

# मोहनदास करमचंद

डॉ. न. म. जोशी

# मोहनदास करमचंद

डॉ. न. म. जोशी

अनुबंध प्रकाशन

अनुबंध प्रकाशन, पुणे ४३.

ISBN - 81 - 86144 - 87 - 0

**मोहनदास करमचंद**

**© डॉ. न. म. जोशी**

मो. ९२२६५७५२९०

प्रथमावृत्ती : म. गांधी स्मृतिदिन, ३० जानेवारी २०१४

**प्रकाशक :**
अ. अ. कुलकर्णी, अनुबंध प्रकाशन
२०२, बालाजी कॉम्प्लेक्स, बालाजीनगर, धनकवडी, पुणे ४३
फोन : (०२०) २४३७२८७१, २४३७३०४४
Email : anubandhprakashan.pune@gmail.com

**अक्षरजुळणी :**
'अक्षरवेल', पुणे ३०

**मुद्रक :**
श्री बालाजी एंटरप्रायझेस्, तलाठी कार्यालयासमोर,
धायरी फाटा, वडगाव बु॥, पुणे

**मुखपृष्ठ :**
सौ. मनीषा पवार

**किंमत : ३०० रुपये**

# मनोगत

*“या गरिबांनो या, झेंडा हाती घ्या*
*“काँग्रेस आमची, गरिबांची सावली,*
*गरिबांची माऊली हाय वो,*
*काँग्रेसचि हाक तुम्हा हाय वो,*
*गांधीबाबाची हाक तुम्हा हाय वो...”*

१९४३-४४ च्या सुमारास पांडू मास्तरांकडून हे गाणं मी ऐकलं. मी सात वर्षांचा होतो. सातारा जिल्ह्यातल्या, पाटण तालुक्यातल्या कोयनेपलीकडच्या दूरस्थ गावी, गारवडे इथं. गारवडं माझं गाव. ज्योतिबाच्या देवळात आम्हा सर्व मुलांना जमवून क्रांतिकारक असलेले पांडू मास्तर आम्हाला गाणं सांगायचे. त्यांच्याबरोबर कै. यशवंतराव चव्हाणही होते. आम्ही पोरं चढ्या आणि खड्या सुरात अशी गाणी गायचो. गांधीबाबाची हाक वयाच्या सातव्या वर्षीच माझ्या कानांवर आली होती. तेव्हा आमच्या लेखी ते महात्मा गांधी नव्हते. तर गांधीबाबाच होते. आमच्या गावाच्या आमच्या राममंदिरात रामदासी होऊन राहणारे गोविंदबुवा आगरकर (सुधारकाग्रणी गोपाळ गणेश आगरकर यांचे बंधू) पूर्वायुष्यात काँग्रेसचे सैनिक होते आणि खांद्यावर खादी कापडाचे तागे घेऊन ते गावोगाव हिंडत ‘जन हो खादी वापरा’ असा गांधीजींचा संदेश पोचवायचे अशी आठवण मला कराडचे कै. पु. पां. तथा बाबूराव गोखले यांनी सांगितली होती.

गारवड्याच्या शाळेत असताना मी एक छोटं गांधीचरित्रही वाचलं होतं. गांधी या ना त्या निमित्तानं माझ्या मन:पटलावर कोरले जात होते. पुढं मी शिक्षणासाठी बाहेर पडलो. सोलापूरच्या हरिभाई देवकरण प्रशालेत पाचवी

सहावीत असतांना..... राष्ट्रीय कीर्तनकार दत्तोपंत पटवर्धनबुवा यांच्या कीर्तनातून पुन्हा गांधी समोर आले. बुवा एक सुंदर पाळणा म्हणत.

पुतळाबाईच्या उदरी जन्मला
मोहन गांधी नाव तयाला
रामचंद्राचा अवतार झाला
जो जो रे बाळा जो.....

हा पाळणा कधी मला गो. रा. कामतकर सर वर्गात म्हणायला सांगत. मीही समरसून म्हणत असे.

अशा तऱ्हेने बालपणापासून 'गांधी' माझ्या अवती भवती होते. एवढ्यात एक अग्निप्रलय झाला.

१९४८ साल! ३० जानेवारीला म. गांधी यांची हत्या झाली. मी त्यावेळी जळगावला मावशीकडे होतो. पण माझे सारे कुटुंबीय माझ्या गारवड्यातच होते ना! ४ फेब्रुवारीला आमचं घर जळलं. मी एप्रिल महिन्यात सुटीसाठी घरी आलो तर माझ्या सुंदर चौसोपी घराचे उध्वस्त, जळके अवशेष मी पाहिले. राखेचे ढिगारे अर्धवट जळलेल्या तुळ्या आणि ओक्याबोक्या भिंती...

माझ्या मित्रांनी मला सांगितलं...

"म. गांधींची हत्या झाली. ती गोडसेनं केली. म्हणून तुमचं घर जाळलं."

मी त्यावेळी बारा वर्षांचा होतो. माझ्या मनात बाराशे प्रश्न उभे राहिले. कोण गोडसे! त्यानं गांधींना का मारलं? त्यानं गांधींना मारलं म्हणून आमचं घर का जाळलं?" कुणी जाळलं? आम्ही गांधीबाबाची हाक गाणं म्हणत होतो त्याच गांधी बाबाच्या नावानं आमचं घर जाळलं? हे कसं काय?

आणि मग तेव्हापासून गांधी हा विषय माझ्या मनात राखेखाली निखारा धुमसावा तसा घुमसत होता.

सातव्या वर्षापासून बाराव्या वर्षापर्यंत गांधी माझ्या मनात भ्रमररूंजी घालत होते. बाराव्या वर्षी घडलेल्या त्या अनाकलनीय पण सुन्न करणाऱ्या आघातानं गांधी घोंघावत होते.

आमच्या कुटुंबाची वाताहत तर झालीच पण पुढची चार वर्ष आम्ही-मी माझी भावंडं, आई, वडिल एकत्र राहू शकलो नाही. पाचजण पाच ठिकाणी होतो. आई भिलवडीला दाईप्रशिक्षण घ्यायला गेली. पोटासाठी पुढं काहीतरी करावंच लागणार होतं ना! एका भावाला मिरजेच्या मावशीनं सांभाळलं. धाकट्या दीड वर्षांच्या भावाला मामा मामीनं कराडला सांभाळलं, मी थोरल्या

मावशीकडे सांगली जळगाव करीत होतो. वडील पुण्यात होतेच. त्यांनी अन्नब्रह्माची उपासना करून झारेपळ्या या शस्त्रांद्वारे जीवनाची लढाई सुरू केली.

ही सगळी वणवण.... त्या गांधीवधोत्तर घटनेनं झाली होती.

मी पुण्यात आलो. केसरी वाड्यात आम्हाला आसरा मिळाला आणि पाच वर्ष लोकमान्यांच्या वास्तूत राहण्याचा योग आला. त्याच जडणघडणीच्या काळात साहित्य, संस्कृती, राजकारण या क्षेत्रातली असंख्य दिग्गज मंडळी बघितली. त्यांना त्या पवित्र वास्तूत ऐकलं. महाविद्यालयीन शिक्षणाच्या काळात मनाची अशी मशागत होत होती. केसरी वाड्यात असतांना एकीकडे स्वा. सावरकर यांच्या सारख्या प्रखर देशभक्ताची सेवा करायला मिळाली, तर त्याचवेळी आचार्य स. ज. भागवत, वि. प्र. लिमये, पोपटलाल शहा, शंकरराव देव, अशा गांधीवादी कार्यकर्त्यांनाही तिथंच जवळून बघता आलं. महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस स्त्री संघटनेनं सूतिका मंदिर या नावाचं प्रसूती गृह चालवलं होतं. माझ्या आईला प्रमुख नर्स म्हणून तिथं नोकरी मिळाली आणि राहायला जागा ही.

या काळखंडात मी वैचारिक दृष्ट्या मोठ्या शृंगापत्तीत होतो. स. प. महाविद्यालयात प्रखर गाढे विचारवंत डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे गुरु म्हणून भेटले आणि त्यांनी मनावरचं मळभ दूर केलं. स्वच्छ नजरेनं उगवतीचा सूर्यप्रकाश ही बघावा आणि मावळतीनंतरचा अंधारही अनुभवावा हे त्यांनी शिकवलं. विवेकनिष्ठा आणि तर्कदृष्टी यांचे वस्तुपाठ डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे यांनी दिले. कोणतीही व्यक्ती, घटना, प्रसंग, विचारप्रणाली विवेकनिष्ठेच्या कसोटीवर तपासून बघावी असं त्यांनी वळण लावलं. आणि वाचन व वाचनोत्तर विचार यांची शिस्त मनाला लागली.

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, गोवा मुक्तिसंग्राम यांचे केंद्र केसरीवाडा असल्यामुळे त्या चळवळी, त्यांतील लढाऊ व्यक्ती यांनाही जवळून बघता आलं. या चळवळीच्यानंतर महाराष्ट्राचाच नव्हे तर देशाचाही राजकीय चेहेरामोहोरा बदलला. अस्सल गांधीवादी कार्यकर्ते अडगळीत पडले आणि 'महात्मा गांधी की जय' असा जयघोष करणारे कडक खादीधारी पुढं आले.

म. गांधी जिल्हा परिषदांच्या कार्यालयात, सचिवालयात, तसबिरीत जाऊन बसले.

वर्धा आणि साबरमती हे गांधी विचारांचे आश्रम पर्यटन स्थळे बनली.

आणि गांधीवादाची जोपासना करणारे सच्चे गांधीवादी कार्यकर्ते या आश्रमातून गांधींना जिवंत ठेवण्याचा प्रयत्न स्वत:च्या प्राणांची बाजी लावून करू लागले.

पुढील काळात तर म. गांधी भारताच्या चलनी नोटेवर स्थानापन्न झाले. आणि म. गांधी हे चलनी नाणे बनले.

एकीकडे स्वत:च्या वैयक्तिक जीवनात गांधीहत्येमुळे निर्माण झालेल्या संकटज्वाळा, आणि दुसरीकडे राष्ट्रीय व सामाजिक जीवनात होत असलेला गांधी विचारांचा 'इस्कोट'....

मनाच्या पोवळ्यावर अनेक गांधील माशा घोंघावत होत्या.

अशाच अवस्थेत एक मणिकांचन योग उद्‌भवला

खरं तर तो दुर्भाग्य योगच म्हणायचा.

पूर्वी सांगितल्याप्रमाणे प्रकृती, परिस्थिती आणि प्रवृत्ती या तीन प्रकारांशी झगडत जीवनाची वाटचाल सुरू होती.

प्रकृतीनं अनेक आव्हानं उभी केली. विशीच्या आतच काही शस्त्रक्रियांना सामोरे जावे लागले. त्यातून उद्‌भवणाऱ्या अनाकलनीय परिस्थितीत चोवीस तासांची डोकेदुखी जडली. डॉक्टरांनी मेंदूची शस्त्रक्रिया करून घेण्याचा सल्ला दिला. ॲलोपॅथीच्या रामबाण उपायांनी तात्पुरतं बरं वाटायचे. पण औषधं बंद झाली की दुप्पट त्रास व्हायचा.

मग गुरुवर्य डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे यांनी उरुळी कांचन येथील निसर्गोपचार केंद्रात जाऊन उपचार घेण्याचा सल्ला दिला. १९६७ साली मी तिथं एक महिनाभर जाऊन राहिलो. हा आश्रमही म. गांधी यांनीच स्थापन केलेला. स्वत: गांधीजी तिथं येऊन राहिले होते. मी होतो त्या काळात श्री. बाळकोबा भावे तिथं असत.

तिथले नियम मी कसोशीने अमलात आणले. पंधरा दिवसांचा उपवास केला. त्यामुळे उपवासाबद्दल आत्मविश्वास निर्माण झाला. बस्ती, कटिस्नान, मातीचेलेप, सूर्यस्नान, वमन, हे सारे उपचार निष्ठेनं करीत राहिलो. बाहेरून दिसायला प्रकृती अर्ध्यावर आली होती. पण आतून मला ताजेपणा वाटत होता. अर्थातच उपवासकाळात दुसरा काहीच उद्योग नसल्यानं मी तिथल्या समृद्ध ग्रंथालयातील जवळजवळ चारशे पुस्तकं वाचली. निसर्गोपचार, पर्यावरण, नई तालीम, विविध गांधी वाङ्मय, सर्वोदय या सर्व पुस्तकांचा मी फडशा पाडला. एकेक पुस्तक वाचत गेलो तसतसा मला नवा प्रदेश गवसत आहे

असं वाटलं. 'दि लास्ट फेज' हे गांधींवरील मोठे खंड वाचले. प्यारेलाल यांनी अत्यंत तपशीलवार लेखन केलंय. शिवाय गांधीजींची आत्मकथा चारपाचवेळा वाचली. आणि मग गांधी मला उलगडत गेले.

वयाच्या बाराव्या वर्षी मला जो प्रश्न पडला होता की माझं घर गांधीचा जयघोष करीत का जाळलं, त्या प्रश्नाची अनावश्यक छळणूक थांबली. आणि अंधाऱ्या गुहेतून अनेक वळणे चालत प्रकाशाच्या वाटेवर यावं, स्वच्छ हिरवळीचा प्रसन्न मार्ग सापडावा तसं झालं. उरुळी कांचन येथील ग्रंथवाचनोत्तर मला असं वाटू लागलं की म. गांधीजींच्या राजकारणाबद्दल कदाचित कोण्या विचारवंतांचे मतभेद असतील तर ते असू देत. पण राष्ट्रोद्धार समाजकारण, वंचितांची, दु:खे, मनोनिग्रह, ग्रामसुधारणा, जीवनाला अर्थामुळे येणारा अर्थ किंवा अर्थामुळे ओढवणारा अनर्थ यातील समतोल, काम आणि राम याचं जीवनातील समायोजन याबाबत गांधीजी किती थोर आहेत! त्यांची ही थोरवी निरपवादपणे गांधीवादाच्या विरोधकांनाही मान्य करावी लागेल.

१९७० हे गांधी जन्म शताब्दीचं वर्ष! प्रख्यात गांधीवादी लेखक विचारवंत व चरित्रकार दा. न. शिखरे यांनी एक दिवस मला गांधीभवनं दाखवलं. त्या गांधीमय वातावरणात मी चार पाच तास होतो. शिखरे म्हणाले. "इतके काय काय लिहिता. अहो. या महापुरुषावर काही तरी लिहा. ललित लेखक आहात. ना. मग चरित्रात्मक कांदबरी लिहा." आणि मग शिखरे यांनी लेखनाचा तगादाच लावला.

उरूळी कांचन येथील आश्रम निवासात पार्श्वभूमी तयार झाली होतीच. बालपणीची गांधीबाबाची हाक आठवली. आणि पुतळाबाईच्या उदरी जन्मलेल्या मोहन गांधी या रामचंद्र अवतारावर कादंबरी लिहिण्याचा निश्चय केला.

नू. म. वि. प्रशाला, स. प. महाविद्यालय, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ यांची समृद्ध ग्रंथालयं मी पुन्हा चाळली. कै. दा. न. शिखरे पाठीशी होतेच. आणि मग जन्मशताब्दी वर्षाव 'प्रेषित' ही कादंबरी प्रकाशित झाली. माझ्या हातून एक चांगली चरित्रकथा लिहिली गेली हे समाधान मला मिळालं. कै. यदुनाथ थत्ते, कै. नानासाहेब गोरे, कै. एस. एस. जोशी यांच्या सारख्या महनीय व्यक्तींनी आणि इतर अनेकांनी कादंबरी वाचून विशेष अभिनंदन केलं.

बरीच वर्ष मधे गेली. एक गोष्ट प्रकर्षानं जाणवत होती. 'प्रेषित' मध्ये मी १९१५ नंतरचे महात्मा गांधी समाविष्ट केलं होते. त्यांचं आफ्रिकेतील कार्य

त्याचं बालपण, थोडक्यात महात्मा म्हणून त्यांच्या जडणघडणीचा काळ प्रेषित मध्ये नव्हता.

मग मजकुराचं पुनर्लेखन केलं. गांधीजींची आत्मकथा समोर होतीच. एक वेगळा प्रयोग करून बघावा म्हणून या पुनर्लेखन केलेल्या मजकुराला नवं प्रथमपुरुषी प्रकरण जोडलं. त्याला नाव दिलं 'स्वगत'. माझी भूमिका स्पष्ट करण्यासाठी प्रदीर्घ मनोगतही लिहिलं. प्रसिद्ध गांधीवादी विचारवंत आणि पद्मविभूषण डॉ. शोभना रानडे यांनी सुंदर प्रस्तावना लिहून दिली.

श्रीमती शोभना रानडे यांच्या प्रस्तावनेमुळे 'मोहनदास करमचंद' ही माझी साहित्यकृती आभूषित स्वरूपात आपणासमोर येत आहे.

अनुबंध प्रकाशनाचे अनिल कुलकर्णी यांनी केवळ प्रकाशक म्हणून नव्हे तर राष्ट्रीय भावनेने प्रेरित होऊन या कादंबरीचे प्रकाशन करण्याचे निश्चित करून माझ्याकडून 'लिहवून' घेतले.

ही माझी कलाकृती वाचकांच्या हाती देतांना मला कृतार्थतेचा परमानंद होत आहे.

या चरित्रात्मक कादंबरीचं नाव, 'मोहनदास करमचंद' असं सरळ सरळ म. गांधीचं नावच मी दिलं आहे. पण त्याचा अन्वयार्थ वेगळा आहे. १९१५ साली म. गांधी भारतात आले. त्यावेळी भारताच्या राजकीय क्षितिजावर टिळकयुगाचा प्रभाव होता. १९२० मध्ये लोकमान्यांच्या देहावसानानंतर गांधीयुग भारतात सुरु झालं. आणि त्यानं सामान्य माणसांना मोहिनी घातली. श्रीकृष्णानं ज्याप्रमाणे आपल्या मधुर मुरलीरवानं गोकुळाला मोहिनी घातली होती त्याप्रमाणे गांधीजींच्या मंत्राची मोहिनी भारतीय जनमानसावर होती. लक्षावधी नि:शस्त्र, सामान्य लोकांना स्वराज्याचा मंत्र उच्चरून इंग्रजाला त्राही भगवान करून सोडण्याचं बळ आलं होतं. या दृष्टीनं गांधीजी मोहन होते.

त्यांच्या वडिलांचे नाव करमचंद! करमचंदाचा हा सुपुत्र कर्मयोगी होता. स्वातंत्र्याचं चक्र गांधीजींनी चरख्याच्या चक्राद्वारे फिरवलं. चरखा हे कर्ममार्गाचं प्रतिक! गांधीजीनी स्वत:च करमचंद होऊन आपल्या वडिलांच्या नावाचे सार्थक केले.

म्हणून या कादंबरीचं नाव 'मोहनदास करमचंद' असेच मी योजले.

माझ्यापूर्वी अनेक नामवंतांनी विविध स्वरूपात 'गांधी' हा विषय साहित्यप्रांती दाखल केला आहे. त्या नामवंतांच्या दिंडीचा मी केवळ वारकरी आहे अशी माझी नम्र भूमिका आहे.

कै. बा. भ. बोरकर यांच्या पंक्ती मला नेहमी स्मरतात.

*"देखणे जे हात त्यांना निर्मितीचे डोहळे*
*मंगलाने गंधलेलं सुंदराचे सोहळे*
*देखणे ते चेहरे प्रांजळाचे आरसे*
*सावळे की गोरटे या मोल नाही फारसे*
*देखणी ती पाऊले जी ध्यासपंथे चालती*
*वाळवंटातून जाता स्वस्ति पद्मे रेखिती."*

म. गांधीजींची पावले अशीच पारतंत्र्याच्या वाळवंटात स्वस्तिचिन्हे उमटविणारी होती.

'मोहनदास करमचंद' म्हणजे अशा मंगलमय प्रेरणादायी, स्वस्तिन्हांचा मागोवा आहे.

**- न. म. जोशी**

# स्वागत

आपल्या ह्या सुंदर विश्वाला २० व्या शतकांत एक मोठी भेट भारताकडून मिळाली आहे. आज जगाच्या कानाकोपऱ्यातून ज्ञात-अज्ञात लोक ह्या भेटीकडे आकर्षित झालेले आहेत. कारण त्यांच्या प्रश्नांची उत्तरे किंवा समस्यांचे समाधान कदाचित ह्या दोनच शब्दाच्या व्यक्तीमध्ये (गांधी) त्यांना सापडेल अशा आशेने ते प्रयत्न करीत आहेत. पुष्कळांना त्यांच्या समग्र जीवनाचे दर्शन हवे आहे. कारण त्यातून योग्य तो बोध घ्यायचा आहे. अनेकांना त्यांच्या पत्नीचे नाव देखील अज्ञात आहे आणि ही मंडळी जेव्हा 'बा'ची समाधी बघतात तेव्हा त्यांची जिज्ञासा अधिकच जागृत होते आणि अधिकाधिक शोध सुरू होतो! त्यात काही शास्त्रज्ञ असतात, विचारवंत असतात तरच बरीच मंडळी निव्वळ 'जिज्ञासू' असतात. खासकरून या सर्व मंडळीसाठी 'मोहनदास करमचंद' ही एक अनमोल भेट आहे! गांधी चरित्राचा हसतखेळत करून दिलेला परिचय म्हणजे हे डॉ. न. म. जोशी लिखित ललित लिखाण आहे. त्याचा गाभा सत्यावर आधारित असून त्याचा साज आधुनिक समाजप्रणालीला आवडेल असा आहे!

सर्व लोकांसाठी लिहिलेली ही कथारूपी कलाकृती जरी असली तरी त्यातून नवीन पिढीला एक नवीन दृष्टी, आचार, विचार त्यांत सापडणार आहेत. म्हणून हे पुस्तक निश्चितच लोकप्रिय होईल ही खात्री वाटते! कारण त्यात माणसाची गरज भागवण्याची कला तर आहेच पण सध्या माणसाला सुटलेली हाव थोपवून धरण्याची देखील शक्ती आहे! विज्ञान हे जरूर जोपासावे पण त्यातून माणुसकी गमावून बसू नये हे गांधींचे मुख्य तत्त्व आणि त्याचा लाभ शेवटच्या माणसाला पण मिळावा ही संकल्पना आहे! त्याबद्दल

लेखकांचे मन:पूर्वक अभिनंदन. कारण त्यांनी नकळत गांधीना आणि त्यांच्या व्रतस्थ जीवनाला अत्युच्च शिखरावर प्रतिष्ठित केले आहे! त्यात 'मोहनदास करमचंद'चे यथार्थ दर्शन आहे.

संत एकनाथ, पैठण येथे असताना, नदीवरून स्नान करून येताना एक मनुष्य पाच वेळा त्यांच्या अंगावर थुंकला. त्यांनी सहजरीत्या सहन केले आणि शेवटी त्या माणसाने त्यांचे पाय धरले! हा एक वैयक्तिक सत्याग्रहाचा नमुना म्हणता येईल. पण गांधीनी त्याला सामूहिक रूप दिले आणि त्यासाठी सतत स्वाध्याय, रचना आणि संघटन अतिशय चातुर्याने केले. त्यातून एक प्रचंड शक्ती विकसित झाली आणि नंतर गांधीनी हा प्रयोग राजकीय क्षेत्रांत पण यशस्वी केला आणि त्यामुळेच ते जनरल स्मट्स्ना म्हणू शकले की, 'मी लढा जिंकणार, तुमच्या विरोधात जिंकणार पण तुमच्या सहकार्यानेच जिंकणार.' या सत्याग्रह शक्तीचा प्रभाव या पुस्तकात ठिकठिकाणी अतिशय सूक्ष्मतम पद्धतीने वर्णन केलेला दिसतो. संपूर्ण लिखाण स्वच्छ व सरळ आहे आणि वाचत असताना मनाची पकड घेणारे आहे! काही ठिकाणचे संवाद इतके प्रभावी आहेत की अक्षरश: वाचकाच्या डोळ्यातून अश्रू ओघळतात आणि वाचणारा एकरूप होतो आणि वाचक स्वत:ला विसरून जातो!

वेगवेगळ्या घटना, प्रसंग, संवाद, भेटीगाठी ह्या अतिशय मार्मिक पण ललित शब्दांत लिहिल्यामुळे एक वेगळ्या अनुभव येतो आणि सामान्य वाचक मंत्रमुग्ध होतो.

विशेष करून कस्तुरबांचे योगदान, त्यांची मूकसेवा पण खंबीर स्वभाव, मनाला स्पर्शून जातो. त्यांचे गांधीसोबतचे ६२ वर्षांचे वैवाहिक जीवन हे एक सतीचे वाण होते. वरवर पाहणाऱ्या माणसाला ही गांधींची पत्नी निव्वळ पतीपरायण वाटत असेल पण त्यांचा अंतरात्मा नेहमी मुक्त, स्वतंत्र असाच राहिला. श्री. गोकुळदास माकनजींची ही सुकन्या म्हणजे ही छोटीशी सुंदर मूर्ती. पण एक सुर्वगुणसंपन्न गृहिणी होती. त्यांनी स्वहस्ताने कातलेल्या सुताची पांढरशुभ्र साडी उठून दिसत असे. आश्रमवासी आणि अतिथींची विचारपूस आणि आदरातिथ्य हा त्यांचा विशेष गुण होता. ही 'बा' तर शेतकऱ्यांची आईच होती. भुकेल्यांना अन्न आणि उघड्यावाघड्या लोकांना वस्त्र परिधान देणे हा तर त्यांचा स्वधर्मच होता. १९१५ साली फिनिक्स आश्रमांतील गांधीजींच्या प्रयोगाच्या त्या प्रथम शिष्या होत्या आणि त्यांनी निष्ठेने पावले टाकली. दोघांचे सहजीवन हा एक आदर्श नमुना होता आणि

म्हणूनच गांधीनी "पुर्नजन्म जर असेल तर हीच पत्नी मला जन्मोजन्मी मिळावी" अशी प्रार्थना कस्तुरबांच्या चितेसमोर केली होती.

अशा या आदर्श आणि अलौकिक जीवनाचे सुंदर दर्शन लेखकाने अतिशय हळूवारपणे आणि यथार्थ भावनेने केलेले अनेक जागी या पुस्तकात दिसून येते.

हे पुस्तक वाचावयास सुरुवात केली की, ते एखाद्या मनोरंजक कादंबरीप्रमाणे शेवटपर्यंत वाचतच रहावे आणि कधीच संपूच नये असे निश्चितच वाटते. सर्व वाचकांना हा अनुभव नक्कीच मिळेल.

३० जानेवारी, १९४८ या दिवशी नेहरू भावनावश होवून म्हणाले होते की, 'भारतातील प्रकाश आता लोपला आहे' पण लगेच त्यांनी स्वत:ला सावरले कि 'नाही, माझे हे म्हणणे चुकीचे आहे, कारण इतकी वर्षे ज्या प्रकाशाने या देशाला उजळून टाकले आहे तो प्रकाश अजून पुष्कळ काळ टिकणार आहे आणि त्यामुळे या विश्वातील अनेकांची अंतर्मने सतत उजळून निघणार आहेत.

'मोहनदास करमचंद' हे पुस्तक हे कार्य निश्चितच करील हा विश्वास वाटतो.

**शोभना रानडे**
विश्वस्त सचिव
गांधी राष्ट्रीय स्मारक समिती
आगाखान पॅलेस, पुणे ४११००६

# स्वगत

मी मोहनदास करमचंद गांधी!

माझी आत्मकथा सत्याचे प्रयोग-मी यापूर्वीच लिहिली आहे. पण यापुढच्या पानांत मी वेगळ्या स्वरूपात लोकांच्या पुढे येणार आहे. त्या माझ्या कादंबरीमय चरित्रकथेची नांदी म्हणून मी माझं स्वगत समोर ठेवतोय....

करमचंद तथा कबा गांधी आणि पुतळीबाई यांचा मी सर्वात धाकटा मुलगा. गुजराथेत पोरबंदरला जन्मलो. पोरबंदरला सुदामापुरी असंही म्हणतात.

सुदामापुरीच्या शाळेत मी जाऊ लागलो. कसेबसे काही पाढे शिकलो. पण या पाढ्यांबरोबरच पंतोजींना शिव्या द्यायलाही शिकलो.

सात वर्षांचा असताना वडिलांबरोबर राजकोटला गेलो. शाळेत मी यथातथाच विद्यार्थी होतो. हो. पण मी एक गोष्ट मात्र सांगतो. मी अत्यंत भिडस्त होतो. राजकोटच्या शाळेतला एक प्रसंग मला अजून आठवतो. जाइल्स नावाचे शाळा खात्याचे तपासनीस आले होते. त्यांनी आम्हा मुलांना पाच शब्द लिहायला सांगितले. त्यांतला एक शब्द होता केट्ल (Kettle). माझी वर्णरचना चुकली होती. माझ्या शिक्षकांनी मला बुटाचं टोक टोचून सावध केले होते. मला कॉपी करता आली असती. पण मी नाही केली. इतर सर्वांचे पाचही शब्द बरोबर आले. मी मात्र वर्गात शेवटचा ठरलो.

मला शाळेच्या पुस्तकातले धडे वाचायला आवडायचे नाहीत. पण माझ्या वडलांनी एक नाटकाचे पुस्तक आणले होते. श्रवण पितृभक्ती. हे पुस्तक मी खूप वेळा वाचले. एकदा एक नाटकही पाहिलं. नाव होतं हरिश्चंद्र! ते मला फार आवडलं. माझ्या मनावर या नाटकाचा सखोल परिणाम झाला. सर्वांनीच हरिश्चंद्रासारखे सत्यवादी व्हायला हवे असे मला वाटे.

मी तेरा वर्षाचा झालो. आणि माझ्या जीवनात एक नवा योग आला.

घरात तीन भावांची लग्नं एकत्र लावून देऊन थाटमाट करायचा असे वडीलधाऱ्यांनी ठरवले. माझ्या लग्नाच्या वेळी वडील अजारी होते. मी जी पुस्तके वाचत होतो त्यामध्ये एकपत्नीव्रत पाळणे हा पतीचा धर्म आहे असे वाचले. मग माझ्या मनात विचार आला की पत्नीनेही एकपतीव्रत पाळले पाहिजे.

माझी पत्नी कस्तुरबाई निरक्षर होती. लग्न झालं तेव्हा साधी सरळ, मेहनती आणि मितभाषी.

या वयात मी हायस्कुलात शिकत होतो. विवाहामुळे माझे एक वर्ष फुकट गेले. आता पुढचे काही शिक्षण इंग्रजीतून होते. पण मला त्यावेळी इंग्रजीत मुळीच गती नव्हती. भूमिती माझ्या नावडीचा विषय! त्याच्या बरोबरीने पुढे संस्कृत माथी आले. माझे शिक्षक कृष्णशंकर यांनी मला अभ्यासाची गोडी लावली. त्यांचे उपकार मी जन्मभर विसरलो नाही.

शालेय वयात एका दुर्गणी मुलाशी माझी मैत्री वाढली. मीच ती मुद्दाम वाढवली. त्या मुलाला सुधारावे असा माझा उद्देश होता. पण या आमच्या मैत्रीला घरच्यांचा, आणि माझ्या पत्नीचाही विरोध होता.

आणखी एक गंमत मुद्दाम सांगायची आहे. मी शालेय वयात खूप भित्रा होतो. भुतेखेते, चोर, साप यांचं मला फार भय वाटे. माझ्यापेक्षा कस्तुरबा धीट होती. आपण बलवान होण्यासाठी मांसाहार केला पाहिजे असे मला वाटू लागले. आमच्या घरी मांसाहार हे परमपाप होते. मांसाहाराचा मुहूर्त केला. पण ते खाणं मला मुळीच आवडलं नाही. मांसाहारबरोबरच मला धूम्रपान करावं असं वाटू लागलं. धूर काढून बघितला. पण पुढं त्यातही रस वाटेना. मी एकदा चोरीही केली. पण मन स्वस्थ बसू देईना. वडिलांजवळ कबुली दिली. चिठ्ठी लिहिली. आणि मनावरचं चोरीचं दडपण दूर होऊन मी मोकळा झालो. वडील संतापी होते. खरं तर त्यांनी मला कठोर शिक्षा केली असती. पण काय आश्चर्य!

माझे रुग्ण वडील... त्यांनी चिठ्ठी हाती धरली... वाचली... आणि फाडून टाकून ते पुन्हा आडवे झाले. पण त्यांच्या चेहेऱ्यावरचे भाव... व्यथित होते.

वडिलांचा व्यथित चेहेरा पाहून मला मनोमन शिक्षा झाली होती. आणि त्याच क्षणी मला अहिंसेचा वस्तुपाठ मिळाला होता.

मी उत्तर आयुष्यात आफ्रिकेत व नंतर आपल्या देशात जो अहिंसात्मक लढा दिला त्याची प्रेरणा मला या घटनेतून मिळाली.

आमच्याकडे एक दाई होती. तिच्या तोंडी सदैव रामनाम असे. मला भुताची भीती वाटली की ती मला रामनाम घ्यायला सांगायची. रंभा दाईनं माझ्या मनात रामनामाचं बीज पेरले. माझा एक चुलतभाऊ रामभक्त होता. त्यानं आम्हा दोघा भावांना रामरक्षेची संथा दिली. पोरबंदरला मी एका महाराजांच्या रामायण प्रवचनाला जात असे. मला खूप आवडायचं त्यांचं प्रवचन. राजकोटला आल्यावर मी रामायणाबरोबरच भागवत वाचले. वाचायच्या आधी ऐकले.

वडलांकडे पारशी, जैन असे निरनिराळ्या संप्रदायांचे लोक येत. त्यांचे संवाद मी लक्षपूर्वक ऐकले. सर्वधर्मसमभावाची बीजं इथं पेरली गेली. १८८७ साली मी मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास झालो. भावनगरच्या शामलदास कॉलेजात गेलो. सहा महिने झाल्यावर सुट्टीत घरी आलो. कॉलेजात माझं मन रमलं नाही.

मावजी दवे यांना आम्ही जोशीजी म्हणत असू. आमच्या कुटुंबाचे मित्र होते. त्यांनी आग्रह केला की मी विलायतेला पुढील शिक्षणासाठी जावं आणि बॅरिस्टर होऊन यावं. घरात, घराबाहेर, नातेवाईकांमध्ये माझ्या विलायतवारीबद्दल खूप चर्चा झाली. पण माझ्या मनात 'विलायत' पक्की होती. मी उंटावरून पोरबंदरला गेलो. तिथून राजकोटला परतलो. आणि मुंबईला जायला निघालो. माझ्या विलायतवारीला काही विघ्ने आली. पैशांची तरतूद हा अडथळा तर होताच. पण धार्मिक दृष्ट्याही काही लोकांना ती मंजूर नव्हती. मला वाळीत टाकण्याचे प्रयत्न झाले. पण माझा निश्चय ढळला नाही.

मुंबई बंदर सोडताना मी मनाचा निश्चय केला होता. येईल त्या वादळवाऱ्याला तोंड द्यायचं. साउदॅप्टन बंदरात पोचलो. माझे मार्गदर्शक डॉ. प्राणजीवन मेहता यांनी मला पुस्तकी शिक्षणाबरोबरच कुठल्या तरी कुटुंबात राहून अनुभव घेण्याचा सल्ला दिला. त्यांनीच माझी व्यवस्था केली. पण माझ्या शाकाहारी भूमिकेमुळे माझी बरीच अडचण होऊ लागली. 'अन्नाहाराचे समर्थन' हे सॉल्टचे पुस्तक मी वाचले आणि निरामिष भोजनाचा माझा निश्चय दृढ झाला. माझा दिनक्रम सुरु झाला.

विलायतेत मी शोभलो पाहिजे म्हणून नवे कपडे शिवले. माझे कुटुंबातले शिक्षण आणि बॅरिस्टरीचे शिक्षण सुरु झाले.

विलायतेहून मी परतलो. माझी आई निवर्तली होती. मी आता बाप

झालो होतो. भारतात काहीतरी करणं आवश्यक होतं. वकिली करायची तर कुठे आणि कशी यावर माझा विचार होत नव्हता. माझ्या मित्र मंडळींनी मला सुचवलं की मुंबईला जाऊन हायकोर्टाचा अनुभव घ्यावा.

मग मी आलो मुंबईत. कामं मिळायला हवी होती. सुदैवानं ममीबाईचा दावा माझ्याकडे आला. पण... दलालाला कमिशन द्यावे लागणार म्हणून मी तो नाकारला. मी प्रवाहाविरूद्ध पोहत होतो. मला त्याची किंमत मोजावीच लागणार होती. तरीही मला ममीबाईचा दावा मिळाला. त्याचे तीस रु. मिळाले.

माझं बिऱ्हाड गिरगावात होतं. पंचेचाळीस मिनिटांची पायी चाल करून मी कोर्टात जात असे. या चालीचा मला शेवटपर्यंत उपयोग झाला. पण मला आता मुंबईचा कंटाळा आला होता. मी परत राजकोटला आला.

माझ्या बंधूंच्याच एका केससंबधी विलायती अंमलदाराला भेटायला गेलो होतो. माझी इच्छा नव्हती. पण भावासाठी गेलो. गरजवंत होतो ना!. अंमलदाराचा गर्विष्ट स्वभाव! मला सहन नाही झाला. त्याला त्याच्याच भाषेत खडसावून परतलो. मनात पुष्कळ घालमेल सुरू होती. आता कुठंतरी सुरक्षित नोकरी धरावी असाही एक विचार मनात चमकून गेला.

आणि एक नवी वाट माझ्यासाठी खुली झाली.

एका मेमन पेढीचा दक्षिण आफ्रिकेत मोठा व्यापार होता. त्या पेढीचा चाळीस हजार पौंडांचा एक दावा तिकडं सुरु होता. त्या दाव्याचं काम मी बॅरिस्टर असल्यानं बघावं असा त्या पेढीनं मला आग्रह केला.

एक वर्षासाठी आफ्रिकेत जायचे. येण्याजाण्याचं फर्स्टक्लासचं बोटीचं भाडं आणि आणि राहण्या जेवण्याचा खर्च तर मिळणारच होता. शिवाय १०५ पौंड मला मिळणार होते.

मी दक्षिण आफ्रिकेला जायचं ठरवलं. मी आफ्रिकेतील नाताळच्या डरबन बंदरात पोचलो. नवा प्रदेश, नवं काम, नवे लोक, नवे वातावरण! अब्दुला शेठ हे माझे तेथील अशील होते. त्यांना इस्लामचा अभिमान होता.

दक्षिण आफ्रिकेत एक वेगळाच अनुभव मला आला

हिंदी लोकांचे आपपसातच वेगवेगळे गट होते.

मुसलमान व्यापारी होते ते स्वत:ला अरब म्हणत.

हिंदू किंवा पारशी कारकुनांचा वेगळा गट होता. पारशी स्वत:ला पर्शियन म्हणत. हिंदू कारकून त्रिशंकूसारखे होते.

पण इथं आणखी एक मोठा गट होता. तो म्हणजे 'गिरमिट्यांचा'. हे

गिरमिटे कोण! गिरमिट म्हणजे करार. बरेच लोक करार किंवा आग्रिमेंट (गिरमिट) करून इथं येतात. अग्रिमेंट करून जे आले ते गिरमिटे. मी ही एक गिरमिट्याच!

मला तिथं कुली बॅरिस्टर असं इंग्रजी गोरे म्हणू लागले.

ज्यांनी मला आफ्रिकेत बोलावलं होतं त्या अब्दुल्ला शेठच्या सल्ल्याप्रमाणे मी इंग्रजी टोपी न वापरता माझी गुजराथी पगडीच डोईवर घालू लागलो. माझ्याच पगडी धारणेबद्दल मी तिथल्या वर्तमानपत्रांना पत्रे पाठवली. मला खूप प्रसिद्धी मिळाली. आगंतुक पाहुणा (अन्वेल्कम व्हिजिटर) अशी माझी संभावना झाली. अब्दुल्ला शेठनी मला डरबनहून प्रिटोरियाला पाठवलं. त्यांनी माझ्यासाठी पहिल्या वर्गाचं तिकिट काढलं होतं. रात्रीसाठी बिछाना हवा असेल तर स्वतंत्र पाच शिलिंगाचं तिकिट काढावं लागे. मी पाच शिलिंग वाचवले. कारण माझ्याजवळ माझं अंथरूण होतं.

रात्री नऊ वाजले. मॅरित्सबर्ग इथं गाडी पोचली. तिथं एक गोरा उतारू आला. माझ्याकडे त्याने काहीशा वक्र दृष्टीने पाहिलं. उपेक्षेनं पाहिलं. तो उतरला आणि पोलिसांना घेऊन आला.

"तुम्हाला शेवटच्या डब्यात जावं लागेल." पोलीस मला दरडावून म्हणाले.

"माझ्याजवळ पहिल्या वर्गाचं तिकिट आहे." मी ठामपणे म्हणालो.

"ते असू द्या. पण तुम्हाला त्या डब्यात बसता येणार नाही. उतरा तुम्ही"
"नाही उतरणार."

"उतरावं लागेल."

मग एक शिपाई पुढं आला. त्याने माझा हात पकडला. धक्का मारून त्यानं मला खाली खेचलं. माझं सामानही डब्याच्या बाहेर काढलं. मी त्यांच्या म्हणण्याप्रमाणे दुसऱ्या डब्यात गेलो नाही. गाडी तर निघून गेली. माझं सामान रेल्वेच्या माणसांनी कुठं ठेवलं कळलं नाही.

थंडीचा कडाका होता. मी कुडकुडू लागलो. माझ्या सामानात माझा ओव्हर कोट होता. मी विचार केला. काय हा अन्याय! केवढा वर्ण द्वेष! काळा आणि गोरा यांमध्ये केवढी दरी!

सकाळ झाली. तशाही अवस्थेत मी दादा अब्दुल्लांना तार करून सगळी हकिकत कळवली. मग त्यांनाही ताबडतोब मॅरित्सबर्गच्या काही हिंदी व्यापाऱ्यांना कळवलं. ते मला भेटायला स्टेशनवर आले. त्यांच्याकडून जे समजलं ते मन

विषण्ण करणारं होतं. सगळ्याच हिंदी लोकांना अशी वागणूक होती. मग दुसऱ्या गाडीनं चार्ल्सटाऊनला आलो. तिथून मला जोहान्सबर्गला जायचं होतं. जातांना मला स्टँडर्डट्नला राहावे लागणार होते. तिथं जायला घोडागाडी होती. तिथंही मला अपमानास्पद वागणूक मिळाली. एका गोऱ्या माणसाने, त्याला विडी पिण्याचा लहर आली म्हणून, मला माझी जागा बदलून गाडीच्या फळीवर बसायला सांगितले.

"मी तिथं बसणार नाही." मी ताड्कन उत्तर दिलं.

आणि मग... तो मला गुद्दे मारू लागला. खाली ओढू लागला. तो गोरा चांगला धटिंगण होता. इतर प्रवाशांना माझी दया आली.

"नको रे त्याला मारू" असे ते कळवलात त्याला म्हणाले. त्यानं मारण्याचं बंद केलं तरी माझ्याकडं डोळे वटारून तो रागानं बघत होता.

"स्टँडरटनला पोचल्यावर तुझ्याकडे बघून घेईन. असा त्याचा आविर्भाव होता.

जोहान्सबर्गला पोचलो. तिथं ग्रँड नॅशनल हॉटेलमध्ये गेलो. तिथल्या मॅनेजरनं माझ्याकडं चमत्कारिक नजरेनं बघितलं आणि काहीशा उपेक्षेच्या सुरातच म्हणाला,

"सर्व खोल्या भरल्या आहेत. जागा नाही." मग मी अब्दुल गनी शेठ यांना महंमद कासम कमरुद्दिन यांच्या दुकानी भेटलो. दादा अब्दुल्ला शेठ यांनी गनी शेठला माझ्याबद्दल आधी कळवून ठेवलं होतं. अब्दुल गनी शेट म्हणाले.

"अहो तुम्ही हिंदी, तुम्हाला हॉटेलात उतरू देणारच नाहीत."

"का पण?"

"ते तुम्हाला इथं राहिल्यावरच कळेल. आम्ही व्यापरी इथं मारून मुटकून राहतो. कारण आम्हाला पैसे कमवायचे असतात. आम्ही इथे अपमान सहन करीतच जीवन कंठत असतो. तुम्हाला प्रिटोरियाला जायचं आहे ना? तुम्हाला तिसऱ्या वर्गानेच जावे लागेल."

"मी फर्स्टक्लासमधूनच जाणार. ते जमलं नाही तर घोडागाडी."

"अहो, तसं करणं तुम्हाला अवघड. वेळ आणि पैसा, व्यर्थ जाईल.

मग मी रेल्वे स्टेशनवर आलो. मी बॅरिस्टर असून मला प्रथम वर्गानेच प्रवास करायचा आहे आणि प्रिटोरियाला वेळेवर पोचायचं आहे अशी स्टेशनमास्तरला चिठ्ठी पाठवली.

मग इंग्रजी पोशाखात स्टेशनवर गेलो. फर्स्टक्लासचं तिकिट मागितलं.

स्टेशनमास्तरनं माझ्याकडं रोखून बघितलं आणि तो म्हणाला. "तिकिट देतो. पण वाटेत गार्डानं तुम्हाला खाली उतरवलं आणि तिसऱ्या वर्गाच्या डब्यात बसायला सांगितलं तर तुम्ही उतरलं पाहिजे. नाहीतर मी गोत्यात येईन. मला तुम्हाला तिकिट दिल्याबद्दल जाब द्यावा लागेल."

गाडीत गेलो. पहिल्या वर्गाच्या डब्यात बसलो. पुढं गार्ड आलाच. त्याने मला तिसऱ्या वर्गाच्या डब्यात जाण्याविषयी सांगितलं. पण मी मुरकटून बसून राहिलो. डब्यात एकच इंग्रज होता. तो म्हणाला.

"बसू दे याला इथे. त्याच्याजवळ तिकिट आहे."

"तुम्हाला कुलीबरोबर बसायचं असलं तर खुशाल बसा असं म्हणून तो गार्ड फणफणत निघून गेला.

प्रिटोरियाला पोचलो. मला इथं हॉटेल मिळेल का अशी शंका वाटू लागली. बाहेर अंधार आणि मनातही अंधार! विषममतेची काजळी जणू सर्वत्र पसरली होती. एका अमेरिकन हवशानं मला एक हॉटेल दाखवलं. तिथल्या मालकानं रात्रभर राहू यायचं कबूल केलं. पण एक अट घातली माझं जेवण मी माझ्या खोलीतच द्यायचं.

विषमतेच्या ज्वालात भाजणारे आणि अपमानाचे चटके सहन करणारे ते जीवन! अनेक हिंदी लोक तसंच जगत होणे.

श्री. बेकर हे अब्दुल्ल शेठचे आफ्रिकेतले वकील. त्यांना मी भेटलो. त्यांनी एका बाईकडे पस्तीस शिलिंग भाडे ठरवून मला राहण्याची सोय करून दिली. श्री. बेकर हे ख्रिस्ती धर्माचे अभ्यासक होते. त्यांनी मला चर्चमध्ये प्रवचनांना येण्याबद्दल सांगितले. बेकरच्या विनंतीप्रमाणे मी माझ्याच कामाच्या व्यापातून सवड करून चर्चमध्ये जाऊ लागलो. तिथं निरनिराळे लोक भेटायचे. चर्चा व्हायच्या. श्री. कोट्स नावाच्या गृहस्थांची चांगली ओळख झाली. त्यांनी मला अनेक धार्मिक ग्रंथ वाचायला दिले. मला आता तिथच्या हिंदी लोकांच्याही ओळखी करून घ्यायच्या होत्या. मला असं वाटलं...

सगळ्या हिंदी लोकांना एकत्र करावं. त्यांच्यासमोर त्यांच्याच कथा आणि व्यथा मांडाव्यात. प्रिटोरियात हिंदू वस्ती फारशी नव्हती.

शेठ तय्यब हाजीखान महंमद यांनी मला याबाबत मदत करण्याचं आनंदानं मान्य केलं.

आणि आफ्रिकेतील माझ्या कामाची नांदी झाली.

शेठ हाजी महंमद यांच्या घरी सभा भरली. सभेला हिंदी लोक आले

होते. मुख्यत्वे मेमन व्यापारी होते. सभा सुरु झाली. सभेतलं माझं पहिलंच भाषण! माझी तयारी खूपच होती.

पण मला आधी ऐकायच्या होत्या त्या त्यांच्या कथा आणि व्यथा.

सभा सुरु झाली सभेत मी जे विचार मांडले त्यांचा परिणाम चांगला झाला असावा. सभेला अनेक 'गिरमिटे' कुली, सामी, व्यापारी, सर्व जण उपस्थित होते. मी म्हणालो.

"आपण हिंदी आहोत हे विसरता कामा नये. हिंदू, मुसलमान, पारशी, खिश्चन किंवा मद्रासी, पंजाबी, सिंधी, असले भेद विसरून सर्वांनी एकत्र यायला हवं. हिंदी लोकांना जे क्लेश होतात, अपमान सोसावा लागलो. त्यावर गंभीर विचार करू या. अंमलदारांच्या गाठीभेटी घेणे. अर्जविनंत्या करणे, त्यांच्यापुढे आपल्या समस्या मांडणे या गोष्टी आवर्जून करायला हव्यात. या कामी मला जेवढा वेळ मिळेण तेवढा मी निरपेक्षपणे देईन."

लोकांनी पसंतीच्या टाळ्या वाजवल्या. या सभेत मी आणखी एक गोष्ट सुचवली. इंग्रजी शिका असं मी लोकांना सांगितलं. ज्यांची शिकण्याची तयारी आहे. त्यांच्यासाठी मी स्वत: वर्ग घेईन असं आश्वासन दिलं.

वर्ग निघाला नाही. पण दोघेतिघे तयार झाले. त्यांना मी घरी जाऊन इंग्रजी शिकवू लागलो.

आम्ही आमच्या विचारविनिमयसभा नियमितपणे घेऊ लागलो.

हिंदी लोकांसाठी आफ्रिकेत निरनिराळे कडक कायदे होते. हिंदी लोकांचे अनेक हक्क हिरावून घेण्यात आले होते. ट्रान्सवाल मध्ये एक कायदा होता. प्रत्येक हिंदी माणसाला प्रवेश फी म्हणून तीन पौंड द्यावे लागत. त्यांना विशिष्ट भागातच राहता येत असे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे हिंदी लोकांना फूटपाथवरून चालण्याचा हक्क नव्हता. अशा अन्यायकारक कायद्यांमुळे माझा हिंदी जनतेबद्दलचा कळवळा खूपच वाढला.

दक्षिण आफ्रिकेतील हे वातावरण कसं बदलता येईल यावर मी विचार करू लागलो. माझं खरं काम होतं, दादा अब्दुल्ला यांचा दावा! त्याची तयारी तर मी करत होतोच. पण त्याचवेळी माझी उर्मी मला स्वस्थ बसू देईना. मन उसळी मारत होते. स्वातंत्र्य साद घालीत होतं.

दावा संपला. आता मला प्रिटोरियात राहण्याचं काहीही कारण नव्हतं. मला आता डरबनला जाऊन हिंदुस्थानात जाण्याचे परतीचे वेध लागले होते. अब्दुल्लाशेठनी सिडनेहॅममध्ये माझ्या निरोपाची एक मेजवानी दिली. तिथं एका

वर्तमानपत्रातल्या मजकुरानं माझं लक्ष वेधलं. मी अस्वस्थ झालो. नाताळच्या विधिमंडळात सभासद निवडून देण्यासाठी हिंदी लोकांना मताधिकार होता. तो काढून घ्यावा अशी ती बातमी होती.

मी या बातमीचा विचार करू लागलो. का बरं असं व्हावं? आणि ब्रिटिश लोकांनी तसं ठरवलं तरी इथंच जन्मलेले, इंग्रजी शिकलेले अनेक तरूण हिंदी लोक आहेत, त्यांनी ऐकून का घ्यावं? त्यांनी चळवळ का करू नये? त्यांना स्वत:च्या हक्कांची जाणीव नाही का?

अब्दुल्ला शेठना मी याबाबत विचारलं. ते म्हणाले...

''आम्हा लोकांना व्यापारातलं कळतं. बाकीच्या कायदेशीर बाबी आम्हाला समजत नाहीत. आणि इंग्रजी शिकलेल्या व इथंच जन्मलेल्या तरुणाचं म्हणाल तर... ते बरेच ख्रिश्चन आहेत. त्यामुळं ते धर्मगुरुच्या, पाद्री लोकांच्या प्रभावाखाली असतात. आणि बरेच धर्मगुरू गोरे ... ते सरकारी मताचे असतात. ते कशाला या गोष्टींचा विचार करतील!''

''हा तुम्हा लोकांवर अन्याय आहे. तुम्ही या विरूद्ध आवाज उठवलाच पाहिजे.''

मी त्या सर्वांना समजावून सांगितलं.

''मग तुम्ही आता परत न जाता महिनाभर अजून राहा. आम्हाला मार्गदर्शन करा. आम्ही तुमच्या सांगण्याप्रमाणे करू.'' लोकांनी मला खूप आग्रह केला आणि माझा हिंदुस्थानात परतण्याचा बेत लांबला. माझ्या पुढं आता आणखी एक नवं कार्यक्षेत्र होतं. वैधानिक लढाई होती. अन्यायाचा कायदेशीर प्रतिकार होता.

नाताळमधल्या हिंदी समाजाचे नेते होते हाजी महंमद हाजीदादा. अब्दुल्ला शेठच्या घरीच हाजीदादांच्या अध्यक्षतेखाली हिंदी लोकांची सभा झाली. हिंदी लोकांचे मताधिकार काढून घेणाऱ्या कायद्याचं नाव होतं. ''फ्रँचाइज बिल'' या फ्रँचाइझ बिलाला विरोध करण्याचं या सभेत एकामतानं ठरलं.

खरं तर या बिलाचं दोन वेळा नाताळ विधिमंडळात वाचन झालं होतं. पण हिंदी लोकांनी त्याला विरोध नोंदवलेला नव्हता. ही उदासीनता होती. काहीशी बेफिकिरीही होती. या उदासीनतेचाच लाभ उठविण्याचं सरकारनं ठरवलं होते. एका वर्तमानपत्रात टीका आलीच होती...

''हा कायदा इतका कडक असताना हिंदी लोकांकडून थोडाही विरोध झाला नाही हाच हिंदी समाजाच्या बेफिकिरीचा आणि हा मताधिकार भोगण्याच्या

नालायकीचा मोठाच पुरावा आहे.''

मग याबाबत मी एक अर्ज तयार केला. शेकडो लोकांनी त्यावर सह्या केल्या. राष्ट्रीय हक्कांबद्दल लढण्याची प्रेरणा या चळवळीमुळे मिळाली.

अर्जावर दहा हजार सह्या होत्या. आणि मी इथंच रहावं असं मला वाटू लागलं. इतरांनाही तसंच वाटलं. पण माझी पोटापाण्याची व्यवस्था काय? तोही प्रश्न लोकांनीच सोडवला. वीस व्यापाऱ्यांनी एकत्र येऊन मला वर्षाला ठराविक रक्कम देण्याचे ठरविले.

मला इथं वकिली करायची होती. मी बॅरिस्टर होतो. पण इथली सनद घेणं आवश्यक होतं.

माझी वकिली ही माझ्या दृष्टीनं दुय्यम होती. मला सार्वजनिक कामात अधिक रस होता. मग एक सार्वजनिक संस्था स्थापन करण्याचा मी निश्चय केला. अब्दुल्ला शेठ आणि माझे अनेक व्यापारी मित्र यांची मला सहानुभूती होती संस्थेबाबत एक मोठा प्रश्न पुढे आला...

संस्थेचं नाव काय असावं!

या बाबीत संस्थेला 'काँग्रेस' हेच नाव द्यावे असे मी सुचविले. आणि.... २२ मे १८९४ रोजी एक नवी संस्था स्थापन झाली. त्या संस्थेचं नाव होतं. 'नाताळ इंडियन काँग्रेस'

या संस्थेसाठी वार्षिक तीन पौंड वर्गणी ठरविण्यात आली. हळूहळू काँग्रेसचे सभासद वाढत गेले. दरमहिन्याला सभा होत. कधीकधी आठवडा उलटला की लगेच सभा बोलावली जाई.

या संस्थेचा हिशोब आणि तिचं कामकाज चोख ठेवणं हे मोठं आव्हानच होतं. ते काम तर आम्ही करत होतोच. पण काँग्रेसचा जन्म ज्या विशिष्ट हेतूनं झाला त्याबाबत मी स्वत: आग्रही होतो.

सार्वजनिक कामाला पैसे लागतातच. पण पैसे गोळा केले तरी संग्रह करायचा नाही. हिशोब चोख ठेवायचा हे आमचं पहिलं तत्त्व होतं. दुसरं म्हणजे वसाहतीत ज्यांच्या जन्म झाला त्या सुशिक्षित हिंदी लोकांची सेवा करणं. त्यासाठी एका शिक्षण संस्थेची मी स्थापना केली. अल्प वर्गणी, त्यांच्या गरजा ओळखून त्यांना चर्चामंडळ द्वारे ज्ञान देणे, स्वत: विचार करायला लावणे अशी कामे आम्ही केली. त्यासाठी एका छोट्याशा ग्रंथालयाचीही सोय केली. तिसरं मोठं काम म्हणजे येथील हिंदी लोकांच्या स्थितीबाबत आणि त्यांच्यासाठी करावयाच्या कामाबाबत बाहेर प्रसार करणे. त्यासाठी मी दोन

पुस्तिकाही लिहिल्या. त्या सर्वत्र पाठवल्या.

नाताळ इंडियन कॉंग्रेस हळुहळू बाळसं धरू लागली. सुशिक्षित, व्यापारी यांनी पाठिंबा दिला तरी गरीब मजूर, गिरमिट्ये या लोकांनीही यावं असं मला सारखं वाटत होतं. त्यासाठी त्यांची कामं करणं आवश्यक होतं. अशा वेळी एक निमित्त मला मिळालं.

बालासुंदरम् नावाच्या एका मद्रासी माणसाला त्याच्या मालकानं बेदम मारलं होतं. त्याचे दात पडले होते, तोंडातून रक्त गळत होतं. बालासुंदरम् माझ्याकडे आला. मी त्याला डॉक्टरचे प्रमाणपत्र आणायला सांगितलं. ते तो घेऊन आला. मग मी पुराव्यासह मॅजिस्ट्रेटकडे गेलो. बालासुंदरम्ला न्याय मिळाला. आणि साहजिकच सर्व गिरमिट्यांमध्ये मी लोकप्रिय झालो. माझी कीर्ती थेट भारतात मद्रासपर्यंत गेली. कारण तेथील अनेक गिरमिट्ये आफ्रिकेत आले होते.

आता मी हिंदी गिरमिट्यांचा आणि त्यांच्या समस्यांचा अधिकाधिक अभ्यास करू लागलो.

१८८४ साली हिंदी गिरमिट्यांवर दरवर्षी पंचवीस पौंड एवढ्या मोठ्या रकमेचा कर लादण्याबाबत नाताळ कॉंग्रेसने बिल आणले होते. मी त्या बिलाला विरोध केला. नाताळ इंडियन कॉंग्रेसने चळवळ उभारली. मग कराची रक्कम तीन पौंड झाली. ही चळवळ अनेक दिवस चालली. कित्येकदा गोळीबाराला तोंड द्यावे लागले. दहा हजार गिरमिट्ये व हिंदी यांनी तुरुंग भरले. पण अंती सत्याचा विजय झाला.

वकिली, चळवळी, समाजसेवा हे कार्य सुरू असतानाच माझं वाचन आणि चिंतन यांची साथ मी कधी सोडली नाही.

मॅक्समुल्लर यांचे एक पुस्तक मी वाचले. त्याचे नाव 'हिंदुस्थान काय शिकवतो.' त्याचवेळी कार्लाइलने लिहिलेलं महंमदचरित्र वाचलं. टॉल्स्टॉय या महान लेखकाची पुस्तकं वाचली. काही ख्रिस्ती कुटुंबांच्या परिचयामुळे मी चर्चमध्ये जात होते. लाइट ऑफ एशिया या ग्रंथाच्या वाचना नंतर मी येशू आणि बुद्ध यांच्या जीवनाचा विचार करू लागलो.

दक्षिण आफ्रिकेत येऊन मला तीन वर्ष घेऊन गेली होती. माझी वकिली तिथं चांगली चालली होती. आता मला काही काळ भारतात जायचं होते. आफ्रिकेला बिऱ्हाड थाटावं असं वाटू लागलं.

मी भारतात गेलो तर इथली कामे कोण बघणार? कॉंग्रेसचे काम कोण

करणार? मग मी ती जबाबदारी माझ्या दोन सहकाऱ्यांवर सोपवली. आदमजी मियाखान आणि रूस्तुमजी यांनी ही जबाबदारी घेतली.

मी भारतात येण्यासाठी पोंगोला बोटीने निघालो. चोवीस दिवसांच्या प्रवासानंतर बोट कलकत्त्याला आली. भारतभूमीवर पाय ठेवताच मला भरून आलं. आपला देश, आपली माती. आता मुंबईला जायचं. गाडीने मुंबईला निघालो. वाटेत तीर्थक्षेत्र प्रयाग! तिथं गाडी पंचेचाळीस मिनिटे थांबणार होती. तेवढ्यात मी शहरात फेरी मारून आलो आणि माझी औषधं आणली. पण गाडी निघून गेली होती. स्टेशन मास्तरनं माझं सामान मात्र उतरवून घेतलं होतं.

मग प्रयागमध्ये राहिलो. तिथून मुंबईला न जाता थेट राजकोटला गेलो. राजकोटला मी एक पुस्तिका लिहिली. ती दहा हजार लोकांना पाठवली. माझे आफ्रिकेतले अनुभव होते त्या पुस्तिकेत.

मुंबईला याच सुमारास प्लेगची साथ आली होती. ती राजकोटपर्यंत येण्याची शक्यता होती. राजकोट हे संस्थान होते. राजकोटमध्ये प्लेगप्रतिबंधक योजना सुरू झाली. मी ही त्या योजनेत सहभागी झालो. अनेक सुधारणा करायच्या होत्या. संस्थानाने नेमलेल्या कमिटीचा मी सभासद झालो. शौचकूपांच्या अवस्थांबाबत आम्ही पाहणी केली. सुधारणा सुचवल्या. काही वस्त्यांत तर शौचकूपच नव्हते. पण आश्चर्य असं की शौचकूप नसले तरी त्यांची घरं साफ होती. सारवलेली होती.

अंतर्बाह्य शुचितेवर भर देऊन मी या कामाला गती दिली.

माझ्या मेव्हण्याचे देहावसान झाले होते. त्यासाठी मला मुंबईला जावे लागले. मुंबईहून पुण्याला आलो. लोकमान्य टिळकांना भेटलो. टिळकांची लोकप्रियता अफाट होती. त्यांच्या भेटीनंतर मी नामदार गोखले यांना भेटायला गेलो. त्यांचा माझा पूर्वी परिचय होताच.

गोखले यांना तर मी गुरुस्थानी मानावे अशी माझ्या मनाचा स्थिती होती. गोपाळ कृष्ण गोखले मला गंगौघासारखे वाटले. त्यांच्या सहवासाने मी पावन झालो. त्यांनी मला पुन्हा भेटायला सांगितलं.

पुण्याहून मी मद्रासला गेलो. आफ्रिकेत मी बालासुंदरम् बाबत केलेलं काम मद्रासमध्ये खूप लोकांना माहीत होतं. तिथं माझी एक सभा झाली. मद्रासमध्ये अनेकांचे प्रेम मिळाले.

मद्रासहून कलकत्त्याला गेलो. तिथं मी सुरेंद्रनाथ बॅनर्जींना भेटलो. माझ्या

आफ्रिकेतील कामाची माहिती त्यांना होती. सुरेंद्रनाथांनी मला सांगितले,

"ब्रिटिश इंडियन असोसिएशनच्या प्रतिनिधींना भेटा"

माझ्या या भारत भेटीत मी दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या समस्यांचा येथील लोकांना परियच करून देत होतो.

डरबनहून तार आली.

"लगेच परत फिरा. पार्लमेंट जानेवारीत भरणार आहे." आता मला आफ्रिकेला परत जाणं आवश्यक होतं. जायचं कसं? तोही प्रश्न सुटला. दादा अब्दुल्ला यांनी 'कूरलँड' नावाची एक बोटच विकत घेतली होती. या बोटीतून मी सहकुटुंब आफ्रिकेला निघालो.

माझ्याबरोबर कस्तुरबा, माझे दोन मुलगे आणि माझ्या मेव्हण्यांचा एक मुलगा होता.

सहकुटुंब समुद्रप्रवास मी प्रथमच करीत होतो. मी नाताळला निघालो होतो. पुढं माझ्या आफ्रिकेतील जीवनात जी वादळं यायची होती त्यांची जणू पूर्वसूचनाच समुद्रातल्या वादळाने दिली आणि आमची बोट चार दिवस उशीरा पोचली. समुद्रात वादळ... मनात वादळ... सर्व प्रवासी चिंतित होते. बोटीला प्रचंड हेलकावे बसत होते. पण तुफान शमलं आणि आम्ही डरबनला सुखरूप पोचलो.

आम्ही निघालो त्यावेळी मुंबईला प्लेग होता. मग आमची इथे कसून आरोग्य तपासणी झाली. डॉक्टरी तपासण्या झाल्या. आणि पाच दिवस आम्हाला क्वारंटाइनमध्ये टाकण्यात आलं.

हा निर्णय केवळ आरोग्यविषयक नव्हता. आम्हाला परत घालवून देण्याचे कारस्थान होते. मी बोटीवरील लोकांना धीर देत होतो. नाताळ प्रांत हिंदी लोकांनी भरून टाकण्याचा माझा डाव होता असा गोऱ्या लोकांचा माझ्यावर आरोप होता. पत्नी व मुले यांना रुस्तुम शेठ यांच्याकडे सुखरूप जाऊ देण्यात आले. पण मला मात्र गोऱ्या अधिकाऱ्यांनी जणु अटकावच केला.

माझ्याविरूद्ध तिथं बरंच वातावरण तापवलेलं होतं. माझ्याबरोबर मि. लॉटन नावाचे गोरे अधिकारी होते. आम्ही रस्त्याने चाललो होतो. तोच लॉटन काहीसे बाजूला होताच माझ्यावर दगड धोंडे आणि कुजकी अंडी यांचा मारा सुरु झाला. कुणीतरी माझी पगडी उडवली. आणि मला लाथांचा प्रसादही मिळाला. एका हिंदी तरूणाने हे दृश्य पाहून पोलिसांत वर्दी दिली. पोलिस आले. त्यांच्याबरोबर मी रुस्तुम शेठ यांच्या घरी गेलो.

माराने अंग ठणकत होतं. एका ठिकाणी रक्त आले होते. रुस्तुम शेठनी डॉक्टर बरजोर यांना बोलावलं. उपचार झाले.... पण बाहेर....

घराला गोऱ्या लोकांचा वेढा पडला होता. लोक माझ्या नावाने आरोळ्या देत होते. अलेक्झांडर नावाच्या पोलिस अधिकाऱ्याबरोबर मी वेषांतर करून बाहेर गेलो. पोलिस ठाण्यातच गेलो.

माझ्यावर हल्ला करणाऱ्यांवर खटले भरण्याची तयारी पोलिसांनी दाखवली. पण मी कोणाबद्दलही तक्रार नाही असे लेखी लिहून दिले.

माझ्या अहिंसेच्या प्रयोगांना सुरूवात झाली होती. आफ्रिकेत पुढे मी अनेक आंदोलने केली. सत्याग्रह केले. त्यासाठी मला या घटनेतून मनोबल मिळाले. आणखी एक प्रश्न मला भेडसावत होता,

माझ्या मुलांच्या शिक्षणाचा. गोऱ्या लोकांसाठी असलेल्या शाळांमध्ये हिंदी मुले शिकू शकत नव्हती. माझ्या मुलांना तिथं प्रवेश मिळाला असता. पण हिंदी इतर मुलांचे काय?

मग मी माझ्या मुलांसाठी एक इंग्रजी शिक्षिका घरीच नेमली. बरेच विषय मी स्वत: शिकवीत असे. हा माझा प्रयोग मुलांच्या दृष्टीने परिपूर्ण नाही याची मला जाणीव होती. गृहशिक्षण व शाळेतले शिक्षण यामध्ये मी समवाय केला. माझा प्रयोग माझ्यापुरता तरी यशस्वी झाला.

वकिली चाललीच होती. माझी समाजसेवाही मला स्वस्थ बसू देत नव्हती. एकदा एका महारोग्याला मी माझ्या खोलीत नेलं. त्याच्या जखमा धुतल्या. आणि मग त्याला सरकारी इस्पितळात पाठवलं. मग रुग्णसेवा आणि बालसंगोपन ही क्षेत्रेही माझ्या आवडीची झाली.

आपल्याला आपलं जीवन विशिष्ट तऱ्हेने जगता आलंच पाहिजे यावर माझ्या कटाक्ष होता. मी स्वावलंबनाच्या वाटा शोधल्या. स्वत:चे कपडे स्वत: धुणे, एवढेच नव्हे तर स्वत:चे केस स्वत:च कापणे असे प्रयोग मी करू लागलो. काही वेळा माझी टिंगलटवाळी झाली. पण मी ती सहन केली.

बोअर युद्धामध्ये घायाळ सैनिकांची मी सेवाशुश्रुषा केली. १८९७, १८९९ साली भारतात मोठा दुष्काळ पडला होता. माझ्या देशासाठी मला काहीतरी करायचं होते. दक्षिण आफ्रिकेतून मी दुष्काळ फंडं गोळा केला. काही गोऱ्या इंग्रजांनीही वर्गणी दिली. पण मला आता पुन्हा एकदा भारतभेटीची आस लागली होती. माझ्या मित्रमंडळींनी मला नाखुषीनेच निरोप दिला. हिंदी लोकांनी मला अनेक भेटवस्तू दिल्या. सत्कार केले. नजराणा म्हणून काही

दागिनेही मिळाले. ते विकून मी त्याचा ट्रस्ट केला. १९०१ साली मी पुन्हा भारतात आलो. कलकत्त्याला काँग्रेसची महासभा होती. सर दिनशा वाच्छा याचे अध्यक्ष होते. या महासभेत दक्षिण आफ्रिकेत हिंदी लोकांविषयी मी ठराव मांडला. ठराव एकमताने पास झाला.

याच सुमारास मला आणखी एक गोष्ट खटकली. लॉर्ड कर्झन यांच्या दरबारात पुष्कळ मोठमोठे लोक व राजेमहाराजे आले. सजूनधजून, अलंकार घालून आले होते. इतर लोक विशेष वेष परिधान करून आले होते. धन, सत्ता आणि मानमरातब यांचा पोकळ डौल मला तिथं बघायला मिळाला.

या भेटीत मला मोठा लाभ झाला. तो म्हणजे नामदार गोखले यांचा दीर्घ सहवास. गोखले यांचाशी संवाद करणे, त्यांच्याबरोबर फिरायला जाणे ही एक मेजवानीच होती. माझ्या मनातील अनेक शंकांचे निवारण गोखले करीत. त्यांच्या सूचनेनुसार मी भारतातील निरनिराळ्या समाजांचे निरीक्षण केले. समाजमन अभ्यासले. लोकांना भेटलो. चर्चा केल्या. धर्म, संस्कृती, भाषा रीती रिवाज या बाबात निरीक्षणे केली. काही वेळा मी गोखले यांच्याबरोबरच प्रवासाला जात असे. अशा एका प्रवासात मी तीर्थक्षेत्र काशीला गेलो. रेल्वेच्या तिसऱ्या वर्गाने प्रवास केला. तिथली अस्वच्छता, ओंगळपणा यांचा अनुभव घेतला. लोकांचे वागणे समजले. काशीत मी एका पुजाऱ्याकडे उतरलो. दक्षिणेच्या प्रश्नावरून त्याचे शिव्याशाप मिळाले. तेही अनुभवले.

काशीविश्वेराच्या या ईश्वरीय प्रवासानंतर मला एका विशेष विभूतीला भेटायचे होते. त्यांचे नाव ॲनी बेझंट! त्या नुकत्याच मोठ्या आजारातून उठल्या होत्या. मी त्यांचा निरोप घेऊन मुंबईला आलो.

नामदार गोखले यांची खूप इच्छा होती की, मुंबईला येऊन राहावं. मी प्रथम राजकोटलाच राहिलो. गोखले यांच्या इच्छेप्रमाणे मुंबईला आलो. चेंबर्स भाड्याने घेतल्या. गिरगावात बिऱ्हाड केलं. माझा मुलगा मणिलाल तिथं आजारी पडला. मी त्याला जलोपचार करून पाहिले. मणिलाल बरा झाला. पण माझं गिरगावातलं घर राहाण्यासारखं नव्हतं. ओल होती. घर बदलायला हवं होते. मग सांताक्रूझला एका बंगल्यात राहायला गेलो. दक्षिण आफ्रिकेतील माझी आशिलं मला काही द्रव्य पाठवीत होतीच. पण मला इथं हायकोर्टाचं काम अजून मिळत नव्हतं. पण ते मिळेल अशी शाश्वती वाटत असतानाच आफ्रिकेतून तार आली.

"चेंबरलेन येत आहेत. तुम्हाला इकडे आले पाहिजे."

आफ्रिकेतून येतांना मी माझ्या लोकांना वचन दिले होते की तुम्ही हाक मारताच मी हजर असेनं. मला वचन भंग करायचा नव्हता.

बिऱ्हाड मुंबईलाच ठेवायचे ठरले. मी पुन्हा आफ्रिकेत डरबनला गेलो. मी आफ्रिकेत गेलो खरा. पण लक्षात असं आलं की कावेबाज इंग्रजांनी हिंदी प्रतिनिधींना घोळवत ठेऊन हाती काहीच दिलं नव्हतं. श्री. चेंबरलेन दक्षिण आफ्रिकेत आले ते काही देण्यासाठी नव्हे तर साडेतीन कोटी पौंड ब्रिटनला घेऊन जाण्यासाठी.

महायुद्धोत्तर काळात आफ्रिकेची स्थिती उजाड झाली होती. हिंदी लोकांचे हाल चालले होते. ट्रान्सवाल हा मुलुख तर वैराण झाला होता. ट्रान्सवाल भागात काही काम करणे आवश्यक होते. ट्रान्सवालमध्ये हिंदी लोकांना राष्ट्रीय हक्कांसाठी खूप झगडावे लागणार होते.

आता बराच काळ मला दक्षिण आफ्रिकेत राहावे लागणार होते. एकीकडे माझे समाजकार्य सुरु होते तर दुसरीकडे माझे शाकाहाराचे आणि जलचिकित्सेचे प्रयोग सुरू होते. याचवेळी मातीच्या उपचारांचेही प्रयोग मी करून पाहिले प्रत्येक वेळी वैद्य किंवा डॉक्टर गाठून धावपळ करण्यापेक्षा या निसर्गउपचाराने बरं वाटेल असे मी लोकांना सांगत राहिलो.

जोहान्सबर्गमध्ये एशियाटिक अंमलदाराचं ठाणं होते. तिथं असं समजलं की जे योग्य हक्कदार आहेत त्यांना आफ्रिकेत यायला खूपच अडचणी येतात आणि ज्यांचा हक्क नाही ते शंभर पौंड भरून बिनधोक येतात. हा प्रचंड अन्याय होता. माझ्याकडे याबाबत खूप तक्रारी येत होत्या. मी पुराव्यांसाह पोलीस कमिशनरकडे जात होतो. वरिष्ठ इंग्रज अधिकाऱ्यांना माझ्या या हालचाली पसंत नव्हत्या. पण मी सत्यमार्गावर चालत राहिलो. लोकांसाठी काम करीत राहिलो.

या काळात निरनिराळ्या निमित्ताने इंग्रजांचे स्वभावविशेष बघायला मिळाले. उद्योगाप्रियता, कार्यनिष्ठा यांचाही अनुभव मला आला. माझ्या कार्यालयात एका इंग्रज स्त्रीची नेमणूक मी केली होती. वक्तशीरपणा, काटेकोरपणा याचे ती उत्तम उदाहरण होती. हिंदी लोकांच्या वसाहती, त्यांच्या समस्या, त्यांना भोगावे लागणारे हाल, त्यातच प्लेगची साथ अशा अनेक समस्यांनी लोक त्रस्त झाले होते.

एकदा मी जोहान्सबर्ग ते नाताळ असा रेल्वेप्रवास करीत होतो. मला पोचविण्यासाठी आलेले मि. वेस्ट यांनी माझ्या हाती एक पुस्तक ठेवले आणि

ते म्हणाले "हे वाचा आवडेल तुम्हाला." प्रवास चोवीस तासांचा. पुस्तक होतं. अन् टु दिस लास्ट... लेखक रस्किन. पुस्तक वाचू लागलो. आणि ते सोडवेना या पुस्तकाचं पुढं मी सर्वोदय या नावाने भाषांतरही केले. या पुस्तकाचा माझ्या मनावर विलक्षण परिणाम झाला. मनाची कवाडं सताड उघडली आणि त्यातून एक स्वच्छ सुगंधी झोत आला. तो विचार झोत म्हणजे सर्वोदय.

सर्वोदय कल्पनेवर आधारित एखादी वसाहत असली पाहिजे असं मला. तीव्रतेने वाटू लागले. एखादी शेतजमीन घ्यावी, तिथं शेत वसाहत करावी. सर्वांनी एकसारखा पण पोटापुरता पगार घ्यावा. आपापली शेती करावी. उरलेल्या वेळात 'इंडियन ओपीनियन' या संस्थेचे काम करावे. या वसाहतीत जीवनावश्यक अशा सर्व गोष्टी असतील. सर्वांनी सर्वांसाठी श्रम करून सर्वांचे जीवन सुखी करायचे ही सर्वोदयाची कल्पना इथं राबवायची.

मग फिनिक्स आश्रमाची उभारणी झाली. पाण्याचा झरा असलेली वीस एकर जमीन खरेदी केली. त्याला लागून ऐंशी एकरांचा एक भाग ही घेतला. रुस्तुमशेठ या सर्व साहसांमध्ये माझ्याबरोबर होते. इंडियन ओपिनियन छान चालले होते. एक बातमी येऊन थडकली. नाताळमध्ये 'झुलू' बंड उसळले होते. झुलू बंडात उसळलेल्या सामाजिक उत्पातामुळे तिथं गंभीर परिस्थिती निर्माण झाली होती. मला नाताळला जावे लागणार होते. मग फिनिक्स मध्ये कोण राहणार? कस्तुरबाईंनी ती जबाबदारी घेतली.

आफ्रिकेच्या माझ्या निवासात मला कोणता महत्त्वाचा लाभ झाला असेल तर तो म्हणजे सत्याग्रह या अन्यायाविरूद्ध लढण्याच्या शस्त्राची उत्पत्ती. याशिवाय निसर्गोपचार, मनोनिग्रह, व्रतस्थ राहणी, समूह जीवन यांबाबतही मला खूप प्रयोग तिथं करता आले. आफ्रिकेत कस्तुरबाईला तीन वेळा जीवावरचं दुखणं बेतले. पण तिनं धीरानं माझ्या सर्व प्रयोगात मला साथ दिली. आफ्रिकेतील माझा आणखी एक प्रयोग म्हणजे टॉलस्टॉय आश्रम! त्याबद्दल सविस्तर सांगायला हवं. पण आता एवढंच सांगतो की हा एक आगळावेगळा शैक्षणिक प्रयोग होता. पुस्तकी शिक्षणा बरोबरच शरीरश्रम आणि हस्तकौशल्य यांचा उपयोग करून जीवनाभिमुख शिक्षण इथं दिलं जात होते. टॉलस्टॉय आश्रमात समूहजीवनाचा सुंदर पाठ दिला जात होता.

पण आता अशी स्थिती निर्माण झाली होती की मला आता माझ्या भारतभूमीकडे जावेच लागणार होते. शरीर आणि मन... या दोघांनीही भारतमातेची

आठवण काढली होती. वास्तविक१९०५ सालीच मी कायमचा स्वदेशी येणार होतो. पण दहा वर्षांनी तरी मला मायभूमीकडे येता येणार होतं. माझ्या परतीबाबत भारतातही औत्सुक्य होतं असे म्हणतात. ना. गोखले यांनी तर अनेक सभासंमेलनांची व्यवस्था करून ठेवली होती. मी येण्यापूर्वीच फिनिक्स मधली काही मंडळी हिंदुस्थानला येऊन पोचली होती...

आमची बोट मुंबई बंदराला लागली... आणि माझ्या अंतरंगात आत्मिक समाधानाचे तरंग उसळू लागले.... भारतमाता मला वेगळ्याच कारणासाठी खुणावत होती...

आता पर्यंत हे माझे स्वगत मी मोकळेपणाने मांडले आहे. पण प्रथमपुरुषी लिहिणं किंवा बोलणं हे फार काळ करू नये. अहंकाराचा वारा न लागो माझ्या चित्ता... मीपणा नको......

म्हणून हे प्रथम पुरुषी स्वगत थांबवतो. तरीही पुढची माझी जीवनकथा वाचायला मिळणारच आहे. पण प्रथमपुरुषात नाही. हा मोहनदास करमचंद दुसऱ्या कुणाला तरी कसा दिसला ते समजण्यासाठी आता मोहनदास या रंगमंचावरून दूर होत आहे. आता दुसऱ्या कोणाच्या तरी लेखणीतून त्याची कहाणी साकारणार आहे....

❖

# एक

उगवतीला सूर्यगोल दिसू लागला. शनिवारचा दिवस असल्यानं नेहमीच लवकर जागी होणारी मुंबई आज आणखी लवकर जागी झाली. समुद्र तर किनाऱ्याशी केव्हाचा खेळत होता. प्रवासाला निघालेले समुद्रवारे झोपून उठलेल्या मुंबईच्या कानात कुजबुजले, "ऊठ मुंबापुरी, स्वागताला सिद्ध हो. आज गांधी येणार." जीवनकलहाच्या वेडात धावणारी ती अवखळ नगरी क्षणभर थबकली. गांधी या अक्षरद्वयांच्या श्रवणानं तिचं अंगांग शहारून गेलं.

तसं पाहिलं तर इतर अनेक नावांसारखं गांधी हे नाव. पण या नावानं आफ्रिकेत केलेल्या चमत्काराच्या वार्ता नित्यश: मुंबईच्या किनाऱ्यावर येऊन धडकत होत्या. वर्णद्वेषानं बरबटलेल्या त्या भूमीत हिंदी मन मृत झालं होतं. त्यात चैतन्याचं वारं फुंकून त्याला जाग आणली ती गांधींनी. ब्रिटिशांच्या जुलुमी टाचेखाली वर्षानुवर्ष चिरडल्यामुळं लोळागोळा झालेलं आणि अस्तित्वहीन होऊ पाहणारं हिंदी मन आकारास येऊ लागलं, 'न्याय हवा' म्हणून घोषणा देऊ लागलं. हाताशी ना शस्त्र, पाठीशी ना सत्ता; अशा यात्रेकरू अवस्थेत एका ऐतिहासिक राजवटीशी सामना द्यायला हा सुशिक्षित वारकरी आफ्रिकेच्या वाळवंटात उतरला होता आणि हा हा म्हणता त्यानं तिथं रानं फुलविली. आफ्रिकेतली ही विजयपताका खांद्यावर घेऊनच गांधी भारताकडे यायला निघाले होते. आणि म्हणूनच मुंबापुरी त्या दिवशी कमालीची उत्सुकली होती.

अपोलो बंदराचं आवार पुरं गजबजून गेलं होतं. गांधींच्या स्वागताला आतुरलेली मनं तिथं गोळा झाली होती. अवघा भारत प्रतीकरूपे तिथं जमला होता. काठियावाडी फेटे होते, मराठी पगड्या होत्या, लखनवी झब्बे होते, पार्शी टोप्या होत्या, मुसलमानी अचकन होते, युरोपियन कोट-पाटलोणी होत्या.

नरोत्तम मोरारजी गोकुळदासांची मोटार येऊन थडकली. तशी लोकांनी त्यांना वाट करून दिली. पेटिट आणि हॉर्निमन आधीच येऊन धक्क्यावर थांबले होते. या सर्वांना बोटीवरच गांधीजींची भेट घ्यायची होती.

दूरवरून बोटीचा एक ठिपका अथांग सागराशयावर हेलकावताना दिसला तशी धक्क्याच्या फलाटावर आणखी गर्दी झाली. "आई, याच बोटीतून गांधी येणार ना गा?" कुणा लहानग्या मुलानं आपल्या आईचं बोट घट्ट धरीत विचारलं.

"होय बेटा. आता येईलच बोट. तुला मी उंच करून दाखवीन हं." आई उत्तरली.

"आई"

"काय बेटा?"

"कसे असतील गं गांधीजी?"

"आता मला तरी काय ठाऊक? आपण पाहू या आता..."

"गांधीजी लहानपणी भुताला भीत असत. मग आता कसे ग ते एवढे शूर झाले?"

आई नुसतीच हसली. मुलाच्या प्रश्नाचं उत्तर तिच्याही आवाक्याबाहेर होतं. लहानपणी कमालीचा मुखदुर्बळ असलेला मोहनदास, भुताखेतांना भिणारा, सशाचं काळीज असलेला मोहनदास... यानं भुतापेक्षा भयंकर राजवटीशी लढाई केली कशी, सामना दिला कसा!

समुद्रपक्षी बंदराभोवती रुंजी घालू लागले आणि बोट नजिक आल्याची वार्ता त्यांनी आणून पोचवली. अल्पावधीत बोट धक्क्याला लागली आणि अनेक उत्सुक नजरा बोटीच्या दाराचे लचके तोडू लागल्या. नरोत्तम मोरारजी, पेटिट, हॉर्निमन, आणि आणखी कितीतरी लोक बोटीला जोडणाऱ्या लाकडी फलाटावरून आत गेले. नरोत्तमदासांनी गांधींच्या गळ्यात एक सुबक पुष्पहार घातला. चांदण्यासारखं संथ स्मित करीत गांधीजींनी त्याचा स्वीकार केला. आणि लगेच गळ्यातून काढून शेजारी असलेल्या एक छोट्या मुलाच्या हातात दिला.

"प्रवास कसा झाला?" हॉर्निमननी विचारलं.

"रामकृपेनं इथवर तर ठीक झाला!" गांधीजी उत्तरले.

"आपल्याला पाहण्यासाठी बाहेर खूप लोक आतुरलेत. चलावं आपण." पेटिट हसत हसत म्हणाले.

"मी इतका प्रेक्षणीय असेन याची कल्पना नव्हती मला. चला" असं म्हणत गांधीजी सर्वांपुढे चालू लागले. बोटीतले इतर उतारू ओढाळ गुरांसारखे अजून बाहेर येतच होते. बाहेरच्या जमावाला अजून गांधीजी दिसले नव्हते. एवढ्यात कोणीतरी म्हणाले, "ते पहा, तेच गांधीजी" लाकडी फलाटावरून तुरुतुरू धावल्यासारखी ती व्यक्ती म्हणजे गांधीजी यावर कुणाचाच विश्र्वास बसत नव्हता. काठियावाडी फेटा, पैरण आणि धोतर अशा वेषात बॅरिस्टर गांधी आणि मागं होत्या त्यांच्या पत्नी कस्तुरबा. त्याही तशाच साध्या.

"बॅ. मोहनदास करमचंद गांधी की-"

"जय"

अपोलो बंदराची हवा या जयकारानं सुगंधित झाली. जमावावर स्मिताचे शिडकावे करीत गांधीजी पुढं गेले. मोठ्या कष्टानं वाट काढीत त्यांची वाहिनी दूर गेली तरी जमावाचे डोळे त्यांचा पाठलाग करीतच होते.

"आपल्या निवासाची व्यवस्था सांताक्रूझला जव्हेरीभाईंकडं केली आहे." नरोत्तमदास म्हणाले.

"कुठंही करा हो. नाहीतर आमचा आपला नेहमीचा निवास आहेच. आफ्रिकेतला."

"नेहमीचा कुठला?"

"तुरूंग. मोठा छान निवास असतो. माणसाला तुरुंगात जितकं स्वातंत्र्य लाभतं तितकं बाहेर खचित नाही."

"आपल्या आहाराचीही योग्य व्यवस्था केली आहे."

"म्हणजे आमच्या चमत्कारिक राहणीचा तुम्हा लोकांना फारच त्रास होणार एकूण."

"त्रास कसला. उलट सर्व लोक सर्व गोष्टी आनंदाने करताहेत."

"आता रेवाशंकरभाईंच्या घरी बिस्किटं, पाव, केक यांच्याऐवजी भुईमुगाचे दाणे, ऑलिव्ह तेल हे पदार्थ दिसू लागणार तर."

"दिसू लागणार नाही. दिसू लागलेत."

वाहिनीच्या काचेतून रेवाशंकरभाईंचा बंगला दिसू लागला. बंगल्याभोवतीही बरीच वर्दळ होती. बंगल्याच्या बागेत छोटी-मोठी फुलझाडं होती. मधल्या रिकाम्या जागेत माणसांचे घोळके मोठे मजेदार दिसत होते.

गांधीजी येताच बाग एकदम रिकामी झाली. तिथं राहिली ती फक्त हलू न शकणारी फुलं. पण त्यांनीही आपल्या माना झुकवून उत्सुकता दाखविली.

सत्कारसमारंभांची शेकडो आमंत्रणं आधीच येऊन थडकली होती. लोकाराधनेखातर ते नको असलेले सत्कार स्वीकारावे लागणार होते. जनतेच्या मनोभूमीवर उगवलेली ही आदरभावनेची नाजुकसाजुक फुलं इतक्या सहजासहजी खुडून टाकता येणारी नव्हती. म्हणून जिथं जिथं सत्कार झाले तिथं तिथं गांधीजी गेले पण आंतरिक अनिच्छेनं; पुष्पमालांनी जीव गुदमरून जात होता. पुष्पहारांच्या ठिकाणी दिसत होते ब्रिटिश सत्तेचे पाशवी फास आणि पुष्पगुच्छांच्या ठायी दिसत होत्या हाती पडणाऱ्या जुलुमी बेड्या.

एक दिवस असाच एक सत्कार होता. तेच गुळगुळीत शब्द, तसेच हार आणि तोच सारा उपचार. सभा खूप उशीरा संपली. वाहिनीतील सामानाची जागा गांधींना मिळालेल्या हारतुऱ्यांनी गच्च झाली होती. गांधींच्या डाव्या हाताला कस्तुरबा आणि उजव्या हाताला फेरोजशहा मेथा होते, वाहिनी चालत होती, रस्ता कापीत होती. गांधीजी बोलत नव्हते. दिव्यांच्या रांगांनी उजळलेल्या निर्मनुष्य रस्त्यावर त्यांची दृष्टी पुढं पुढं धावत होती.

"गांधीजी, आपण काही बोलत नाही?" मेथाजींनी त्या नि:शब्द शान्ततेचा फुगा फोडला.

"मेथाजी, आता काही बोलावंसं वाटत नाही."

"का बरं? आपण तर वकील."

"आता कुठं वकील राहिलो आहे मी बोलायला. मेथाजी, एक विचार बोलू?"

"अवश्य."

"शान्तिनिकेतनला जावं म्हणतो. आणि मग यात्रेला."

"अजून कितीतरी निमंत्रणं राहिली आहेत मुंबईतली."

"कळवून टाकतो या साऱ्यांना नकार. आता पुरे झाले हे समारंभ." डाव्या बाजूकडून खुदकन हसण्याचा आवाज आला. कस्तुरबा पदराआड तोंड लपवून हसू दाबत होत्या.

"का हसलात?"

"उगाच. आत्ता जे आपल्याला सुचलं ते पहिल्याच दिवशी कसं सुचलं नाही म्हणते मी."

"झाली चूक. पण ती सुधारू नये असं थोडंच आहे?"

'शान्तिभवन' दिसू लागलं. पायऱ्या चढताचढता गांधीजी कस्तुरबांना म्हणाले, "आपली निघण्याची तयारी करा. उद्या आपण कलकत्त्याला जाऊ."

आणि कस्तुरबा पुन्हा एकदा मघासारखंच अर्थपूर्ण हसल्या.

धूर ओकत धावणारी हावरा एक्स्प्रेस भुसावळला येऊन थडकली होती. भुसावळही सोडलं तेव्हा ती आणखी वेगानं धावू लागली. ठिकठिकाणच्या स्थानकांवर गांधीजींना भेटण्यासाठी माणसं येत होती. हार घालत होती, टाळ्या वाजवत होती, घोषणा देत होती. भुसावळ सोडलं तेव्हा डब्याची दारं बंद करायला सांगून गांधीजी खिडकीला पाठ लावून बसले आणि सामानाच्या पेटीतून त्यांनी गीतेचं पुस्तक काढलं. पंधरावा अध्याय वाचू लागले.

**ऊर्ध्वमूलमधःशाखम् अश्वत्थं प्राहुरव्ययम्**
**छंदासि यस्य पर्णानि यः स्तं वेद सवेदवित्।**

... वाटेवर अनेक स्थानकं आली आणि गेली. गांधीजींच्या डब्याचं दार उघडलं नाही. पंधरावा अध्याय संपला, सोळावा, सतरावा, अठरावा... आणि मग पुन्हा पहिल्यापासून सुरू.

गाडीचा वेग मंदावला. स्थानक जवळ आल्याची ती खूण होती. एवढ्या अंतरावरूनही गाडीच्या खडखडाटात स्थानकावर जमलेल्या जमावाच्या घोषणा ऐकू येत होत्या. गांधींचं गीतावाचन सुरूच होतं. कस्तुरबा ते ऐकत होत्या, पहात होत्या. स्थानकावर गाडी येताच कस्तुरबांनी त्यांच्या हातातलं पुस्तक ओढून काढलं.

"हे काय?" गांधीजींनी चमकून विचारलं.

"योग्य तेच." कस्तुरबा शान्तपणे उद्गारल्या. "खिडकी उघडा आणि लोकांना दर्शन द्या."

"पण गीता..."

"कशाला वाचायची ती?"

"मनःशान्तीसाठी"

"मग बाहेर जमलेल्या या भोळ्याभाबड्यांना मनःशान्ती कोण देणार?"

"समजलो मी," असं म्हणून गांधीजींनी खिडकी उघडून बाहेर पाहिलं. एकदम दहापाच हार गळ्यात आले. 'गांधीजी की जय' या घोषणा वाऱ्याबरोबर डब्यात घुसल्या. गांधींच्या त्या क्षणभराच्या दर्शनानं आनंदाची लूट घेऊन तो जमाव परतला. गाडीनं ते स्थानक सोडलं.

पुन्हा डब्यात तीच शान्तता.

"आज तुम्ही आम्हाला खरी गीता शिकवलीत" गांधी कस्तुरबांना म्हणाले.

“म्हणजे?”

“लोकांचा आनंद तो आपला आनंद. आणि आम्ही शोधत होतो त्या आनंदाला या पुस्तकाच्या पानांत.”

गांधीजींच्या बरोबर आफ्रिकेतून आलेली फिनिक्स मंडळी शान्तिनिकेतनात आधीच येऊन राहिली. यात काही विदेशी गौरवर्णीही होते. शान्तिनिकेतनात महिनाभर राहण्याच्या इराद्यानं गांधीजी आले होते. गुरुदेवांच्या या पुण्यपावन भूमीत पाऊल ठेवताच गांधीजींचं मन उचंबळून आलं. इतर अनेक आश्रमांसारखा या आश्रमाला अवाढव्य इमारतींचा पिंजरा नव्हता. आश्रमाचे हातपाय निसर्गाच्या सहवासात मुक्तपणे पसरले होते. विविध प्रकारच्या वृक्षवल्लीरींनी आश्रमाची सोबत केली होती. त्यांच्या सुशान्त छायेखालीच ज्ञानाचे पाठ इथं दिले जात असत. चार भिंतींनी कोंडलेल्या जगात विद्यादान करण्याचा परिपाठ इथं नव्हता. सूर्याच्या स्वच्छ प्रकाशात जीवनविद्यांची देवाण घेवाण इथं चाले.

आफ्रिकेतले सहकारी मगनलालभाई इथंही होतेच. त्यांच्या मदतीनं गांधीजींनी पहिलं काम केलं, ते म्हणजे आश्रमाचं स्वयंपाकघर ताब्यात घेतलं. आचाऱ्यांना रजा मिळाली. शिक्षक अन् विद्यार्थी चुलीतल्या लाकडांशी झटाझोंब्या घेऊ लागले. धुरानं डोळे चोळू लागले. या सर्व श्रमिकांत अँड्र्यूझ आणि पियर्सन यांच्यासारखे साहेब लोक होते तर नगीन बाबू, शरद बाबू, कालिबाबू यांसारखे बाबू लोकही होते.

कविराज कुठंतरी दौऱ्यावर गेले होते; ते परत आले. आश्रमाच्या मुख्य इमारतीसमोर असलेल्या अंगणाच्या पल्याड एक पिंपळ उभा होता. पिंपळाच्या पायतळी हिरव्या गवतानं रुजामा अंथरला होता. त्यावर गांधीजी आणि कविराज बोलत बसले होते. कालेलकरकाका आणि मगनभाई त्यांच्यापासून थोड्या अंतरावर गप्पा छाटीत होते.

इमारतीच्या डाव्या बाजूच्या पायवाटेनं शिक्षक-विद्यार्थ्यांचा एक तांडा आला. प्रत्येकाच्या हातात काही ना काही हत्यार किंवा साधन होतं. पियर्सनच्या गोऱ्यापान हातात बांबूच्या दांडक्याला बांधलेली एक केरसुणी होती. लख्ख सारवलेल्या अंगणावर रात्री झडलेला पालापाचोळा साचला होता. पियर्सनचा हात चालू लागला तशी केरसुणीच्या रुंदीचा एकेक पट्टा साफ होऊ लागला. दुसऱ्या बाजूला लावलेल्या वाफ्यात नगीनबाबू कुदळ चालवीत होते. त्यांच्या नितळ देहकान्तीवरील धर्मबिंदू कोवळ्या उन्हात चमकत होते. आश्रमातले

विद्यार्थी आणि शिक्षक नवीन आलेल्या गौरांगांच्या खांद्याला लावून ते जे श्रमचित्र उभे करीत होते त्यात कविराजही मिसळून गेले. त्यांनाही जणू हे नवीन होतं.

"मोहनदासजी, यातच स्वराज्याची गुरुकिल्ली आहे" रविंद्रबाबू दिलखुलास हसत म्हणाले.

"चला तर. आता रसोईघराकडं जाऊ. गांधीजी आणि रविंद्रबाबू रसोईघरात गेले. त्यांच्यामागोमाग 'पियर्स' आले. इतर वेळ तापून तापून थंड झालेली मोठमोठी भांडी पियर्सनची वाट पहात होती. पियर्सननी आपल्या दणकट हातांनी एक पातेलं खसकन उचललं आणि ओल्या मातीचा गोळा लपकन त्यावर मारून त्यांनी घासायला सुरुवात केली. कोपऱ्यात आशुबाबू सतार छेडीत होता. सतारीसारखाच गोड पोरगा. आपल्याच लयीत नेहमी असायचा. सतारीच्या तालावर पियर्सचं गोरं शरीर हालत होतं. एकेक भांडं लख्ख होत होतं. मध्येच आशूनं ओरडून विचारलं, "पियर्स, येऊ का मदतीला."

तिकडं न बघताच पियर्स ओरडला "नको बाबा. तू सतारच वाजव. ती बंद झाली तर आमचे हात चालणार नाहीत." आशूची बोटं पुन्हा सतारीशी खेळू लागली...

"मोहनदासजी, हे सारं काही तरी वेगळं चाललंय. आणि जे चाललंय ते छान चाललंय." रविंद्रबाबू समाधानानं म्हणाले.

रसोईघराच्या मुख्य दालनात बाळकृष्णाची एक लहानशी मूर्ती होती. तिच्यासमोरील दिव्यातलं तूप संपत आल्यामुळं ज्योत फडफडत होती. रविंद्रबाबूंनी आशूला निरांजनात तूप घालायला सांगितलं.

इतक्यात एक आश्रमीय तारेचा लिफाफा घेऊन आला. 'मोहनदास क. गांधी' या नावानं तार होती. तारेतले शब्द वाचताच हात थोडे थरथरले. डोळ्यांच्या कडा ओलसर झाल्या. गांधीजींनी सहज मागे वळून पाहिलं. ती थरथरती ज्योत केव्हाच शान्त झाली होती. पांढुरक्या धुराची एक रेषा वरवर सरकत होती. व्यथितचित्तानं गांधीजी आपल्या कुटीत आले आणि त्यांनी मगनलालभाईंना सांगितलं.

"भाई, मी पुण्याला जातोय. आमचं कृपाछत्र... गोपाळ कृष्ण गोखले..."

"काय! गोपाळ कृष्ण गोखले..."

"होय मगनलाल! गोपाळ कृष्ण गोखले. तारेत तोच मजकूर आहे."

❖

# दोन

गोपाळ कृष्णांचा अंत्यविधी पुण्यात उरकला, "एक वर्षभर तोंड बंद, कान अन् डोळे उघडे" हा राजकारणाचा गुरुमंत्र ज्यांनी दिला ते गोपाळ कृष्ण अनेक संस्थांचा पसारा मागं टाकून निघून गेले होते. त्यांच्या भारतसेवक समाजाचा सभासद होऊन तिथं काम करण्याचा निश्चय अजून व्हायचा होता.

डॉक्टर प्राणजीवन मेहता यांना भेटण्यासाठी गांधीजींनी रंगूनची वारी केली. परतताना त्यांच्या मनात 'हरद्वार' उभे राहिले. हरद्वारला कुंभमेळा होता. हरेक हिंदू या महापर्वणीच्या पुण्यप्रवाहात स्वत:ला बुचकूळन घेण्यासाठी जिवाचा आटापिटा करतो. गांधीजींना या कुंभमेळ्यात फारसा रस नव्हता. महात्मा मुनशीराम हरद्वारला होते. थोर विचारवंत! त्यांना भेटण्याची आतुर इच्छा होती. देवदर्शनाला जायचं तर वाटेतले आडवे-तिडवे रस्ते कापावेच लागतात. त्याच भावनेनं गांधीजी कुंभमेळ्यात गेले. मेळा कसला? तो बाजार! दैन्याची आणि अज्ञानाची लक्तरं अध्यात्माच्या वेशीवर टांगून पुण्यप्राप्तीचा केविलवाणा प्रयत्न करण्यासाठी जमलेले लक्षावधी वळवळणारे जीव! ती वेडीपिशी गर्दी, माजलेल्या पुंडांसारखे खादाड साधू, नदीच्या पाण्यात पापविसर्जन केल्याच्या आनंदात मशगुल असणारे यात्रेकरू, हे सारं पाहून गांधीजी अंतर्मुख झाले. या कुंभात आपण फार काळ अडकणं शक्य नाही हे ओळखून त्यांनी मेळ्याचा निरोप घेतला.

हरद्वार आणि शान्तिनिकेतन या दोन्ही भेटी फलरूप झाल्या. शान्तिनिकेतनात काका कालेलकर गवसले तर हरद्वारला स्वामी श्रद्धानंदांचा परिचय झाला.

रंगून, हरद्वार, शान्तिनिकेतन, पुणं... इतकी सगळी ठिकाणं झाली. पण गांधीजींच्या मनाला स्वास्थ्य नव्हतं. कुठल्यातरी अनामिक असमाधानाच्या

जाणीवेनं मनाची ती सखोल दरी तळापासून घुसळून निघत होती. काहीतरी निराळं झालं पाहिजे, वेगळं घडलं पाहिजे असं सांगणाऱ्या मनानं गिरक्या घेत घेत कौल दिला- 'आश्रमाची स्थापना.'

भारताच्या नकाशावरून डोळे भिरभिरा फिरले. ठिकाण शोधण्यासाठी. पण कुठेच स्थिरावेनात. अखेर भिरभिरता त्यांना एक ठिकाण सापडलं. अहमदाबाद. मातृभू गुजराथचं नाणावलेलं शहर. राजधानी. प्रयोगाला इथं वाव मिळेल, नव्याला इथं पाठिंबा मिळेल या आत्मविश्वासानं उडी तर टाकली आणि कोणे एके दिवशी 'सत्याग्रह आश्रम' उभा राहिला. ही सत्याची प्रयोगशाळा; पंचवीस स्त्री-पुरुषांनी या शाळेत अभ्यासकाची भूमिका घेतली. त्यात तेरा जण आसामी तामिळीसुद्धा होते. अहमदाबादेच्या अवाढव्य देहाच्या सावलीत सत्याग्रहाश्रमाचं रोपटं आभाळाकडं धाव घेण्याचा प्रयत्न करू लागलं. याच आश्रमाला पुढं साबरमतीचा किनारा आवडला आणि कोचरबचं वास्तव्य संपवून साबरमतीच्या तीरी आश्रमानं तळ ठोकळा.

अशीच एक संध्याकाळ! आश्रमातील मुलं वाऱ्याशी मस्ती करीत हुंदडत होती. आणि आश्रमाच्या अंगणात अंगावर गार वारा खेळवीत सारे आश्रमवासी गांधीजींचे शब्द जिवाचे कान करून ऐकत होती. एवढ्यात एकानं एक पत्र गांधीजींच्या हाती दिलं. अमृतलाल ठक्कर यांच्याकडून पत्र आलं होतं.

गांधीजींनी पत्र वाचून खाली ठेवलं. वाऱ्याच्या झुळकीबरोबर पत्राचा कागद हलत होता. आवाज देत होता. वरचा लिफाफा शेजारी असहायपणे पडला होता. मन कल्लोळलं. पत्राला उत्तर देणंही कठीण होतं. अमृतलालनी लिहिलं होतं, नव्हे केवळ पृच्छ केली होती- "एका अंत्यज कुटुंबाला आश्रय द्याल का आश्रमात?" आसरा देणं तर आवश्यक होतं. त्या अंत्यजाच्या डोळ्यांतले व्याकुळ भाव साकारले. त्याच्या केविलवाण्या चेहऱ्यावरचा अनाथपणाचा भाव अस्वस्थ करू लागला. श्रद्धेच्या जळवांना झटकून आणि सोबत्यांचा रोष अंगावर घेऊन या अंत्यजाला जवळ करायचं होतं.

... रात्र अंधारली तरी गांधीजींच्या मनात या विचारांचे लोळ भडकले होते. अखेर ते सारे शान्त झाले. भिंतीला पाठ लावून गांधीजी बसले होते. समोरच्या लिहिण्याच्या मेजाशी मनगभाई होते. मेजावर लालटेन जळत होता. त्याची वात मोठी करून मगनभाईंनी विचारलं, "ठक्करभाईंना उत्तर काय लिहू?"

"लिहा... अत्यंज कुटुंबाला आसरा देत आहोत. त्यांना पाठवून द्या."

मगनभाईंची लेखणी थरथरली. आश्रमात अंत्यज कुटुंब! थरथरत्या लेखणीनंच

त्यांनी ती अक्षरं लिहिली. आणि या बातमीचा वणवा आश्रमभर पसरला. आश्रम आतल्या आत धुमसू लागला. प्रत्यक्ष पेट घेत नव्हता तरी नापसंतीचा धूर ओकत होता.

कस्तुरबांना ही वार्ता समजली. त्यावेळी त्या देव्हाऱ्यासमोर बसून पूजा करीत होत्या. बाळकृष्णाच्या मूर्तीला पंचद्रव्याचं स्नान घालून त्या देव्हाऱ्यात ठेवणार होत्या. त्यांच्या हातातील ती मूर्ती गळून पडली. ताम्हनात टपकन आवाज झाला; याचवेळी गांधीजी तिथं येत होते.

''आपल्या हातून देव खाली पडला'' गांधीजी हसून म्हणाले.

''हो. धर्माला कुणी खाली पाडलं की देवालाही पडावं लागतं.'' कस्तुरबांच्या स्वरात कडवट रुष्टपणा होता.

''माणसाला माणसानं जवळ करणं यात धर्मनाश कुठं होतो हे कळत नाही?'' गांधीजी शान्तपणे उत्तरले.

''असंच जर आपलं मत आहे तर हे सारे देव साबरमतीत फेकून द्या आणि इथं माणसं बसवा.''

''जरूर पडली तर तेही करावं लागेल. तुमच्या मनात आता आग भडकलीय. शान्त झाली म्हणजे माझंच म्हणणं तुम्हाला पटेल.'' असं म्हणून गांधीजी निघून गेले.

चोरपावलांनी येऊन दुसऱ्या दिवसानं आश्रमाला जागं केलं. पण आज आश्रम जागाच होता. आश्रमात अद्भुत घडणार होतं. आश्रमात अंत्यज येणार; सहकुटुंब राहणार. जिज्ञासा, औत्सुक्य, भीती, विषाद, स्वागत. संमिश्र भावनांनी आश्रमीयांची मनं भरभरून वाहात होती.

गांधीजी सोप्यावर बसले होते. दूरवरून दोन आकृत्या दिसू लागल्या. गांधीजींनी आश्रमातल्या एका मुलाला पुढं पिटाळलं, त्यांच्या हातातलं सामान घेऊन यायला.

''ये दूदाभाई'' गांधीजींनी दूदाचं मनभरं स्वागत केलं. दूदानं गांधीजींच्या पायांशी आपलं अंग झोकून दिलं. त्याला दोन्ही हातांनी धरून उठवीत ते म्हणाले, ''अरे अरे, हे काय? पाया देवाच्या पडावं.''

''मला कुठं दुसरा देव ठाऊक आहे.'' दूदा एवढं म्हणतो तोच दानी पाया पडली आणि छोट्या लक्ष्मीने आपले इवलेसे हात जोडून नमस्कार केला.

अंत्यजानं गांधीजींच्या पायाला स्पर्श करून नमस्कार केला आणि गांधीजींनी

त्याला हातांनी धरून उठवलं...

आश्रम ज्या घरात होता त्याच्या मालकानं हे पाहिलं. त्याची बुबुळं कपाळात जाऊ लागली होती. त्याच्या सर्वांगात क्रोधाची एक लाट उसळून गेली. त्याची सावली चटकन नाहीशी झाली.

छोट्या लक्ष्मीला आश्रम फारच आवडला. वासरासारखी ती इकडं तिकडं हुंदडत होती. आणि तिचा स्पर्श होऊ नये म्हणून माणसं बेतानं वावरत होती. उघडपणे बोलता येत नव्हतं. पण लक्ष्मी, दूदा किंवा दानी यांपैकी कुणीही दिसलं तरी माणसं चार हात दूरच जात.

दूदाला येऊन आठवडा झाला होता. तो आता आश्रमात रुळत चालला होता. इतरांची तिरस्काराची आगही हळूहळू फुफाटा होऊ लागली होती. गांधीजी सकाळचं फिरणं आटोपून परत येत होते. आश्रमाच्या वाटेवरल्या एका रुंद दगडावर लक्ष्मी उन्हात पाठमोरी बसली होती. दूरवर दूदा आणि दानी सरपणासाठी काटक्या गोळा करायला गेले होते. आपल्या विस्कटलेल्या डोक्यात दोन्ही हातांनी बोटं खुपसून लक्ष्मी कराकरा खाजवीत होती. गांधीजींनी तिच्या हाताला धरून तिला आश्रमात आणलं. आपल्या खोलीतल्या चटईवर तिला बसवलं आणि ते मगनभाईंना म्हणाले-

''भाई, एक बारीक कंगोऱ्याची फणी आणवा. थोडंसं तेल आणा आणि दानीबेनला बोलावून घ्या.''

दानीबेन आली. डोक्यावरची सरपणाची मोळी तिनं दाणकन खाली टाकली आणि समोर पहात ती पुतळ्यासारखी उभी राहिली. लक्ष्मी पाठमोरी बसली होती. गांधीजी तिची वेणी घालीत होते. वेणी घालता घालता तोंडं वेडीवाकडी करून लक्ष्मी त्यांच्याशी खेळत होती. वेणी चापून चोपून बसल्यावर लक्ष्मीनं चेंडूसारखी उडी मारली आणि ती आईला बिलगली.

''अम्मा, आता बघ मी कशी दिसते.''

... दानीचा ऊर भरून आला होता. आकंठ कृतज्ञता त्या लहानशा जागेत मावेना. ती डोळ्यांतून वाहू लागली. मगनभाई मनात म्हणत होते, ''बेटी, तुझी वेणी घालणारे हात फार मोठे आहेत'' गांधीजी पायऱ्या उतरून खाली आले. त्यांनी दानीला बजावलं ''दानीबेन, लक्ष्मी अशी दिसली पाहिजे रोज.'' दानीनं मान हलवली. लक्ष्मी केव्हाच पसार झाली होती. डावीकडं कस्तुरबांची खोली होती. गांधीजींनी सहज वळून पाहिलं. लक्ष्मीच्या बोटाला धरून कस्तुरबा तिला आपल्या खोलीत नेत होत्या.

दूदा, दानी अन् लक्ष्मी आश्रमात केव्हाच एकजीव होऊन गेले. पाणी पाण्यात मिसळून जातं; काठावरचे बांध मात्र उगाच थरारतात. तसं झालं. आश्रमाला मदत करणाऱ्यांच्या मनात किल्मिषांची बांडगुळं उगवली. पुरोगामीपणा त्यांना मान्य होता. पण इतका पुरोगामीपणा सहन होत नव्हता.

आश्रम होता एका बंगल्यात. मालक टिळा-टोपी-गंधवाला, कट्टर सनातनी. त्याच्या नजरेतून आश्रम उतरला. आश्रमातील सारी माणस उतरली. दुदाची सावली शेजारुन गेली तरी दहा वेळा आंघोळ करू लागला. "हा आश्रम म्हणजे भ्रष्टाचाराचा कारखाना आहे." असा धडधडीत प्रचार त्याने सुरु केला. आश्रमातला मदत देणारे लोक हात आखडता घेऊ लागले. आश्रमाच्या खर्चाची तोंडमिळवणी करता करता मगनभाईचा जीव कासावीस व्हायला लागला.

"आपण एवढ चांगल कार्य करतो; अन् अंत्यजाला आश्रय दिला एवढंच लोकांच्या लक्षात आलं" मगनभाई त्रासून म्हणाले.

"भाई, आपण चांगलं काम करतो हे कुणी ठरवायचं? समाजाचं मन मोठ विचित्र असतं. ह्या मातीत विषवल्ली लवकर फोफावतात; अमृतवल्लीना मात्र जन्म घेताना प्राणान्त वेदना होतात. गांधीजी शांतपणे म्हणाले. " मग हे सारं करायचं करी कशाला? विषवल्लीच वाढायच्या असतील तर?"

" मगनभाई, माती बदलता येते. श्रद्धा हवी."

आश्रमाची रसद बंद झाली. चारी बाजूंनी कर्मठांनी मोर्चे बांधून भडीमार सुरु केला. टीकेचे वादळवारे वहात होते, तरी या प्रकोपात आश्रम खडेखांब उभा होता.

एका चटईवर गांधीजी बसले होते. समोर चारपाईवर मगनभाई; त्यांच्यासमोर उघड्यावाघड्याा चोपड्या पडल्याा होत्या. जमेचा स्तंभ कोराकरकरीत राहिला होता. खर्चाचा स्तंभ भरुन गेला होता. सगळ्या चोपड्या बंद करुन त्या एकत्र बांधत मगनभाई म्हणाले, "यापुढे येत्या महिन्याला आश्रमाचा खर्च चालविण्यासाठी पैसा नाही."

"पैसा नाही? गांधीजींनी शांतपणे विचारल.

"हो, हो. पैसा नाही. आपण बहिष्कृत आहोत. एक तर आश्रम बंद करा, नाहीतर दूदाला अन् दानीला .....'

'मगनभाई!" गांधजी तीव्र स्वरात म्हणाले. "मगनभाई, पैसा नसेल तर आपण अंत्यजवाड्यात जाऊन राहू, पण दूदाला न् दानीला ..... छे छे, ते होणे नाही."

मगनभाईंनी सांगितलं तसंच झालं. त्यांची थैली उलटी झाली तरी पैसा दिसेना. धान्याधुन्यानं भरलेले पाकशाळेतले डबे आता खडखडू लागले.

आश्रमाच्या एका मठीतल्या गवाक्षातून गांधीजी दूरवर पहात होते. नजरेच्या टप्प्यात एक झाड होत. झाडावर घरटं. घरट्यात पिलू असावं. पिलाची आई बाळाला एक एक फेरी करुन चारा आणू देत होती.

पाठीमागून कस्तुरबा आल्या. " काय पहाणं चाललय एवढ? "

" आईची माया आणि ....

" नियतीची किमया ... ते बघा.

" ते घरटं तुटायला आलंय. थोड्यात वेळात ते जमिनीवर आदळणार."

पिलाच्या आईच्याही ते लक्षात आलं असावं. ती कावरीबावरी झाली. चिवचिवाट-फडफडाट करु लागली. इतक्यात एक पारधी आला. पिलाच्या आईचा आकान्त वाढला. पिलू केविलवाणेपणाने बघू लागलं. पारधी जवळ आला. पिलाच्या आईचा आक्रोश वाढला. पारध्यानं घरटं हातात घेतलं. त्यात ते चिमणं पिलू होतं. जवळच्या दोऱ्याचे कान करुन घरट्यात अडकवले आणि घरटं झाडाला बांधून तो शांतपणे निघून गेला. पिलाच्या आईनं घरट्याकडे धाव घेतली आणि पारध्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे फांदीवर बसून ती पाहू लागली. त्या इवल्या पक्षिणीच्या डोळ्यात कृतज्ञता होती.

एवढा वेळ कस्तुरबा श्वास रोखून उभ्या होत्या. एक दीर्घ सुस्कारा सोडत त्या म्हणाल्या " बरं झाल बाई....'

इतक्यात मगनभाई आले. ते निस्तब्ध होते. काही बोलेनात, चेहऱ्यावर चिंतेची जाळी होती. एक एक शब्द अस्फुटसा उच्चारीत ते म्हणाले, "गांधीजी, फक्त आजच... आजचीचा सोय आहे. उद्या आश्रमाला उपास घडणार..."

"ठीक आहे. उद्याचा दिवस उपवासदिन करु. परवाचं परवा बघता येईल.

लक्ष्मी रतनच्या बोटाला धावत आत आली आणि गांधाजींना बिलगून म्हणाल, "दादाजी, बाहेर पों पों वाजतंय" मागून दूदा आला. " बाहेर मोटारीत एक शेठ आलेत. ते तुमची भेट मागतात."

आश्रमाच्या दाराबाहेर एक काळीकुळकुळीत अजस्त्र देहाची वाहिनी उभी होती आणि वाहिनीत एक देह होता. गांधीजी वाहिनीजवळ गेले, पण त्या देहाने वाहिनीतून उतरण्याची तसदी घेतली नाही. किंचित पुढ झूकून शेठ म्हणाले,

" आश्रमाला काही मदत देऊ इच्छितो. घ्याल? "
" आपण द्याल तर अवश्य घेईन. आश्रम सध्या याचकच आहे."
" ठीक. उद्या मी याच वेळी येईन. आपण आश्रमात असाल? "
" हो. पण आपले नाव ... " गांधीजींनी उत्सुकतेने विचारले.
" छे. छे. नावाची काही आवश्यकता नाही. " .... या शब्दांबरोबरच मोठा आवाज करीत ती वाहिनी दूर गेली. दृष्टीआड झाली.

रात्रभर गांधीजी या इच्छुक, अनाम दातृत्वाचा विचार करीत होते ...

दुसरा दिवस उजाडला. ठरल्या वेळी वाहिनीच्या पोंग्याचा आवाज झाला. गांधीजी आणि त्यांच्यामागून मगनभाई सामोरे गेले. पुन्हा कालचीच तऱ्हा. उतरणे नाही की बोलणे नाही. एखाद्या गुहेच्या तोंडातून फांदी बाहेर डोकवावी तसा वाहिनीच्या खिडकीतून एक धष्टपुष्ट हात बाहेर आला. हातात तसलंच लठ्ठ पुडकं होतं, ते गांधीजींच्याा हाती देऊन तो हात मागे गेला आणि काही बोलायच्या आतच धुळीचे फराटे उडवत ती वाहिनी रस्ता कापून गेली. तिच्या बारीक बारीक होत जाणाऱ्या वर्तुळाकडे गांधीजी अन् मगनभाई स्तिमितपणे बघत राहिले.

तो अज्ञात दाता केव्हाच अदृश्य झाला होता. त्याचं अबोल दातृत्व या क्षणी गांधीजींच्या हातात होतं. गांधीजींनी ते पुडकं मगनभाईच्या हाती दिले आणि म्हणाले "मोजा भाई".

" एक .... दोन.... तीन...."
" शंभर .... दोनशे ... तीनशे..."
"किती आहेत मगनभाई? "
" तेरा हजार! " मगनभाई जवळजवळ ओरडलेच.

समाधानाची एक सूक्ष्म रेषा गांधीजींच्या डोळ्यात तरळून गेली. आश्रमाच्या तहानलेल्या भूमीवर या तेरा हजाराची पाणकळा अवतरली. आता उमेदीचे अंकुर या भूमीत धरणार होते. दूदा, दानी, अन् लक्ष्मी पायगुणाची ठरली. आश्रम तरला.

कस्तुरबांना कळलं. त्यांच्या डोळ्यांत अवघा आनंद उभा राहिला. तो पदरांनी टिपत त्या म्हणाल्या,

"त्या पक्षिणीच्या घरट्यासारखा आपला आश्रम तरला."
"होय. सगळेच पारधी पारध करीत नाहीत. कुणी जीवनदानही देतो."

आश्रमाचा रथ आता विश्वासानं मार्गक्रमणा करू लागला. आश्रमानं

अंगीकारलेलं कार्य बाळसं धरू लागलं. जिवावरच्या दुखण्यातून उठलेला रुग्णाईत केवळ मनाच्या सामर्थ्यावर पुन: टवटवी धरू लागतो आणि होता होता तेज:पुंज होतो तसा आश्रम होऊ लागला.

गांधीजींचं एक वर्षाचं मौन आता संपणार होतं. एवढ्यात एक लखोटा आमंत्रण घेऊन आला. पंडित मालवीयजींकडून ! अविश्रान्त उरस्फोड करून मालवीयजींनी बनारस हिंदू विद्यापीठ उभं केलं होतं. अनेकांनी या विद्यापीठासाठी आपले हात मोठे केले होते. कितीएक लोकांनी आपली दातृत्वाची छाया देऊ केली होती. गांधीजींना उद्‌घाटनसमारंभाचं आमंत्रण आलं. नुसतं समारंभाचं नव्हे, समारंभात वक्तव्य करण्याचंही. आमंत्रण स्वीकारण्याचं पत्र गेलं आणि पाठोपाठ गांधीजींनीही बनारसकडं कूच केलं.

❖

# तीन

विद्यापीठ जन्माला येऊ घातलं होतं. विद्यापीठाचं आवार आज विलक्षण गजबजून गेलं होतं. सडारांगोळ्यांनी रस्ते सजले. हंड्या-झुंबरांनी मंडप फुलला. प्रवेशद्वाराची भव्य कमान केळीच्या खांबांनी मढवली होती. केळीची पानं सर्वांचे लवून स्वागत करीत होती. देशातल्या सर्व भागातून विद्वान आणि पंडित, राव आणि रंक इथं गोळा झाले होते. या सरस्वती-विहाराच्या सोहळ्यासाठी त्या मेळाव्यात सत्ताधारी मुकुट होते तशी वैभवदर्शी हिरेमाणकं होती आणि विद्वत्तेची तेजस्वी वल्कलेही होती.

गांधीजी या समारंभाला निघाले. ही काशीनगरी; भारतवासीयांचं पुण्यपावन परमधाम म्हणजे काशी. याच काशीत हा नेत्रदीपक सोहोळा उभा राहिला होता. आणि तीच काशी या अंगाला अगदी वेडीवाकडी पसरली होती. इहलोकीच्या कार्याची इतिश्री करताना काशीविश्वेश्वरासमोर प्रत्येक भारतीय आपल्या पापपुण्याचा रोकडा कबुलीजबाब देतो. हे जिथं होतं ते महाक्षेत्र काशी. या महाक्षेत्राचे रस्ते म्हणजे दीनदरिद्री आणि वेड्याविद्र्या भिकाऱ्यानी भरलेले उकिरडे झाले होते. भ्रष्ट माणुसकी त्या भिकाराच्या रूपानं काशीविश्वेश्वराच्या अंवतीभंवती लाचारपणे हिंडत होती. पाठीला चिकटलेल्या पोटावर हात मारून तोंडं वेगाडली जात होती. विश्वेश्वराची आर्त करुणा भाकली जात होती. गांधीजी चालतच होते. पहात होते. डोळे सुन्न होत होते. वैभवशाली दातृत्वातून निर्माण होत असलेल्या ज्ञानपीठाच्या वाटेवरही दरिद्रीनारायणाची असंख्य रूपं वळवळताना पाहून मस्तकात मुंग्यांची वारुळं होऊ लागली.

आणि तिकडं शानदार समारंभ उभा राहिला होता. लॉर्ड हार्डिंग्ज हे व्हाईसराय होते. त्यांनीच वास्तूची कोनशिला बसवली. या समारंभाचे यजमान

होते मालवीयजी. त्यांची धावाधाव चालली होत. हिंदूंच्या या देशात हिंदू रिवाजाप्रमाणं शिक्षण देणारी संस्कारशाळा चालविण्याचा त्यांचा ध्यास आज आकारास येत होता.

गांधीजींच्या भाषणाच्या दिवशी तो शाही मंडप डंवरलेल्या ताटव्यासारखा दिसत होता. सरदार-दरकदारांनी आपापल्या जागा भूषवल्या. मागची माणसं आपली डोकी शक्य तितकी उंच करून व्यासपीठाकडं पहात होती. व्यासपीठावर कोण गर्दी! दरभंग्याचे महाराज अध्यक्ष होते; प्रशस्त अन् ऐसपैस; टपोऱ्या गुलाबांमधून नाजुक जाई डोकवावी तशा तिथं डॉ. ॲनी बेझंट दिसत होत्या. वेळादर्शकानं ठरलेली वेळ दाखवली तरी अजून मुख्य वक्त्यांचा पत्ता नव्हता. आजचा वक्ता तर वक्तशीरपणाबदादल प्रसिद्ध! मग असं कसं झालं? लोकांमध्ये चुळबुळ सुरू झाली.

मालवीयजींनी सहज प्रवेशद्वाराकडं पाहिलं आणि त्यांनी आपलं उत्तरीय सावरलं. लगबगीनं ते प्रवेशद्वाराकडं गेले. द्वारपाल कोण्या एका प्रवेशकाबरोबर हुज्जत घालत होता. त्यानं प्रवेशपत्र आणलं नव्हतं. आपण प्रवेशपत्र आणायला विसरलो असं तो द्वारपालाला सांगत होता. मालवीयजींनी डोळे ताणून पाहिले- काठियावाडी फेटा, उपरणं, अंगरखा... मालवीयजी धावले. त्यांनी द्वारपालाला खुणावलं आणि हळूच सांगितलं- 'गांधी'

द्वारपाल बिचारा ओशाळला. त्याच्या पाठीवर प्रेमाची थाप देऊन गांधीजी पुढे गेले. जाताना ते मालवीयजींना म्हणाले, "त्यानं आपलं काम चोख केलंय. मीच निमंत्रण आणायला का विसरावं?"

गर्दीतून वाट काढीत गांधीजी व्यासपीठाकडे गेले तेव्हा लोकांनी एकमुखानं त्यांचा जयकार केला. भाषणांच्या फैरी झडू लागल्या. वाक्गंगेच्या प्रवाहात शब्दांच्या लाटा खळाळू लागल्या. रत्नामाणकांच्या बांधबंदिस्तीत असलेली डोकीही हलू लागली. दाद देऊ लागली. गांधी उभे राहिले. मंडपाचे श्वास रोखले गेले.

"भाईयो और बहनो...

मंडप चमकला. आत्तापर्यंतची सर्व भाषणं इंग्रजीतून होती. बेझंटबाईचे डोळे उत्सुकता दाखवून पाहू लागले. समोर बसलेल्या प्रत्येक संस्थानिकांच्या मांडलिक डोळ्यात नाखुषी उगवली. मग गांधीजींनी इंग्रजीत भाषण केलं. स्वच्छ टपोरेदार शब्द; शान्त आणि संथ लय; पण प्रत्येक वाक्य आत्मविश्वासानं आलेलं; त्यांचे विचार कुणाला पटत होते, कुणाला पटत नव्हते. पण ऐकावेसे

मात्र सर्वांनाच वाटत होते. त्यांनी पहिला धक्का दिला तो पवित्र काशीपुरातल्या अपवित्र दृश्याचं वर्णन करून; आणि मग नजर वळली समोरच्या संस्थानिकांवर- प्रत्येक शब्द हृदयाच्या तळातून ओठावर येत होता. गांधीजींनी त्या लक्ष्मीधरांना कळवळून आवाहन केलं.

"बाबांनो, तुमच्या अंगावरलं हे जडजवाहीर आता ठेवा उतरवून. हे दृश्य बघवत नाही. संस्थानातील प्रजा दु:खी आहे, कष्टी आहे, अज्ञानी आहे. ती दारिद्र्याच्या कर्दमात लोळत आहे अन् तुम्ही हे वैभव अंगावर खेळवता! काय अधिकार आहे तुम्हाला?"

या प्रश्नातल्या तीव्रतेनं त्या लक्ष्मीधरांची काळजं हलली. कुणाची चरचरा कापलीसुद्धा. ते समारंभाचे मानकरी. अन् त्यांना असा रोकडा सवाल? घोर अपमान. त्या कुबेरपुत्रांना या अपमानाच्या इंगळ्या शतधा डसल्या. कारण त्यांपैकी प्रत्येकानं उभ्या राहणाऱ्या विद्यापीठासाठी काही ना काही दिलं होतं. त्यांच्या जमावात चलबिचल सुरू झाली. मागची माणसं हात उंच करून गांधीजींना दाद देत होती. पण बेझंटबाई अस्वस्थ झाल्या. सभेचे सर्व नियम गुंडाळून ठेवून त्यांनी गांधीजींना सांगितलं, "पुरे आता" पण गांधीजी बोलतच राहिले.

एकेक खुर्ची रिकामी होऊ लागली, ती घमेंडखोर आसनं ओकीबोकी दिसू लागली. पण त्यांच्या मागं जमिनीवर बसलेला समाज गांधीजींचे शब्द जिवाचे कान करून ऐकत होता. भाषण संपलं. गांधीजी आसनस्थ झाले तेव्हा त्या सभेचं एक स्थिरचित्र झालं होतं.

गांधीजींच्या निवासस्थानी पोराथोरांची तोबा गर्दी उसळली होती. आजच्या समारंभाच्या नायकाचं ओझरतं दर्शन झालं तरी पुरे असं त्या गर्दीला वाटत होतं. संध्याकाळी बनारसच्या आणखी काही संस्थांना भेटी द्यायच्या होत्या. त्यांचे कार्यकर्तेही या गर्दीतच मिसळून बसले होते. एवढ्यात एक पोलीस अधिकारी आले. ते होते बनारसचे पोलीस कमिशनर. त्यांनी हुकुमाचा एक कागद गांधीजींच्या हाती ठेवला.

"ताबडतोब बनारस सोडून जा."

"तथास्तु" कागदाची गुंडाळी करीत गांधीजी म्हणाले. पोलीस कमिशनरशी हस्तांदोलन करीत गांधीजी म्हणाले, "आपण निश्चिंत असा. आपल्या हुकुमाप्रमाणेच मी वागेन. आणि वागायचं नाही असं ठरलं तर आधी कळवीन. पण कोणत्याही परिस्थितीत तुम्हाला धोका देणार नाही."

मालवीयजींना हे कळलं. त्यांनी धावपळ केली. सरकारदरबारी रदबदली केली. फोन, तारा, पत्रे, निरोप, भेटी! सारं झालं आणि गांधीजींवर बजावलेला हुकूम रद्द करवला. पण हे सारं घडायला दुसऱ्या दिवसाचा सूर्य उगवला होता. हुकूम रद्द केल्याचा हुकूम हातात घेऊन उत्फुल्ल मनानं मालवीयजी गांधीजींना भेटण्यासाठी आले. निवासात सर्व सामसूम होते. मालवीयजी पुढं गेले. गांधीजींचा कमरा रिकामा होता. कमिशनरच्या हुकुमाचा कागद उपडा पडला होता. खिडकीतून येणाऱ्या वाऱ्याबरोबर त्याची फडफड होत होती तेवढाच काय तो आवाज!

मालवीजयी परत आले, तो बेझंटबाई त्यांचीच वाट पहात होत्या. गांधीजींचा निरोप होता, "पुण्याला जात आहे, गोपाळ कृष्ण गोखल्यांच्या पहिल्या श्राद्धदिनासाठी. पुन्हा हरद्वारला येणार आहे." आपले पागोटे उतरवून ठेवत हताशपणे मालवीयजी म्हणाले,

"हे बरं झालं नाही. आपले पाहुणे होते ते. असं जावं लागावं त्यांना, हे बरं नाही झालं..."

वारुळावर चहूबाजूंनी मुंग्यांनी गर्दी करावी त्याप्रमाणे लखनौ शहराकडे प्रवासी येत होते. पाण्यानं भरलेला ढग मोकळा होताना टपोऱ्या थेंबांची कोसळ पृथ्वीवर होते तशी एखादी गाडी स्टेशनला लग़ली की, ती रिकामी झाल्यावर शहराचे चारी रस्ते नुसते फुलून जात. लखनौला काँग्रेसचं अधिवेशन होतं. येणाऱ्यात प्रतिनिधी, पत्रकार, बघे, सारे होते. एका सुरेख संध्याकाळी खुलं अधिवेशन भरलं. गांधीजी होतेच. मंडप गच्च होता. अनेक विषयांवर वाक्ताडन चाललं होतं. ठराव पास होते. चंपारण्याबाबत ठराव आला. तो पसार झाला. ठरावानं चंपारण्यातल्या शेतकऱ्यांना सहानुभूती दाखवली.

इंग्रजांची सत्ता भारतात गुरगुरू लागल्यावर गोऱ्या कातडीनं आसामप्रमाणं बिहारातही पाय रोवले. चंपारण्यातील निसर्गधन आणि भूमिधन लुटण्यासाठी अनेक मळेवाले सिद्ध झाले. खंडानं जमिनी देण्याची लालूच दाखवून भरपूर कर वसूल करीत हे लोक. नाना बंधनांनी तिथल्या भूमीपुत्राला हे मळेवाले बेजार करीत. त्यातलं एक बंधन विचित्र होतं. त्याचं नाव तीनकठी पद्धत. निळीची लागवड केलीच पाहिजे. नाही केली तर मारझोड, शिव्याशाप आणि बळजबरी. मळेवाले गोरे, सरकारही त्यांचंच. मग दाद घेणार कोण? तक्रारी झाल्या, अर्जविनंत्या धाडल्या पण बिनकाळजाच्या सरकारला पाझर नाही

फुटला. उन्हानं खरपूस भाजलेल्या जमिनीत हात खुपसून तिथला शेतकरी घाम गाळत होता आणि सुगीच्या वेळी त्याच्या पाठीवर बसत होते आसूड!

आणि याच वेदना ठरावात मांडल्या होत्या. पण हा कागदी ठराव. तो एकमतानं पसार झाला. ठराव पसार होताच त्या अथांग समुदायात कुठंतरी स्वत: कसंबसं सामावून घेणारे दोन डोळे लकाकले. पण क्षणभरच! हा नुसता ठराव आहे, सहानुभूतीचा. तो काही कायदा नव्हे. हे ध्यानात येताच पुन्हा निराशा उतरली. तो एक साधा गावकरी होता. तसा खेडवळच. पण डोळ्यात विलक्षण चमक होती. खुलं अधिवेशन संपलं आणि गांधीजी आपल्या निवासाकडं चालले. एक जथा त्यांच्या मागोमाग चालला होता. पैरणवाल्याची घालमेल वाढली. तो ताडकन् जागचा उठला आणि त्या जथ्याचा पाठलाग करीत तो वाट पाहू लागला. गांधीजींची वाट अडली. कुणी धसमुसळ्या बाजूच्या गर्दीतून पुढं आला आणि म्हणाला, "माफ करा; माझं नाव राजकुमार शुक्ल."

"कुठून आलात तुम्ही?" गांधीजींनी विचारलं.

"चंपारण्यातून."

"काय काम आहे आपलं माझ्याकडं?"

"थोडा वेळ द्याल तर सर्व सांगतो."

"चला असे माझ्याबरोबर."

"आपण पुढे व्हा. आलोच मी" असं म्हणून राजकुमार शुक्ल निघून गेले आणि येताना कुणाला तरी बरोबर घेऊन आले.

काँग्रेस प्रतिनिधींच्या निवासाच्या तंबू-राहुट्या पडल्या होत्या. इतिहासकालीन युद्धाच्या तळासारखे ते दृश्य दिसत होते. खास प्रतिनिधींची सोय एका अलिशान इमारतीत करण्यात आली होती. पण गांधीजींनी सर्वसामान्य प्रतिनिधीप्रमाणे राहणेच पसंत केले. अशाच एका गरिबाच्या महालात गांधीजी बसले होते. राजकुमार शुक्ल आले. बरोबर असलेल्या व्यक्तीचा निर्देश करून ते गांधीजींना म्हणाले.

"ये वकीलबाबू आपको सब हाल बताएँगे."

वकीलबाबूंनी काळ्या अल्पाकचा लांब डगला घातला होता. इंग्रजी पद्धतीची पाटलोण होती. चंपारण्यातल्या भोळ्या शेतकऱ्यांची लूट करणाऱ्या गोऱ्या लुटारुंपैकीच हा कुणीतरी असावा अशी समजूत झाली असती. पण हे वकीलबाबू शेतकऱ्यांचे वकील होते. तास दोन तास ते बोलत होते. धबधब्यासारखे! राजकुमार शुक्ल ते ऐकत होते. गांधीजी त्यांच्या भाषणातल्या बारीकसारीक

गोष्टींचीही नोंद घेत होते.

हे वकीलबाबू म्हणजे व्रजकुमार शुक्ल. लखनौ काँग्रेसमध्ये चंपारण्याविषयी यांचं भाषण झालंच होतं.

लखनौहून गांधीजी कानपूरला गेले. तिथं राजकुमार शुक्ल हजर! आश्रमात गेले तिथंही शुक्ल उगवले. मग गांधीजींनी ठरवलं की, चंपारण्यातली परिस्थिती पाहण्यासाठी स्वत:च जायचं. गांधीजींनी राजकुमार शुक्लांना सांगितलं, "कलकत्त्याला तुम्ही या. मी भूपेंद्रबाबूंकडं उतरणार आहे."

"आपण अवश्य या मात्र. गरीब शेतकरी आपली आतुरतेनं वाट बघताहेत." अशी आर्जवं करून राजकुमार शुक्ल निघून गेले. या अर्धशिक्षित खेडवळाचं गांधीजींना कौतुक वाटलं. हा माणूस आपले पाय झिजवत होता ते इतरांचे पाय बळकट व्हावेत म्हणून.

गांधीजी कलकत्त्याला जाऊन पोचण्यापूर्वीच राजकुमार शुल्क भूपेंद्रबाबूंकडे तळ देऊन होते. दोघे मिळून नंतर पाटण्याला गेले. एक अर्धशिक्षित तर एक बॅरिस्टर. पण दोघेही खांद्याला खांदा लावून मातीत राबणारे शेतकरी दिसत होते.

"शुक्लजी, तुमचा काय इरादा आहे?" पाटणा आल्यावर गांधीजींनी विचारलं.

"पाटण्याला प्रथम आपण राजेंद्रबाबूंकडे जाऊ. तिथून मग मुझफ्फरपूरला, कृपलानीजींकडे आणि पुढं मग आपणच ठरवा. आपण जागा दाखवायची अन् आम्ही हमला करायचा."

गांधीजी हंसून म्हणाले, "शुक्लाजी, आम्ही जागा जरूर दाखवू. पण आमचा मार्ग हमला करण्याचा नाही. सत्याग्रहाचा आहे."

"तुमचा सत्याग्रह प्रत्यक्ष हमल्यापेक्षा भयंकर असतो असं आम्ही ऐकलंय. मी हमला म्हणालो ते याच अर्थानं." शुक्ल म्हणाले.

प्रत्यक्ष चौकशीला सुरुवात झाली. चंपारण्यातील वाट न् वाट पालथी घातली गेली. झोपडीझोपडीत गांधी या नव्या नावाचा उच्चार होऊ लागला. राजेंद्रप्रसद, व्रजकिशोरबाबू, कृपलानी यांनी एकेक आघाडी संभाळत लढ्याचं रणशिंग फुंकलं. हा आवाज चंपारण्याला नवीन होता. या विचित्र ध्वनीनं ते रान हादरून गेलं आणि रानावर सत्ता गाजवणाऱ्यांची सिंहासनं डळमळू लागली. मोतीहारी आणि बेट्टिआ अशी दोनच शहरं बिहारमध्ये; बाकी सगळी

गावे डोंगराला बिलगलेली नाहीतर उतरणीवर विसावलेली. चौकशीला निघण्यापूर्वी मळेवाल्यांनाही कल्पना द्यावी असा युक्त विचार करून गांधीजींनी जे. बी. विल्सन साहेबाला निरोप पाठवला. साहेब मळेवाल्यांच्या संघटनेचा चिटणीस. गांधीजी स्वत:हून त्यांच्याकडे गेले. विल्सननं गांधीजींचं यथोचित स्वागत केलं. पण आपला मुद्दा मात्र सोडला नाही.

"मि. गांधी, किती केलं तरी तुम्ही परके. तुम्ही कशाला अंगावर घेता हे काम?'' विल्सन मिशीत हंसत म्हणाला.

"ते माझं कर्तव्य आहे मि. विल्सन. तुम्ही मला माझ्या कामात मदत केली पाहिजे बरं का.'' गांधीजी सर्व समजून म्हणाले.

"अवश्य अवश्य; पण या मदतीचा आणि आमच्या संघटनेचा काही वास्ता राहणार नाही. मी विल्सन, एक व्यक्ती म्हणून मदत अवश्य करीन.'' विल्सन कावेबाजपणाने म्हणाला.

"चालेल, तरीही चालेल. पण खरोखरीच मदत करा.'' असं म्हणून गांधीजींनी विल्सनसाहेबाचा निरोप घेतला. विल्सनसाहेब अधिकच बुचकळ्यात पडला.

मौलाना मझरूल हक्क यांच्या निवासस्थानाला त्या दिवशी यात्रेचं स्वरूप आलं होतं. कारण गांधीजी त्यांच्याकडेच उतरले होते. हक्कसाहेब गांधीजींबरोबर लंडनला होतेच. तिथली ओळख पुढं दृढ झाली. गांधीजी मुझफ्फरपूरला आल्याची वार्ता रानातल्या वाऱ्यासारखी पसरली. शेकडो गरीब शेतकरी मुझफ्फरपुराकडे धाव घेऊ लागले. शे-पाचशे माणूस त्या कुटीच्या अंवतीभोवती जमा झालं होतं. गांधीजी बाहेर आले. त्या समुदायावर एकवार नजर फिरवून ते काही बोलणार होते. पण शब्दच फुटेना. त्या समुदायातला प्रत्येक चेहरा त्याच्या पायाखालच्या जमिनीसारखाच काळा ठिक्कर आणि करपलेला वाटत होता. पाऊसपाण्याविना सुकलेल्या जमिनीला तडे जाऊन भेगा पडतात तशा त्यांच्या सर्वांगावर भेगा होत्या. अन् प्रत्येकाच्या डोळ्यांत काही वेदना होती. काही दु:ख होतं.

गांधीजींच्या हृदयात कालवाकालव झाली. "हा आर्यांचा देश... ही गंगामैय्याची पुण्य भूमी... सस्यशामल वसुंधरेचे पुत्र... पुत्र कसले, जीव शिळा झालेले नुसते देह...'' गांधीजींच्या मनात विषादवाऱ्यांनी कल्लोळ केला. गांधीजींनी त्या जमावाला अभय दिलं. आणि मनात आशेची रोपटी पालवीत तो निघून गेला.

"प्रसादबाबू, आजच चौकशीला निघू या. आता वेळ दवडण्यात अर्थ नाही. लवकर कार्यक्रमाची आखणी करा." गांधीजी राजेंद्रबाबूंना म्हणाले... आणि छावण्या हलल्या. चंपारण्यातल्या झोपडीझोपडीत ती सुगंधमय वार्ता जाऊन थडकली... 'गांधीजी येताहेत.' शेतकरी आपल्या झोपड्या शक्य तितक्या साफसूफ करू लागले. फाटकीतुटकी कांबळी आणि वाकळा हंतरू लागले. अंगणं सारवली जाऊ लागली. मातीत खेळणारी अन् शेतात राबणारी पोरं 'गांधीबाबा की जय' हे कसं म्हणायचं याचा सराव करू लागली.

अरण्यरानं तुडवीत आणि दिवसरात्र जागवीत चौकशीचं चक्र फिरू लागलं. एकेक हकिकत म्हणजे दुःखाचा पंचनामाच! त्यांची व्यवस्थित मांडणी करण्याचं वकीली काम राजेंद्रबाबू करू लागले. कागदावर कागद भरू लागले.

आणि कमिशनरसाहेबांचा हुकूम येऊन थडकला.

"चंपारण्य सोडून जा."

गांधीजींनी हुकूम वाचला आणि कागदपत्रांच्या बाडात तो गुंडाळून ठेवायला सांगितलं. व्रजकिशोरबाबूंनी कागदाला कागद लावून टाकला. आणि वाटेत आलेला खड्डा भरून धों धों वाहणारा प्रवाह जसा पुढंच जातो तशी गांधीजींची चंपारण्य यात्रा सुरूच राहिली, या अडथळ्याला न जुमानता.

वैशाखाचं ऊन रणरणत होतं. धूळ आणि वाळू वाऱ्याच्या झोताबरोबर उंच उडून अंगाला झोंबत होती. झाडांचे पर्णहीन शेंडे भुताच्या पंजासारखे वेडेवाकडे दिसत होते. त्यातून उन्हाच्या वक्ररेषा सळसळत जाताना दिसत होत्या. शेपन्नास माणसांचा जथा चालला होता. वाटेत कुठं एखादी वस्ती लागली तर घडीभर मुक्काम! टीका-टिप्पणी आणि नोंदी; जबाब आणि कैफियत; हे सारं संपलं की पुन्हा आतपयात्रा सुरू. चालता चालता राजेंद्रबाबू म्हणाले, "इथून पुढचा प्रदेश आता अवघड आहे चालायला. भीतिहरवा आलं की हत्तीचा इंतजाम करतो. आपण हत्तीवरूनच यावं. आम्ही सारे पायी येऊ." खांद्यावरच्या पंचानं कपाळीचा घाम टिपत गांधीजी म्हणाले- "प्रसादजी, चंपारण्यात निदान त्या हत्तीला तरी स्वतंत्र राहू दे. आम्हाला नको हत्ती. ही पदयात्रा छान चालली आहे..."

भीतिहरवा आलं. पाठीशी डोंगर घेऊन हे लहानसं गाव उभं होतं. शेतमळ्यांनी गावाला वेढा दिला होता. आणि मध्ये एखाद्या बेटासारखं गाव राहिलं होतं. गाव कसलं ते! मोजक्याच घरांची वस्ती. दहापाच फुलांची

लांबलचक माळ तयार कली म्हणजे जशी दिसते तसं गाव दिसत होतं. दूर दूर अंतरावरची फुलांसारखी छोटी घरं आणि मध्ये दोऱ्यासारखे त्यांना जोडणारे अरुंद रस्ते. बहुतेक घरांना घर म्हणणं जरा धाडसाचंच होतं. झोपड्याच त्या. आणि त्यात राहणारे सगळे शेतकरी, मळेवाल्यांचे मजूर. ओढग्रस्त, त्रस्त आणि उध्वस्त जीवन जगणारे.

गांधीजी एका झोपडीसमोर उभे होते. आतून कुणाचं तरी आर्त विव्हळणं ऐकू येत होतं. हातापायांची पडवळं झालेला एक मुलगा काही कळेनासं होऊन झोपडीच्या दाराशी बसला होता. झोपडीचं दार एखाद्या खिडकीपेक्षाही लहान होतं. आतबाहेर करताना निम्मं शरीर वाकवून चालावं लागे. आतून एक स्त्री बाहेर आली आणि गांधीजींच्या पाया पडली. रडून रडून तिचे डोळे सुजले होते. नाक फुगीर झालं होतं. आणि चेहरा कुठल्या तरी काळजीनं काळवंडून गेला होता.

"बाई, घरात कोण आहे?" गांधीजींनी प्रेमभरानं विचारलं.

बाईच्या तोंडून शब्द फुटेना. नुसतेच ओठ थरथरू लागले. असहायपणे तिनं झोपडीकडे पाहिलं. तिनं आपल्या मुलाला खसकन् ओढून दूर केलं आणि आत जे दिसलं ते पाहून गांधीजींसकट सारे गदगदून गेले. एखाद्या गुहेत हाडांचा सांगाडा अस्ताव्यस्तपणे पडावा तसा तिच्या नवऱ्याचा देह पडला होता. ना अंथरुण, ना पांघरूण. सतरा ठिकाणी विरलेली एक पथारी त्याच्या विद्ध देहाला कुठं कुठं चिकटली होती. अंगभर पांढऱ्या पट्ट्या गुंडाळल्या होत्या. एक डावा डोळा आणि तोंड एवढंच उघडं.

"बाई, काय झालं याला?" प्रसादबाबूंनी विचारलं. तरीही बाई काही बोलेना. तिचं लक्ष दूरवरून येणाऱ्या वाहिनीकडं होतं. वेगानं धूळ उडवत येणारी ती वाहिनी जवळ आली. क्षणभर थांबली. आत कुणी गोरा होता. त्यानं तिथं जमलेल्या लोकांकडे काहीशा तुच्छतेनं पाहिलं आणि तितक्याच उन्मत्तपणे त्याची वाहिनी निघून गेली. जाताना आपली बुबुळं उंच करीत तो पुटपुटला-

"सो, यू आर मि. गांधी..."

गाडी निघून गेली तशी बाईनं एक सुस्कारा सोडला आणि समाधानानं गांधीजींकडं पाहिलं.

ब्रजकिशोरबाबूंनी तिला खोदून खोदून विचारलं,

"बहन, तुम्हे क्या हो गया है? तुम्हारा पती ऐसा क्यों?" तरी बाई बोलेना. खाली मान घालून अंगठ्यानं जमीन उकरू लागली ती.

"मै बताता हूँ, इसका पती ऐसा क्यों?" मागून एक खणखणीत आवाज आला...

"मेरा नाम है बिहारी."

बिहारी चांगला दांडगेश्वर होता. त्याचा जबडा सिंहासारखा क्रूर दिसत होता. डोळ्यात मात्र ओतप्रोत सौजन्य होतं. गांजलेल्या शेतकऱ्यांचा देव म्हणून बिहारी भीतिहरवामध्ये प्रसिद्ध होता. गोऱ्या मळेवाल्यांपुढे आवाज उठवणारा तोच एकटा. कसल्याही संकटात बेगुमानपणे स्वत:ला झोकून देण्याचं सामर्थ्य बिहारीजवळ होतं. सिंहाच्या जबाड्यात हात घालून दंष्ट्रा उपटण्याइतकी तडफ त्याच्या अंगी होती. अनेक शेतकऱ्यांना गोरे मळेवाले मारझोड करीत; तीही आसुडानं. बिहारी तिथं असलाच तर त्यानं नुसती नजर टाकली की आसूड धरणारं मनगट लुळं पडे.

या झोपडीतल्या कर्त्या पुरुषावर काल जो अन्याय झाला होता त्यावेळी बिहारी नव्हता. असता तर अन्याय करणाराला त्यानं मोक्षालाच पाठवलं असतं. आज तो विचारपूस करायला आला होता. त्याच्या डोळ्यांत निखारे फुलले होते. पण वाणीत विलक्षण आर्जव आणून कळवळून तो बोलत होता.

"गांधीबाबा, तुम्ही, प्रसादबाबू सारे चंपारण्यात हिंडत आहांत, चौकशी करताहात. कसली चौकशी करणार तुम्ही? असेच काही दिवस गेले तर इथं स्मशान होईल. मळे जोरानं बहर धरतील. पण त्यांना खतपाणी असेल शेतकऱ्यांच्या हाडामांसाचं. झोपडीत लुळा होऊन पडलेला हा बेणी पाहिलात? त्याचा अपराध काय? वाढवून दिलेला कर वेळेवर भरला नाही. नाहीच भरणार तो. कसा भरणार? वितभर पोटासाठी गाडीभर कष्ट उपसावे तरी पोट रिकामंच; मग कर कुठला भरणार आणि त्याला शिक्षा किती जबर."

बिहारीच्या भीमकाय देहावर डोळ्यांतून अश्रूंचे थेंब ओघळू लागले- गांधीजींसकट सर्व माणसं सुन्नपणे ऐकत होती...

"गांधीबाबा, याला शिक्षा कोणती? एका लाकडाच्या ओंडक्याला बेणीला बांधलं. गच्च, आवळून. सगळे मळेवाले हा जीवघेणा खेळ बघायला हारीनं बसले. एक मोठी हत्ती आणवला. माणूस बांधलेला तो जिवंत ओंडका हत्तीसमोर ठेवला. हत्तीनं तो ओंडका उंच उचलला. मळेवाल्यांना सलामी दिली आणि... आणि.. विलक्षण वेगानं हत्तीनं तो ओंडका दूर फेकून दिला... मळेवाल्यांनी टाळ्या वाजवल्या... पण... पण गांधीबाबा... बेणीचं काय? त्याच्या बायकोचं काय? त्याच्या लहान पोराचं काय? चटणीसाठी वरवंट्यानं

खोबरं चेचतात तसं त्याचं अंग चेचलंय. हाड न् हाड खिळखिळं झालंय. मांसाचे लचके कातडीचे पडदे फाडून बाहेर आलेत. जिवात धुगधुगी आहे एवढंच काय ते... तुमच्या चौकशीत येणार आहे हे? मळेवाल्यांना होणार आहे शिक्षा या क्रूर चेष्टेबद्दल?''

बिहारी पुन्हा स्फुंदू लागला.

झोपडीत अंधार पसरू पहात होता. आतल्या देहाची चाळवाचाळव झाली. बाई आत गेली. पोरगं बिहारीच्या पैरणीला धरून उभं होतं. गांधीजी प्रसादबाबूंना म्हणाले-

''बेणीला इस्पितळात न्यायची व्यवस्था करू या. आणि... त्याच्या बायकोला काही पैसे पण देऊ या.''

आणि एका दुर्दैवी कहाणीची वेदना उरी घेऊन गांधीजी पुढं गेले.

दुसऱ्या दिवशी तिरहुतपासून पाच कोस लांब असलेल्या एका खेड्यात राहुट्या उभारल्या. तंबू पडले. रात्ररात्र जागरणं करून प्रसादबाबू शेतकऱ्यांच्या कैफीयती तयार करीत होते. गांधीजी उष्णजलपान करीत बसले होते. ब्रजकिशोरबाबू कुठंतरी कामगिरीवर गेले होते. दूरवरून मोठा जल्लोष ऐकू येऊ लागला. ढोल बडवल्याचा आवाज जवळ जवळ येऊ लागला. गांधीजींनी मायाप्रसादला विचारलं, ''काय चाललंय हे बाहेर?''

''मिरवणूक आहे बकऱ्याची.''

''का बरं? त्यानं टक्कर जिंकली काय?''

''छे छे. देवीला बळी देणार त्याला.''

''अस्सं...'' गांधीजी पुढं काही बोललेच नाहीत. तरातरा उठून ते तंबूसमोरून चाललेल्या मिरवणुकीत सामील झाले. त्यातली किती तरी माणसं गांधीजींना ओळखत होती. पण ती आपल्याच नादात आता दंग होती. त्यांना दिसत होती फक्त कालभैरवी कालीमाता आणि तिच्यासमोर पडणारा रक्ताचा सडा! लोक धुंद होते. नाचत होते. सर्वांच्या उन्मत्त धुंदीचा बळी तो बकरा! तो बिचारा असहायपणे मधून चालला होता. त्या मुक्या प्राण्याची कावरीबावरी नजर कुणाचा तरी आधार शोधीत होती.

देऊळ आलं; जल्लोष थाबला; आवाज थंड झाले. भगतगणांनी कालीमातेसमोर लोटांगणं घातली आणि त्यातल्याच एका भक्तानं बकऱ्याची मुंडी धरली. दुसऱ्याच्या हातात लखलखता सुरा होता. भगतमंडळी प्रसादासाठी आसुसली होती. लखलखता सुरा उजेडात चमकला आणि बकऱ्याच्या काळजात

जाण्यासाठी तो वेगानं खाली आला.

“थांबा...”

“सुरा सर्रकन मागं गेला. नजरा गर्रकन वळल्या.

“अरे, हे तर गांधीजी.”

“अरे, गांधीबाबा यहाँ कैसे.”

“आपल्या या मिरवणुकीत गांधीजी कसे?”

लोकांची आपापसात कुजबूज.

बकऱ्याची मुंडी धरणारा होता चरणदास. त्याला गांधीजी ओळखत होते. तोही गांधीबाबांना ओळखत होता. त्यानं बकऱ्याचा कान सोडला. चारणदासाचा चेहेरा ओशाळा झाला. गांधीजींनी विचारलं,

“या बकऱ्याला तुम्ही बळी का देता?”

“देवीला प्रसन्न करण्यासाठी.” चरणदास म्हणाले.

“ठीक. माणूस हा बकऱ्यापेक्षा चांगला की नाही?”

“निश्चित्तच.”

“मग माणसाचा बळी दिला तर देवी जास्त प्रसन्न होईल? बोला. तुमच्यापैकी कोण बळी जायला तयार आहे?”

निस्तब्ध शान्तता. एवढी शेदोनशे माणसं. पण हूं की चूं नाही. किल्ल्यावर चित्रं ठेवतात तशी माणसं दिसत होती. फक्त बकऱ्याची लांडी शेपटी हलत होती.

“तुमच्यापैकी कुणी बळी जायला तयार नसेल तर मी आहे. माझा बळी द्या पण या बकऱ्याला सोडून द्या.”

मघाची ती शान्ततेची लाट या शब्दांनी फुटली. कुणी आपल्या तोंडात मारून घेतल्या. कुणी आपले कान धरले. जो तो अपराधी नजरेनं गांधीजींकडे पहात होता. चरणदासनं बकऱ्याला सोडून दिलं. बकरा शान्तपणे निघून गेला. त्याला खरोखरच मुक्ती मिळाली. गांधीजी म्हणाले “शाबास चरणदास. माझी तुझ्याकडून हीच अपेक्षा होती.” त्या दिवशी लोकांचा तो जथा एक नवी दृष्टी घेऊन परत गेला. गांधीजी आपल्या तंबूकडे परत फिरले. तंबूच्या बाहेरच्या बाजूला एक अर्धगोल दगड होता. त्यावर एक माणूस गुडघ्यात मान घालून बसला होता. दूरवरून गांधीजींना पाहताच तो सावरून बसला. गांधीजी जवळ आले तेव्हा उठून प्रणाम करून तो म्हणाला,

“मी आपली बराच वेळ वाट पहात बसलो आहे.”

“अस्सं? मग आत या. निवान्त बोलू.”

“छे, छे निवान्त बोलायला मला सवड नाही. मी आपल्याला एक सूचना द्यायला आलोय.” असं म्हणून त्या व्यक्तीनं गांधीजींच्या कानात कुजबुजून काही सांगितलं. आणि तो त्वरेने निघून गेला.

गांधीजी राहुटीत आले तेव्हा राहुटीत कुणीच नव्हतं. एवढ्यात व्रजकिशोरबाबू लगबगीने आले आणि म्हणाले,

“आज गावात काय आवई उठली आहे माहीत आहे?”

“हो हो. मला सारं माहीत आहे. आत्ताच एका भल्या माणसानं अनाहूतपणे येऊन मला सांगितलंय सारं. पण तुम्ही घाबरू नका.”

प्रसादबाबू म्हणाले, “घाबरू नका कसं? आजपासून तुमच्यावरच पहारा ठेवणं आवश्यक आहे. कुठंही आणि केव्हाही हिंडता.”

“आमच्यावर पहारा परमेश्वराचा आहे.” गांधीजी हसून म्हणाले. “आणि प्रसादबाबू, पहाऱ्यानं संकटाचा नाश होत नाही, ते फक्त थोपवून धरलं जातं एवढंच. तुम्ही एक दार बंद केलंत तर ते दुसऱ्या दारानं येईल.”

रात्र पसरू लागली होती. रातकिड्यांनी राहुटीला जणू वेढाच दिला होता. त्याच्या आवाजानं अंधाराची पोकळी भरून निघाली होती. मधूनच काजवे नजर टाकून जात होते. वाऱ्याच्या मंदशार झुळुकीबरोबर होणारी पानांची सळसळ तेवढी ऐकू येत होती. कंदिलाच्या प्रकाशात गांधीजींचं पत्रलेखन सुरू होतं. अवंतिकाबाई गोखले, देशपांडे, पुंडलिकजी ही सारी माणसं चंपारण्यात येणार होती. त्यांना पत्रं लिहायची होती. विनोबाजी, काका कालेलकर हे निरनिराळ्या कामगिऱ्या करीत होते. त्यांनी पत्राद्वारं केलेल्या प्रश्नांना उत्तर द्यायची होती. मगनभाईंना आश्रमाबाबत सूचना द्यायच्या होत्या. लेखणी खाली ठेवली तेव्हा घड्याळाचे काटे नवावर सरकले होते. सर्वत्र प्रगाढ शान्तता होती. गांधीजी उठले, हातात काठी घेतली आणि हळूच राहुटीच्या बाहेर पडले. दूरवर समोर, टेकडीसारख्या उंचवट्यावर मळेवाल्याची बंगली होती. अरुंद पायवाटेनं झपझप चालत गांधीजी बंगलीजवळ पोहोचले. दूरवरून कंदिलाचा उजेड पाहताच बंगलीवाल्याच्या कुत्र्यानं भुंकून कल्लोळ केला. पण गांधीजी जवळ आले तसा तो कुत्रा शान्त झाला. शेपूट हलवीत तो त्यांच्या पायांशी झोंबू लागला. डाराडूर झोपलेला पहारेकरी जागा झाला. त्यानं डोळे ताणून पाहिले. स्वत:ला चिमटा घेऊन पाहिला. आणि मग तो खडबडून जागा झाला. त्यानं फाटक उघडलं. गांधीजी पुढं गेले. त्यांनीच दारावरची घंटी

दाबली. बराच वेळ झाला आणि मग दाराचा अडसर निघाला. रात्रीचा झगा घातलेल्या मळेवाल्याने झोकांड्या खात दरवाजा उघडला आणि तंद्रीतच विचारलं, "कोण आहे एवढ्या रात्रीचं?"

गांधीजींनी फक्त कंदील उंच धरला. त्या मंद प्रकाशानं त्याचे डोळे उघडले आणि तो दचकला.

"ओ, मि. गांधी! हौ आर यू हिअर?" तो जवळ जवळ किंचाळला.

गांधीजी शान्तपणे म्हणाले, "आपण मला मारण्याचा कट केला असं ऐकलं. म्हणून मी स्वत: आलो. म्हटलं आपल्याला आणि आपल्या माणसांना तसदी नको. आपण खुशाल मारा मला."

मळेवाल्याला घाम फुटला. आधीच अर्धवट झोपेत असलेला तो लडबडू लागला आणि धाडकन् खुर्चीत कोसळला. शेजारीच काचपात्रात पाणी होतं. गांधीजींनी ते त्याला प्यायला दिलं आणि शान्तपणे परत फिरले. परतताना फाटकाशी सलामी द्यायला कुत्रा होताच. कुत्र्यानं राहुटीपर्यंत गांधीजींना सोबत दिली. मळेवाला पाहातच राहिला.

राहुटी शान्त होती. वेलादर्शकानं तीन वाजले असल्याचं सांगितलं आणि आपल्या नित्याच्या पथारीवर गांधीजी आडवे झाले. तासादीडतासात प्रार्थनेसाठी उठायचं होतं.

प्रात:कालच्या वाऱ्याच्या झुळुकांनी ही थरारक वार्ता झोपडी झोपडीत पोचवली. आयाबाया थक्क झाल्या. पोरासोरांनी कान टवकारले. मोठ्यांनी डोळे विस्फारले. हे तर आक्रितच होतं. गांधीजींच्या राहुटीला मधमाशांच्या मोहोळाचं रूप आलं होतं. कुणी प्रेमळ चौकशी करीत होता, कुणी "बरं झालं बुवा' म्हणून सुस्कारा सोडला होता; एखादी सत्तरीतली वृद्धा 'झडापिडा टळो' म्हणत होती, तर उसळत्या रक्ताचा एखादा जवान मिशीवर ताव देऊन आणि डोळ्यांचे निखारे फुलवून म्हणत होता, 'मळेवाल्याकडं बघून घेऊ." गांधीजींनी सर्वांना शान्त केलं. तोच कुणी जयकाराची आरोळी दिली :

"बोला, गांधीजी की"

"जय"... आरोळी देणारा बिहारी होता.

"बोला, बॅ. मोहनदास गांधी की"

"जय"... आवाजाची एक प्रचंड लाट.

आणि मग देहामनानं गांधीमय झालेला कुणी भूमिपुत्र म्हणाला,

''म्हणा महात्मा गांधी की''

''जय''

जमाव आनंदानं उसळला. त्या जयकाराच्या गर्जनांनी सारं चंपारण्य दणाणून गेलं. मरगळलेल्या चंपारण्याला अंतर्बाह्य जागृती आल्याचं ते सुचिन्ह होतं.

मोतीहारी आणि बेट्टिआ अशा दोन प्रमुख शहरांमधून मोर्चे बांधण्यात आले होते. मळेवाल्यांच्या मनातून संताप नुसता धुमसत होता. मिळेल त्या मार्गाने सत्याग्रहीची निंदानालस्ती ते करू लागले. पण चंपारण्यातला शेतकरी मनानं आता खंबीर झाला होता. चंपारण्यातल्या मनाला जाग आलीच होती. आता बुद्धीला उजाळा देणे आवश्यक होते. गंगाधरराव देशपांड्यांना खलिता गेला- ''चंपारण्यात शाळा उघडायच्या आहेत. शिक्षक पाठवा.'' खलित्यास उत्तर आले ते माणसे घेऊनच. बाबासाहेब सोमण आणि पुंडलिकजी (कातगडे) आले. दक्षिण प्रदेशातून आनंदीबाई आल्या. अवंतिकाबाई गोखले, कस्तुरबा, मणीबेन, पारेख, दुर्गाबेन देसाई यांचीही एक फळी तयार झाली आणि चंपारण्यातल्या सहा खेड्यात सहा शाळा सुरू झाल्या.

भीतिहरवात अशीच एक शाळा बांधली. पोरंटोरं 'श्रीगणेशा' लिहू लागली. रानात पाढे-परवचा आणि बाराखड्या घोकण्याचे आवाज येऊ लागले. भितिहरवातल्या शाळेचं छप्पर होतं बांबूचं आणि गवताचं. शाळा छान चालली होती. कस्तुरबा आणि सोमण हे दोनच शिक्षक. दोघांनीही शाळा नावारूपास आणली.

एके रात्री एकदम आगडोंब उसळला. काळ्यानिळ्या धुराचे लोटच्या लोट आभाळात सरकू लागले. बाबासाहेब शाळेशेजारच्या कुटिरात झोपले होते. ते खडबडून जागे झाले. कस्तुरबाई धावल्या. अख्खा गाव गोळा झाला. तोपर्यंत धुमसत्या धुराची उसळती आग झाली होती. नुकतीच आकार घेऊ लागलेली शाळा- राखोडी झाली. बाबासाहेबांचं मन भरून आलं. कस्तुरबाईंनी डोळ्यांना पदर लावला. अविश्रान्त अंगमेहनतीनं उभं केलं ते शिल्प कुणाच्या काळ्या करणीनं उध्वस्त झालं.

गांधीजींना समजलं. अस्वस्थ झाले. पण आग लागली या बातमीहून अधिक अस्वस्थ करणारी बातमी होती आग कुणी लावली याची. लोक म्हणाले, ''मळेवाल्यानं सूड काढला. त्यानंच आग लावली.''

गांधीजी काहीच बोलले नाहीत. बाबासाहेबांनी गाव जमवला. तरुण पोरं

गोळा झाली. कुदळ-फावडी जमा झाली. अस्तन्या-बाह्या सावरल्या गेल्या आणि हा हा म्हणता महिन्याच्या आत शाळा पुन्हा उभी राहिली. तीही नव्या रूपात! पक्क्या विटांची बांधणी, जाड भिंती. आता कोण जाळील आणि काय जाळील!

जळक्या इमारतीचे अवशेष इतस्तत: पडले होते आणि त्यांच्या मध्ये नवी इमारत मोठ्या दिमाखानं उभी राहिली होती. खुरट्या हरळीच्या मधोमध डौलदार वृक्ष फुलावा तशी. गांधीजींनी पाहिलं. बाबासाहेबांच्या खांद्यावर हात ठेवून ते म्हणाले, ''फुफाट्यावर फुंकर घालून निखारा कुणीही फुलवील. पण त्याच फुफाट्याचा शाडूच्या मातीसारखा उपयोग करून सुंदर शिल्प उभारणारा सच्चा कलावंत. ते काम तुम्ही केलंत.''

बाबासाहेब फक्त खाली मान घालून उभे होते. या स्तुतीनं ते भारावून गेले. आजूबाजूच्या शेतकऱ्यांना जमवून गांधीजी म्हणाले, ''निष्कारण मळेवाल्यांवर आळ घेऊ नका. ते आपले शत्रू नाहीत. आपला त्याचा वाद असला तरी वैर नाही.'' नंतर बाबासाहेबांकडे वळून म्हणाले, ''मी आता मोतीहारीला जातो. कोचरबला, अहमदाबादला प्लेग सुरू झाल्याची वार्ता आहे. हातपाय हलवायला हवेत.'' गांधीजी एका बैलगाडीत बसून गेले आणि बाबासाहेबांनी शाळेची घंटा घणघण वाजवली. शेपन्नास पोरं आजूबाजूच्या रानांतून गोळा झाली. दूर जाणाऱ्या बैलगाडीकडे पहात पोरांनी तक्रार केली, ''बाबाजी, गांधीबाबा इथं आले तेव्हा आम्हाला का नाही सांगितलं?'' पोरं हट्टच घेऊन बसली. बद्री पोरांचा पुढारी. तो म्हणाला, ''आज आम्ही सत्याग्रह करू. अभ्यास बंद.'' असं म्हणून साऱ्या पोरांनी धुळीत बैठक मारली.

बाबाजी कस्तुरबाईंना म्हणाले, ''पहा पोरांनादेखील आता सत्याग्रह समजू लागला.''

❖

# चार

प्लेगनं अहमदाबादेवर मोर्चे बांधले. गावातली गर्दी स्मशानात येऊ लागली. बघता बघता मोठमोठे देह कोसळू लागले. गांधीजींना या भयंकर संसर्गजन्य रोगानं अस्वस्थ केलं. आश्रम सुरक्षित राहिला पाहिजे ही चिंता होती. एकीकडं अहमदाबादच्या मजुरांचं प्रकरण चालू होतं तर इकडे प्लेगनं कासाविशी वाढली होती. अहमदाबादच्या हमरस्त्यावर पुंजाभाई हिराचंद भेटले. भला माणूस. आश्रमाविषयी जिव्हाळा बाळगून असायचा.

"काय मोहनदासजी, अस्वस्थ दिसता?" पुंजाभाईंनी विचारलं.

"पुंजाभाई, जागा पाहिजे जागा."

"अरे? तुम्हाला राहायला जागा नाही? एक काय शंभर जागा बघून देतो अहमदाबादेत." पुंजाभाई हसून म्हणाले.

उपनेत्र डोळ्यांवर चढवीत गांधीजी म्हणाले, "ते ठीक आहे भाई. पण या जागेत पन्नास माणसं राहू शकतील का?"

"काय? तुमच्या कुटुंबात पन्नास माणसं आहेत?" पुंजाभाईंनी आश्चर्यानं विचारलं.

"पन्नास आहेत; शंभर होतील. कदाचीत पांचशे... हजारसुद्धा! पुंजाभाई आश्रमाला जागा हवी आहे. आश्रम माझं कुटुंबच आहे." गांधीजींच्या हातावर हात मारून पुंजाभाई ढग गडगडल्यासारखं हसले. आणि स्नेहभरानं म्हणाले, "मोहनभाई, जागा मिळेल. आजपासून शोधायला लागतो. आणि पुंजाभाईंनी खरोखरीच जागा शोधून दिली.

साबरमतीच्या तीरावर! दुधेश्वराचं सुंदर मंदिर साबरमतीच्या तीरावर आहे. राक्षसांचा संहार करण्यासाठी देवांना ज्यांनी आपली हाडं दिली त्या महान्

दधीची ऋषींची ही बलिदानभूमी. जवळच स्मशान, आणि दुसऱ्या बाजूला तुरुंग. असा आश्रमाचा परिवार.

कोचरबच्या बंगल्यातून आश्रम इथं आला. आश्रम म्हणजे कसला! बांबूच्या झोपड्या आणि तंबू. एका शुभ्र आणि शुभ सकाळी साबरमतीच्या तीरावर हा सत्याग्रहाचा यज्ञ सुरू झाला. मगनलाल, गांधी होतेच. विनोबाजी आले. आणखी काही येणार होते.

गिरिजाशंकर जोशी आश्रमात नेहमी येत असत. ते प्रसिद्ध ज्योतिषी होते. त्यांच्या ज्योतिषाचा पडताळा अनेकांना आला होता. अहमदाबादेतल्या अनेक श्रीमंतांचा जोशीबुवांवर विश्र्वास होता. गिरिजाशंकर एक दिवस गांधीजींना म्हणाले, "सोमालाल नावाचे एक धनिक गृहस्थ आहेत. तुम्ही राष्ट्रीय शाळा सुरू केली आहे. तिच्या बांधकामासाठी ते काही देणगी देऊ इच्छितात."

"आनंदाची गोष्ट आहे." गांधीजी हसून म्हणाले, "आम्ही हात पसरलेच आहेत. कुणी हातावर ठेवील ते आम्ही घेतोच. किती देणार आहेत सोमालाल?"

"चाळीस हजार रुपये."

"ठीक आहे. आम्ही अवश्य स्वीकार करू."

दुसऱ्या दिवशी चाळीस हजारांची रक्कम गिरिजाशंकरनी बापूजींच्या स्वाधीन केली. सारे आश्रमवासी गांधीजींना आता बापूजी या लाडक्या नावाने हाक मारू लागले होते.

अहमदाबादेवर दुसऱ्या एका संकटाचे ढग जमा झाले. इन्फ्ल्युएंझाची साथ बळावली. दररोज शेदोनशे जीव हकनाक जाऊ लागले. त्या दिवसात अहमदाबाद ही जणू मृत्यूनगरीच बनली. अशा परिस्थितीत इतकी मोठी रक्कम खर्च न करण्याचा निश्चय गांधीजींनी केला. शाळेच्या इमारतीचे काम तूर्त स्थगित केले. गांधीजींनी गिरिजाशंकर जोशींना बोलावून घेतलं आणि म्हणाले, "जोशीजी, सोमालालभाईंची रक्कम परत देऊन टाका. आम्ही काही इतक्यात इमारत बांधत नाही."

"पण सोमालालभाईंनी कुठं त्याबद्दल विचारलंय? तुम्ही केव्हा ना केव्हा शाळा बांधणारच. त्यावेळी या रकमेचा विनियोग करा. परत कशाला देता?"

आपली तर्जनी हवेत फिरवत गांधीजी म्हणाले, "नाही गिरिजाभाई, नाही. आम्ही ज्यावेळी शाळा बांधू त्यावेळी आम्हाला निश्चित पैसे मिळतील. चिंता नको. सोमालालभाई, नाहीतर आणखी कुणी. पैसे मिळतील ही खात्री आहे. आपण त्यांचे पैसे परत करा."

गिरिजाशंकरांनी निरोप्याचे काम चोख केले. सोमालालभाईंकडून गांधीजींना उत्तर आलं, "पैसे परत घेणार नाही. एकदा दिले ते दिले. आपण त्या पैशांचं काहीही करा."

सकाळचे वारे साबरमतीच्या जलाशयाशी कानगोष्टी करीत होते. आश्रमाच्या पाकशाळेतली चूल पेटली होती. बापूजी मधपाणी घेत होते. मिश्रणाचा घोट घेता घेता पत्रव्यवहार पहात होते. कस्तुरबांच्या कुटीसमोर मोठा घोळका दिसला. जो तो आपलं काम सोडून तिकडं जात होता. पाकशाळाही रिकामीच होती. चूल नुसती धगधगत होती. बापूजींच्या कपाळावर सूक्ष्म आठी पडली. सारा आश्रम ओस. आहे काय? आणि समजा काही घडलंच असलं तर प्रत्येकानं काम कशाला सोडायला हवं?"

रतन सांगत आला, "बापूजी, आश्रमात चोरी झाली." रतन धापा टाकीत होता. त्याला जवळ घेत बापूजी म्हणाले, "अरे रतन, तू कशाला घाबरतोस एवढा? चोरी म्हणजे काय? एकाच्या काही वस्तू दुसऱ्याकडं गेल्या एवढंच! चल मी आलो."

आश्रमात जिकडं तिकडं झालेल्या चोरीची चर्चा सुरू होती. कस्तुरबा पाकगृहात आल्या. बापूजींना आल्याचा रस द्यायचा होता तो त्या घेऊन आल्या. बापूजी कताई करीत होते. पेळू चरख्याला लावीत त्यांनी कस्तुरबांना विचारलं,

"आश्रमात कसली गडबड झाली आज?"

"चोरी झाली."

"कशाची?"

"तशी मामुलीच."

"चोर आश्रमातले?"

"नाही. बाहेरचे."

"चोरी कशाची आणि कुणाची ते नाही सांगितलंत?"

"माझ्याच दोन पेट्या गेल्या."

"ते ठीक, पण पेटीत काय होतं सांगा ना?"

"साड्या होत्या."

"दोन पेट्या होतील इतक्या साड्या तुमच्याजवळ कशा?"

गांधीजींनी काहीशा तीव्र सुरात विचारलं. कस्तुरबांची नजर खाली वळली. त्या पुटपुटल्या,

"रामी आणि मनु कधी कधी आश्रमात येतात. त्यांच्यासाठी मी साठवून ठेवल्या होत्या."

"कशा साठवून ठेवल्या? का विकत घेतल्यात?"

"नाही. मला भेट मिळालेल्या होत्या."

"मग त्यांचा उपयोग तरी करायचा होता. नाहीतर आश्रमाच्या कार्यालयात जमा करायच्या होत्या. संग्रहाचा लोभ आपल्यासारख्यांना शोभा देत नाही."

इतक्यात दूदा दोन रिकाम्या पेट्या घेऊन आला.

"बापूजी, किशनच्या शेतात या रिकाम्या पेट्या सापडल्या."

"दूदाभाई, या पेट्या आश्रमाच्या कार्यालयाकडं जमा कर."

... त्या रिकाम्या पेट्या खडखडवीत दूदा गेला. कस्तुरबांनी आल्याच्या रसाची वाटी बापूजींसमोर ठेवली.

"रागावलात?"

"नाही."

"मग बोलत का नाही?"

"करायला चुकले. आता बोलताना चुकू नये म्हणून."

"आता तुम्ही कधीच चुकणार नाही. घ्या. माझ्याबरोबर थोडा आल्याचा रस घ्या."

"घेते." असं म्हणून कस्तुरबांनी गांधीजींना विचारलं,

"आज वर्तमानपत्रात म्हणे काय काय आलंय."

"काय आलंय?"

"जसं काही आपण वाचलंच नाही."

"तुम्हाला ठाऊक आहे आहारविहाराइतकंच वृत्तपत्रवाचन नेमानं करतो मी."

"मग आज आपल्याला विशेष काहीच वाचायला मिळालं नाही?"

"काहीच नाही. अहमदाबादची बातमी आहे. मजूर-महाजन संघाची. चंपारण्यातली आहे. तीनकठ रद्द झाल्याची..."

"या बातम्या नाही हो." कस्तुरबा काहीशा चिडून म्हणाल्या. "आपल्याविषयी काही आहे का म्हणते मी?"

"माझ्याविषयी? मी कुठं एवढा प्रसिद्ध माणूस आहे?"

"वेड घेऊन पेडगावला नका जाऊ. काल आश्रमात कुजबूज चालली होती. हिरालालभाईंची कागाळी आहे."

"मग त्यात नवीन काय?" गांधीजी शान्तपणे म्हणाले.

"आपल्याला काहीच नवीन नाही. डोळ्यादेखत पोटच्या मुलाचा असा अध:पात तुम्ही शान्तपणे पाहू शकता?"

"हीच तर कसोटी आहे."

"कसोटी कसली? आपण मनात आणता आणि थोडा आवर घालता तर कदाचित माझा हिरालाल हाती लागता." डोळ्यांच्या कडा पुसतपुसत कस्तुरबा उद्‌गारल्या.

"वेड्या आहात झालं. दोष तुमचा नाही. तुमच्या मायेचा आहे. प्रपाताला बांध घालून अडवता येईल पण अध:पाताला घातलेला बांधच स्वत: अध:पतित होतो."

कस्तुरबा आपल्या कुटीकडं निघाल्या तेव्हा एक टिटवी फडफडाट करीत आश्रमावरून वेगानं गेली. हिरालालच्या काळजीनं व्याकुळलेलं त्यांचं मन त्या टिटवीकडं उगाचच आशंकेनं पाहू लागलं.

अहमदाबादचं मजूर प्रकरण एकदाचं निकालात निघालं. मजूरमालकांचा समेट झाला. अंबालालभाई, शंकरलाल बंकर यांना फार आनंद झाला. याच वेळी खेड्याची सुपारी आली. लोकांना कार्यक्रमांच्या सुपाऱ्या तर गांधीजींना सत्याग्रहाच्या सुपाऱ्या येत. सरदार पटेल खेडा सत्याग्रहात गवसले आणि सत्याग्रहानं जिंकलेल्या अनेक लढयांपैकी खेड्याची ही लढाई कमालीची यशस्वी झाली. चंपारण्यात आता आनंदीआनंद होता. बिहारीचं पत्र आलं होतं- "आपल्या आशीर्वादानं काम फत्ते झालं. तीनकठी कायदा रद्द झाला. आम्ही तुमची आतुरतेनं वाट पहात आहोत."

आश्रमाचं दैनंदिन जीवन नित्याप्रमाणं सुरू होतं. कस्तुरबांनी लावलेली तुळस अंगानं भरू लागली होती. तुळशीपलीकडं कुणीही न लावलेली एक कोरांटी वाढली होती. त्या वाळवंटाचा आता आश्रमामुळं कायापालट झाला होता. पाणीसुद्धा न धरणारी ती जमीन आता बीज धरू लागली होती.

खेड्याहून सरदारांचं पत्र घेऊन काही शेतकरी बापूजींना भेटण्यासाठी आले होते. नंदकिशोर त्यांचा पुढारी. बापूजी कोरांटीला पाणी घालत होते. मगनभाई आले आणि म्हणाले,

"आपली बैठकीची व्यवस्था केली आहे."

"आत कशाला. इथेच बसू ना मोकळ्यावर. बसायला कांबळी आणा."

पटापट कांबळी अंथरली. बालकृष्णावर शेषानं छत्र धरलं होतं. त्याप्रमाणं एका झाडाच्या डेरेदार फांदीनं या बैठकीवर सावली धरली होती. शेपन्नास माणसं होती. नंदकिशोर म्हणाले, "आमच्या वतीनं आज आम्ही आपल्यासाठी भेट आणली आहे."

"भेट? मला?"

"हो हो, आपल्याला."

गुलाबी कागदाच्या आवरणात रेशमी फितीनं बांधलेली एक पेटी नंदकिशोरनं उघडली. पेटीवरचा कागद निघताच चंदनाचा गंध हवेत दरवळला. चंदनी पेटीवर डोळ्यांना मोहिनी घालणारं नक्षीकाम होतं. पेटीत एक शुभ्र मुलायम धोतरजोडी आणि तितकंच सुंदर कापड होतं."

गांधीजींनी ती पेटी आडवी उभी, उलथी पालथी करून पाहिली. तर्जनी व अंगठा यात धरून कापडाचं सूत पाहिलं आणि म्हणाले, "सुंदर, फारच सुंदर."

सगळ्या शेतकऱ्यांचे चेहरे खुलले. राठ मिशांच्या आवरणातून त्यांचे ओठ हसताना दिसू लागले.

"आवडली आमची भेट आपल्याला?" नंदलालनी विचारलं.

"आवडली. फार आवडली."

"आम्हांला वाटलंच होतं. आपल्यामुळं आमचे हे शेतकरीबांधव सुखी झाले. आपण नसता तर कदाचित वर्षानुर्ष आम्ही असेच राहिलो असतो."

"हा तुमचा विनय आहे. तुम्ही लोकांनी जिद्द धरली नसती तर मी एकटा काय करणार होतो. आता मात्र तुम्ही लोकांनी मनापासून शेती केली पाहिजे. आपल्या देशातील उपासमार थांबवणं तुमच्यासारख्यांच्या हाती आहे."

एवढ्यात निरोप आला- 'गंगाबेन मुजुमदार आल्यात.'

"बसायला सांगा त्यांना. मी आलोच." गांधीजी म्हणाले.

"बापूजी, तुम्ही आता पुन्हा आमच्या गावी कधी येणार?"

"येईन केव्हा तरी, युद्ध निघाल्याशिवाय सैनिक तिकडं कशाला येईल?" बापूजी हसून म्हणाले, नंदलालजी उठून निघाले तेव्हा बापूजी म्हणाले, "थांबा नंदलालजी."

"आज्ञा बापूजी."

"नंदलालजी, तुमची भेट मला स्वीकारता येणार नाही."

"का बरं?" नंदलालजी चमकून म्हणाले. "आपण आत्ता तर म्हणाला,

आपल्याला भेट फार आवडली.''

''नंदलालजी, मला तुमची भेटीची भावना आवडली. पण वस्तू नाही आवडली.''

''म्हणजे?''

''नंदलालजी, त्या धोतरजोडीवरचा छाप वाचा बरं?''

''वाचतो'' असं म्हणून नंदलालजींनी घडी उलगडली.

''मेड इन् इंग्लंड; मँचेस्टर.''

''बापूजी, धोतरं मँचेस्टरचीच आहेत. हा बघा छाप.''

''होय ना, मग म्हणूनच ही भेट मला नको.''

''बापू...''

''होय नंदलालजी. या मँचेस्टरनं आज भारतातल्या विणकऱ्याला उपाशी मारलंय. हजारो मैलांवरचे हे यंत्ररूपी राक्षस इथलं अन्न गिळून टाकताहेत. ही भेट तुम्ही परत घेऊन जा.''

नंदलालजी हिरमुसले. ती धोतरजोडी जडपणे त्या चंदनाच्या पेटीत ठेवीत म्हणाले, ''बापूजी... मला कल्पना नव्हती की...''

''नंदलालजी, पुढील वेळी याल तेव्हा कातलेल्या सुताची जोडी आणा. कितीही जाडीभरडी असली तरी आवडेल मला आणि असं करा, ती चंदनाची पेटी ठेवा. ती इथंच म्हैसूरला तयार झाली असेल.''

तेवढ्यानंही नंदलालजींना समाधान वाटलं आणि प्रणाम करून ते निघून गेले.

किशनभाईनं सकाळी कांबळी उचलली. गंगाबेन कुटीत येऊन थांबल्या होत्या. बापूजींची काठी कुठं दिसेना. ''अरे किशन, माझी काठी कुठं गेली?''

''आत्ता तर होती इथं'' किशन शोधक नजरेनं पाहात म्हणाला. काठी कुठंच दिसेना. बापूजींना तर काठी हातात लागते नेहमी. किशन कावराबावरा झाला. ''आपलीच चूक. काठीवर नजर ठेवायला हवी होती.'' तो मनाशी म्हणाला.

''असू दे किशन. मी जातो आता तसाच. सापडली तर आणून दे आत.''

किशन दूरवर धावत गेला. पोरं खेळत होती. रतन आणि लक्ष्मीच्या मागं पोरांचा हा घोळका होता. किशन धावत गेला. रतननं काठीचा घोडा केला होता. तो टकॉक टकॉक करीत धावत होता. पोरं हसत खिदळत त्याच्या मागून

हुंदडत होती. किशननं रतनच्या पाठीत रपाटा मारला आणि खस्कन काठी ओढून तो परत फिरला.

"ही घ्या बापूजी काठी" किशन आनंदानं म्हणाला.

"किशन, ती काठी मुलांना देऊन टाक."

"आपल्यासाठी आणली मी ती."

"मुलांना दुखावून? वेडा. जा परत नेऊन दे."

असं म्हणून तसेच वेगानं चालत गांधीजी कुटीकडं गेले. गंगाबेन केव्हाच्या वाट पहात होत्या.

"काय गंगाबेन, कुठवर यात्रा केलीत?" बापूजींनी हंसून विचारलं.

"खूप हिंडले. शेवटी विजापूरला चरखा सापडला."

"काय विजापूरला?" विनोबाजींनी आश्चर्यानं विचारलं.

"गोलघुमटाच्या विजापूरला नव्हे." बडोद्याच्या विजापूरला."

"मग लोक काय म्हणाले?" गांधीजींनी उत्सुकतेनं विचारलं.

"लोक म्हणाले आम्हाला पेळू द्या आणि आम्ही कातलेलं सूत विकत घ्यायचं कबूल करा. तर आम्ही कातू."

"फारच छान. गंगाबेन, तुम्ही चांगलं काम केलं."

"पण बापूजी, पेळू कुठून आणणार?" सचिंत मुद्रेनं गंगाबेननी विचारलं.

इतक्यात उमर सोबानी आले. उमरजींना कितीतरी गिरणीमालक ओळखत होते. गांधीजींची प्रश्नमुद्रा पाहताच सोबानी चट्कन म्हणाले, "पेळू पाठवणं फारसं अवघड नाही. मी गिरणीतून पेळू पाठवतो."

गंगाबेन आनंदल्या. पदर खोचत त्या म्हणाल्या, "तर मग आता आम्हाला कामाला सुरुवात करायलाच हवी. येते हो मी."

गंगाबेन गेल्या. त्यांच्या दूर दूर जाणाऱ्या आकृतीकडं पहात गांधीजी उमरजींना म्हणाले, "उमरजी, अशा बायका घरोघरी होतील तर स्वराज्य किती दूर आहे?"

"अशा म्हणजे कशा बापूजी?" उमरजींनी विचारलं.

"उमरजी, ही विधवा; घरची श्रीमंत आहे. वैभवाच्या राशीवर लोळत सुखानं मिष्टान्न खाईल आणि अत्तराचे दिवे जाळत परांच्या गादीवर विश्रांती घेईल अशी हिची संपत्ती आहे. पण गरिबांसाठी चरख्याचा शोध करायला वणवण हिंडली बिचारी. मुजुमदार घराणं तुम्हाला माहीत आहे..."

"काय? मुजुमदारांची गंगा... गंगाबेन मुजुमदार..."

"हो हो! तीच. तीच ही गंगाबेन मुजुमदार. धाडसी आहे, कल्पक आहे,

हुशार आहे. आणि... स्वत: दु:ख सोसता सोसता तिला दुसऱ्याची दु:खंही कळताहेत.''

''बापूजी, आश्रम कसा काय चाललाय?'' उमरजींनी विचारलं.

''उमरजी, चांगली माणसं मिळणं हे मी सर्वांत मोठं सुदैव समजतो. अन् ते मला लाभलंय. महादेवभाई, मगनभाई, विनोबाजी, काका... ही सारी माणसं आश्रम वाढवताहेत.''

''एक नाव आपण विसरलात बापूजी.'' उमरजी हसून म्हणाले.

''ते कोणतं?''

''कस्तुरबा.''

''विसरलो नाही मी. ते नाव इतक्या खोलवर हृदयात आहे की वर ओठापर्यंत यायला जरा वेळ लागतो.''

ही बैठक संपली तेव्हा कस्तुरबा बापूजींच्या स्नानाची तयारी करीत होत्या. हंड्यातलं पाणी घंगाळात उपसता उपसता त्या पुटपुटत होत्या, ''ते नाव इतक्या खोलवर हृदयात आहे की ओठापर्यंत यायला जरा वेळ लागतो.''

बिर्लाजी भेटायला आल्याची वर्दी किशननं आणली. बिर्लाजींना निरोप मिळाला, ''आता तासभर बापूजींची भेट होणार नाही. वेळ असेल तर अवश्य बसा.''

''पुन्हा येतो.'' असे सांगून ते निघून गेले.

बापूजींचं स्नान झालं. आज स्नानापूर्वी मालिश करायचं राहून गेलं. रोजच्या परिपाठात कधी कधी असा बदल करावा लागे आणि असं झालं की इकडं कस्तुरबांची घालमेल होई.

बिर्लाजी येईपर्यंत वाट बघायला हवी होती. पण नुकतंच येऊन पडलेलं वृत्तपत्र वाचलं आणि मग बापूजींना आठवण झाली...

''आज आपल्याला पुन्हा खेडा जिल्ह्यात जायचंय.''

मगनभाई मुंबईला गेले होते, पण जाताना त्यांनी दिनदर्शिकेवर सर्व कार्यक्रम लिहून ठेवला होता.

दिनदर्शिकेचं पान काल चुकून कुणीतरी फाडलं आणि कार्यक्रमाची आखणी विस्कटली. तो कागद कुठेच सापडेना. त्या एवढ्याशा कागदासाठी सारा आश्रम डोळे ताणू लागला. पोरंसोरं वाळवंटातही जाऊन आली. पण त्या कागदानं कुठं दडी मारली होती कुणास ठाऊक.

त्या दिवशी अनसूयाबेन आश्रमात होत्या. त्यांनी ही धावपळ पाहिली. श्रीमंताघरची लेक! गरीबाचा कळवळा असला तरी एका य:कश्चित कागदाच्या

तुकड्याची किंमत तिला ठाऊक असण्याचं काही कारण नव्हतं. शेपन्नास माणसं या कागदासाठी धडपड करत आहेत हे पाहून अनसूयाबेन धावत आल्या आणि म्हणाल्या, "बापूजी, असली दहा कॅलेंडरं मी तुम्हाला देते. इतक्या सगळ्या माणसांना उगीचच का शोधाशोध करायला लावता?"

गांधीजी गंभीरपणे बोलले, "कागद लहान की मोठा हा प्रश्न नाही. प्रश्न चांगल्या आणि वाईट सवयीचा आहे. गरीब देशाच्या प्रजेनं काटकसरीनंच वागलं पाहिजे."

"पण बापूजी, त्या कागदाचा तुम्हाला आता तरी सापडून उपयोग काय आहे?"

"प्रत्येक वस्तूचा जास्तिजास्त अन् काळजीपूर्वक उपयोग झाला पाहिजे. या कागदाचा मी लिफाफा करणार आणि तोच पत्रासाठी उपयोगात आणणार"

अनसूयाबेन काहीच बोलल्या नाहीत. गांधीजींची अस्वस्थ हालचाल सर्वांनाच दिसत होती आणि सारेच हवालदिल झाले होते. इतक्यात रतनला पाठीस घेऊन किशन धावत आला. त्याच्या हातात कागदाचा चोळामोळा होता. तो टप्कन त्यानं खाली टाकला आणि म्हणाला,

"बघा, हाच का?"

"हो हाच. किशन तू आज हे चांगलं काम केलंस."

कागदाचा बोळा उलगडला. त्यावर आपले दोन्ही हात फिरवून तो साफ करीत गांधीजी म्णाले, "अनू, आता आम्ही खेडा जिल्ह्यात निघालो. येणार?"

"आता पुन्हा काय आहे बापूजी तिथं?"

"रिक्रूट भरतीचा प्रचार."

"तुम्ही इंग्रजांच्या बाजूनं प्रचार करणार? सैन्यात भरती व्हा म्हणून?"

"का? काय हरकत आहे?"

"इंग्रज तर आपले शत्रू..."

"चुकता तुम्ही अनसूयाबेन. इंग्लंडच्या भारतावरील सत्तेविरुद्ध आपला लढा आहे. इंग्लंड या राष्ट्राविरुद्ध नाही. ते जर संकटात सापडले तर मदत करणं हे आपलं कर्तव्य आहे. रावजीभाईंना सांगा आपल्याला निघायचंय."

रावजीभाई आले. त्यांनी सांगितलं, "जवाहरलालजींची तार आली आहे. दिल्लीला येण्याबद्दल."

"त्यांना उलट तार करा. आता खेड्याकडे कूच करीत आहोत. तेथून आलो की गाठ घेऊ."

❖

# पाच

गांधीजी आश्रमातून गेल्याबरोबर आश्रम एकदम सुना सुना वाटू लागला- पुष्पहीन ताटवा दिसतो तसा. सायंप्रार्थना झाली आणि किशन, रतन, लक्ष्मी यांनी महादेवभाईंजवळ आग्रह धरला, ''महादेवकाका, आम्हाला गोष्ट सांगा.''

''गोष्ट गांधीजींचीच सांगेन. चालेल.''

''चालेल, चालेल. गांधीजींचीच सांगा.''

महादेवभाईंनी सुरुवात केली...

''पौर्णिमेची रात्र होती. साबरमतीचं पाणी खळखळा वहात होतं. शुभ्र चांदणं पाण्यावर पडून जणू चांदण्याचा रसच वाहतोय असं वाटत होतं...''

मुलं कान देऊन ऐकत होती. गोष्ट ऐकायला कस्तुरबाही येऊन बसल्या.

''उन्हाळा असल्यानं मंद वाऱ्याच्या झुळुका अंगावरून जाताना बरं वाटत होतं आणि त्यांच्या स्पर्शामुळं उन्हाळ्यातही थंडीची शिरशिरी अंगावर येत होती.''

''ही काय बापूजींची गोष्ट आहे?'' रतन अधीरेपणानं म्हणाला.'' महादेवभाईंना मुलांची उत्सुकता ताणावयाची होती. मग त्यांनी पुन्हा सुरुवात केली,

''प्रार्थना झाली. एका बिछान्यावर बापूजी बसले होते. तक्क्यावर उजवा हात टेकून ते किंचित आडवे झाले. समोरच रावजीभाई बसले होते. बिछान्याच्या कडेला अनसूयाबेन, बिहारमधल्या मिस् पेन आणि...''

''आणि तिसरी मी होते.'' महादेवभाईंचं बोलणं तोडून हसत कस्तुरबा म्हणाल्या.

"बापूजी उघडेच होते. नेहमी असतात तसे. गार वारा अंगाला झोंबत असेल म्हणून कस्तुरबा उठल्या आणि एक चादर त्यांनी बापूजींच्या अंगावर घातली.

"तुम्ही ती सापाची गोष्ट सांगणार वाटतं?" कस्तुरबा म्हणाल्या. सापाची गोष्ट म्हणताच सारी मुलं थरारली.

"चादरीचा एक पदर जमिनीवर पसरला होता. रावजीभाईंची नजर तिकडं गेली आणि ते क्षणभर चमकले. काळ्या रंगाचा एक साप चादरीचा रस्ता करून बापूजींच्या पाठीवर जात होता. बापूजी बोलण्यात रंगले होते. रावजीभाईंना वाटलं एकदम ओरडावं. पण छे. ओरडलो तर साप घाबरेल, दंश करील. म्हणून त्यांनी बापूजींना शान्तपणे सांगितलं, "बापूजी, साप."

"कुठं आहे?" बापूजींनी तितक्याच शान्तपणे विचारलं.

"तुमच्या पाठीवर."

"बा उठल्या, पेनबाईही दूर झाल्या. रावजीभाईंनी पाहिलं- साप कुठंच दिसेना. चादरीच्या बोगद्यात तो बेटा खुशाल जाऊन लपला होता. बापूजी स्थिर होते. एखाद्या पुतळ्यासारखे. रावजीभाईंनी चारी टोकं धरून चादर उचलली. ती हलकी फुलकी चादर चक्का लावलेल्या फडक्यासारखी जड वाटत होती. रावजीभाईंनी चादर दूर फेकून दिली. तो कालसर्प त्या चादरीतून बाहेर पडला. त्याला नंतर रावजीभाईंनी पकडलं आणि दूर सोडून दिलं." मुलांना गोष्ट फार आवडली. आणखी गोष्ट सांगा असा हट्ट मुलांनी धरला. तेव्हा कस्तुरबा म्हणाल्या, "महादेवा, आज पुरे. पत्रव्यवहार बघायचाय. उद्याला कसलंसं पत्र व्हाइसरायकडं धाडायची आठवण करायला सांगितलंय यांनी तुला. चल."

माखनलाल गांधीजींबरोबर हुज्जत घालत होता. बरेच आडवेतिडवे प्रश्न विचारून बेजार करीत होता. खेडा जिल्ह्यातला हा गरीब शेतकरी गांधीजींना देवासमान मानणार होता. खेडा सत्याग्रहात माखनलाल आघाडीवर होता. साहेबानं जंग जंग पछाडले तरी माखनलालनं सारा भरला नाही. माखनला फटक्यांची शिक्षा झाली. एक फटका पिंढरीवर बसून कातडी सोलली होती. आता माखनचा पाय बरा झाला होता. पण करबंदीच्या चळवळीची आठवण करून देणारा चार बोटाचा एक चट्टा त्याच्या पिंढरीवर कायमचा राहिला होता. तोच माखनलाल गांधीजींपुढं उभा होता.

"बापूजी, तुम्ही आमचे देव. तुमच्या शब्दाखातर कुठेही उडी घालू. पण

आमच्या उडीचा निदान तुम्हाला तरी उपयोग व्हायला हवा.''

''माखन, ही वेळ फार महत्त्वाची. यावेळी इंग्रजाला आपण मदत केलीच पाहिजे.''

''बापूजी, मग खेडा सत्याग्रहात आम्हाला फटके कशाला खायला लावले?''

''अन्यायाशी सामना देण्यासाठी.''

''मग त्याच अन्यायाला तुम्ही आता मदत करायला निघालात?''

''माखन, इंग्रजांचं आणि आपलं भांडण नाही. इंग्रजी सत्तेविरुद्ध आपण भांडतो. इंग्लंड हे उदार राष्ट्र आहे. ते जगलंच पाहिजे.''

''बापूजी, हे आम्हाला मंजूर नाही. मला हा अवसानघातकीपणा वाटतो. येतो आम्ही. बापूजी, एवढं सोडून कोणतंही काम सांगा. काळजांची पायतणं करून तुम्हाला देऊ. पण हे सांगू नका.''

असं म्हणून माखनलाल निघून गेला. त्याच्याबरोबर त्याची पाच-पंचवीस माणसं आली होती. तीही माखनची सावली धरीत निघून गेली. ही छोटीशी सभा एका झाडाखाली भरली होती. सगळेजण निघून गेल्यावर झाडाखाली फक्त बापूजी आणि रावजीभाई एवढेच राहिले. बाकीचे सारे इतर गावांतून प्रचारासाठी गेले होते.

आकाश झाकोळून आलं होतं. पश्चिमेची रुपेरी कडा शुभ्र कागदावर काळा रंग पसरावा तशी काळवंडून जात होती. पिंजलेल्या कापसासारख्या शुभ्र ढगांऐवजी काळसर वर्णाचे बथ्थड ढग जमा होऊ लागले. पावसाळा नसतांना हे फसवे ढग असे आभाळात येतात. बापूजी आभाळातला तो देखावा पहात होते. रावजीभाईंनी विचारलं, ''बापूजी, माखनलालसारखे मातबर लोक तोंड फिरवू लागले. आता काय?''

''जे मघा होतं तेच आताही. आपलं काम सुरूच राहील.''

''याच माखनलालनं मागल्या वेळी आपल्याला गाडी दिली होती, निवारा दिला होता. माणसं तर कितीतरी. हा एवढा कसा बदलला?''

''बदलला ना? मग त्याला आणखीही बदलून आपल्या मार्गावर आणता येईल. विश्वास हवा. रावजी, आभाळातले ते रंग बघ. ढगांचे. मघा रुपेरी होते ते आता काळेशार आले. पुन्हा थोड्या वेळानं गुलाबी छटाही येईल कदाचित. रावजी, ढग बदलले, ढगांचे रंग बदलले तरी आभाळ बदललंय का? त्याला बदलून कसं चालेल. आपल्याला तसं व्हायचंय. आभाळासारखं मोठं, व्यापक.''

काहीतरी खूप नवं समजल्यासारखा चेहेरा करीत रावजीभाई म्हणाले,

"मग आता पुढं काय करायचं म्हणता?"

"आपली माणसं आली की स्वाऱ्या पुढच्या गावी हलवायच्या."

"चालेल. तोपर्यंत बच्चूभाईकडं जाऊन येऊ. त्यांनी तुम्हाला चहाला बोलावलंय."

"चहा न पिणाऱ्या माणसाला चहाला बोलावलंय?" बापूजी हसून म्हणाले, "बच्चूभाईंना म्हणावं आम्हाला चहाचे कप देण्यापेक्षा दोन रिक्रूट द्या."

वारा जोरानं वाहू लागला. झाडांची पानं एकमेकांना घासून आवाज करू लागली. बच्चूभाईंच्या घराकडे जाणाऱ्या अरुंद वाटेनं गांधीजी चालू लागले. त्यांच्या पाठोपाठ रावजीभाई गेले. त्या वाटेवर त्या दोघांव्यतिरिक्त आता कुणीही नव्हतं...

पहाटवारे साबरमती आश्रमावरून वाहू लागले. आश्रमाची प्रार्थना संपलेली होती. झोपडीवजा इमारतींच्या खिडक्यांतून कंदिलाचा मंद पिवळा प्रकाश दिसत होता. बापूजी जवाहरलालजींना पत्र लिहीत होते. कृपलानींना लिहायचे पत्र अजून वाट पहात होते. पत्र लिहिता लिहिता सूर्य किती वर आला याचं भान नाही राहिलं. पत्रावर सही करून लेखणी खाली ठेवली तर दारात कस्तुरबा!

"आज एवढ्या सकाळच्या?"

"आज सण आहे."

"कुणाचा?"

"सर्वांचा."

"मग आपलं म्हणणं काय आहे?" हंसत बापूजींनी विचारलं.

"आज आपला नेहमीचा आहार नको."

"ठीक आहे. आज उपवास करू."

"माझं म्हणणं तर ऐका. कस्तुरबा काहीशा त्रासून म्हणाल्या. "आज मी गव्हाची खीर आणि मुगाची उसळ करणार आहे."

"करा ना. तुम्ही निरनिराळे पदार्थ फार छान करता."

"आपण खाणार?"

"मी?"

"हो, खीर खाल्लीच पाहिजे."

"खाल्लीच पाहिजे? मग विचारता कशाला?"

"कर्तव्य आणि शिष्टाचार म्हणून."

"मंजूर. मंजूर. आज आम्ही खीर खाऊ."

"हो, आज आपण पुन्हा दौऱ्यावर जाणार..."

"नडियादला जायचंय."

"बरोबर महादेवाला घेऊन जावं. अजून तब्येत सुधारलेली नाही."

"हे सांगता अन् खीर खा म्हणता."

कस्तुरबा गेल्या. जराशानं महादेव अन् नरहरीभाई आले.

"महादेव, आज येणार ना तू आमच्याबरोबर?"

"असं का विचारता बापूजी? तुमच्याबरोबर आता सावलीसारखं राहायचं ठरवलंय मी."

"सूर्य प्रखर झाला की सावलीसुद्धा माणसाला सोडून जाते बाबा."

"ते काही असलं तरी ही सावली कोणत्याही सूर्याला शरण जाणार नाही बापूजी."

"महादेवा, तुझ्यासारखी माणसं संगतीला आहेत म्हणून आमच्यासारखी विचित्र माणसं जगत आहेत."

"बापूजी, कल्पना छान आहे. पण फक्त उलट वापरली पाहिजे."

बोलता बोलता उन्हाचे कवडसे अंगावर खेळू लागले. तेव्हा नरहरीभाई म्हणाले, "मी जातो. गावात जाऊन आज आपल्या दाण्यागोट्याची व्यवस्था करायची आहे."

कस्तुरबांचा निरोप आला, "पाठवू का?"

गांधीजींनी उत्तर दिलं, "पाठवू नका. घेऊन या."

थोड्या वेळानं कस्तुरबा आल्या. एका थाळीत दोन वाट्या आणि दोन कटोरे होते. कटोऱ्यात गरम खीर होती. वाट्यांतून मुगाची उसळ. त्यात लाकडी चमचे ठेवीत कस्तुरबा म्हणाल्या, "घ्या."

बापूजींनी खिरीचा चमचा तोंडाला लावला तेव्हा कस्तुरबा त्यांच्याकडं अतीव समाधानानं पहात होत्या.

"तुम्हाला काय माहीत महादेव पण इथं आहे ते?" बापूजींनी विचारलं.

"आता हे काय सांगायला हवं?"

"बा, आज मुगाची उसळ विशेष चांगली झाली आहे." उसळ दातांखाली

चावत महादेवभाई म्हणाले.

"मग आणखी आणू का?"

"मला नको. महादेवा, तू खा. सबंध पातेलंच घेऊन या."

आज कस्तुरबांना फार बरं वाटलं होतं. गेल्या कित्येक दिवसांत बापूजींनी त्यांच्या मनासारखं खाल्लं नव्हतं. दौऱ्याच्या वेळी लिंबं आणि भुईमुगाचं लोणी खायचे. त्यामुळं अतिसार झाला तेव्हापासून तर बापूजींनी खाण्यापिण्याच्या बाबतीत फार काटेकोरपणा ठेवला होता. आज बापूजींनी एक वाटी गव्हाची खीर खाल्ली. त्या एवढ्याशा खाण्यानं कस्तुरबांना मनोमन सुख झालं.

पण संध्याकाळ उगवली अन् पोटात डचमळू लागलं. कुणीतरी वळवळणारे प्राणी पोटात फेर धरताहेत असं वाटू लागलं. तासाभरात नडियादकडे जाणारी गाडी साबरमती स्टेशनवर येणार होती. आश्रमापासून स्टेशन लांब. कुणाला काही कळू दिलं नाही. पोटातला मुरडा आतल्या आत सहन करीत बापूजी स्टेशनपर्यंत चालत गेले. अहमदाबाद आलं. तिथं वल्लभभाई भेटले.

"काय भाई, वार्ता काय?"

"आजपर्यंत क्षेम. आपलं?"

"मी तर कसा आहे हे तुम्ही बघताच आहात." हसत गांधीजी म्हणाले. याच वेळी पायातून असह्य कळा येत होत्या. स्वत: उन्हाची आग सहन करणारं झाड इतरांना सावली देतं तसे गांधीजी वेदना सोसून हसत होते, वार्तालाप करीत होते. गाडी पुढं गेली. रात्र भरू लागली. नडियाद आलं. अर्ध्या मैलाची वाट तुडवायची होती. पोटातल्या कळा मेंदूला जाऊन डसत होत्या. पण त्यांना चेहऱ्यावर उतरू न देता गांधीजी चालत गेले. निवासात पोचताच बहिर्दिशेला जाणं भाग पडलं. एकदा, दोनदा, तीनदा...

पाय गळाठू लागले. अंगातला त्राण हळूहळू कमी होतो की काय असं वाटू लागलं. महादेवभाई अस्वस्थ झाले. त्यांनी साबरमतीला नरहरभाईंना पत्र लिहिलं, "आश्रमातला कमोड घेऊन या."

डॉक्टर कानुगांना निरोप गेला. निरोपाचं उत्तर म्हणून डॉक्टर स्वत:च धावतपळत आले. त्यांनी तपासणी केली. पोट खपाटीला गेलं होतं. रस पिळून काढलेल्या चिपाडासारखे पोटाचे स्नायु झाले होते. चेहेऱ्यावर फिकेपणा आला होता. डॉक्टर महादेवभाईंना म्हणाले, "महादेवभाई, मी एवढा आलो, तपासणी केली. पण उपयोग काय?"

"का बरं? एवढं विकोपाला गेलंय दुखणं?" सचिंत सुरात महादेवभाईंनी विचारलं.

"छे छे. दुखणं सुसाध्य आहे. पण बापूजी औषध घेतील तर ना?"

महादेवभाई बापूजींच्या खाटेजवळ गेले आणि हलक्या गोड आवाजात यांनी विचारलं, "बापू, औषध घेणार ना?"

कुशीवरून वळत बापूजी म्हणाले, "महादेव, विचारून मला यातना का देतोस?"

"तुमच्या यातना मला बघवत नाहीत म्हणून, तुम्ही इंजेक्शन घ्या."

"प्राण्याची लस असलेलं इंजेक्शन मी कसा घेऊ महादेव?"

एवढ्या बोलण्यानंही त्यांना थकवा आला. डॉक्टर हात बांधून उभे होते, ते हताशपणे खुर्चीत बसले.

रात्री ताप वाढला. तासातासाला थर्मामीटरचा पारा अधिकच वर सरकत होता. त्यात पुन्हा पोटातल्या कळा आणि वात.

पहाटेस नरहरीभाई आले; बरोबर कमोड घेऊन. आता ताप किंचित उतरला होता. ग्लानी आली होती. नरहरीभाईंचा आवाज ऐकून बापूजींनी डोळे किलकिले केले आणि विचारलं,

"का एकाएकी आलात?"

"कमोड आणलंय, आश्रमातून."

"कुणी मागवला कमोड?" तशाही अवस्थेत बापूजी उग्रपणे म्हणाले.

"महादेवभाईंचं पत्र आलं, म्हणून घेऊन आलो."

कधीही न रागावणाऱ्या बापूजींचा चेहेरा लाल झाला. तापात या आगीची भर. ते तीव्र सुरात महादेवभाईंना म्हणाले,

"महादेव, तू हे काय केलंस? आश्रमातला कमोड कशाला मागितलास?"

बापूजींच्या या प्रश्नानं महादेवभाई थरारले. असा हा पहिलाच प्रसंग. ते शान्तपणे म्हणाले, "हा कमोड तिथं पडूनच होता. तुम्हाला त्रास होतो म्हणून मागवला."

"महादेव..." गांधीजी ओरडले. त्यांना धाप लागली होती. महादेवभाईंनी भांड्यातून कोमट पाणी दिलं. पाण्याचा घोट घेतल्यावर बापूजी म्हणाले, "महादेव, माझी काळजी तुला. म्हणून तू हा लोकांकरिता ठेवलेला कमोड मागवलास. मग लोकांची काळजी कोण करणार? आणि म्हणे पडून होतं. महादेव, स्टेशनवर आग विझवण्यासाठी फायर बकेट असतात. त्या वर्षानुवर्ष

तशाच पडून असतात. आग काही रोज लागत नाही. पण म्हणून त्या बादल्यांचा दुसरा उपयोग कुणी करीत नाही... महादेव... हे बरं नाही केलंस.'' आणि गांधीजी खाटेवर कोसळले. महादेवभाईंनी त्यांच्या अंगावरची चादर सारखी केली. भाईंच्या डोळ्याच्या कडा पाणावल्या होत्या. दोन्ही काठ भरून आले होते. खोलीतलं वातावरण विलक्षण गंभीर झालं होतं. नरहरीभाई दिङ्मूढ अवस्थेत कोपऱ्यात उभे होते.

इतक्यात वल्लभभाई आले. त्यांनी हे क्रोधचित्र पाहिले अन् क्षणभर तेही विचलित झाले. पण चर्या बदलून ते हसत म्हणाले, ''नरहरी, आपल्याला इथं कमोड मिळालाय ना? मग हा कमोड घेऊन सकाळीच साबरमतीला जा.''

वल्लभभाईंनी पाहिलं तेव्हा बापूजींची मुद्रा शान्त होती. क्षणापूर्वीच्या वादळाचा मागमूसही दिसत नव्हता.

सकाळी अंबालालभाई आले. बरोबर त्यांच्या पत्नी होत्या. अंबालाल आले तेव्हा दहावीस डॉक्टरांनी खाटेला वेढा दिला होता. प्रत्येकाच्या गळ्यातली रबरी नळी पुढं झुकल्यामुळं लोंबकळत होती. डॉक्टर सगळे हतबुद्ध झाले होते. 'औषध घेणार नाही' हा बापूजींचा निश्चय तसूभरही ढळला नाही.

अंबालाल आले तेव्हा डॉक्टरांचा वेढा सुटला. अंबालालजींनी गांधीजींच्या क्षीण देहाकडे पाहिलं. त्यांच्या डोळ्यात दु:ख मावेना. ते भरल्या आवाजानं म्हणाले, ''चला माझ्याकडं अहमदाबादला. औषध नका घेऊ. पण निदान सेवा घ्याल की नाही आमची.'' त्या शब्दांमधल्या आर्ततेनं मन विरघळलं आणि तासाभरातच अंबालालजींची मोटार अहमदाबादच्या रस्त्यावर धावू लागली. मोटारीत रुग्णाइत गांधीजी होते. मोटार बंगल्यापाशी आली. गांधीजी येणार असल्याची वर्ता आधीच जाऊन थडकली होती. बंगला, बंगल्याला मिळणारे रस्ते माणसांनी फुलून गेले होते. अंबालालजींनी त्या अधीर समुदायाला विनवून सांगितलं, ''कृपा करून बापूजींना त्रास होईल असं काही करू नका.'' आणि क्षणभरातच ते रस्ते निर्मनुष्य झाले. बंगल्यात शान्तता भरून राहिली. अंबालाल, अनसूयाबेन स्वत: डोळ्यात तेल घालून देखरेख करीत होत्या. पण बारीक ताप हटेना. गांधीजींनी मृत्यूचा ध्यास घेतला. रामनामाचा सारखा जप. संध्याकाळी ते महादेवभाईंना म्हणाले, ''महादेव, मला आश्रमात घेऊन चल. मरायचं तर तिथं मरेन.''

''बापूजी!'' महादेवभाई स्फुंदत म्हणाले.

''महादेव, अश्रू आवर. मी खरं ते बोललो. लवकर आश्रम गाठू या.''

... गाडी आश्रमाच्या परिसरात आली तेव्हा शेकडो व्याकुळले डोळे बापूजींना पहात होते. त्यांना त्रास होईल म्हणून हुंदकेसुद्धा आतल्याआत देत होते. त्यातच दोन तपस्वी डोळे होते. कस्तुरबांचे. बापूजींची अवस्था पाहून कस्तुरबांना काळीज कुणी चरचरा कापत असल्यासारखं वाटलं. देव्हाऱ्यातल्या बाळकृष्णाला त्यांनी ताम्हनातल्या पाण्यात ठेवलं आणि सांकडं घातलं- "करुणाघना, वाचव यांना."

रात्री घालमेल वाढली. डॉ. कानुगांना सांगावा गेला. अनसूयाबेन धावत धडपडत आल्या. रात्र असूनही अवघा आश्रम तारवटल्याला डोळ्यांनी जागरण करीत होता. वल्लभभाई डॉ. कानुगांना घेऊन आले. डॉक्टरनी स्टेथास्कोपची नळी छातीला लावली आणि नाडी बघण्यासाठी बापूजींचा हात हातात घेतला तेव्हा साऱ्यांचे श्वास रोखले गेले. उशाशी जळणाऱ्या समईची ज्योत फडफड करीत होती. आणि... आणि डॉ. कानुगांनी या घनगंभीर वातावरणाचा फुगा टच्कन् फोडला. ते हसून म्हणाले, "नाडी उत्तम! प्रकृती छान आहे. क्षीणतेमुळं थकवा आहे एवढंच."

कितीतरी सुस्कारे एकदम सुटले. बा धावत गेल्या आणि बाळकृष्णाला ताम्हनातून काढून त्यांनी देव्हारा दाखवला.

डॉक्टरांनी हवाला दिला तरी बापूजी मृत्यूच्या कल्पनेला घट्ट धरून बसले होते. लोकनायक, अण्णासाहेब कर्वे, यांच्या विचारपूस करणाऱ्या तारा आल्या होत्या. जवाहरलाल, राजेंद्रप्रसाद, कृपलानी यांच्या तारांवर तारा येत होत्या. प्रकृती कशी सुधारावी? औषध नाही, इंजेक्शन नाही."

डॉ. तळवलकर एका गृहस्थाला घेऊन आले. त्यांचं नाव होतं केळकर. अर्धे डॉक्टर होते. अभ्यास पूर्ण, पण परीक्षा दिलेली नव्हती. वृत्ती प्रयोगशील. सगळे रोग बर्फाच्या उपचारानं बरे होतात असं त्यांचं म्हणणं. असली विचित्र माणसं बापूजींना फार आवडायची. हा आईस-डॉक्टर आश्रमात आला, तेव्हा सागळे लोक थंडगार पडले.

महादेवभाई म्हणाले, "यांच्या नादी नका लागू."

"तेच माझ्या नादी लागले आहेत. करू देत उपचार."

दुसऱ्या दिवसापासून आश्रमात बर्फच बर्फ. अखेर हे आईस डॉक्टर म्हणाले, "अंडी खा."

बापूजी म्हणाले, "माफ करा. आपला हा उपचार मी घेऊ शकत नाही."

याच वेळी पुन्हा एकदा तपासणी करायला डॉ. कानुगा आले. ते

म्हणाले, "बापूजी, आता निर्वाणीचं सांगतो; औषधं राहिली, इंजेक्शनं राहिली. अंडीही नकोत. निदान हवापालटासाठी तरी जा. तेवढ्यानंही प्रकृतीला आराम पडेल पुष्कळसा."

"कुठं जाऊ म्हणता डॉक्टर?"

"माथेरानला."

"बरं आहे. हा तुमचा उपचार मी अवश्य करीन. आजच..."

पण माथेरान मानवलं नाही. आठवड्याच्या आत बापूजी आश्रमी आले. तिथलं जड पाणी मानवलं नाही.

"डॉ. दलाल आज येणार आहेत." महादेवभाईंनी सांगितलं.

"अरे, कितीजणांकडून तुम्ही माझी चिरफाड करणार आहात?" बापूजी अस्वस्थपणे म्हणाले.

डॉ. दलाल दुपारचे आले. तपासणी झाली. आग्रही सुरात डॉक्टर म्हणाले, "दूध आणि इंजक्शनं घेतलीच पाहिजेत तुम्ही बापूजी."

"डॉक्टार, फार तर इंजक्शनं घेईन. दूध नाही घेणार."

"का बरं?"

"डॉक्टर, तुमच्यासारख्या धन्वंतरीला मी काय सांगावं? दूध हे नैसर्गिक अन्न नव्हे. मला दुधाची शिसारी येते."

कस्तुरबा जवळच उभ्या होत्या. त्या पटकन शब्द उचलून म्हणाल्या, "गाई-म्हशीच्या दुधाची शिसारी येते? मग शेळीचं दूध घ्यायला काय हरकत आहे?"

डॉ. दलाल म्हणाले. "फारच छान. शेळीचं दूध घेतलं तरी चालेल. पण दूध पोटात जाणं आवश्यक आहे."

हो ना करत करत बापूजींनी संमती दिली आणि दुसऱ्या दिवशी आश्रमाच्या संख्येत एका दुभत्या शेळीची वाढ झाली.

... हळूहळू प्रकृतीला आराम पडत चालला. तरी अजून विचारपूस करणाऱ्या तारा, पत्रं येतच होती आणि महादेवभाई त्यांना उत्तरं देतच होते.

❖

# सहा

जर्मनीचा पराभव झाला. महायुद्ध थांबले. मॉंटेग्यु-चेम्सफर्ड रिपोर्ट प्रसिद्ध झाला. गांधीजी अजून रुग्णशय्येवरच होते. कॉंग्रेसचं अधिवेशन मालवीयजींच्या अध्यक्षतेखाली भरलं होतं. त्यात रौलट कमिशनच्या शिफारशींविरुद्ध ठराव करण्यात आला. चिरोल प्रकरणासाठी लोकमान्य त्यावेळी इंग्लंडला गेले होते. दिवसागणिक महागाई वाढत होती. त्या आगीत जनता होरपळून निघत होती. शेतकरी हवालदिल झाला होता. मजूर संप करीत होते. सर्वत्र होता असंतोष! राजकारणात असंतोष, समाजात असंतोष!

आश्रमात सभा भरली. गांधीजी तक्क्याला टेकून बसले होते. महादेवभाई सभेची टिपणं घेत होते. रावजीभाई, मगनभाई आश्रमाची व्यवस्था पहात होते. वल्लभभाई, सरोजिनी नायडू, हॉर्निमन, सोबानी, शंकरलाल बँकर, अनसूयाबेन यांच्या या सभेत रौलट बिलाचा निषेध आणि सत्याग्रहाची मोहीम या दोन गोष्टी ठरल्या.

स्वामी श्रद्धानंद, जवाहरलाल, कृपलानी यांना पत्रं गेली, स्वामींकडून उत्तर आलं, "आम्ही तयारीत आहोत. दिवस ठरवा."

सहा एप्रिल हा सार्वत्रिक सत्याग्रहाचा, हरताळाचा दिवस ठरला. उपवास कार्यस्थगिती आणि चिंतन हेही सत्याग्रहाचं स्वरूप! सहा एप्रिलसाठी सारा हिंदुस्थान सज्ज झाला. साहेबाच्या पलटणीतले क्रूर शिपाई देशभर गस्त घालू लागले. संगिनी टोचून लोकांना धाक दाखवू लागले.

आणि दिल्लीत अचानक काही अस्मानी सुलतानी झाली. तीस मार्चलाच हरताळ! दिल्ली बंद. दिल्लीचे जे रस्ते माणसांनी गजबजलेले असत ते आज शान्तपणे झोप घेत होते. उन्हाचा कडाका सहन करूनही त्यांना गाढ निद्रा

आली होती. चांदणी चौकातही शुकशुकाट होता. नवी दिल्ली अजून विशेष आकाराला आली नव्हती. जुन्या दिल्लीत तुरळक रहदारी सुरू होती. संध्याकाळी वातावरण अधिक गंभीर झालं.

व्हाइसराय आपल्या मखमली गिरदीच्या आसनावर रेलून बसले होते. समोर कागदपत्रांची भेंडोळी होती. डाव्या उजव्या हाताला टेलिफोन होते. दरक्षणी कोणता ना कोणता टेलिफोन खणाणे. व्हाइसरायचे दूत संगिनी घेऊन दिल्लीचा बंदोबस्त करायला चारी दिशांनी बाहेर पडले होते. स्वामी श्रद्धानंद आज सभा घेणार होते. ती सभा त्यांना घेऊ देऊ नका अशी चिथावणी व्हाइसरायनं मुसलमानांना दिली होती. व्हाइसरायचा हा गोरा कावा होता. भांडण लावायचं. त्या भाऊगर्दीत आपणच एकाला मारायचं आणि दुसऱ्यानं मारलं म्हणून ऊर बडवत आपणच रडायचं कि भोळ्या भाबड्यांची छान दिशाभूल होते. आजही तोच कावा होता. गुप्तचर क्षणाक्षणाला नित्य नवी वार्ता आणून देत होते. व्हाइसराय जोरानं पाईप फुंकत होता. हकीमसाहेब अजमलखान यांना बोलावणं पाठवूनही ते आले नव्हते.

अफाट जनसमुदाय संध्याकाळचा जमला. अजून उन्हाचा चटका जाणवत होता. श्रद्धानंदांची तेजस्वी मूर्ती उभी राहिली तेव्हा लोकांनी केलेल्या जयकारानं आकाशाची पोकळी भरून गेली.

स्वच्छ टपोरे शब्द स्वामीजींच्या रसाळ वाणीतून येत होते. लक्षावधी मनं शब्दफुलांना वेचून घेत होती. पूर्वाश्रमी महात्मा मुनशीराम म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्वामीजींनी लोकांची हृदयं हलवली. पलटणीच्या बंदुका रोखलेल्या होत्या. त्यांच्यातून आग बरसणार होती. त्या बंदुका फक्त 'फायर!' या हुकूमाची वाट पहात होत्या.

जुम्मामशिदीतही सभा झाली. तिथंही स्वामीजी असंच बोलले. एक दूत धावत गेला. व्हाइसरायची फुंकणी फकाफका धूर ओकत होती. त्या धुराच्या रूपानं त्याच्या मनातली कमालीची अस्वस्थता बाहेर पडत होती.

"क्या हो गया? व्हॉट इज द मॅटर?" व्हाइसरायनं टेबलावर मूठ आपटून कर्कश सुरात विचारलं.

"साहेब, मशिदीत भाषण झालं स्वामींचं." दूतानं सांगितलं.

"स्वामी, स्वामी, स्वामी..." साहेब रागानं पुटपुटला आणि ताडकन मागं वळून म्हणाला, 'फायर!'

दूत धावला आणि त्यानं ही आज्ञा सर्वांच्या कानांपर्यंत पोचवली. या

वेळपर्यंत ती जंगी मिरवणूक निघाली होती. घोषणा एवढ्या गर्जत होत्या की झाडांवरचे पक्षी फडफड करीत दूर जात होते. जमीनही हादरून जावी असे आवाज येत होते. पलटणीला आता चेव आला आणि त्यांनी बंदुकींचे ट्रिगर सटासट ओढले. त्यांच्या अरुंद तोंडातून आगीचा वर्षाव व्हायला लागला. जागोजाग रक्ताची थारोळी रस्त्यावर दिसत होती. काही मुडदे पाडल्यावर हे हत्त्याकांड थांबलं. त्या दिवशी दिल्लीनं सुतक पाळलं.

जे दिल्लीत तेच लाहोर, अमृतसरला घडलं. गांधीजी अस्वस्थ झाले.

मुंबईला हरताळ पडला. आदल्या दिवशी हजारो लोकांनी चौपाटीवर समुद्रस्नान केलं आणि ठाकुरद्वारकडे भव्य मिरवणूक निघाली. हिंदू होते, मुसलमान होते, राव होते, रंक होते, स्त्रिया, पुरुष, बाल, वृद्ध सगळे होते. एका मशिदीत भाषणे झाली.

विठ्ठलदास जेराजणी म्हणाले, ''बापूजी हिंदू-मुस्लीम ऐक्याच्या आणि स्वदेशी व्रताच्या शपथा घ्यायला लावू लोकांना.''

''विठ्ठलदासजी, शपथा घेऊन कुठं व्रताचरण होतं का? शपथ ही जिभेवरून येते तर व्रताचरण हृदयातून होत असतं.''

''बापूजी, प्रयोग करून पाहू. आज मिरवणुकीला किती गर्दी होती. माझी खात्री आहे की असेच लोक उद्या येतील.''

''विठ्ठलदासजी, आशा करणं ही चांगली गोष्ट आहे. पण निराशेची तयारी ठेवा म्हणजे दु:ख होणार नाही.''

दुसऱ्या दिवसाची सकाळ उगवली. चौपाटीवर समुद्राच्या लाटा किनाऱ्याशी खेळत होत्या. पाण्याच्या कडेकडेनं लांबवर वाळूचा तो प्रचंड पट्टा पसरलेला होता. सकाळी फिरायला येणारे तुरळक लोक वाळूत पाय रुतवत रुतवत धीमेपणानं येत होते. बापूजी, विठ्ठलदास, महादेवभाई उभ्याउभ्याच लोकांची वाट पहात होते. दोन तास झाले. सूर्य चांगला वर येऊन अंगाला चटके देऊ लागला. विठ्ठलदासजींची चुळबूळ वाढली. उणीपुरी तीस-चाळीस माणसं जमली होती; तीही तितकीशी उत्साही नव्हती. विठ्ठलदासजींच्या चेहऱ्यावर पराभवाची छाया दिसू लागली. तेव्हा बापूजी म्हणाले, ''विठ्ठलदास, चकाकतं तेवढं सारं सोनं नसतं.''

''बापूजी, माझा अंदाज फसला. काल मिरवणुकीला तर...''

''या देशाचं दुर्दैव ते हेच. लोक मिरवणुकीला येतील, व्रताचरणाला येणार नाहीत. ओरडायला येतील, प्रार्थनेला येणार नाहीत. जल्लोषाला जमतील

पण चिंतनाला राहणार नाहीत.''

''बापूजी, मला कल्पना नव्हती.'' विठ्ठलभाई खेदानं म्हणाले.

जमलेल्या लोकांनी शपथेचं वाचन केलं. अथांग सागराच्या साक्षीनं व्रतग्रहण केलं आणि तो ओढूनताणून घडवलेला सोहोळा संपला.

''चल महादेवा, आज रात्री आपण दिल्ली, अमृतसरकडं कूच करायचं.'' जाता जाता गांधीजी महादेवभाईंना म्हणाले.

गाडी लोहमार्गावरून प्रचंड खडखडाट करीत धावत होती. बापूजींचा नुकताच डोळा लागला होता. त्यांचे उपनेत्र त्यांच्या डोळ्यांवरून घसरू पहात होतं. महादेवभाईंनी हलकेच ते काढून ठेवले आणि ते पुन्हा आपली डायरी लिहिण्याच्या कामात दंग झाले. प्रत्येक स्टेशनवर लोकांचा त्रास नको म्हणून महादेवभाईंनी डब्याची दारं-खिडक्या लावून टाकली होती. खिडक्यांवर चटईचे पडदे लावले होते. त्यामुळं तो डबा एखाद्या गुहेसारखा दिसत होता. गाडीचा वेग मंदावला. बरेचसे रूळ बदलल्याचा खडखट्ट खडाडखट्ट आवाज आला आणि गाडी थांबली. महादेवभाईंनी एक खिडकी उघडून बाहेर पाहिलं. 'पलवल' स्टेशनच्या नावाची धुरकट पाटी दिसली. खाडखाड बूट वाजवत एक उंच धिप्पाड आकृती पुढे येत होती. पोशाखावरून तो पोलीस अधिकारी असावा हे महादेवभाईंनी तत्काळ ओळखलं. डब्याचं दार उघडलं. त्यानं हळूच विचारलं,

''मि. गांधी?''

''येस'' महादेवभाई म्हणाले.

''हा त्यांच्याकरिता हुकूम.''

''आणा मी जागाच आहे'' पलीकडून बापूजी म्हणाले. त्या अधिकाऱ्यानं हुकूम बजवायला आला असतानाही गांधीजींना खाडकन् सलाम ठोकला आणि मग अनवधानानं केलेली चूक ध्यानात येताच 'आपल्याला कुणी पाहिलं तर नाही?' अशा शंकित मुद्रेने तो डब्याबाहेर इकडेतिकडे पाहू लागला.

''पंजाबात जाऊ नका. तुम्ही गेल्यानं अशान्तता वाढेल.'' असा तो हुकूम.

बापूजी म्हणाले, ''मी गाडीतून उतरणार नाही. आपण कोणतीही कारवाई माझ्यावर करा.''

शिकवल्यासारखे चार पोलीस पुढे आले. आणि त्यांनी गांधीजींना डब्यातून उतरवलं. मुंबईकडे जाणारी बॉंबे एक्स्प्रेस आली तेव्हा पहिल्या वर्गाच्या

डब्यात गांधीजींना बसवलं. बरोबर इन्स्पेक्टर बोरिंग होते.

"बापूजी, मी आता काय करू?" महादेवभाई सचिंत मुद्रेनं म्हणाले.

"अरे, तुला पकडायचं राहिलंच का?" हसत बापूजी म्हणाले.

"मी आता तुमच्योबरोबरच येतो."

"नको. तू दिल्लीलाच जा. स्वामीजींना भेट. लोकांना शान्त रहायला सांग. माझं मी कळवतोच तुम्हाला."

दोन्ही गाड्या सुटल्या आणि विरुद्ध दिशेने जोरानं धावू लागल्या.

गांधीजींना पकडलं ही वार्ता गांधीजी मुंबईला पोचण्याच्या आत जाऊन थडकली आणि मुंबई उसळली.

गाडीत बोरिंग गांधीजींना म्हणाले, "मि. गांधी, मरीन लाईन्सवर गाडी थांबवतो. तिथं तुम्ही उतरून जावं हे बरं. कुलाब्याला फार गर्दी होईल."

मरीन लाईन्सला न थांबणारी ती गाडी आज थांबली. एका डब्यातून गांधीजींची कृश मूर्ती उतरली. पण अनपेक्षित असल्यानं कुणाला फारसं लक्षात आलं नाही. मरीन लाईन्सला गांधीजी आले. नेहमीसारखी वेगवान वाहतुक सुरू होती. एक घोडागाडी येऊन थडकली. आतल्या माणसानं मुंडी बाहेर काढली आणि तो आश्चर्यानं जवळजवळ ओरडलाच,

"अरे! गांधीजी! तुम्ही? अन् असे चालत?"

"का? गांधीला चाललेलं बघवत नाही तुम्हाला भाई?" गांधीजी म्हणाले.

"बसा, बसा. लवकर गाडीत बसा. मी तुम्हाला रेवाशंकरभाईंकडे पोचवतो." असं म्हणून त्यांनी गांधीजींना हाताला धरून जवळजवळ उचलूनच गाडीत बसवलं आणि घोड्यांचे लगाम खेचले. गाडी भरधांव चालली.

"बापूजी, आज मोठा भाग्याचा. तुम्ही आमच्या गाडीत बसलात." भाई गांधीजींकडं आदरानं पहात म्हणाले.

"भाई, काही तरी बोलू नका. यात कसलं भाग्य?"

"तुम्हाला नाही कळायचं. सोन्याला आपली किंमत कळत नसते. त्याचे दागिने घालणाराच ती जाणतो."

"वा वा, भाई; पण एक बालपण सोडलं तर गेल्या पन्नास वर्षात मी सोन्याला स्पर्शसुद्धा केला नाही. कशाला सोन्याचं उदाहरण देता?"

"ते राहू दे. तुम्हाला मुंबईत काय चाललंय ठाऊक आहे?"

"नाही. काही ठाऊक नाही मला"

"लोक चवताळलेत."

“का?”

“आपल्याला पकडलं म्हणून.”

“अजबच आहे. बरं आणखी काही?”

“पायधुणीपाशी दंगा व्हायची भीती आहे. मॅजिस्ट्रेट अन् पोलीस तिकडेच गेलेत.”

“आज पायधुणीला पुन्हा रक्त सांडणार तर...” काळजीच्या सुरात गांधीजी म्हणाले.

रेवाशंकरभाईंचा निवास आला. गांधीजी आत शिरतात तोच मागून शिवायला आल्यासारखे उमर सोबानी आले. त्यांच्या बरोबर अनसूयाबेन होत्या. दोघांचेही चेहरे घामेजले होते. डोळ्यात चिंता होती.

सोबानी घाईघाईनं म्हणाले, “बापूजी, लोक अगदी अधीर झालेत आम्ही हात टेकले. तुम्हाला पाहिलं तरच शान्त होतील. यायला हवं तुम्ही. तेही आत्ताच.”

“आत्ताच येतो चला.”

मोटार पायधुणीचा रस्ता कापू लागली. एखाद्या प्रचंड जत्रेसारखी गर्दी रस्त्यांतून होती. ‘गांधीजी येत आहेत’ ही बातमी वणव्यासारखी पसरली आणि त्या प्रचंड गर्दीला माणसांचे लोंढे आणखी येऊन मिळू लागले.

“वंदे मातरम्.”

“अल्ला हो अकबर.”

घोषणांनी आकाशाच्या चिंधड्या उडत होत्या. गांधीजींना नुसतं ओझरतं पाहूनही लोक हर्षानं वेडे झाले.

पायधुणी भागात पलटणीच्या घोडेस्वारांनी थयथयाट सुरू केला होता. घोडेस्वारांना पाहून लोक जास्तच खवळले. त्यांच्यावर विटांचा वर्षाव होऊ लागला. त्या वीटमारीनं घोडेस्वार खवळले. आता तुंबळ युद्धाला तोंड फुटणार अशी चिन्हं दिसू लागली. धरण फुटतांना पाण्याची पहिली लाट वेगानं मुसंडी मारत पुढे यावी तशा विटा येऊ लागल्या. घोडेस्वारांनाच नव्हे तर लोकांनाही त्यांचा प्रसाद मिळाला. लोकांच्या अस्ताव्यस्त समुदायाचं आता प्रचंड मिरवणुकीत रूपांतर झालं. गांधीजी हात जोडून लोकांना विनवीत होते, “शान्त रहा, शान्त रहा.”

मिरवणुकीला अब्दुल रहमान गल्लीतून क्रॉफर्ड मार्केटकडे जायचं होतं. गल्लीच्या तोंडाशीच घोडेस्वारांच्या सज्ज तुकडीनं जाम पलिस्तर मारलं.

पोलिसांनीही कडं करून रस्ता बंद केला होता. पण लोक कुठले ऐकायला. एक भली मोठी लाट आदळावी तसा लोकांचा लोंढा कड्यावर आदळला. पोलिसांचं कडं तुटलं. गांधीजी ऊर फुटेतो सांगत होते,

"थांबा. पोलिसांचं कडं तोडू नका."

लोक बेभानपणे धावत होते. धक्काबुक्की करीत होते.

"लोकहो, हा आपला मार्ग नव्हे..."

गांधीजींचे शब्द हवेतल्या हवेत विरून जात होते. त्या कल्लोळात गांधीजींचे शब्द ऐकायला वेळ होता कुणाला. आणि मग इतका वेळ केवळ बघ्यांची भूमिका करणारे ते घोडे पुढं सरसावले. घोडेस्वारांनी भाले परजले. आणि गल्ली न् गल्लीच्या मागं पसरलेल्या अथांग जनसंमर्दावर त्यांनी एकच धडक मुसंडी मारली.

घोडेस्वारांना पुढं जाता येईना. लोकांना मागं हटता येईना. लोक या अचानक हल्ल्यानं बेभान झाले होते. घोडेस्वार दात ओठ खाऊन सरसावत होते. या रणधुमाळीत गांधीजी पाण्यातल्या काडीसारखे तरंगत होते. कुणीही न ऐकणारी विनवणी करीत होते.

कुणाचं संबध शरीर चिरडलं गेलं. कुणाचे कपडे फाटले. कुणी रक्तबंबाळ झाला. कुणाला खरचटले तर कुणाचा डोळा निकामी झाला. अखेर तो जमाव भेदून घोडेस्वारांची तुकडी पुढं गेली. तेव्हा मण्यांनी गच्च भरलेली माळ ओघळावी तसे लोक विखुरले. पांगले, आणि एवढ्या मोठ्या वादळानंतर तितकीच घनगंभीर शान्तता तिथं निर्माण झाली.

चौपाटीवरची सभा आटोपून गांधीजी रेवाशंकरभाईंच्या घरी शान्तपणे बसले होते. जीव दमून गेला होता. घशाला कोरड पडल्यासारखं वाटत होतं.

अनसूयाबेननं लिंबाच्या रसात मधाचे थेंब टाकून ते मिश्रण काचपात्रात घालून आणलं आणि म्हणाल्या, "घ्या बापूजी."

"अनसूयाबेन, एवढ्या घाईगर्दीतही माझ्या या विचित्र संवयीची आठवण तुम्ही ठेवता?"

"आठवण ठेवत नाही मी. आठवण राहतेच."

रेवाशंकरभाई सांगत आले,

"अहमदाबादेलाही भयंकर हुल्लड माजली आहे."

"का बरं?" बापूजींनी विचारलं,

"अनसूयाबेनना पकडल्याची अफवा उठली. मजूर पिसाट झालेत अगदी."

"लिंबू-मधाचं ते मिश्रण अर्धवट राहिलं. घोट घशाखाली ढकलीत गांधीजी म्हणाले, "भाई, आता आम्ही अहमदाबादेकडं."

"मी पण येते बापूजी." अनसूयाबेन म्हणाल्या.

आणि गांधीजी अहमदाबादेकडं गेले. वाटेत स्टेशनास्टेशनावर चर्चा सुरू होती.

बेन म्हणाल्या, "बापूजी, बरंच काही झालंय."

"काय काय झालंय?"

"नडियाद शेजारी रेल्वेचे रूळ उखडून टाकलेत. विरमगावला एका सरकारी नोकराचा खून झालाय."

गांधीजींनी डोळे मिटून घेतले. मिटल्या डोळ्यांसमोर प्रकाशचक्र फिरू लागलं. गाडी धावतच होती. गांधीजींची मान डाव्या खांद्यावर कलंडली होती. हाताचा पंजा पंख्यासारखा विस्फारून त्यात त्यांनी आपलं तोंड लपवलं होतं.

"बापूजी, तुम्हाला काही होतंय का?"

"अं..." मान वर करीत बापूजी म्हणाले, "बेन, काही होत नाही. काही होत नाही मला."

"मग कसला एवढा विचार करता."

"आता कोणतीही गोष्ट करतांना खूप विचार करायचा हाच विचार."

"बापूजी, मी समजले नाही."

"बेन, या अहमदाबादच्या मजूरांसाठी मी लढलो. मी लढलो यात काही विशेष मी केलं असं नाही मला म्हणायचं. पण माझा काहीच प्रभाव त्यांच्यावर नाही पडला. त्यांनी या दंग्यात भाग घ्यायला नको होता."

"बापूजी, रेताड जमिनीत कितीही खतांचा मारा केला, अस्सल बी पेरलं तरी त्या जमिनीत फुलांचे ताटवे नाही उगवायचे. मातीचा गुण बदलायला हवा."

"होय बेन आमचं सविनय कायदेभंगाचं गाडं मला वाटतं त्याहून कितीतरी सावकाश चालणार असं दिसतंय."

गाडीचा वेग मंदावला. अहमदाबादच्या जवळपासचं कुठलं तरी स्टेशन आलं होतं. गार वाऱ्याच्या झुळुका खिडकीतून येऊ लागल्या होत्या. विश्वाची चिंता करणारं बापूजींचं मन क्षणभर विसावा घेऊ लागलं. त्यांचा डोळा लागला. अनसूयाबेननी पेटीतली चादर काढून बापूंच्या अंगावर घातली. तो निद्राधीन चेहरा सुद्धा कुठला तरी खोल खोल विचार करतोय असं वाटत होतं.

पंजाबात तर नरमेध यज्ञ झाला. यज्ञाचं पौरोहित्य डायर आणि ओडवायर या दोन नरासुरांनी केलं. गांधीजींनी सविनय कायदेभंग मागे घेतला होता. आणि तिकडं पंजाबात जालियनवाला बाग रक्तानं धुवून निघाली. बागेच्या अरुंद वाटा बंद करून डायर आणि अेडवायरनं पाखरांसारखी माणसं टिपली. त्या बागेवर शवागाराची अवकळा पसरली. होणार ते होऊन गेलं होतं. जीव वाचवण्याच्या धडपडीत काही माणसं विहिरीत पडून मेली होती. झालं काय आणि राहिलं काय, जगलं कोण आणि वाचलं कोण याचा अंदाज लावणं कठीण होऊन बसलं होतं.

सरकारनं हंटर कमिटी नेमली. काँग्रेसनंही घायाळ झालेल्या पंजाबची चौकशी करण्यासाठी कमिटी नेमली. पंडित मालवीयजी पुढं झाले. मोतीलाल, देशबंधु दास, अब्बास तय्यबजी, जयकर आणि गांधीजी चौकशीला निघाले.

जालियनवाला बाग आता शान्त होती. जळून गेलेल्या प्रेतांची राख अस्ताव्यस्तपणे पसरावी तशी बागेची भुई दिसत होती. उन्हाचा कडाका होण्यापूर्वीच बागेला डोळे भरून पहावं म्हणून गांधीजी आले होते. अजून अमृतसर पुरं जागं झालं नव्हतं. शहरावर उगवलेला सूर्य किलकिल्या डोळ्यांनी पहात होता. मोतीलाल, तय्यबजी, जयकर, दास यांना घेऊन गांधीजी बागेत उतरले. चालता चालता कुठं कुठं पापड मोडल्यासारखा आवाज येई. तय्यब्बजींनी पायाखालची माती मूठ भरून हातात घेतली आणि पाहिलं...

"काय आहे तय्यबजी?" गांधीजींनी विचारलं.

"रक्तात भिजलेली माती वाळून पोपडे झालेत."

"हे बघा इकडं" असं म्हणत मोतीलालजींनी सर्वांना हटकलं. मोतीलालजी चवड्यावर बसून जमीन उकरत होते. अर्ध्या हाताएवढ्या खड्ड्यातून दोन बोटात धरून त्यांनी फणसाच्या आठळीसारखी वस्तू बाहेर काढली. आणि फुंकून आपल्या रुमालानं पुसत ते म्हणाले, "ही बंदुकीची गोळी. ३०३ मस्केट. बहुतकरून युद्धाच्या वेळी अशा बंदुकींचा वापर केला जातो..."

गांधीजींनी तळहातावर ती गोळी ठेवली... "कुठं सापडली?"

"जमिनीत फूटभर खोल घुसली होती."

गांधीजी काहीच बोलले नाहीत.

त्यांचा तांबूस पसरट तळहात थरथरत होता आणि भूकंपानं जमीन हादरल्यावर घर हादरतं तशी ती गोळी त्यांच्या तळहातावर थरथरत होती.

"बापूजी!" तय्यबजी गांधीजींच्या खांद्यावर हात ठेवीत म्हणाले, "हे तर काहीच नाही. त्या विहिरीकडं चला म्हणजे श्वासोच्छवास करणं सुद्धा कठिण होईल आपल्याला तिथं."

त्या रक्तलांछित वाटेवरून शक्य तितक्या जपून पावलं टाकीत गांधीजी पुढं गेले. फर्लांगभर अंतरावर तो कुआ होता. जवळ जावं तसतशी दुर्गंधी अस्वस्थ करीत होती. त्याभोवती आता तारांचं कुंपण घालून बंदोबस्त करण्यात आला होता. संगीन रोखून एक गुरखा त्या मृत्युगोलाचं रक्षण करीत होता.

"दासबाबू, घटना होऊन गेली त्याला आता तीन महिने लोटले असतील नाही." गांधीजींनी गंभीरपणे विचारलं.

"होय मोहनदासजी. पण इथली ही दुर्गंधी अजून वर्षभर आठवण देत राहील या दुर्घटनेची." दासबाबू म्हणाले.

"मग आता हा पहारा कशाला?"

"जखमेवर मीठ म्हणून."

गांधीजींनी त्या गुरख्याकडे पाहिलं. तो उंचच उंच होता. हातात बंदूक धरून ताडाच्या झाडासारखा तो ताठ उभा होता. पण त्याच्या डोळ्यात पाणी जमा झालं होतं. चेहेरा विलक्षण व्याकुळला होता.

"काय झालं भाई तुला?" तुझ्या डोळ्यात पाणी?" गांधीजींनी विलक्षण ममतेनं त्याला विचारलं. त्या ममताळू स्वरांनी त्याच्या डोळ्यांचे उरलेसुरले बांध विरघळले आणि त्या आडदांड देहातून खळखळा मोती ओघळू लागले. आपल्यासमोर असलेले तेच गांधीजी याची त्या बिचाऱ्याला मुळीच कल्पना नव्हती. तो हृदय पिळवटून सांगत होता, "माझा भाऊ आणि त्याची दोन लहान मुलं... या... या विहिरीत कुजून मेली. त्या दिवशी... काय सांगू... भयंकर... फार भयंकर!" त्या गुरख्याचे ओठ थरथरत होते...

हळूहळू त्याच्या चेहेऱ्यावरची व्याकुळता नाहीशी झाली. त्यात क्रोधानं आकार घेतला. त्याचे डोळे लाल होऊ लागले. रिकाम्या हाताची मूठ वळवून तो म्हणाला...

"आणि... आणि गांधीजी म्हणतात आपलेच लोक अत्याचारी आहेत. बाबूजी, तुम्हीच सांगा मला, पहाडासारखा माझा भाऊ... त्याला असली मौत आली. ती दोन लहान पोरं... नाकातोंडात पाणी जाऊन तडफडली... मेली. दुसरे दिवशी त्यांची प्रेतं फुगून वर आली... अशा वेळी वाटतं..." तो विलक्षण दांतओठ खाऊ लागला. त्याच्या हातातली बंदूक गळून पडली.

आणि... भावनावेग अनावर झाल्यानं तो खाली कोसळला. कोसळता कोसळता तो म्हणत होता... "नाही नाही... गांधींना इथं येऊ देऊ नका... उपयोग नाही... जाव... चलेजाव गांधी..."

स्वयंसेवकांनी त्याचा तो गलितगात्र देह उचलून दूर नेला आणि त्याच्या तोंडावर थंडगार पाण्याचे हबके मारून हातापयांना मालिश केलं. तो शुद्धीवर आला; तरी त्याच्या चेहेऱ्यावरची मघाची तळतळाटाची भावना गेली नव्हती. गांधीजींनी त्याच्या पाठीवर थोपटून त्याला शान्त केला तेव्हा तय्यबजी हळूच कानात कुजबुजले- "मोहनदासजी, चला पुढं. त्याला सांगू नका, तुम्हीच गांधीजी आहात ते. नाहीतर त्याचा आणखी भडका उडायचा."

"केव्हातरी त्याला कळलंच पाहिजे. कळेलही. मग मीच सांगितलेलं काय वाईट? त्याच्या मनात जर गांधी या व्यक्तीविषयी राग असेल तर त्याला वाट मिळेल. तत्त्वाविषयी त्याचा गैरसमज असेल तर तो मी दूर करीन. पण त्याला अंधारात का ठेवा?" गांधीजी शान्तपणे म्हणाले. "तो नीट शुद्धीवर आला म्हणजे त्याला आपल्या निवासात घेऊन या." असं स्वयंसेवकांना सांगून गांधीजी पुढं चालू लागले.

सगळी बाग ओस होती. पर्णपुष्पहीनं झाडं, रोपं आणि वेली भेसूर दिसत होत्या. डाव्या बाजूला कुंपणाच्या भिंतीशेजारीच एक वेल मात्र चांगली फोफावली होती. तिचा पसारा भिंतीवर विसावला होता. शंखाच्या फुलांसारखी पिवळट तांबूस फुलं इतकी आली होती की, त्यांच्यामुळं पानंसुद्धा दिसत नव्हती. वेलीच्या मुळाशी चिखलाचा रबडा होता. त्यास नुकतंच कुणीतरी पाणी शिंपलं असावं. सुरकुतलेल्या आणि वाकलेल्या म्हाताऱ्यांच्या मेळाव्यात एखादंच टवटीत मूल दिसावं तशी ती फुलारलेली वेल दिसत होती. पण तिच्या एकाकीपणामुळं आणि तिनं जन्म दिलेल्या तांबूस फुलांमुळं ती वेल जास्तच भयाण वाटत होती. गांधीजी अनिमिष नेत्रांनी त्या वेलविस्ताराकडं बघत होते. वेलीच्या आडोशाला एका ओट्यावर भिंतीलगत दोघंजण बोलत होते.

एक भरदार देहयष्टीचा आणि दुसरा तितकाच किरकोळ. एकानं लुंगी गुंडाळली होती तर दुसऱ्यानं पायजमा घातलेला होता. गुडघ्यावर पायजमा फाटून त्याच्या डाव्या गुडघ्याची वाटी त्यातून डोकावत होती. दोघांचेही चेहेरे विषण्ण, भयाण आणि क्रूर दिसत होते. जगाची आणि जीवनाची काही फिकीर नसल्यासारखे ते दोघे त्या ओट्यावर लोळत होते.

"चलो गुरनाम, देखेगे ये गांधीबाबा कैसा है?" एक म्हणाला.

"काय करायचंय? त्यांना बघायला जाणारे पुष्कळ लोक आहेत. आपली आणखी त्यात भर कशाला जोगिंदर?" दुसरा.

"गुरनाम, जालियनवाला बाग प्रकरण घडलं ते गांधींच्याचमुळं असं आपल्यासारखं आणखी कितीजणांना वाटत असेल?"

"पुष्कळांना वाटत असेल. बोलत नाहीत एवढंच."

"कुणामुळं का होईना. आपल्यासारख्या अनेकांची बरबादी तरी झाली... भगवान उनका भला करे."

तय्यबजी, मोतीलाल, हे सारं ऐकत होते. त्यांच्या चेहेऱ्यावरचे भाव प्रत्येक शब्दाला बदलत होते. स्वयंसेवकानं गांधीजींना विचारलं, "त्या माणसांना पुढं बोलावू का?" गांधीजींनी हातानंच नको म्हणून सांगितलं. काठीचा आधार घेऊन पुढं पाऊल टाकीत गांधीजी म्हणाले, "प्रवाहाला पुढं जायचं असेल तर वाटेतले खाचखळगे भरूनच पुढं जावं लागतं. त्यांना चुकवून किंवा टाळून नव्हे. ते त्यांच्या मताशी प्रामाणिक आहेत. आपण आपल्या मताशी प्रामाणिक राहून त्यांच्यासारख्या अनेकांची मतं बदलण्याचा प्रयत्न करू या. चला."

इतका वेळ जालियनवाला बाग अरण्यासारखी दिसत होती. आता पुन्हा ती उजाड, ओसाड, आणि भयाण दिसू लागली. गांधीजी आणि बरोबरची सारी मंडळी निघून गेली. ऊन तापू लागलं. पहारेकरी गुरखा आता चांगलाच शुद्धीवर आला होता. विहिरीच्या कुंपणावर तो पुन्हा पहारा करू लागला. गांजाने तारवटलेले डोळे मिटून माना खाली टाकत गुरनाम आणि जोगिंदर एकमेकाला म्हणत होते, "ये गांधीबाबाने क्या किया?"

"पंजाबातील स्त्रियांनी गुजराथेतील स्त्रियांप्रमाणे आपले चरखे जाळून टाकलेले नाहीत. आपण हे विसरता कामा नये की आपले पूर्वज अगदी अल्प श्रमाने आपली कपड्यांची गरज इथल्या इथेच भागवीत असत..."

तांबूस देशी कागदावर गांधीजी भराभर लिहीत होते. पंजाबातील चौकशीचं काम आता जवळजवळ पूर्ण होत आलं होतं. मधेच एकदा अहमदाबादला आले असताना यंग इंडियाच्या कचेरीत गेले आणि गांधीजी लेखणी घेऊन लिहायला बसले.

"बापूजी, आज आश्रमात नाही जायचं?" शंकरलालनी विचारलं. "हा लेख इथंच पूर्ण करतो अन् मग आश्रम." लिहितालिहिताच गांधीजी म्हणाले.

'यंग इंडिया' आणि 'नवजीवन' ही दोन्ही पत्रं आता चांगली चालली होती. लोक हौसेनं आणि भक्तीनं वाचत होते. गांधीजींनी खपासाठी या पत्रांना व्यापारी स्वरूप कधीच येऊ दिलं नव्हतं.

लेख पुरा करून गांधीजींनी लेखणी खाली ठेवली आणि त्यांनी शंकरलालजींना विचारलं, "जमनादासजी आलेत?"

"हो, आलेत ना. बोलावू?"

"बोलवा त्यांना. झोपले असले तर नका उठवू. सकाळी खूप उशीरा उठण्याची त्याची सवय माहीत आहे मला." जवळच्या कापडी पिशवीतून छोटी मधाची बाटी आणि एक लिंबू काढून गांधीजींनी टेबलावर ठेवलं आणि मोठ्या काचपात्रातलं पाणी लहानशा ग्लासात ओतून त्यात मधाचे थेंब टाकले. लिंबू पिळून ते मिश्रण ढवळत होते. इतक्यात जमनादासजी आले.

"या जमनादासजी. झोपमोड तर झाली नाही?" हंसून गांधीजींनी विचारलं.

"छे छे. अलीकडं मी एवढा वेळ झोपत नाही."

"मग तुमचे डोळे असे का दिसतात?"

"जागरणानं. रात्री मशिनवरून टाईप उडला आणि दुरुस्तीच्या वेळी सगळा कंपोज निखळून पडला. मग फार धावाधाव करावी लागली. स्वस्तः खिळे जुळवायला बसलो आणि अंक बरोबर सहा वाजता हातात दिला."

"जमनादासजी..." गांधीजी विलक्षण हार्दिकतेनं म्हणाले.

"काय बापूजी?"

"यंग इंडिया आणि नवजीवन यांनी इतक्या थोड्या अवधीत एवढी भरारी का मारली ठाऊक आहे?"

"का?"

"तुमच्यासारखे असे मेहनती व्यवस्थापक."

"हे खरं नाही बापूजी. तुमचे लेख वाचण्यासाठी लोक वर्तमानपत्रं विकत घेतात. आमच्यामुळं नव्हे."

"असेल. पण माझे लेख लोकांपर्यंत वेळेवर आणि नीटपणे पोचवणं हे काम तर तुम्हीच करता की नाही!" त्यांच्या पाठीवर थाप मारीत गांधीजी म्हणाले.

"बापूजी, यंग इंडियाचा खप आता किती ठाऊक आहे?"

"किती?"

"चाळीस हजार. मागणी वाढती आहे."

"आणि नवजीवन?"

"नवजीवनही तितकाच."

साधू शिपायानं निरोप आणला "गोरधनदास भेटायला आलेत."

"पाठवून द्या त्यांना आत." गांधीजींनी सांगितलं.

"हे गोरधनदास कोण?"

"इथले व्यापारी आहेत. कापड, किराणा यांचे ठेकेदार. शिवाय गोवाकोकण इथून कोकणी मालाची ठेकेदारी करतात."

"त्यांचं आपल्याकडं काय काम?"

"दोन दिवसांपर्वीच येऊन गेले. म्हटलं बापूजी आले म्हणजे या."

"काम?"

"उत्तर भारतात पेढीच्या दोनचार शाखा उघडताहेत ते. त्यासाठी तुमचं काही सहाय्य हवं म्हणाले."

"पेढी उघडायला माझं सहाय्य? कमाल आहे. म्हणजे बँक सुरू करायला फकीराची मदत मागण्यापैकीच प्रकार आहे."

गोरधनदास आले. त्यांची ठेंगणीशी मूर्ती लुटलुटू चालत येताना मोठी मजेदार दिसत होती. पण नजरेवरून माणूस कावेबाज दिसत होता. शक्य तितकं वाकून त्यांनी गांधीजींना अभिवादन केलं आणि लाचार हसू तोंडावर आणीत ते म्हणाले-

"माझं नाव गोरधनदास. माझ्याबद्दल आपल्याला जमनादासजींनी सांगितलंच असेल."

"तुमचं नाव फक्त सांगितलं. तुमच्याबद्दल अजून काही सांगितलं नाही."

"आपण मोठी माणसं. आपण गरिबाची काही सेवा घ्यावी."

"बोला गोरधनदासजी. आम्हीच आपली सेवा करू."

"छे. छे. असं कसं होईल? प्रथम मी सेवा करतो मग आपल्याला..."

"गोरधनदासजी, तुमचं काम नाही सांगितलंत?" गांधीजी विषय तोडून म्हणाले.

"काम म्हणजे असं होतं... मी आपल्या आश्रमाला काही देणगी देऊ इच्छितो."

"वा वा. मग त्यात एवढं चाचरण्यासारखं काय आहे?"

"नाही, म्हणजे त्याचं काय आहे..."

"लवकर बोला गोरधनदास. बापूजींना आश्रमात जायचंय." जमनादास

तीव्रतेनं म्हणाले.

"आमची पेढी आहे हे आपल्याला ठाऊकच आहे. उत्तर भारतात आम्ही दोनचार शाखा उघडायचा विचार करीत आहोत. आपण मनावर घेतलंत... तर... आम्हाला..."

"मी आपल्याला काय मदत करू शकतो गोरधनदास?"

"आपली दोन्ही पत्रं फार लोकप्रिय आहे. पब्लिकमधे खूप वाचली जातात. आमच्या पेढीविषयी आपण थोडंफार त्यात लिहिलं तर..."

"गोरधनदास, तुमच्या पेढीविषयी अवश्य लिहू. पण राष्ट्रीय जागृतीच्या उद्देशानं आमची पत्र चालतात. तुमची पेढी असं काही कार्य करते? देणग्या, समाजजागृती, संस्था चालवणं..."

"नाही नाही. आम्ही फक्त व्यापार करतो..."

"मग तुमच्या पेढीविषयी एक शब्दसुद्धा लिहिता येणार नाही."

"मग जाहिरात तरी..."

"माफ करा गोरधनदासजी. या पत्रांतून जाहिराती छापत नाही आम्ही.

"दहापाच हजार जास्त देऊ."

"सांगितलं ना, कितीही पैसे दिलेत तरी जाहिरात नाही."

"आमची समदी आशा खलास झाली."

"आपण या आशेनं आम्हाला देणगी देणार होता? आपण आपली देणगी देऊ नका. देणगीचा सौदा जमायचा नाही." बोलता बोलता गांधीजींच्या गोऱ्यापान चेहेऱ्यावर सूक्ष्म लाल छटा आली होती. जमनादासनी गोरधनदासांना जायला सांगितलं. तोही लोचट माणूस खोटं हसत निघून गेला.

जमनादासजी हळूच म्हणाले, "बापूजी, त्यांची योजना काही वाईट नव्हती. एवढे चाळीस पन्नास हजार रुपये कोण देतो आपल्याला?"

गांधीजींनी चमकून त्यांच्याकडे पाहिलं आणि रुद्ध स्वरात ते म्हणाले, "जमनादास, निदान तुम्ही तरी असं बोलू नये. व्यवहारासाठी तत्त्वाचा सौदा होतो तेव्हा तत्त्वाला मूठमाती मिळते."

जमानादास काहीच बोलले नाहीत. तेव्हा गांधीजींनी मृदू स्वरात विचारलं, "रागावलात?"

"नाही बा. पण पैसे चांगल्या कार्यासाठीच उपयोगी पडले असते. नवीन मशीन आणायचंय. आता या सिलिंडर मशीनला काम आवरत नाही."

"पैसे मिळतील. नाही मिळाले तर आपण असंच चालवू. पण तत्त्वाचा

बाजार करून मिळणारी श्रीमंती आपल्याला नको. ते जाऊ द्या. चहा घेणार?'' गांधीजींनी चटकन विषय बदलला.

''चहा? कुठं आहे चहा?''

''हाच आमचा चहा. मघापासून तसाच पडलाय. लिंबूपाणी आणि मध. तुम्हाला नाही आवडायचा. माहीत आहे मला.'' असं म्हणून गांधीजींनी तो पेला तोंडाला लावला. आणि नंतर पंचानं हात टिपत ते म्हणाले, ''चला, आता आश्रमाकडे जातो.''

एव्हाना ऊन तापू लागलं होतं. जमनादास म्हणाले, ''थांबा, गाडी मागवतो. ऊन फार आहे.''

''नको कित्येक दिवसांत जमिनीला पाय नाही लागले. आज चालतच जाईन म्हणतो.''

''आश्रमापर्यंत? तीनचार मैल?'' आश्चर्यानं जमनादास म्हणाले, इतक्या दिवसांचा वचपा नको काढायला? चला. गेलंच पाहिजे मला.'' काठी उचलून लांब लांब टांगा टाकीत गांधीजी निघून गेले. जमनादासजी त्यांच्या दूर दूर जाणाऱ्या आकृतीकडे अनिमिष नेत्रांनी पाहात होते. बाजूच्या खोलीतून छपाई यंत्राचा खडखडाट ऐकू येत होता. फोनची घंटा खणाणत होती. साधू शिपाई समोर येऊन काही सांगत होता. तरी जमनादासांची समाधी उतरली नव्हती. ते बघत होते. गांधीजींची आकृती केव्हाच दिसेनाशी झाली होती. आता फक्त उन्हाच्या रेषा झळाळत होत्या.

❖

# सात

गांधीजी आश्रमात येऊन पोचले तेव्हा सूर्य चांगला कडाडला होता. नरहरीभाई आश्रमाच्या दाराशी स्वयंसेवकांना सूचना देत होते. आश्रमात डाव्या बाजूला एक नवीनच कुटी उभारली गेली होती. गांधीजींना पाहताच नरहरीभाई पुढे धावले आणि त्यांचा हात आपल्या खांद्यावर ओढून घेत ते प्रेमळ रागाने म्हणाले, "बापूजी, आम्हाला कळवायचं नाही?"

"नरहरी, कळवून आणि जाहिरात करून आलो की माझ्या मागची गर्दी हटत नाही. आज कित्येक दिवसांनी जमिनीला पाय लावून मी मनसोक्त चाललो. हे बघ. त्यासाठीच हे वेषान्तर केलंय.

नरहरीभाईंनी पाहिलं. त्यांच्या आत्तापर्यंत हे लक्षातच आलं नव्हतं. आफ्रिकेत असताना जसा वेष करीत तसा बापूजींनी आज वेष केला होता. आज नेहमीपेक्षा वेगळीच काठी हातात होती. आपल्या कुटीतून कस्तुरबा हे सर्व बघत होत्या. गांधीजी आपल्या कुटीत जाऊन बसतात तोच कस्तुरबा मागून आल्या. त्यांच्या हातात ओल्या फडक्यात गुंडाळलेली पानं होती. त्यांच्या चेहेऱ्यावर काळजी उमटली होती.

बापूजींनी विचारलं, "हे काय आणलंत?"

"एरंडीची पानं."

"आत्ता कशाला?"

"एवढ्या रखरखीत उन्हातून आलात. बाधेल. डोक्यावर ठेवते ही पानं. जरा थंड वाटेल."

"फार काळजी करता आमची."

"आम्हा बायकांचा हाच धर्म."

“घरची हालहवाल काय आहे?”

“बाई ग?” कस्तुरबा आश्चर्यानं म्हणाल्या, “आज आपण घराविषयी कसं विचारता?”

“आम्हाला कळतंय. तुमच्या या उद्‌गारातून आमच्याविषयी राग व्यक्त होतोय ते. पण सांगा. देवदास, मणिलाल...”

“देवदास कलकत्त्याला गेलाय. रामदासचं अन् मणीचं आजच पत्र आलंय. दोघंही खुशाल आहेत.”

“हं.”

“हं काय? आणखी नाही विचारलंत?”

“आणखी काय?”

“हिरालालबद्दल?”

“काही विचारण्यासारखं आहे का?”

“म्हणूनच विचारायचं. पायाला गळू झालं म्हणून पायच कुणी कापून काढत नाही.”

“छान बोललात. पण सारा पायच गळवांनी भरून गेला अन् नासला तर कापावाच लागतो. राहिलेल्या शरीराला त्रास होऊ नये म्हणून.”

इतक्यात काकासाहेब आले. कस्तुरबा उठून गेल्या. काकांच्यामागून गायनाचार्य खरे आले. त्यांच्या हातात सूरपेटी होती.

“काय खरेजी, आज दुपारचीच कुठं प्रार्थना आहे वाटतं?” बापूजींनी विचारलं.

“आज दरबारसाहेब येणार आहेत आश्रमात. आताच येतील चार वाजता. आपण त्यांना मागेच आमंत्रण दिलं होतं.” काकासाहेबांनी सांगितलं.

काठेवाडातल्या ढसा या गावी हरिजनपरिषद भरली होती. गांधीजी येणार म्हणून ढसाच्या महाराजांनी- दरबार गोपाळदासांनी- सुंदर व्यवस्था ठेवली होती. पण गांधीजी परिषदेला जाऊ शकले नाहीत. काकासाहेब आणि नरहरीभाई गेले होते. परिषदेनंतर दांडिया रास हा नाच तिथल्या शेतकऱ्यांनी करून दाखविला होता. परिषदेचा सर्व वृत्तान्त ऐकल्यावर गांधीजींनी मगनलालना सांगितलं, “दरबारसाहेबांना अन् त्यांच्या शेतकऱ्यांना बोलावून घ्या.” मगनलालजींनी आमंत्रणं दिली. त्याप्रमाणं दरबासाहेब आले होते.

गांधीजींनी विचारलं, “दिवसभर प्रवासात असतील. त्यांच्या भोजनाची व्यवस्था?”

"केली आहे सर्व. बा जातीनं उभ्या राहिल्या आहेत."

आश्रमाच्या भोजनगृहात लांबचलांब पंगत बसली. डाळवांग्याचा बेत होता. सर्वांनाच बसण्यासाठी चटईच्या पथाऱ्या अंथरल्या होत्या. दरबार साहेबही त्यावरच बसले होते. खरपूस भाजलेल्या खाकऱ्यांची चवड घेऊन बा आल्या आणि प्रत्येकाच्या पानात एकेक वाढून त्या पुढं गेल्या. मागून डाळवांग्याचं पातेलं घेऊन गांधीजी आले. त्यांना तसं पाहताच सगळ्या शेतकऱ्यांनी आणि आश्रमीयांनी जयकाराचा एकच कल्लोळ केला. एका मोठ्या ओघराळ्यातून बापूजी वाढत होते. शेतकरी ओरपत होते. दरबारसाहेब गंमतीनं म्हणाले,

"बापूजी, कुणी परक्यानं पाहिलं तर काय म्हणेल तो?"

"काय म्हणणार आहे?" गांधीजींनी विचारलं.

"ब्रिटिश सत्तेविरुद्ध असहकाराच्या शस्त्रानं लढा देणारा वीर ओघराळ्यानं डाळवांगं वाढतोय."

"वाढता आलं तरच लढता येईल." गांधीजी म्हणाले.

गायनाचार्य खरे आले. त्यांनी सूरपेटीवर सूर लावून सुंदर प्रार्थना म्हटली. आणि पहिला घास तोंडात गेला. तासभर हा भोजनमेळा रंगला होता.

"बापूजी, बेत अगदी झकास झाला होता हं." आंचवता आंचवत दरबारसाहेब म्हणाले.

"आता एक तासभर विश्रांती घ्या आणि मग तुमचं नृत्य बघायचंय आम्हाला. खूप कीर्ती ऐकली आहे तुमच्या या शेतकऱ्यांची."

"पण बापूजी," रुमालाला हात पुसत दरबारसाहेब म्हणाले, "आम्ही तर तुमच्याविषयी खूप वेगळं ऐकलं होतं."

"काय वेगळं ऐकलं होत? भयंकर तर नव्हे ना?"

"छे छे. तुम्हाला गाणंबजावणं, नृत्य मुळीच आवडत नाही असं..."

"आवडत नाही असं नव्हे दरबारसाहेब. पण त्यासाठी देण्याइतका वेळ माझ्यापाशी नसतो. संगीताच्या मैफलीतले सूर मला गोड का लागत नाहीत? मला त्यापेक्षा हरिजन परिषदेत गांजल्यारंजल्या लोकांचे पोट पिळवटून निघालेले सूर मला जास्त व्यथित करतात. मग हे सूर मी विसरून जातो. म्हणून काय मी अरसिक आहे?"

"असं कुठं मी म्हटलं?" दरबारसाहेब खाली पहात म्हणाले.

"मग आपल्याला असं का वाटलं?"

"आपण मोठे; आपल्या मागं कामाचा रामरगाडा खूप..."

"मी मोठा असेनच तर माझी अरसिकता म्हणजे मोठ्या माणसांच्या खोट्या गोष्टीपैकीच एक आहे असं समजा तुम्ही."

नरहरीभाई आले म्हणून बोलणं तुटलं. ते म्हणाले, "चलायचं ना? पाहुण्यांना दुधेश्वराचं मंदिर दाखवायचंय."

"दरबारसाहेब, आपण जाऊन या. तोपर्यंत मी पत्रव्यवहार उरकून घेतो. म्हणजे मागं कोणतंही व्यवधान नको नृत्य बघताना."

दरबारसाहेब, तीसचाळीस किसान आणि बरोबर नरहरीभाई दुधेश्वराकडे गेले. काकासाहेब, विनोबाजी, खरे हे सुद्धा बरोबर होतेच. गांधीजी आपल्या कुटीत येऊन बसले. पाच बोटांच्या उंचीचा पत्रांचा गठ्ठा त्यांनी पुढं ओढला. आणि चष्मा लावून ते वाचू लागले. लोकमान्य टिळक, जवाहरलाल यांना पत्रं लिहायची होती. सशस्त्र क्रांतीवर विश्वास असणाऱ्या कोण्या एका जहाल बंगाली तरुणाचं पत्र आलं होतं. "सत्य-अहिंसेची पूजा करीत बसणारे आपण कदाचित थोर सत्पुरुष असाल. परंतु परकीयांच्या कराल मगरमिठीतून भारतमातेची मुक्तता करायला तुमची ही बिनधारी शस्त्रं निरुपयोगी ठरतील. राष्ट्ररक्षणार्थ आणि राष्ट्राच्या अभ्युदयार्थ बलदंड व्यक्तींची आणि ज्वलंत अंत:करणांची आवश्यकता आहे, आज राष्ट्रासमोर उडालेला भडका इतका मोठा आहे की अहिंसेच्या लक्षावधी झाऱ्या पाणी शिंपू लागल्या तरी आग थांबायची नाही. उलट पाणी शिंपणाराच जळून मरेल. आपण विचार करा आणि सच्चे देशभक्त असाल तर आमच्या प्रयत्नांना पाठिंबा जाहीर करा. आम्ही आपल्याला शिरोधार्थ मानू. जालियनवाला बागेत वाहिलेले रक्ताचे पाट आमच्या नजरे समोरून हलत नाहीत. मांसाचा पडलेला खच भेसूर दिसत होता. आणि ते हाडांचे सांगाडे? ते कसे विसरणार? खिलाफत चळवळीला जोर चढलाय. आपण तिला खतपाणी घालताहात. घाला. पण तुमच्याबरोबर साऱ्या देशाला आगीत उभं करू नका."

पत्र पोटतिडिकीनं लिहिलेलं होतं. पत्राखाली एक ज्वलंत देशभक्त अशी झोकदार सही होती. गांधीजींनी ते पत्र पुन्हा वाचलं. आणि शान्तपणे खाली ठेवून दिलं. अशा पत्रांना उत्तरंच द्यायची नाहीत असं त्यांनी ठरविलेलं होतं. एक तास या आणि अशाच आणखी काही पत्रांच्या सोबतीत गेला. उन्हाची तिरीप आता कमी झाली होती. साबरमतीचा संथ जलाशय मावळत्या किरणात चमकत होता. दूरवरून पाचपन्नास माणसं येताना दिसत होती. अगदी पुढं दरबार गोपाळदास आणि नरहरीभाई होते. मागं किसानांचा तांडा होता. त्यात

काही आश्रमातले स्वयंसेवक होते.

आश्रमाच्या डाव्या बाजूला स्वच्छ सारवलेलं अंगण होतं. मगनभाईंनी ते आज झाडून लखलखीत केलं होतं. संध्याकाळच्या सावल्या उतरू लागल्या होत्या. माणसं गोळा झाली. चारपाच चाटया अंथरल्या होत्या. त्यावर बसलेल्या माणसात गांधीजी जाऊन बसले. उजव्या हाताला कस्तुरबा, अनसूयाबेन, दानी, लक्ष्मी, मणी या बसल्या होत्या. आणि सगळ्यांच्या नजरा त्या चित्रविचित्र वेषातील किसानांनी वेधून घेतल्या. दरबार गोपाळदास गांधीजींच्या शेजारीच बसले होते. ते एकदम उठून किसानांत जाऊन मिसळले आणि त्यांच्या तालावर दरबारजींची पावलं पडू लागली. 'दांडिया रास' विलक्षण रंगला. प्रत्येक पाऊल गती आणि लय घेऊन पडत होतं. लय वाढत होती तसतसा रंग भरत होता. प्रत्येक पाहणारा मनातल्या मनात आपली पावलं त्या नाचणाऱ्या पावलांशी मिळवत होता. तासभर 'दांडिया रास' साबरमती आश्रमाला गुंगवत होता. दरबार गोपाळदास स्वतःचं सिंहासन विसरून त्या मुंडासेवाल्यांमध्ये विलक्षण धुंद होऊन नाचत होते. नाच संपला तशी सगळे दांडिये नृत्याच्या आवेशातच बसकण मारून खाली बसले. तेव्हा एकदम पाचपंचवीस झाडं जमिनीत गडप झाल्यासारखं वाटलं. खांद्यावरच्या मारवाडी पंच्यानं घाम टिपत जो तो गांधीजींच्या प्रतिक्रियेची वाट पहात होता. त्यांच्या शब्दांसाठी सारे कान आतुरले होते. एव्हाना सूर्य अस्ताला गेला होता. नरहरीभाईंनी एक गॅसची बत्ती एका उंच तिपाईवर आणून ठेवली होती. तिच्या प्रखर प्रकाशात सगळे डोळे चमकत होते. मगनभाईंनी गांधीजींच्या हाती एक सुताचा हार दिला. तो गांधीजींनी दरबारजींच्या गळ्यात घातला आणि ते म्हणाले, "दरबारजी, फार छान नृत्य झालं तुमचं. तुम्हाला रत्नहार अनेक मिळत असतील. पण हा आमचा सुताचा हार गोड मानून घ्या."

दोन्ही हातांनी दोन्ही गालांवर मारीत गोपाळदासजी म्हणाले,

"हे काय बोलणं झालं बापूजी? आपल्याकडून मिळालेला हा सुताचा हार लाख रत्नहारांहून मोलाचा आहे. पहा. म्हणून तर मी तो गळ्यातून काढला नाही."

कस्तुरबा मधेच कुठं गेल्या होत्या. त्या आल्या. त्यांच्या हातात द्रोणांची चवड होती. प्रत्येकासमोर एकेक द्रोण ठेवत त्या पुढं जाऊ लागल्या. मणीबेन आणि अनसूयाबेननी एक मोठं पातेलं आणलं. त्यातली खीर कस्तुरबा मोठ्या डावानं वाढू लागल्या.

"बापूजी हा काय प्रकार आहे?" गोपाळदासांनी चमचाभर खीर जिभेने चाखत विचारलं.

"गोपाळदास, तुम्ही नाचून दमलात ना? मग आता चहा नको तुम्हाला? हाच आमच्या आश्रमातला चहा. खीर आहे. तुळशीचं बी शिजवून केलेली."

"ही खीर खाल्लीत ना गोपाळदासजी की उद्या दुप्पट लयीत नाचाल." काकासाहेब म्हणाले.

"दरबारजी, तुम्ही केव्हा नाच शिकलात? आम्ही परिषदेला आलो होतो तेव्हा तर तुम्हाला काहीच येत नव्हतं?" नरहरीभाईंनी विचारले.

"होय ना, पण बापूजींचं आमंत्रण आलं म्हणून स्वत: नाच शिकलो. म्हटलं, त्यांनी सांगितलंच तर आपल्याला नाचता आलं पाहिजे." गोपाळदास म्हणाले.

रात्रप्रार्थनेची वेळ झाली होती. म्हणून सारे उठले. उठता उठता गोपाळदासजींच्या खांद्यावर हात ठेवीत गांधीजी म्हणाले,

"गोपाळदासजी, राजाच्या तालावर नाचणारी प्रजा आपण सर्वत्र बघतोच. पण प्रजेच्या तालावर नाचणारा राजा मात्र आज आम्ही पाहिला."

गांधीजींच्या या उद्‌गारांनी गोपाळदासजींचा ऊर भरून आला. ते झटकन वाकून गांधीजींच्या पायांना स्पर्श करीत गदगदल्या स्वरात म्हणाले, "बापूजी, आपल्या सदिच्छा आणि आपले आशीर्वाद असेच आमच्या पाठीशी असू देत." गांधीजींनी त्यांना प्रेमभरात उठवलं तेव्हा शे शंभर डोळे हा हृदयस्पर्शी देखावा बघत होते.

"बापूजी, फायली आणून ठेवल्यात. टाक, दौत, वाळू, कागद सर्व तयारी आहे. मी पुन्हा केव्हा येऊ?"

"काकाजी, तुम्ही आता येऊच नका. नाहीतर सारखी तुमची झोपमोड होईल. मला झोप आली की झोपेन. या फायली तशाच राहू द्यात." गांधीजी म्हणाले.

कमरेइतक्या उंच चौपाईवर एक मोठा लालटेन जळत होता. बैठ्या मेजावर गांधीजी लिहीत बसले होते. आवतीभोवती फायलींचा आणि कागदाचा पसारा होता. पंजाब चौकशीचा रिपोर्ट लिहिण्याचं काम सुरू होतं. दोन वाजता किंचित डोळा लागला. तेव्हा कस्तुरबांनी त्यांच्या अंगावर चादर आणून पांघरली. खिडकीतून येणाऱ्या गार वाऱ्याच्या झोतानं अंगावर झिणझिण्या

उठत होत्या. साडेचार वाजता कस्तुरबांनी डोकावलं तेव्हा खिडकी बंद होती. गांधीजी रात्रीप्रमाणंच मेजाशी लिहीत बसले होते. आज प्रार्थनाही जाग्यावरच केली. सकाळचं फिरणं, मालीश, स्नान सगळं झालं आणि पुन्हा बापूजी फायली उपसू लागले. चंपारण्यातल्या लोकांना घेऊन आज कृपलानींजी येणार होते. वल्लभभाईही येण्याची शक्यता होती. म्हणून काकासाहेब वर्दी द्यायला गेले. कुटीचं दार किलकिलं होतं. दुपारचा एक वाजला होता. काकासाहेबांनी दार उघडलं. बापूजी तक्क्यावर कलंडले होते. मान डाव्या खांद्यावर विसावलेली होती डाव्या हातात एक कागद तसाच होता. उजव्या हातात लेखणी लटकत होती. तोंड अर्धवट उघडं होते. त्यांना गाढ झोप लागली होती. "रात्रभर जागरण केलं. आता कशाला उठवा" असा विचार करून काकासाहेब परतले. त्यांनी दरवाजा लावून घेण्यासाठी हळूच ओढला. तेवढ्या आवाजानंही गांधीजी जागे झाले. ते एकदम चपापून उठले. गुन्हा करताना पकडले जावे तसाच जणू भाव त्यांच्या चेहेऱ्यावर होता. ओल्या पंचाचा हात तोंडावरून फिरवून ते पुन्हा लिहायला बसले. काकासाहेब हळूच म्हणाले,

"बापूजी, पुरे आता."

"किती वाजलेत?"

"दुपारचा दीड."

"मग अजून बरीच मजल मारायची आहे."

"किती वेळ लिहिणार असं?"

"होईल तितका वेळ."

"बोटं दुखायला लागतील."

"बोटांना दुखून चालणार नाही."

"आज आश्रमात बरीच मंडळी यायचीत."

"कुणीही आलं तरी संध्याकाळी पाचपर्यंत मला बोलावू नका."

"वल्लभाई, कृपलानी सुद्धा."

"हो. ते सुद्धा आले तरी."

आणि गांधीजींची लेखणी पुन्हा कागदांवर शब्द कोरू लागली.

गांधीजींनी सादर केलेला रिपोर्ट म्हणजे जणू पंजाबच्या हत्याकांडाचा पंचनामाच ठरला. अमृतसरच्या राष्ट्रीयसभेच्या अधिवेशनात त्यावर बरीच चर्चा झाली. लोकमान्य अधिवेशनाला आले होते. याचवेळी युद्ध संपल्यानंतर एक

अंग्रेजी कावा उघडकीस आला. खलिफांचे अधिकार काढून घेणारा कायदा धाडकन करून टाकला सरकारनं आणि मग खिलाफत चळवळीनं भारतात जोम धरला. अलीबंधू सूत्रधार. गांधीजींची यात मोठी ओढाताण झाली. मॉंटेग्यूसाहेब खिलाफत चळवळीवर रुष्ट झालेले होते.

या निमित्तानं गांधीजींनी असहकार पुकारण्याचं जाहीर केलं. अनेक सरकारी किताबती परत सरकारजमा होऊ लागल्या. गांधीजींनी स्वत:चे कैसर-इ-हिंद सन्मानपद सरकारला परत केले. परदेशी मालावर बहिष्कार टाकला जाऊ लागला. बहिष्काराचं रूपांतर प्रचंड होळ्या पेटण्यात झालं. देशभर जणू जिकडं तिकडं असंतोषाचीही यज्ञकुंडं पेटली होती. त्या धगधगत्या कुंडांतून चहुबाजूंनी आहुत्या येऊन पडू लागल्या. जनमेजयाच्या सर्पसत्राची आठवण देणारं ते धगधगतं चित्र होतं.

गांधीजी दिल्लीला जाऊन आले. जुलैच्या सव्वीस तारखेला बातमी आली. ''लोकमान्यांची प्रकृती चिंताजनक आहे.'' गांधीजी गुजराथेतून तडक मुंबईला गेले. तीनचार दिवस लोटले होते. सरदारगृहाभोवती लोकांचा वेढा पडला होता. एकतीस जुलैची मध्यरात्र उलटून गेली. आणि ऑगस्ट महिन्याचा पहिला दिवस सुरू झाला. मुसळधार पावसाची कोसळ भूमीला चोपून काढीत होती. फोर्टातल्या डांबरी रस्त्यांवरून पाण्याचे लोट वाहात होते. ते पाणी तुडवीत आणि मुसळधारीला तोंड देत शेकडो पाय सरदारगृहाकडं चालले होते.

महारथी शरपंजरी पहुडला होता. कर्मयोगी सूर्य अस्तमान होत होता. काळाच्या डोंगराआड गेले चारपाच दिवस हळूहळू विरत जाणारी ती प्रखर सूर्यरेषा त्या मध्यरात्रीनंतर दिसेनाशी झाली. गांधीजींना वार्ता कळविण्यात आली. तेव्हा ते सांताक्रूझला होते. पावसाचं तांडवगीत ऐकता ऐकताच ही हृदयविदारक वार्ता त्यांनी ऐकली. विजेचा दिवा असूनही तो लावलेला नव्हता. एक मेणबत्ती मंद जळत होती. ज्योतीच्या धगीनं मेण वितळून धारा जमिनीवर ओघळत होत्या. हळूहळू सारं मेण वितळलं. गांधीजी त्या ज्योतीकडं नुसतेच बघत होते. वातीला आता मेणाचा आधार राहिला नव्हता. वातीच्या टोकानं एकदम मान टाकली. ज्योत विझली. आणि पांढऱ्या धुराची एक अस्पष्ट रेषा तशा अंधारातही हवेत वर वर जाताना दिसली.

''एक महान आयुष्य संपलं.'' गांधीजी पुटपुटले.

पाण्याच्या पुरात अश्रूंचा महापूर मिसळून गेला. अंत्ययात्रा निघाली.

जवाहरलाल आले. गांधीजी आले. बॅ. जीना, अलीबंधू आले. चौपाटीवरील वाळूचा कण न् कण हलला. समुद्राच्या साक्षीनं एक चिता पेटली. तिनं निद्रिस्त सिंहाला गिळून टाकलं.

गांधीजी जड पावली परतले. अजून असहकाराची चळवळ नावारूपास यायची होती तोच हा आघात!

"बापूजी, आता काय करायचं?" नरहरीभाईंनी विचारलं.

"नरहरी, आज आता आश्रमात जाऊ. मन कसं पिंजून पिंजून गेलंय. वास्तविक जायला नकोच. पण... चला आताच निघू."

या प्रवासात गांधीजी कुणाला भेटले नाहीत. कुठं चर्चा केली नाही. थेट अहमदाबाद.

आठपंधरा दिवस असेच गेले. लोकमान्यांचा मृत्यू आश्रमाला विसरता येत नव्हता. त्या शोकछायेत आश्रमात सूत कताईला आरंभ झाला होता.

बापूजी आपल्या कुटीत बसले होते. चंपारण्यातल्या शाळेविषयी पत्र आलं होतं. त्याला उत्तर धाडायचं होतं. कस्तुरबा आल्या. गांधीजींचा चेहेरा नेहमीप्रमाणे टवटवीत दिसत असला तरी डोळे ओढल्यासारखे वाटत होते.

"बरं वाटत नाही का?"

"खूप बरं वाटतंय आता."

"मग डोळे असे का?"

"त्यांनी तरी किती काम द्यावं?"

"खारकेची खीर करणार आहे. थोडी घेणार?"

"अलीकडं पोटात मधून मधून दुखू लागतं. आज उपासच करायचा ठरवलंय."

"आपण जपलं पाहिजे. आपले हे सर्व प्रयोग अंगाशी येतील बरं. एकदा मुंबईला जाऊ या."

"आता तर मुंबईहून आलो. आणखी कशाला?"

"डॉ. तळवलकरांना दाखवू या."

"तुम्हाला माहीत आहे ना? मग का पुनः पुन्हा विचारता?"

"राहवत नाही म्हणून."

दारात कुणीतरी आलं होतं. कस्तुरबांनी वळून पाहिलं... "देवदास! अरे, अचानक कसा आलास?" त्यांनी अधीरतेनं विचारलं.

देवदासचा चेहेरा ओढल्यासारखा दिसत होता. हळूहळू पावलं टाकीत

तो पुढं आला. गांधीजींच्या चरणांना स्पर्श करून तो कस्तुरबांजवळ आला आणि दाताखाली ओठ दाबत म्हणाला, "आई... आई... वहिनी गेल्या?"

कस्तुरबांना एकदम कळेचना. त्यांनी देवदासचे दोन्ही दंड धरले आणि त्याला गदागदा हलवीत त्या म्हणाल्या,

"देवा, अरे म्हणतोस काय तू?"

"होय आई. हरिलालदादा आता... रसिकची आई गेली." गांधीजींनी डोळे गच्च मिटून घेतले. कस्तुरबांनी डोळ्याला पदर लावला. देवदास कस्तुरबांना घेऊन गेला. महादेवभाई आले. त्यांनी पाहिलं तो गांधीजी योग्यासारखे समाधिस्थ बसले होतेच. महादेवभाईंनी मृदू स्वरात विचारलं.

"बापूजी, देवदासनं कोणती वार्ता आणली?"

"हरिलालजीची पत्नी... आमच्या मोठ्या सूनबाई..."

"बापूजी, तुम्ही आता पडा जरा. आराम घ्या."

"महादेव, आघात व्हायचेच. म्हणून का आडवं व्हायचं. खरेजींना बोलव. मी इथंच आहे म्हणावं."

महादेवभाई गेले अन् खरेजींना घेऊन आले. महादेव, कस्तुरबा, नरहरीभाई, काकासाहेब, अनसूयाबेन... सारे गोलाकार बसले. खरेजींनी सूरपेटीवर सूर लावला. समोर गीतारहस्याचा ग्रंथ होता. कोपऱ्यात एक उदकाडी शान्त जळत होती. खरेजींच्या सुरेल गळ्यातून आर्त स्वर द्रवू लागले...

हे जग त्राता, विश्व विधाता, हे सुखशान्तिनिकेतन हे
प्रेमके सिन्धो, दीनके बंधो, दुःख दरिद्र विनाशन हे
नित्य, अखंड, अनंत, अनादि, पूरण ब्रह्म सनातन हे!

बारडोलीचा परिसर आज माणसांनी फुलून गेला. सुरत जिल्ह्यातलं हे तालुक्याचं गाव कित्येक वर्षं झोपून जागा झालेल्या माणसासारखं उत्साहानं सळसळत होतं. बारडोलीची थंडी, झोप पार उडाली होती. वल्लभभाई दिवसचे दिवस तिथंच तळ देऊन होते. सविनय कायदेभंगाच्या चळवळीचा पहिला घाव बारडोलीतून घातला जायचा होता. पहिला मोर्चा बांधायचा होता तो बारडोलीला. म्हणून या गावाची छाती अभिमानानं फुगली होती. एरवी शुष्क जीवनव्यवहारात गढून गेलेल्या बारडोलीनं आपली चाकोरी सोडून या नव्या वाटेवर प्रवेश केला होता.

तसं पाहिलं तर व्यापारउदीम आणि शेतीवाडी एवढे दोनच व्यवहार बारडोलीला ठाऊक होते. तेही व्यवसाय कुणी जिवाच्या करारानं आणि भरभराटीच्या

इच्छेनं करीत होतं असं नव्हे. जगण्यासाठी, पोटाची वितभर खळगी भरण्यासाठी जेवढा उद्योग आवश्यक होता तेवढाच बारडोली करीत होती. मरायचं नाही म्हणून जगायचं असतं एवढंच या बारडोलीला ठाऊक होतं. पण बारडोलीच्या देहात आता प्राण खेळू लागला होता. का जगायचं हे तिला कळू लागलं होतं. अशा जगण्यासाठी तिनं खुशाल मरण्याची तयारी केली होती.

गांधीजींनी बारडोलीत पाऊल ठेवलं तेव्हा तिथली धूळमाती जमीन सोडून आभाळ पाहू लागली. गांधीजी आणि महादेवभाई यांचा मुक्काम बारडोलीला पडला होता. वल्लभभाईंनी एका छोट्याशा घरात गांधीजींची व्यवस्था केली होती. रात्रीच्या वेळी रोज बारडोलीतली आणि बारडोलीच्या परिसरातली माणसं शेकोटीला येत. घरामागच्या मोकळ्या अंगणात शेकोटी केली जाई.

अशीच एक शेकोटीची रात्र! गांधीजी खाटल्यावर बसले होते. शेजारी वल्लभभाई होते. खाटल्याच्या शेजारी खाली चटईवर महादेवभाई. पाच-पंचवीस व्यापारी मंडळी जमली होती. सविनय कायदेभंगाचं निरूपण ऐकायला जमली होती ही मंडळी.

"गांधीजी, कायदेभंग हा सविनय कसा होऊ शकतो बरं?" बलवंतरायांनी प्रश्नार्थक मुद्रा करून विचारलं.

"का बरं? तुम्हाला अशी शंका का यावी?"

"कुठल्याही कायद्याचा भंग हाच मुळात विनयाला सोडून आहे. मग सविनय कायदेभंग कसा होईल?" गोपालजींनी हसत हसत आपला मुद्दा मांडला.

"गोपालजी, तुमचा मुद्दा वकीली थाटाचा आहे. पण मला अभिप्रेत आहे तो कायदेभंग असा की ज्यात हिंसा नाही, आक्रमण नाही, अत्याचार नाही."

"पण कायदेभंग आला की आक्रमण आलंच, एकाद्या ठिकाणी जाऊ नका असं सांगितलेलं आहे. आणि कायदेभंग करायचा तर तिथं गेलं पाहिजे. म्हणजेच आक्रमण आलंच आणि ते करताना हिंसा झाली तर ती अटळ नाही का?"

"ही एक बाजू झाली. पण एखाद्या ठिकाणी जा असं सांगितलं असताना तुम्ही गेला नाहीत तर तोही एक प्रकारे कायदेभंगच आहे."

"पण हे कायदेभंगाचं अभावात्मक रूप झालं."

"असेल. पण त्याचं सामर्थ्य भावात्मक रूपाइतकंच मोठं आहे."

तास दोन तास या कायदेभंगाच्या चर्चेत सहज निघून गेले. महादेवभाई इतका वेळ समोर काही तरी टक लावून पहात होते. फर्लांगभर अंतरावर एक धिप्पाड आकृती पुतळ्यासारखी निःस्तब्ध उभी होती. तो माणूस धड पुढंही येईना आणि तेथून हलेना. त्यामुळं त्याचं ते तसं उभं राहणं महादेवभाईंना चमत्कारिक वाटलं. म्हणून महादेवभाईंनी बलवंतरायांना विचारलं,

"हा माणूस कोण आहे? अन् हा असा चमत्कारिक तऱ्हेनं इथं का वावरतोय?"

महादेवभाईंनी दाखवलेल्या जागेवर बलवंतरायांनी बॅटरीचा प्रकाशझोत फेकला. पण आता तिथं कुणीही नव्हते. जमिनीत रुतल्यासारखे पावलांचे ठसे मात्र उमटले होते. हत्तीच्या पायासारखे रुंद, जाड, ठसे होते ते. सगळी माणसं निघून गेल्यावर महादेवभाईंनी गांधीजींना आत झोपायला सांगितलं. झोपताना त्यांनी दाराला कडी तर घातलीच पण भलं मोठं कुलूप घातलं.

"महादेवा, आज एवढा बंदोबस्त का बाबा?" गांधीजींनी हंसत विचारलं.

"खबरदारी म्हणून."

"कशाबद्दलची खबरदारी?"

"सुरक्षिततेची."

"आजच एवढी निकड का वाटली?"

"तसं काही घडलं म्हणून."

"काय घडलं? आत्ता तर आपण बोलत बसलो होतो."

"एक रहस्यमय माणूस इथं अंवतीभोंवती वावरतोय."

"रहस्यमय माणूस?"

"हो. मला त्याची हालचाल बरी वाटली नाही."

"मग त्याला आपल्याकडे घेऊन यायचं का नाही?"

"प्रयत्न केला. पण त्यापूर्वीच तो अदृश्य झाला."

"मग त्याची भीती का वाटते महादेवा?"

"ते तुम्हाला नाही कळायचं बापू."

"बरं. तुला कळेल. पण ते कुलूप आधी काढ. मला कैदखान्यात कोंडू नको."

गांधीजींच्या सांगण्याप्रमाणं महादेवभाईंनी कुलूप काढलं पण एक काळजी मनात वागवूनच ते झोपी गेले.

दुसऱ्या दिवशी बलवंतराय पुन्हा आले. त्यांच्याबरोबर गोपालजी होतेच

त्यांनी महादेवभाईंना बाजूला घेऊन सांगितले,

"गावच्या मशिदीत एक पहाडी काबुली मनुष्य आला आहे. त्याची हालचाल काही वेगळीच दिसते. तो गांधीजींच्याबद्दल वारंवार जिथंतिथं चौकशी करत हिंडत असतो."

"रात्री दिसलेला तो भुतासारखा माणूस म्हणजे हाच काबुली असेल." महादेवभाई म्हणाले.

"भाई, काहीतरी बंदोबस्त केला पाहिजे. बापूजींच्या रक्षणाची व्यवस्था करायला हवी. नाहीतर दगाफटका व्हायचा." बलवंतराय काळजीयुक्त स्वरात म्हणाले.

आणि दुसऱ्याच दिवशी त्या घराभोवती काटेरी ताराचं कुंपण पडलं. घराच्या मोठ्या दरवाजाला कुलूप लावून शिवाय तिथं पहारेकरी बसविण्यात आला.

रात्र झाली. गांधीजी वाचता वाचता गाढ झोपी गेले होते. महादेवभाई आपल्या खोलीत दैनंदिनी लिहीत होते. बाहेरच्या ओसरीवर बलवंतराय आणि गोपालजी घोरत होते. त्यांची जुगलबंदी सुरू होती. ती ऐकताना पेंगणारा पहारेकरी मधूनच जागा होऊन खुदकन हसत होता. मध्यरात्रीनं आपला काळा पडदा पृथ्वीवर पसरला आणि जिकडंतिकडं चिडीचूप झालं. कुंपणाच्या पलीकडं कसलीशी खसफस ऐकू आली. पहारेकरी हातातला सोटा सावरून पळाला. पण तो कुंपणापर्यंत जायच्या आत अंधारात कुणी निघून गेलेलं होतं. पहारेकऱ्यानं बॅटरीचा झोत टाकला. दूरवर जाड जाड पावलांच्या खुणा दिसत होत्या. या धावपळीनं बलवंतराय आणि गोपालजी जागे झाले आणि गडबडीनं ते उठून बाहेर आले. पहारेकरी या भुताटकीनं भेदरला होता. कुंपणाच्या काटेरी तारेला अडकलेला एक कापडाचा तुकडा अंधारात वाऱ्यावर हलताना विचित्र दिसत होता. बलवंतरायांनी तो तुकडा हातात घेतला आणि प्रकाशात येऊन पाहिला.

"बरोबर, असाच खमीस त्या काबुलीचा आहे. तोच आला असावा इथं आणि घाईघाईनं पळून जाताना खमीस अडकून फाटला." बलवंतराय म्हणाले. त्यांनी तो तुकडा आपल्या खिशात ठेवून दिला.

दोनतीन दिवसांनी मशिदीतलेच काही लोक गांधीजींच्या निवासस्थानी आले आणि त्यांनी महादेवभाईंना सांगितलं, "तो काबुली माथेफिरू आहे. गांधीजींचं नाक कापण्याच्या गोष्टी बोलतो तो. संभाळून असा."

महादेवभाईंच्या काळजात चर्र झालं. बलवंतराय आणि गोपालजी यांना

धक्काच बसला. "बारडोलीच्या भूमीवर असं काही घडता कामा नये..." या निश्चयानं त्यांनी काबुलीच्या हालचालींवर नजर ठेवली.

संध्याकाळची प्रार्थना संपवून गांधीजींनी पत्रव्यवहार पाहिला आणि नेहमीप्रमाणं गप्पा गोष्टी करीत ते अंगणात आले. खाटल्यावर बसून झोपण्यापूर्वीचा रामनाम जप करू लागले. आभाळात चांदण्यांनी गर्दी केली होती. गडद निळ्या पडद्यावरील ती चंदेरी खडी चमचमताना बहारदार दिसत होती. गांधीजी चांदण्या मोजत आडवे झाले. त्यांनी कुशीला वळून पाहिलं तर आसपास पंधरावीस खाटली! घरात झोपणारे सगळे आज बाहेर. गांधीजींनी बलवंतरायना विचारलं, "काय बलवंतराय, आज आम्हांला असा वेढा का दिला? कुणी काहीच बोलेना. सगळ्यांची तोंड पलिस्तर मारल्यासारखी बंद.

गांधीजींनी महादेवभाईंना विचारलं. मग महादेवभाईंना खरा प्रकार सांगावाच लागला. नाक कापणाऱ्या काबुलीचा. ते ऐकून लहान मुलासारखं हसत गांधीजी म्हणाले,

"भले बहाद्दरांनो, मला वाचवणारे तुम्ही कोण? आणि समजा, ईश्वरानं मला अशा तऱ्हेनच मारण्याचं ठरवलं असलं तर तुमचा हा वेढा ईश्वराला का रोखणार आहे?" आणि मग थोड्या तीव्र स्वरातच त्यांनी सगळ्यांना फर्मावलं,

"जा आपापल्या जागी जाऊन झोपा."

गांधीजींनी जवळजवळ ही आज्ञाच दिली होती. नाइलाजानं तिथल्या खाटा उचलल्या गेल्या आणि काही वेळातच गांधीजी गाढ झोपेत विलीन झाले. जणू काही भयप्रद असं घडलंच नव्हतं.

महादेवभाईंना मात्र जागरण करण्यावाचून गत्यंतर नव्हतं. त्यांच्या बरोबर बलवंतराय, गोपालजी यांनीही रात्र जागवली. भुताखेतांच्या गोष्टी एकमेकांना हळू आवाजात सांगत ते वेळ घालवत होते. दोनाचे टोले पडले आणि नेमकी कालच्याच सारखी खसफस कुंपणाचा बाजूनं ऐकू आली. सगळ्यांनी डोळे ताणून पाहिलं. गांधीजी गाढ झोपेत होते. कुंपणाच्या पलीकडे तो काबुली उभा होता. आज तो पळून गेला नाही. जमिनीत रोवलेल्या खांबासारखा तो निश्चल उभा होता.

महादेवभाई बलवंतरायांना म्हणाले, "राहू दे त्याला तसाच उभा. आत आला तर समाचार घेऊ."

बऱ्याच वेळानं तो मागच्यामागं निघून गेला.

पहाट झाली. गांधीजी उठले. थोड्या वेळानं प्रार्थनेसाठी सारे जमले.

गांधीजी खाटल्यावर बसले होते. भोवती बाकीचे सगळे. आज आलेल्या स्वयंसेवकांच्या पथकात मुंबईचा एक तरुण मुलगा आला होता. फार गोड गळा होता त्याचा आणि नाव मुरली. गांधीजींनी त्याला एखादा अभंग म्हणायला सांगितला.

मुरलीच्या गोड गळ्यातून मधाळ शब्द आणि रसाळ सूर धावू लागले. भैरवीचे सूर वातावरणात दरवळू आगले-

**न कळता काय करावा उपाय**
**जेणे राहे भाव तुझ्या पायी।**
**येउनियां वास करिसी हृदयी**
**ऐसे घडे कडू कासयाने?**
**तुका म्हणे मज राखावे पतिता**
**आपुलिया सत्ता पांडुरंगा।।**

भैरवी संपली. शब्द संपले तरी तिची मनावरली धुंदी अजून उतरली नव्हती. महादेवभाईंनी सहज वळून पाहिलं आणि ते दचकले- कुंपणापलीकडं त्या काबुलीची आकृती! भुतासारखी.

महादेवभाईंनी गांधीजींना सांगितलं. ते म्हणाले, "त्याला माझ्यासमोर घेऊन या."

पहारेकऱ्यानं त्याला फाटकातून आत आणलं. तो बेमुर्वतखोरपणे समोर येऊन उभा राहिला.

गांधीजींनी त्याला विलक्षण प्रेमळस्वरात विचारलं,

"बाबारे, तू असा का उभा होतास इथं? अवघडल्यासारखा?" खांदा उडवत छद्मीपणानं तो काबुली म्हणाला,

"आपण अहिंसेचा संदेश देता ना? तुमचं नाक कापून तुमच्या अहिंसेची परीक्षा घ्यायची होती मला."

हे म्हणताना त्याचा आविर्भाव असा होत होता जणू त्याच्या हाती एखादी सुरी होतीच.

गांधीजी हंसून म्हणाले, "एवढंच ना? मग नाकच कशाला, हे सगळं शरीर मी तुझ्या स्वाधीन करतो. कर तुला काय प्रयोग करायचा तो." असं म्हणून गांधीजी उठून त्याच्या जवळ जवळ जाऊ लागले. तशी त्याचा चेहेरा अधिकाधिक क्रूर दिसू लागला.

महादेवभाई ओरडले, "बापूजी, पुढं नका जाऊ."

गांधीजींनी त्यांना हातानंच गप्प बसण्याची खूण केली.

आता काबुलीच्या डोळ्यातले भाव एकदम बदलले. त्याचा निबर चेहेरा पांढराफटक पडला. अंग थरारू लागलं. शरीर घामानं डबडबलं आणि तो धाडकन् गांधीजींच्या पायाशी कोसळला.

चारपाच दिवसांनी गांधीजी मुंबईला जायला निघाले तेव्हा तोही आपल्या गावी जायला निघाला. स्फुंदत स्फुंदत तो म्हणत होता,

"बापूजी, मला क्षमा करा, मला क्षमा करा."

देशभर शिमगा नसून होळ्या साजऱ्या होत होत्या. होळीच्या भडकत्या ज्वाळा आपल्या जिभांनी परदेशी वस्तूंचा स्वाहाकार करीत होत्या. रेशमी कपडे, मँचेस्टरी धोतरं, तलम साड्या, लोकरीचे उंची कपडे, जे जे म्हणून या देशाच्या बाहेर तयार झालं ते भुरुभुरू जळून जात होतं. ती आग विलक्षण होती. स्वदेशी भावनेला नवं तेज येऊ पहात होतं. लोकांनी पदव्या भिरकावल्या, नोकऱ्यांवर लाथ मारली, शिक्षणाकडे पाठ वळवली आणि असहकाराचा अभिनव झेंडा अभिमानानं खांद्यावर घेऊन, तो उत्साहानं नाचवीत लक्षावधी लोक स्वातंत्र्योपासना करीत होते.

गांधीजींनी टिळक-स्वराज्य फंड उभारला होता. दिवसागणिक फंडाची रक्कम फुगत होती. एक कोटीचं लक्ष्य होतं. सव्वा कोटी रक्कम बोल बोल म्हणता जमा झाली. जमनालाल बजाज यांनी एक लाख रुपये या फंडासाठी दिले. लोकांची उमेद वाढत होती, उत्साह दिवसागणिक अधिक सळसळत होता. पण गांधीजी अस्वस्थ होते. त्यांची बेचैनी वाढत होती. मुंबईला असहकार चळवळीनं उग्र रूप धारण केल्याच्या वार्ता नित्यशः येत होत्या. मालेगावला पोलिसांनी दडपशाही केली. तिचा प्रतिकार म्हणून जनक्षोभाचा डोंब उसळला. गांधीजींनी त्याचा निषेध केल्यावर एक मालेगावी संतप्त तरुण गांधीजींना भेटायला आला. त्यावेळी गांधीजी कताई करीत होते. महादेवभाईंनी शामनाथ आल्याची वर्दी दिली. शामनाथ किरकोळसा होता. मध्यम उंचीचा काळसर वर्णाचा हा तरुण चेहेऱ्यावरून मात्र तीव्र आणि मनस्वी वाटत होता. आत येताच त्यानं प्रथम गांधीजींच्या पायाला स्पर्श करून वंदन केलं आणि काहीशा रुष्ट स्वरात तो म्हणाला,

"एक थोर आणि वडिलधारी व्यक्ती म्हणून मी आपल्या पाया पडलो. पण त्याच वेळी तुमच्यातल्या राजकारणी व्यक्तीचा मी निषेध करतो."

हातातील पेळू शान्तपणे खाली ठेवून गांधीजी हसत म्हणाले,

"आनंदाची गोष्ट आहे. असं दुहेरी प्रेम फारच थोड्या व्यक्तींच्या वाट्याला येतं. आपण माझा निषेध करता तोही प्रेमापोटीच."

"कारण आपण आमचा निषेध केलात."

"शामनाथ, मी कोणाही व्यक्तीचा निषेध नाही केला. मालेगावी जे घटलं त्या घटनांचा आणि त्या मागील प्रवृत्तींचा निषेध केला."

"पण त्या प्रवृत्ती तरी का निर्माण झाल्या, घटना का घडल्या याचा विचार कधी केलाय का कुणी?"

"हो जरूर केलाय. पण कोणत्याही कारणानं का होईना पोलिसांचे मुडदे पडावेत ही गोष्ट शरमेचीच आहे."

"एकूण, आपली सरकारलाच सहानुभूती आहे असा तर अर्थ यातून निघत नाही?"

"शामनाथजी, आपण थंड मनानं विचार करा. मी तुमच्याइकाच किंबहुना जास्त कडवा विरोधक आहे सरकारचा. पण माझी सहानुभूती आहे ती माणसाला. शत्रुत्त्व करतानाही माणुसकी गमावता कामा नये."

"मी आपल्याकडे फार आशेनं आलो होतो बापूजी" शामनाथ तीव्र दाहक स्वरात म्हणाले, आणि आपले दोन्ही हात मागे नेऊन त्यांनी खसकन आपला खमीज वर केला आणि गांधीजीसमोर पाठ करून उभे राहिले.

शामनाथच्या पाठीवर आडवेउभे वळ उठून त्यांची एक चमत्कारिक नक्षीच तयार झाली होती. कमरेकडच्या बाजूला आसूडाच्या फटक्यानं मांस सोडलेले होते, त्यावर खपली धरली होती. बरगड्यांच्या मधला खोलगट भागही सुजून वर आल्यानं पाठीला बरगडी अशी दिसतच नव्हती.

"बापूजी, पाहिलात हा अत्याचार? हे वळ काय बोलतात, या जखमा काय सांगतात, ही सूज काय ओरडते?" शामनाथनी कळवळून विचारलं.

खोलीत विलक्षण गांभीर्य होतं. महादेवभाई एका गोल चौपाईवर अवघडून बसले होते. गांधीजींनी डोळे मिटून घेतले होते. त्यांच्या मनात काहूरकल्लोळ चालला असेल याची लवमात्र खूणही त्यांच्या चेहेऱ्यावर दिसत नव्हती. अखेर शामनाथ उठून म्हणाले, "बापूजी, मी जातो. पण जाताना आपलं मत मात्र कळलं तर बरं होईल."

"शामनाथ, माझं मत विचारता ते काल होतं तसंच आहे, उद्याही तेच राहणार आहे. शामनाथ, असहकारितेची चळवळ ही अनत्याच्याराच्या भक्कम खडकावर उभी करण्यात आली आहे. ज्या क्षणी या चळवळीत अत्याचाराचा

शिरकाव होईल, त्याच क्षणी या चळवळीच्या नरडीला नख लागलेच म्हणूनच समजा.''

''तर मग मी जातो, पण बापूजी, अनत्याचार हा दोही बाजूंनी असावा लागतो. एकतर्फी अनत्याचाराची फार भीषण फळं भोगावी लागतात.'' असं उद्वेगानं म्हणत शामनाथ बाहेर पडले.

गांधीजी शान्तपणं खाली बसले. मघाशी खाली ठेवलेले पेळू अनाथपणे वाऱ्याबरोबर पुढेमागे करीत होते. त्यांना व्यवस्थित ठेऊन गांधीजींनी चरखा पुन्हा हाती घेतला.

महादेवभाईंनी विचारलं, ''बापूजी, आजची वृत्तपत्रं पाहिली तुम्ही?''

''नाही.''

''शामनाथ म्हणाले ते खरं आहे.''

''आणि मी म्हणतो ते?''

''ते आत्ताच नाही सांगता येणार.''

गांधीजींनी एकदम मान वळवून विचारलं, ''महादेव, तू सुद्धा...''

''बापूजी, माझ्या म्हणण्याचा आशय तसा नव्हता. तुम्हाला दुखवायचं नव्हतं.''

''मला तू काय दुखावणार महादेव? पण...''

''बापूजी, या देशाला अजून खूप शिकायचंय. इथल्या माळरानावर तुमच्या सुंदर तत्त्वाचं बी रुजायला अजून खूप अवकाश आहे. आपल्याला खूप मेहनत घ्यायला हवी.''

''मग माळरानाची उसाभरी कुणी करायची? तिथं रानं कुणी फुलवायची? आपणच ना?''

''होय बापूजी. पण कविवर्य टागोरांसारख्यांचाही आपल्याला फारसा पाठिंबा नाही. शिक्षणसंस्थांवर बहिष्कार घालायला विरोध आहे त्यांचा.''

''महादेव, पाठिंब्यासाठी आपण थांबलो तर तो कधीच मिळणार नाही. लक्षात ठेव. प्रकाशासाठी वातीला आधी जळावं लागतं अन् मग प्रकाश पडतो.''

''बापूजी, हे मला पटतं. पण या देशातल्या गरीबातल्या गरीबाला, अडाण्यातल्या अडाण्यालाही ते पटलं पाहिजे. तरच थोडंफार यश मिळेल. नाहीतर शामनाथासारखे हजारो त्रस्त आपल्याला खायला उठतील.''

''महादेवा, अरे यशासाठी कार्य का थांबवून ठेवायचं? आपलं पाणी

कुणीच पीत नाही असं कुठल्या नदीनं म्हणून ती वाहायची थांबली आहे का? ती आपली वाहात असते, सदासर्वकाळ."

उमर सोबानी आणि शंकरलाल आले. हातातील वृत्तपत्र उलगडत सोबानी म्हणाले,

"बापूजी, युवराजांचं आगमन व्हायचंय. आपण जायचं ना स्वागताला?"

गांधीजींनी हसून विचारलं, "सोबानी, तुम्हाला काय वाटतं?"

"बहिष्कार."

"मग तेच करणार आहोत आपण."

इंग्लंडच्या युवराजांच्या आगमनाची तुतारी मुंबईच्या किनाऱ्यावर वाजली. पण तिची ललकार ऐकायला बंदरावर फारच थोडे लोक होते. एरवी उत्साहानं उफाळणाऱ्या मुंबईनं आज सुतक्यासारखा चेहेरा टाकला होता. दुकानं, पेढ्या, वखारी बंद होत्या. रस्ते सुने सुने वाटत होते. परळला मात्र खूप गर्दी लोटली होती. सूर्य पश्चिमेला कलला तेव्हा परळ भागात माणसांचं मोहोळ तयार झालं होतं. ग्रहणातल्या भिक्षेकऱ्यासारखा प्रत्येकाच्या हातात एखादा तरी कपडा होता. कुणी खांद्यावर प्रचंड गाठोडी घेऊन येत होते.

लालबाग चौकात होळीची तयारी झाली. पुरुष दोन पुरुष उंचीचा ढीग. त्यात रंगीबेरंगी, उंचीतलम, सुतीरेशमी असं कापड. त्या ढिगाभोवती गोलाकारात लोक बसले होते. उत्तरेच्या रस्त्यानं गांधीजी मोटारीतून उतरले. जमावानं उत्थापन दिलं आणि "गांधीजी की जय" या आरोळ्यांनी मुंबई दणाणली. याच वेळी युवराजांचा सत्कारसमारंभ सुरू होता. स्वागताची भाषणं चालली होती. परमळमधल्या जयजयकाराच्या लाटा त्या सभेवर जाऊन आदळल्या. तशी लॉर्ड रीडिंग अस्वस्थ झाला. इकडे गांधीजी बोलायला उठले. तिथं त्यांनी बार्डोलीचा सत्याग्रह जाहीर करून टाकला.

"माझ्या देशबांधवांनो, आपण लवकरच बार्डोलीला सविनय कायदेभंगाला सुरुवात करणार आहोत. सरकारी बंदुकांमधून सुटलेल्या क्रूर गोळ्यांना शान्तपणे तोंड द्यायची तयारी आपण ठेवली पाहिजे. गोळीचा बदला घेण्याचा नुसता विचार जरी कुणाच्या मनाला शिवला तरी तिथंच सत्याग्रहाचं सामर्थ्य संपलं असं समजा."

भाषण ऐन रंगात आलं असतानाच कुणीतरी घाबऱ्या घाबऱ्या बातमी आणून पोंचवली "फोर्टात, आणि मुंबईच्या इतर भागात दंगा उसळला."

गांधीजींनी सभा तशीच सोडली आणि अस्वस्थ घाईने ते महादेव भाईंना म्हणाले, "महादेव, फोर्टात चलायचं लवकर."

भरधाव वेगानं ती काळी गाडी फोर्टाकडं धावू लागली. बातमी खरी होती. ठिकठिकाणी गटागटाने जमलेले लोक बेभान झालेले दिसत होते. क्वचित कुठली गल्ली धूर ओकत होती. मधूनच जाळ डोकं वर काढीत होता. ग्रँटरोडला एक पोलीस चौकीही जाळलेली दिसत होती. तिथल्या रस्त्यावर वहाणा, अंडी, लोकांनी पळताना फेकलेल्या वस्तू यांचा खच पडला होता. एक बाहुली रक्ताच्या थारोळ्यात उघड्या तोंडानं हसत होती. चौकीशेजारी गांधीजींनी गाडी थांबवायला सांगितली आणि खाली उतरून अंवतीभवतीच्या त्या भयाण दृश्याकडे त्यांनी एकवार नजर टाकली. डोळे गच्च मिटून घेऊन गाडीच्या दाराला हात धरून ते उभे होते. खेदमय स्वरात त्यांनी महादेवभाईंना विचारलं, "इथं काय काय प्रकार घडलेत?"

जळत असलेल्या चौकी शेजारी एक पोलीस मारून मुटकून गस्त घालत असल्यासारखा दिसत होता. महादेवभाईंनी त्याला खुणावलं तेव्हा तो जवळ आला. त्याच्या डाव्या हाताची बोटं ठेचली गेली होती. डोक्याला खोक पडून त्यातून वाहिलेले रक्ताचे ओघळ मानेवरून खाली आले होते.

"कुणी मारलं तुला?" महादेवभाईंनी विचारलं.

"लोकांनी. दीडदोनशेचा जमाव आला होता." पोलीस म्हणाला.

"आणखी काय काय केलं?"

"चार मुडदे पडले पोलिसांचे. माझ्यासारखे कित्येक जखमी झाले. चौकी जाळली."

"महाराष्ट्रीय दिसतोस?"

"हूं" सुजलेली बोटं दुसऱ्या हातांनी चाचपत तो हुंकारला.

"तरीही लोकांनी मारलं?"

"लोक आजकाल आमची जात, आमचा देश काही ओळखत नाहीत. आम्ही इंग्रजांची चाकरी करतो एवढंच ओळखतात."

"लोकांचा रोख कुणावर होता?"

"एका पारशाचं घर पेटवत होते. हुकूमाप्रमाणं आम्ही वाचवायला गेलो अन् ही अवस्था होऊन बसली." तो पोलीस कळवळून सांगत होता.

सुन्न अवस्थेत गांधीजी आपल्या निवासात परत आले.

"बापूजी, आज सकाळपासून तुम्ही काही खाल्लं नाही. थोडा मोसंबीचा

रस घ्या.'' महादेवभाई म्हणाले.

''महादेव, देवदासाला आधी बोलावणं पाठव. मग मोसंबीचा रस.'' महादेवभाईंनी देवदासला बोलावणं पाठवलं. देवदास दंगलग्रस्त भागातल्या लोकांची विचारपूस करायला गेले होते. इस्पितळात त्यांना फोन करून कळवलं.''

गांधीजींनी कसाबसा अर्धा पेला मोसंबीचा रस घेतला. खोकल्याची उबळ आली आणि खोकताखोकता पोटात वेदना होऊ लागली.

''काय होतं बापूजी?''

''पोटात काही तरी बिघाड झाला पुन्हा.''

''डॉक्टरना बोलावू का?''

''नको. देवदास आला का?''

''तो पहा आलाच.'' महादेवभाई म्हणाले.

''देवदास, आत्ता रात्रीच्या गाडीनं बार्डोलीला जायचं.''

''का?''

''चळवळ स्थगित करा म्हणावं वल्लभभाईंना.''

''का बरं?''

''मुंबईला आत्ता ज्या घटना होताहेत त्या बऱ्या नाहीत.''

''पण बार्डोलीच्या लोकांचा उत्साह...''

''तोच रक्ताच्या नद्या निर्माण करील. तू ताबडतोब जा.''

देवदास बारडोलीला रवाना झाले.

आणि पोटावर हात दाबून गांधी चटईवर आडवे झाले.

गावांमागून गांव, स्टेशनामागून स्टेशन मागे टाकीत मद्रास एक्स्प्रेस धावत होती. तिसऱ्या वर्गाच्या डब्यात गांधीजी होते. कृष्णदास आणि आणखी काही स्ययंसेवक डब्यात होते. सामानाच्या वळकट्या बर्थवर गदगदत होत्या. गांधीजी मद्रासच्या दौऱ्यावर निघाले होते. स्टेशना-स्टेशनावर लोकांची अफाट गर्दी होत होती. धक्काबुक्की करून लोक गांधीजींना बघण्यासाठी अनावर होत होते.

डिंडीगल आलं. डिंडीगलला माणसांचा समुद्र तयार झाला होता. जो तो दुसऱ्याला मागं टाकून आपण पुढं कसे जाऊ याचा विचार करीत इतरांना तुडवीत होता. लोक बेभान झाल्यासारखे वाटत होते. त्या गर्दीसमोरून गांधीजींची गाडी जायची होती. कुणी आई आपल्या मुलाला घेऊन उत्सुकतेनं उभी होती,

कुणी मुलगा आपल्या वडिलांचं बोट धरून मान उंच करीत होता. कुणी वृद्ध हातातल्या काठीनं वाट काढून पुढं जात होता तर अनेक दांडगेश्वर शेतातून चालताना दोन्ही हातांनी पीक बाजूला करून पुढं जावं तसे चालत होते. त्यांच्या मस्तवाल पायाखाली पीक तुडवलं जातं याची त्यांना चिंता असते कुठं!

गांधीजींची गाडी येण्यापूर्वीच डिंडिगलच्या स्टेशनाबाहेर धक्काबुक्की झाली. दहावीस झुंडांचा एक जथा 'महात्मा गांधी की जय' म्हणत गर्दीमागून आला आणि बेगुमानपणं गर्दीला तोडून पुढं गेला. जाता जाता कितीक वृद्धांचे पाय चिरडले गेले. कोवळी पोरं घुसमटून खाली पडली. आयाबायांचे पदर फाटले; तरी यांच्या घोषणा सुरूच होत्या. 'महात्मा गांधी की जय''

गांधीजींची गाडी येऊन पोहोचली आणि त्यांनी सहज म्हणून बाहेर पाहिलं. यादवयुद्धातल्या भीषण गोंधळाचीच ही छोटी आवृत्ती होती. तिथं आलेल्यांचा तोल सुटला होता. ओरडण्यात ताल नव्हता. एखाद्या उरूसात नाचावीत तशी वेडीवाकडी नाचणारी माणसं! आणि घोषणा मात्र गगनाला जाऊन भिडणारी होती. महात्माजींची गाडी आली तरी ओरडणाऱ्यांना पत्ता नव्हता. गाडी निघून गेली तरी त्यांना फिकीर वाटत नव्हती. ज्याच्या नावानं ते चांगभलं करीत होते त्याच्याकडे कुणाचंच लक्ष नव्हतं. सारे त्या चांगभलंच्या धुंदीत होते.

डिंडीगलहून गाडी सुटली. गांधीजी हनुवटीला हात लावून आणि कोपर गुडघ्यावर टेकवून बसले होते. दोन-तीन स्टेशनं गेली. डब्यात नीरव शान्तता होती. गाडीचाच काय तो खडखडाट. कृष्णदासांनी हळूच विचारलं, "बापूजी, काही होतंय का आपल्याला?"

गांधीजींनी नुसतेच डोळे वर करून कृष्णदासांकडे पाहिलं आणि हाताने 'काही होत नाही' अशी खूण केली. बापूजी काहीच बोलेनात. तेव्हा डब्यातल्या इतरांनाही काही बोलता येईना. बऱ्याच वेळानं एकदम त्यांनी कृष्णदासाला हाक मारली-

"कृष्णदास."

"काय बापूजी?"

"लेखनसाहित्य दे. कागद आण."

"आत्ता लिहिणार आहात?"

"हो."

"काय लिहिणार?"

"माझ्या स्वत:विषयी लिहिणार. महिनाभर धोतर, सदरा आणि टोपी टाकून देऊन फक्त पंचा आणि जरूर तर उपरणे वापरणार आहे मी. आण लवकर लेखणी."

"बापूजी, हा विचार आताच अचानक कसा आला?"

"कृष्णदास, मघाचा तो गोंधळ, लोकांची ती बेहोषी, हे सारं पाहून मनाला बरं नाही वाटलं आणि इतक्या सगळ्या लोकांच्या समुदायात एकही खादीधारी दिसला नाही मला."

"बापूजी, खरं सांगू का, समाज हा असाच आहे. सगळी तत्त्वं, सारा उपदेश, साऱ्या नव्या कल्पना गिळंकृत करून पुन्हा तत्त्वाचा स्वाहाकार करायला तो सज्ज असतो. हजारो लोक तुमची खादीसंबंधी भाषणं ऐकताहेत, पण किती लोकांनी खादीचं व्रत घेतलं?"

"मग होळ्या करायला का जमतात?"

"होळीला जमतील. तो आवेश. पण एखादं व्रत घेण्याइतका विचार क्वचितच लोकांमध्ये असतो."

"कृष्णदास, हे मला माहीत नाही असं का तू समजतोस. लोकांचं काहीही असेल. पण माझा माझ्यावर विश्वास आहे ना. हे घे. हे पत्रक पाठवून दे सगळीकडं."

कृष्णदासांनी ते पत्रक घेतलं आणि त्यांच्या वितरणाची व्यवस्था केली. गावोगाव व्याख्यानं, सभा, चर्चा हे सुरूच होतं. दोनचार दिवसांनी मदुरेला मुक्काम पडला. मदुरेच्या मुथुस्वामींच्याकडे गांधीजी उतरले होते. घराला त्रास नको म्हणून गांधीजींनी आऊट हाऊसमध्येच तळ दिला होता. माणसांची सारखी वर्दळ सुरू होती. कुणी विचारायला, कुणी सल्ला घ्यायला आणि कुणी अनाहूत सल्ला द्यायलाही येत होते.

संध्याकाळी स्त्रियांचा एक घोळका आला. गांधीजी आणि कृष्णदास सतरंजीवर बसले होते. सकाळपासून सारखी माणसंच माणसं पाहून कृष्णदासांनाही कसंसंच वाटू लागलं होतं. जणू माणसांचंच अपचन झालं. आता बायका. गौरी, दुर्गावती, लीलव्वा आणि अनेक. गौरीबाईनं गांधीजींच्या गळ्यात एक सुताचा हार घातला. त्या सुताच्या स्पर्शानं गांधीजींची किंचित उदासवाणी वाटणारी मुद्रा खुलली, पण क्षणभरच. वादळवारा मध्येच थोडा वेळ शान्त व्हावा तशी.

गोड गळ्याची एक सुंदर लकेर कानावर आली. दुर्गावती गात होती. एरवी हा सूर देहभान हरपून टाकणारा वाटला असता. पण आज गोड स्वराला दाद देणारी मनःस्थिती नव्हती. दुर्गावती खरोखरीच भक्तिभावानं गात होती-

**गांधी-नामा सुविख्यातः**
**बुद्धः ख्रिस्त इवापरः।।**
**जगद्वंद्यो राष्ट्रवीरः।**
**स महात्मा विराजते।।**

या संस्कृत शब्दांनी आणि शब्दांना लपेटून येणाऱ्या स्वरांनी वातावरण भरून गेलं. कृष्णदास त्या गीताशी एकरूप झाले होते. गांधीजी ऐकत होते. पण आलेल्या स्त्रियांना वाईट वाटू नये म्हणून-

**नेता स्वातंत्र्ययुद्धस्य।**
**नवमार्गप्रदर्शकः।।**
**अन्यायप्रतिकारार्थम्।**
**शुचि-साधन-याजकः।।**

या स्तुतीनं गांधीजींना गुदमरल्यासारखं वाटायला लागलं. दुर्गावती थांबली तेव्हा त्यांना सुटका झाल्यासारखं वाटलं. दुर्गावतीला त्यांनी शाबासकी दिली. नेहमीप्रमाणे चार शब्दांचा खेळ केला आणि प्रसन्न होऊन त्या स्त्रिया आल्या तशा निघून गेल्या.

सायंप्रार्थना आटोपली. दिवसभराचा शीण येऊन कृष्णदास कोपऱ्यात डुलकी घेत होते. गांधीजींनी हळूच हाक मारून त्यांना जागं केलं. ती खोली आता वेगळीच भासत होती. दिवसभर वर्दळ असलेलं शंकराचं देऊळ रात्री एकाद्या गुहेसारखं वाटावं तशी ही खोली दिसत होती. गांधीजींना हेच हवं होतं. आता रात्री दहा वाजायला आले होते. गांधीजींनी कृष्णदासाला हळूच सांगितलं, "कृष्णदास, एकाद्या न्हाव्याला घेऊन ये."

"न्हाव्याला?" आत्ता? यावेळी?" कृष्णदासांनी चकित होऊन विचारलं.

"कृष्णदास आपल्याला ज्यावेळी वेळ होईल ती वेळ चांगलीच असते."

कृष्णदास बाहेर गेले. आणि परत येताना एका नापिताला बरोबर घेऊन आले. रात्रीचे अकरा वाजत आले होते. गांधीजी नापितासमोर बसले आणि त्यांनी त्याला सांगितलं, "सारी हजामत कर." नापिताचा हात थरथर कापू लागला. गांधीजींनी त्याला शान्तपणे सांगितले.

"मित्रा, स्थिरमनानं तुझं कार्य तू कर."

नापिताचं काम संपलं. त्यानं खरोखरीच गुळगुळीत हजामत केली होती. कृष्णदास काही कळेनासं होऊन एका स्टुलावर बसले होते. गांधीजींनी एक छापाचा रुपाया काढून नापिताला दिला. पण त्यानं अपराध्यासारखा चेहेरा करून तो घेतला नाही. गांधीजींच्या पायांवर डोकं ठेवून तो धन्य मनाने निघून गेला. मध्यरात्र होत आली होती. कृष्णदास अजूनही हाताची मूठ हनुवटीवर टेकून सुन्न मनानं बसले होते. गांधीजी त्यांना म्हणाले. "कृष्णदास, झोप बाबा आता. उगाच का डोळ्यांना जागवतोस."

एखाद्या लहान मुलासारख्या तक्रारी सुरात कृष्णदासांनी विचारलं,

"बापूजी, तुम्ही हे काय चालवलंय?"

"ते तुला आत्ताच नाही कळायचं, झोप जा. हा बघ, मीही झोपतो."

या बातमीनं कशीबशी सकाळपर्यंत वाट पाहिली. पण सकाळ व्हायच्या आत ती फुटली. गावभर झाली. वृत्तपत्रांचे बातमीदार रकानेच्या रकाने खरडू लागले. 'गांधीजी संन्यास घेणार.' राजगोपालाचार्यांना बातमी कळली. तेव्हा डॉ. राजनना घेऊन ते गांधीजीकडे निघाले.

गांधीजी बसले होते आणि आंवतीभोवती अनेक माणसं गंभीर चेहेऱ्यानं बसली होती. सर्वांत गांधीजींचाच चेहरा कमी गंभीर दिसत होता. डॉ. राजननी सखोल आवाजात विचारलं,

"बापूजी, तुम्ही संन्यास घेणार म्हणे?"

"कशावरून?" गांधीजींनी हसत हसत विचारलं. डॉ. राजन काहीच बोलले नाहीत. त्यांनी फक्त गांधीजींच्या डोक्याकडे बघितलं. त्यांच्या नजरेचा अर्थ ओळखून गांधीजी म्हणाले,

"याबद्दल म्हणता होय? मग तुम्ही एवढे गंभीर का?"

"गांधीजी, तुम्ही संन्यास घेणं ही आमच्या दृष्टीनं गंभीर गोष्ट आहे." राजाजी म्हणाले,

तर्जनी डाव्या तळहातावर फिरवीत गांधीजी म्हणाले,

"मी संन्याशी होणार नाही. मद्रासमधल्या अनेक लोकांचा माझ्यासारखा वेष आहे. मग तुम्हाला आश्चर्य का वाटावं?"

"मग आपण मुद्दाम असा वेष का घेतलात?"

"राजाजी, माझ्या अंत:करणातल्या दु:खाला मी ही एक प्रकारे वाट करून दिली आहे."

"आपल्याला कसलं दु:ख झालं बापूजी?"

"मद्रासमध्ये मला खादीचं दर्शनही झालं नाही. नुसती गर्दी, नुसता गोंधळ, हे पाहून मी व्यथित झालो. माझा हा पोशाख मला झालेल्या दुःखाचं प्रतिबिंब आहे."

राजाजी आणि डॉ. राजन निघून गेले.

गांधीजी रात्रभर जागेच होते. त्या गर्दीचे आवाज, त्या गोंधळाची विदारक चित्रं त्यांच्या डोळ्यांसमोरून सरकत होती. रात्री तीन वाजताच ते उठून बसले. पहाटेला कराई-कुडीला कूच केलं. कराई-कुडी आलं तेव्हा चांगलं फटफटलं होतं. स्थानकाच्या बाहेर चार गाड्या उभ्या होत्या. शेकडो लोक कुठल्यातरी गंभीर घटनेची चाहूल असल्यासारखे चुपचाप उभे होते. गांधीजींना वाटलं, "या लोकांनी असं उभं राहता कामा नये." म्हणून ते धावल्यासारखे चालत पुढं गेले. सगळ्यांच्या समोर उभे राहून कंबरेवर हात ठेवून ते म्हणाले, "मित्रांनो, संन्याशी मी आहे; तुम्ही नव्हेत. मग तुमचे चेहरे संन्याशासारखे का?"

गांधीजींच्या या उद्गारांनी तिथलं वातावरण बदललं. मोठ्या महालाच्या अनेक खिडक्यांची दारं एकापाठोपाठ उघडली जावीत तसे एकेकजण हसू लागला आणि इतका वेळ असलेल्या व्यर्थ नीरव शान्ततेचा फुगा फुटून तिथं दिलखुलास बातचीत सुरू झाली.

सरकारदरबारी विद्वेषाच्या चुलीवर ठेवलेल्या मडक्यात कोणता हुकूम शिजू घातलाय याची कुणालाच कल्पना नव्हती. गांधीजी साबरमतीला येऊन पोहोचले. साबरमतीच्या आश्रमात पाऊल ठेवताच त्यांचं मन टवटवीत झालं. यंग इंडियासाठी नवे लेख लिहायचे होते. अनेक लोकांची भेटीगाठीसाठी पत्रं येऊन पडली होती. त्यांना तारखा द्यायच्या होत्या. महादेवभाई, मगनभाई यांच्याशी चर्चा करायची होती. हरिजनांच्या एका वस्तीवर गुजराथेत उच्चवर्णीयांनी हल्ला केला होता. त्यात पोळलेल्या हरिजनांचं कळवळून पत्र आलं होतं. त्यांच्याकडे कार्यकर्ते पाठवायचे होते. एक का दोन! अनेक कामं गांधीजींची वाट पहात खोळंबून उभी होती. या कामांचा उरक पाडता पाडता दिवस कसे गेले ते कळलं सुद्धा नाही.

तिसऱ्या दिवशी दोनप्रहरी गांधीजी एका पत्र्याच्या डब्यात पेळू लावत असतानाच कस्तुरबा आल्या. गांधीजी प्रसन्न हसून म्हणाले,

"काय वार्ता सांगणार आहात?"

"आज नवीन काही नाही सांगायला. पण नवीन दाखवणार आहे."

"काय?"
"आश्रमाचं स्वयंपाकघर. आपण आल्यापासून स्वयंपाकघराकडे आला नाहीत."
"तुमच्या प्रदेशात पाऊल ठेवण्याची कुणाची छाती आहे?"
"काहीतरीच. आपण चलावं."
गांधीजींनी हातातलं काम तडक दूर ठेवून दिलं. आणि ते कस्तुरबांच्या पाठोपाठ निघाले. आश्रमाची स्वयंपाकशाळा खरोखरीच कोरी करकरीत दिसत होती. आतमध्ये दोन मोठ्या मांडण्या होत्या त्यावर डबे हारीनं बसवले होते. स्वयंपाकासाठी प्रशस्त फूटभर रुंदीचा कट्टा घातला होता. तो नुकताच स्वच्छ सारवलेला दिसत होता. लाकूड-सरपण ठेवण्यासाठी बाजूला मुद्दाम जागा केली होती आणि डब्यांच्या मांडणीशेजारीच भांड्यांची मांडणी होती. त्यावर स्वच्छ भांडी ओळीनं लकाकत होती. आश्रमाच्या स्वयंपाकघराचा झालेला हा कायापालट पाहून गांधीजी मनोमन खूष झाले. पण त्याचबरोबर हे झालं कसं, पैसे किती खर्च झाले असे विचार मनात तरळून गेले. त्यांच्या कपाळावर आठीची एक बारीक रेषा उमटून गेली. त्यांनी कस्तुरबांना विचारलं,
"हे सगळं छान आहे. पण हे केलं कुणी?"
"आम्ही बायकांनी."
"पैसे किती खर्च झाले?"
"खूप, पण म्हटलं केव्हातरी हे करायला हवं."
"इतके पैसे खर्च करण्याची आता आवश्यकता होती?"
"मला वाटलंच, आपण विचारणार असं म्हणून," हसत हसत कस्तुरबा म्हणाल्या. "आम्ही पैसे खर्च केले नाहीत. या सगळ्याला एक दमडीही खर्च आला नाही."
"मग कोणी दान दिलं?"
"दानच. पण श्रमदान. आश्रमातल्या बायकांनी या सगळ्या मांडण्या तयार केल्या. बिरजू सुताराला बोलावून त्याच्याकडून माहिती घेतली. आणि गवंडी काम सगळं पुरुषमंडळींनी केलंय." गांधीजींचा चेहेरा बदलला. प्रसन्न हसून ते म्हणाले,
"मग आधी का सांगितलं नाहीत?"
"तुमची परीक्षा पाहिली."
"आपण दोघेही एकमेकांचे परीक्षक झालो."

"आणि दोघेही परीक्षेला उतरलो."

"थोडीशी खीर घेणार?"

"नको. खिरीची आठवण आहे ना?"

"चांगलीच आहे. पण अशा गोष्टी नेहमीनेहमी थोड्याच होतात."

"अपवादानंच होणारी घटनाच अशी काही मानगुटीला बसते की जन्माची याद रहावी."

महादेवभाई आले. गांधीजी म्हणाले,

"महादेवाला द्या खीर. त्याला आवडते."

महादेवभाईंनी खिरीची वाटी तोंडाला लावत विचारलं,

"बा, तुम्ही काहीच नाही घेणार?"

"नको. मी जराशानं घेईन."

"काय घेणार?"

"कॉफी." असं म्हणून बांनी गांधीजींकडे पाहिलं. पण त्यांच्या चेहेऱ्यावर कुठलाच भाव नव्हता. गांधीजी हसत म्हणाले,

"माझ्याकडे कशाला पाहाता? तुम्हाला कॉफी घ्यायला मी कधी आडकाठी केलीय?"

गांधीजींनी स्वत: पातेल्यातली कॉफी कपात ओतली आणि तो कप बांच्यापुढं ठेवीत ते म्हणाले, "घ्या, सुखाने घ्या."

महादेवभाईंच्याबरोबर गांधीजी बाहेर निघून गेले. त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बा कितीतरी वेळ बघत उभ्या राहिल्या. कॉफीच्या कपातल्या वाफा हवेत मिसळून जाऊन कॉफी गारढोण होऊन गेली.

संध्याकाळी प्रार्थनेसाठी सगळा आश्रम अंगणात जमला होता. पहिल्या रांगेत ओळीनं सगळी मुलं बसली होती. डाव्या हाताला बायका. सगळ्यांच्या समोर गांधीजी आणि विनोबा बसले होते. प्रार्थना संपत आली होती. एवढ्यात एक जीप गाडी आश्रमाच्या प्रवेशद्वाराशी येऊन गचकन् थांबली. आणि त्यातून खाकी वेषातली तीन-चार माणसं पटापट खाली उतरली. त्यातला एक ताडासारखा उंच होता, पण तब्बेतीनं तितकाच धिप्पाड. तो पोलीस सुपरिंटेंडेंट होता. त्याच्या हातात हुकुमाच्या कागदाची गुंडाळी होती आणि दुसऱ्या हातात पोलीस छडी होती.

इंग्रज अधिकारी असूनही त्यानं गांधीजींना पाहताच खाड्कन सलाम

ठोकला आणि काही न बोलताच कागदाची गुंडाळी उलगडून त्यानं पुढं केली. गांधीजींनी कागद वाचला आणि परत त्याच्या हाती देत ते म्हणाले, "ठीक आहे. मी तयार आहे."

गांधीजींना अटक करायला पोलीस आलेत ही बातमी हा हा म्हणता साबरमतीच्या परिसरात पसरली. ज्यांना ज्यांना समजलं ते ते आश्रमात आले आणि रात्र असूनही वर्दळ वाढली. आश्रमातल्या मुलांनी गांधीजींभोवती कोंडाळं केलं होतं. त्यांचे इवलेसे चेहेरे कष्टी झाले होते. लक्ष्मीनं गांधीजींच्या हाताला धरून त्यांना रडवेल्या सुरात विचारलं,

"बापूजी, तुमी जानाल?"

"होय बेटा, मी जाणार, पण रडायचं नाही हं." असं म्हणून गांधीजींनी तिला उचलून घेतलं आणि तिच्या पाठीवर थोपटत ते सर्व मुलांना म्हणाले, "कुणी रडायचं नाही. हसायचं साऱ्यांनी. शहाणी मुलं रडतात का कधी?" मुलांचे रडवेले चेहेरे हसरे दिसू लागले. मग साऱ्यांना खाली बसवून गांधीजी म्हणाले,

"नरसी मेहतांचे भजन म्हणा बघू."

मुलांनी एक सुरात भजन म्हणायला सुरुवात केली-

**"वैष्णवजन तो तेने कहिये**
**जो पीड पराअी जाने रे।**
**परदु:खे उपकार करे तौये**
**मन अभिमान न आणे रे..."**

वातावरण भक्तिमय होऊन गेलं होतं. पोलीस अधिकारीही गीताच्या तालावर बुटाचा चवडा वरखाली करीत होता. गीत संपलं तेव्हा सर्वत्र नि:स्तब्धता होती. आभाळातल्या चांदण्याची लुकलुक एवढीच काय ती हालचाल.

गांधीजी निघाले. सर्वांचे हात जोडलेले होते. बोलत नव्हतं कुणीच. इतक्याच कस्तुरबांनी साध्या कापडाची एक लांब पिशवी पुढं केली. गांधीजींनी ती हातात घेत पोलीस सुपरिटेंडेंला विचारलं,

"ही चालेल ना हो बरोबर घेतली तर?"

"त्या पिशवीत काय आहे?" अशी डोळ्यानंच पृच्छा केली त्या अधिकाऱ्यानं. गांधीजी म्हणाले,

"काही नाही. टकळी, पेळू आणि एक गीतेचं पुस्तक आहे."

आश्रमावर एकवार प्रेमभरानं दृष्टी टाकून गांधीजी त्या मोटारीत बसले.

मोटार सुरू झाली तेव्हा पोरांनी आपल्या आयांच्या पदरात तोंडं लपवली. त्यांच्या आसवांनी पदर भिजले. साबरमती तुरुंगात मोटार पोचली तेव्हा मध्यरात्र होत होती. शंकरलाल बँकरना तिथं आधीच आणून ठेवलं होतं.

अहमदाबाद कोर्टाचं आवार गच्च भरून गेलं होतं. प्रत्यक्ष खटला ज्या दालनात चालायचा होता तिथं मुंगीला रीघ नव्हती. तेली-तांबोळी, साळी-माळी, प्रतिष्ठित-गरीब, व्यापारी-उदीम असे सगळ्या थरातले लोक हा खटला ऐकायला आले होते.

गांधीजींवर राजद्रोहाचा आरोप सरकारनं ठेवला होता. यंग इंडियातल्या दोन लेखानी राजद्रोह झाला होता असं सरकारचं मत होतं.

आरोपीला कोर्टात आणण्यात आलं. आरोपी शान्तपणे पिंजऱ्यात येऊन उभा राहिला. तेव्हा सरकारी अधिकाऱ्यांसकट सर्वांनी त्याला उत्थापन दिलं. मग आले न्या. ब्रूमफील्ड.

सरकारी वकील उभे राहिले. त्यांनी गांधीजींना विचारलं,

"आपला धंदा?"

"शेतकरी आणि विणकर."

न्यायमूर्तींनी आपला चष्मा कपाळावर नेऊन तिरक्या नजरेनं पाहिलं.

"आपल्याला गुन्हा कबूल आहे?"

"होय."

कोर्टात पुन्हा एकदा लहानशी खळबळ.

"शिक्षा सांगण्यापूर्वी आपल्याला काही बोलायचंय?"

"होय" असं म्हणून गांधीजींनी आपल्या खोचक भाषणात इंग्रज सरकारच्या अनीतीचे वाभाडे काढले आणि दारिद्र्यात पिचत पडलेल्या भरतभूमीचं विदारक दृश्य उघडं केलं. न्यामूर्तीसकट सगळी सभा स्थिरचित्तानं ते सुंदर भाषण ऐकत होती. गांधीजींचं भाषण संपलं तेव्हा दीडतास होऊन गेला होता. न्यायमूर्तींनी एक दीर्घ उसासा सोडला आणि न्यायाचं शब्दांकन करण्यासाठी त्यांनी लेखणी उचलली.

न्यायमूर्ती निकालपत्र वाचू लागले-

"काही वर्षांपूर्वी याच आरोपावरून बाळ गंगाधर टिळक यांच्यावर खटला झाला होता. त्यांना सहा वर्षं कैद झाली होती. तुम्हालाही सहा वर्षांची साध्या कैदेची शिक्षा मी देत आहे. मात्र ही मुदत संपण्यापूर्वीच सरकारने आपणाला

बंधमुक्त केले तर माझ्याइतका आनंद कोणालाच होणार नाही.''

निकालपत्र वाचताना न्यायमूर्तींचा आवाज सद्‌गदित होता. त्यांचा हात थरथरत होता. वाचन संपलं तेव्हा त्यांच्या कपाळावर धर्मबिंदू जमा झाले होते.

''महात्मा गांधी की जय''

प्रचंड जयकारानं कोर्टाचं आवार दणाणून गेलं. आणि गांधीजी व शंकरलाल बँकर यांना येरवड्याला हलविण्यात आलं.

येरवड्याच्या तुरुंगातल्या उंच दगडी भिंतीतला तो दरवाजा एखाद्या गुहेच्या तोंडासारखा वाटत होता. तोंडाशी दोन पहारेकरी गस्त घालीत होते. गोरा सार्जंट विल्सन आपल्या खोलीत बसून पिवळ्या कागदावर काही मजकूर खरडत होता. साहेबाची आता घरी जाण्याची वेळ झाली होती. रामलाल आणि शामू दोघेही त्या क्षणाची वाट पहात होते. खांद्यावर बंदुका घेऊन गस्त घालण्याचं नाटक अजून अर्धा तास तरी त्यांना करायचं होतं. मग ते आत जाणार होते. सगळे कैदी. सगळे पोलीस आत जाऊन गांधीजींचे दर्शन घेऊन आले होते. पण रामलाल आणि शामू दारावरच असल्यानं त्यांना हालता येत नव्हतं आणि विल्सनसाहेबाची खोली प्रवेशद्वाराशीच असल्यानं त्यांना काही करता येत नव्हतं.

''शामू, बस्स झाली आता गस्त.''

''अन् साहेबानं पाहिलं म्हणजे?''

''तो आत्ता जाईल चिरूट फुंकत. मग आपण आत जाऊ.''

''कायरे, गांधीजींची वकीली सनद काढून घेतली म्हणं?''

''मग त्यांना कुठं आता वकीली करायची आहे?''

''तू गांधीजींना आधी कधी पाहिलंस?''

''कालच. त्यांना आणलं तेव्हा मीच होतो साहेबाच्या दिमतीला. मोठ्या साहेबानं झाडा घेतला. मलाच घ्यायला लावला.''

''बडा भाग्यवान है तू.''

''कसा रे?''

''मी तर त्यांना पाहिलंही नाही अजून.''

''मोठ्या सायबानं लअी वंगाळ काम केलं.''

''काय केलं?''

''काल गांधीजींना मोटारीतनं उतरवलं, अन् हा आला की पुढं.''

"कशाला?"
"झाडा घ्यायला."
"तू होतास ना तिथं?"
"होतो ना. पण म्हणाला मी सोता घेणार झाडा. तुमी हिंदी पुलीस लई बदमाष असते म्हणाला."
"असं म्हणाला साहेब? अन् मग तू ऐकून घेतलंस?"
"काय करतो? पोराबाळांचे चेहेरे दिसले समोर. विसरलो."
"मग सायबानं झाडा घेतला?"
"घेतला मंजे? घेतलाच. खरं तर गांधीजींच्या अंगावर पंचाच होता निसता. तरी हा बघतोय चाचपून. असा राग आला म्हणतोस..." शामू दात-ओठ खात म्हणाला.
"मी असतो तर गळाच धरला असता."
"मलाबी तसंच वाटलं."
"मग का न्हाई धरलास?"
"विचार केला. म्हटलं गांधीबाबाचं नाव घ्याचं. कुनाचा गळा धरायचा. सोभा देत न्हाओी."
"हे एक बरं केलंस तू."
इतक्यात चिरुटाचा कडक वास शामूच्या नाकाला झोंबला आणि काही कळायच्या आतच विल्सन साहेबाची पावलं दिसायला लागली. साहेबाचे डोळे तारवटलेले होते. नाक फेंदारून तो करड्या आवाजात म्हणाला, "क्यूं बे, गांधीजी के बारे में क्या बाते करते थे?"
"कुछ नही साब. हम तो ड्यूटीपर हैं।" शामू दीन आवाजात म्हणाला, विल्सन साहेबानं शामूची मानगूट पकडली आणि तो जास्तच रोखून बघू लागला. पण असं करता करता त्याच्या ओठांच्या कुंपणातून त्या चिरूटानं उडी मारली; ती थेट खाली त्याच्या पायावर. कपड्यांवर एक काळा फराटा उठवत तो चिरूट पडला. मग साहेब जास्तच चिडला. चिरकत चिरकत तो म्हणाला,
"याद रखना. गांधीके बारेमें कुछ बोलना नही. नही तो नोकरीपरसे निकाल दूंगा..."
शामूच्या मानेला एक झटका देऊन साहेब निघून गेला.
शामूनं मान झटकली. साहेबाची आकृती दूर दूर गेलेली बघताच दोघांनीही

बंदुकांचं ओझं खांद्यावरून खाली ठेवलं आणि मेंढपाळाच्या ताब्यातून सुटका झालेलं कोकरू पळतं तसे ते आत पळाले. पहाऱ्याच्या खोलीच्या कोपऱ्यात बंदुका ठेवून ते पळाले.

आत कैद्यांची रांग लागली होती. जेवण वेळ तर केव्हाच होऊन गेली होती. शिवाय त्यांच्या हातात थाळ्या कटोरे दिसत नव्हते. मग ही रांग कशाला? असा विचार करीत रामलाल आणि शामू पुढं गेले.

गांधीजींना ज्या कोठडीत ठेवलं होतं तिथपासून ही रांग सुरू झाली होती. ती मुख्य दरवाज्यापर्यंत आली होती. मोठे साहेब आत्ता नव्हते. विल्सन साहेब केव्हाच निघून गेला होता. राहिलेले अधिकारी तर गांधीजींना बघायला केव्हाचे उत्सुक होते. अधिकाऱ्यांच्या मागून शिपाई, शिपायांच्या मागून कैदी असा तो दर्शन-सोहळा दिसू लागला.

शंकरलाल बँकर यांना दुसऱ्याच एका दूरच्या कोठडीत ठेवण्यात आलं होतं. तुरुंगातलं जीवन तुरुंगातल्याप्रमाणेच चैतन्यहीन होतं. पण गांधीजींना त्याचा मुळीच उपद्रव होत नव्हता. जणू काही आपण साबरमती आश्रमातच आहोत इतक्या सहजतेनं ते तुरुंगात रहात होते.

आठपंधरादिवसांनी जेलर स्वत: मुलाखत घेऊन जाई. तसा एकदा आला आणि बंद दाराबाहेरच उभा राहून हातातली छडी फिरवत छद्मीपणानं म्हणाला,

"काय मि. गांधी, केव्हा सुटणार?"

गांधीजी टकळी थांबवून शान्तपणे म्हणाले,

"इथून सुटका होईल तेव्हा."

"तुम्हाला इथून जावेसं वाटत नाही?"

"नाही वाटत."

"आश्चर्य आहे."

"आश्चर्य कसलं? तुमच्यासारख्या प्रेमळ माणसांचा सहवास लाभतोना इथं."

गांधीजी सहज म्हणून बोलून गेलेले शब्द त्याच्या जिव्हारी लागले. हाताची मूठ वळवीत तो म्हणाला,

"ठीक आहे. मला असाच सहवास लाभू दे."

जाताना पाय आपटत चालल्यासारखा जात होता. त्याची आकृती पुसट पुसट होत होती आणि शंकरलाल बँकर हातात वृत्तपत्रांचा गठ्ठा घेऊन येत

होते. गुजराती, इंग्रजी वृत्तपत्रांची आणि नियतकालिकांची चळत त्यांच्या हातात होती.

तुरुंगात असले तरी गांधीजींना वृत्तपत्र वाचायला बंदी नव्हती. शंकरलालनी सांगितलं,

"बापूजी, आजची वृत्तपत्रं बघा."

"काय विशेष?"

"खूपच विशेष. म्हटलं तर विशेष. म्हटलं तर नाही."

"तुम्हीच वाचून दाखवा."

"कशाला उगाच वाचून दाखवू? तुम्हाला दुःख होईल."

"शंकर, दुःख होईल म्हणून दुःखाच्या घटनाच टाळतो का आपण? वाच."

"शंकरलाल वाचत होते. गांधीजी ऐकत होते. शब्दाशब्दागणिक हृदयातील वेदना डोळ्यात उतरत होती. हिंदु-मुसलमानांचे दंगे पुन्हा भडकले होते. गांधींचा असहकार लोकांनी गांधीबरोबर तुरुंगात धाडून दिला होता आणि ते सहकार्यानं दंगे करीत होते. शेवटी शंकरलालनी वृत्तपत्रं पुन्हा काखोटीस घातली आणि ते म्हणाले,

"बापूजी, आज एवंढच पुरे. देवदास आणि राजगोपालाचारी आज भेटायला यायचेत तुम्हाला."

शंकरलाल आपल्या कोठडीत निघून गेले. सिद्दी आला. त्यानं गांधीजींचे तस्त स्वच्छ धुऊन आणलं होतं. कोठडीतली एकमेव सतरंजी झटकून आणली. तुरुंगाधिकाऱ्यांनी हा आफ्रिकन कैदी गांधीजींच्या दिमतीला दिला होता. तो भक्तिभावानं सारं करीत असे. वॉर्डरनं माणसं भेटायला आल्याची वर्दी दिली. गांधीजींनी चपला पायात सरकवीत म्हटलं,

"मी येतोच. तू बसून रहा इथं. पाहिजे तर फुलझाडांना पाणी घाल. मग आजचा पाठ घेऊ."

वॉर्डरच्या मागून चालत चालत गांधीजी भेटगृहात गेले. तिथं देवदास आणि राजगोपालाचारी आधीच येऊन बसले होते. जेलरसाहेबाच्या तोंडात धुनी पेटली होती. टेबलावर पाय टाकून तो अस्ताव्यस्तपणे चिरूट फुंकत होता.

गांधीजींचा चेहेरा ओढल्यासारखा दिसत होता. म्हणून देवदासनं विचारलं, "बापूजी, तुम्हाला काही होतंय का?"

"तसं काही विशेष नाही. पोटात दुखतं अलीकडे थोडं." गांधीजींनी सांगितलं.

तोंडातून धुराची वेटोळी सोडीत साहेब छद्मीपणाने म्हणाला,

"आमच्या इथलं अन्न फार चवदार असतं. हूं म्हणून खातात. अन् मग पोटात दुखतं. तुमच्या वडिलांना सांगा म्हणावं जरा बेतानंच खात चला."

पायरी सोडून बोललेल्या या लागट शब्दांनी देवदासचे डोळे तांबडेलाल झाले आणि काहीतरी बोलण्यासाठी त्यानं तोंड उघडलं तोच गांधीजींनी हातांनी त्याला गप्प बसण्याची खूण केली. असा हा अर्धा तास गेला. राजगोपालाचारींना खूप बोलायचं होतं. पण बोलता आलं नाही. वेळ संपल्याची सूचना आली. आणि ते दोघे निघून गेले.

विल्सनसाहेबानं सिद्दीला कुठल्यातरी कामावर पाठवल्यामुळं आज पाठ राहून गेला. आज पोट दुखत असल्यामुळं विशेष काही खायचं नव्हतंच. म्हणून गांधीजी सतंरजीवर आडवे झाले आणि कसा डोळा लागला ते त्यांनाच कळलं नाही. जागे झाले तेव्हा उन्हं कलली होती. समोरच्या झाडावर सावलीसाठी लपलेले पक्षी फडफड करीत बाहेर येत होते. आकाश स्वच्छ होतं. ये जा करणाऱ्या कैद्यांच्या सावल्या लांबलांब होत होत्या.

थोड्या वेळानं सिद्दी आला. तो थकलाभागला दिसत होता. आज त्याला विल्सनसाहेबानं बागेतलं वीस वाफे खणायला लावले होते. त्याचा चेहेरा आक्रसून गेला होता. आता तर उन्हं मावळून गेली होती. गांधीजींच्या खोलीतली भांडी घासायला तो घेऊन गेला. गांधीजींनी त्याच्या थकल्या देहाकडे पाहिलं तेव्हा ते म्हणाले,

"आज भांडी राहू देत. मीच घासेन."

पण तो ऐकेना. गांधीजी स्वत: भांडी घासणार ही कल्पनाच त्याला सहन होईना. समोर रोपांची आळी लावली होती. त्यातल्याच एका आळ्याशी बसून त्याला भांडी घासायची होती.

गांधीजी पत्रं वाचत होते. एकदम त्यांच्या कानावर एक बारीक किंकाळी सारखा आवाज आला. हातातलं पत्र ठेवून ते झटकन् पुढं गेले. अंधारात सिद्दी थरथरत उभा होता. त्याचे हात मातीनं भरले होते. एका हातानं दुसरा हात त्यानं दाबून धरला होता. आणि कसलीतरी वेदना सहन न झाल्यानं तो विव्हळ झाला होता. गांधीजींनी विचारलं, "काय झालं?"

"विंचू चावला" त्यानं विव्हळत सांगितलं. गांधीजी कोठडीत गेले. चाकू

आणून त्यांनी त्याच्या बोटाचा एक टवका काढला आणि येणारं रक्त भरारा चोखलं. दोन-चार चुळा थुकल्यावर त्याचं विव्हळणं कमी झालं. पण त्याचं शरीर आता लटपटायला लागलं. आजूबाजूला कुणीच नव्हतं. सगळ्या कोठड्या बंद होत्या. गांधीजींनी त्याला व्हरांड्यात झोपवलं. त्याच्या अंगावर आपली शाल घातली. त्याला विलक्षण ग्लानी आली होती. त्याच्याकडे एकवार नजर टाकून गांधीजी कोठडीत गेले. तेव्हा अंधार दाट झाला होता. फक्त झाडाच्या पानांची सळसळ तेवढी ऐकू येत होती.

ससून हॉस्पिटलच्या आवारात रोग्यांची, त्यांना भेटायला येणाऱ्या माणसांची वर्दळ सुरू होती. मोठमोठ्या दालनांतून शुभ्र अंगरखे घातलेले डॉक्टर आणि परिचर ये-जा करीत होते. पण सगळीकडे चिडीचूप शान्तता होती. ससूनच्या दगडी इमारतीच्या मुख्य भागावर असलेला तो उंच मनोरा दिमाखाने उभा होता. त्याच्या टोकावर बसलेला एक कावळा फडफड करीत होता. हातीपायी धड असलेले रोगी बिछान्यावर पडून पडून कंटाळल्यानं बाहेर येऊन पाय मोकळे करीत होते. एवढ्यात येरवड्याच्या तुरुंगाची मोटार सर्रकन आली आणि पोर्चमधे थांबली.

डॉ. गोखल्यांनी मोटारीचं दार उघडलं आणि गांधीजींच्या कमरेला आपल्या उजव्या हाताचा आधार देऊन ते पायऱ्या चढू लागले. गांधीजींनी गोखल्यांचा हात दूर केला आणि म्हणाले,

"अजून माझी इतकी अवस्था झाली नाही डॉक्टर. मी चालू शकतो." जिन्याच्या पाचदहा पायऱ्या सहजपणे चढून गेल्यावर मात्र गांधीजींचे पाय थरथरू लागले. पोटात मधूनच एखादी कळ सणक मारत होती. गांधीजींना खास खोलीतल्या पलंगावर बसविण्यात आलं आणि डॉ. गोखले निघून गेले. खोलीच्या दाराशी एक पोलीस ताटकळत होता. पोर्चमध्ये फौजदार हातातली छडी फिरवत वेळ काढण्याचा प्रयत्न करीत होता. मधेच एकदा बाहेर येऊन टॉवरवरच्या कावळ्यावर उगाचच छडी उगारत होता. गांधीजींनी पोलिसाला हाक मारली. विडीचा धूर घशात गिळत त्यानं चपापून पायाखाली बिडी चिरडली आणि आत जाऊन त्यानं गांधीजींना खाडकन् सलाम ठोकला.

"बाबू, तुझ्या साहेबाला जाऊन सांग म्हणावं तुम्ही आराम करायला हरकत नाही. कुठं जाऊन यायचं असलं तरी या. आणि हे बघ, तुलाही आडवं व्हायचं असलं तर बाहेरच्या बाकावर आडवा हो."

"जी साब, पण..." अडखळत बाबू म्हणाला.

"अरे, मी कुठं पळून का जाणार आहे? जा. तुझ्या साहेबाला म्हणावं, तुम्ही सांगितलंत तरी मी आता पळून जाणे शक्य नाही. बाबूच्या चेहेऱ्यावर समाधान दिसू लागलं, त्यालाही उगाचच उभ्यानं सप्ता करायचा कंटाळा आलेला होता. पडत्या फळाची आज्ञा घेऊन तो दाराकडे वळला.

"आणि हे बघ..." गांधीजींनी हाक मारली, "तुझ्या घरी कोण कोण आहे?"

"म्हातारी, म्हातारा, बाओील आणि..."

"मुलं किती?"

"दोन मुली आणि तीन मुलगे."

"पगार किती मिळतो?"

"पोटापुरता."

"जास्त मिळत असला पाहिजे."

"बाबूनं चमकून पाहिलं."

"नाही देवा, हाच पगार पुरत नाही."

"होय ना? मग विड्या कशाला ओढतोस?"

"करमणूक; मनाला विसावा म्हणून."

"तुझी बायको तुझ्या इतकेच कष्ट करत असेल. तिच्या मनाला कोणता विसावा?"

बाबू काहीच बोलला नाही. खाली मान घालून आपल्या कातडी पट्ट्याशी चाळा करत तो उभा होता.

"बाबू, विड्या ओढणं सोडून दे."

"जी."

"केव्हापासून?"

"आजपासून. आत्तापासून सोडली विडी देवा. हे बघा." असं म्हणून बाबूनं आपल्या खिशातलं विड्यांचं बंडल समोरच्या झाडोऱ्यात दूर भिरकावून दिलं आणि काड्याची पेटी फेकणार तोच गांधीजी म्हणाले,

"ती नको फेकू. आण इकडे. या दवाखान्याला उपयोग होईल." असं म्हणून गांधीजींनी ती पेटी शेजारच्या छोट्या कपाटात ठेवून दिली.

बाबू निघून गेला आणि शुभ्र वेषातली एक गौरकाय परिचारिका आली. तिच्या हातात टपोऱ्या फुलांचा एक घोसदार गुच्छ होता. काचेच्या साध्या

फुलदाणीत तिनं तो गुच्छ खोवला आणि छोट्या कपाटावर ती फुलदाणी ठेवून दिली. ती हसरी असली तरी अबोल वाटत होती. दहा मिनिटं ती त्या खोलीत होती. गादीवरील चादर साफ करून तिनं नोकराला पलंगाची दिशा बदलायला सांगितली. थर्मामीटर काढून गांधीजींच्या हाती देत ती म्हणाली, "ताप घ्यायचाय." गांधीजी हसून म्हणाले, "घ्या ताप घ्या. आता ताप नसूनही आमचा तापच होणार आहे तुम्हा लोकांना."

ती खुदकन हसली आणि थर्मामीटरची कांडी नळकांड्यात खुपसून त्याला तिनं झाकण लावलं. एकदम वाकून तिनं गांधीजींच्या पायाला स्पर्श केला. गांधीजी पाऊलभर मागं सरकले आणि म्हणाले,

"हे काय?"

"असू दे. आपली सेवा आता आम्हाला करण्याला मिळणार. माझा हेवा करतात सगळे लोक."

"कशाबद्दल?" गांधीजींनी उत्सुकतेनं विचारलं.

"आपली सेवा करण्याची संधी मला मिळाल्याबद्दल."

"तुमचं नाव काय?"

"नाव सांगते, पण एक अट आहे."

"सांगा."

"आपण मला अहो-जाहो नाही म्हणायचं."

"बरं बरं. तुझं नाव काय?"

"फ्लाविया."

"छान. किती दिवस आहेस इथं?"

"नुकतंच माझं शिक्षण पूर्ण झालं. आपणच माझे पहिले रुग्ण."

"वा वा. फ्लाविया, आता लोक माझाही हेवा करू लागतील."

"का बाई?"

"तुझा पहिला रुग्ण होण्याचा मान मला मिळाल्याबद्दल."

"छे छे..." असं काहीतरी पुटपुटत विलक्षण भारावून फ्लाविया निघून गेली. क्षणभर त्या खोलीत नीरव शान्तता पसरली. गांधीजी तक्क्याला टेकून आडवे झाले. कपाटावरचा तो गुच्छ सुंदर दिसत होता. त्यातल्या इतर फुलांच्यामधून मधलं एक सुंदर फूल पाळण्यातून मूल डोकवावं तसं डोकावत होतं. खोलीचं दार अर्धवट उघडं होतं, गांधीजी ससून इस्पितळात आल्याची बातमी या वेळेपावेतो पसरली होती. रुग्ण आपल्या खाटा सोडून गांधीजींच्या खोलीवरून

उगाचच चकरा मारीत होते. काहीजण टोळकी करून आपापल्या वॉर्डात चर्चा करीत होते. गांधीजींनी फौजदाराला वर बोलावून घेतलं आणि ते त्याला म्हणाले,

"ज्यांना माझी भेट घ्यायची असेल त्यांना घेऊ द्या."

"माफ करा साहेब. असं करता येत नाही."

"मघापासून किती लोक दारावरून ये जा करताहेत."

"मै मजबूर हूँ!" असं म्हणून त्या पोलीस अधिकाऱ्यानं तोंड फिरवलं आणि बेफिकीरपणे तो निघून गेला. त्याचवेळी कर्नल मेडॉक यांचा निरोप घेऊन एक सेवक आला. त्याच्या पाठोपाठ चारचाकीवर एक स्ट्रेचर आणलं गेलं. कर्नल मेडॉक यांच्या तपासणीच्या खोलीत गेल्यावर मेडॉकनी स्वत: हात देऊन गांधीजींना बसतं केलं.

स्टेथास्कोपची नळी कानाला अडकवीत मेडॉकनी विचारलं,

"कसं वाटतंय आपल्याला?"

"छान वाटतंय."

"पण आपल्या डोळ्यात वेदना दिसताहेत."

"असतील."

"मला वाटतं तातडीनं ऑपरेशन केलेलं बरं,"

"करा."

"कुणाला काही कळवायचं?"

"नाही. तुम्ही ऑपरेशन करा."

"कुणालाच निरोप द्यायचा नाही? आश्चर्य आहे!"

"श्रीनिवास शास्त्रींना तेवढा निरोप द्या. बाकी कुणाला नको."

आणि मग भराभर शस्त्रक्रियेची तयारी सुरू झाली. चाकू-कातऱ्या सज्ज झाल्या. डॉक्टरांनी आपले गाऊन चढवले. हातमोजे घातले गेले. ऑपरेशनच्या अरुंद टेबलावर गांधीजींना झोपविण्यात आले. कर्नल मेडॉक स्वत: उभे होते. त्यांचा उंचापुरा देह सगळा शुभ्रवस्त्रांकित होता. डोळे फक्त उघडे. ते मात्र शेजारच्या चाकूकात्र्यांवर भिरभिरा फिरत होते. फ्लावियाची कोण धांदल चालली होती. फ्लावियाच्या जोडीला मेरी आली. टेबलाच्या वर सूर्यासारखा दिसणारा अजस्त्र दिवा एकदम लागला आणि कर्नल मेडॉकनी चाकूसाठी हात पुढं केला. फ्लावियानं पहिला चाकू त्यांच्या हातावर ठेवला... आणि भक्कन सगळे दिवे गेले. अंधार तर मिट्ट होता. डोळ्यांत बोट

घातलं तरी समोरचं काही दिसत नव्हतं.

सगळ्यांची धावपळ झाली. तरी बरं. पोट अजून ओपन केलेलं नव्हतं. भूल दिलेली होती. कर्नल मेडॉक अस्वस्थ झाले. ऑपरेशन तर होणं आवश्यक होतं. ऑपरेशन थिएटरच्या दाराबाहेर पाचपन्नास माणसं उगाचच चिंताक्रान्त चेहेरे करून उभी होती. बाबू शिपायांनं त्या साऱ्यांना जवळजवळ हाकलून दिलं.

कर्नल मेडॉकनी निर्णय घेतला. आणि फ्लावियाला ते म्हणाले,

''चटकन चारपाच गॅसच्या बत्त्या मागवा.''

''म्हणजे? बत्तीच्या प्रकाशात ऑपरेशन?''

''अलबत. वेळ नका काढू.''

फ्लावियानं एका सेवकाला तातडीनं धाडला, आणि पंधरावीस मिनिटांच्या आतच भकभकत्या बत्त्या येऊन दाखल झाल्या. कर्नल मेडॉकनी पुन्हा फेस-मास्क चढवला आणि फ्लावियाला ते म्हणाले, ''फ्लाविया! आर यू रेडी?''

''यस सर...'' फ्लाविया हळूच म्हणाली.

भयप्रद काळोखात तोंडाला पट्ट्या बांधून उभी राहिलेली ती माणसं; आवाज कसला तो नव्हताच. फक्त चाकूकात्र्या ठेवल्याचे आवाज आणि काही निःश्वास. कर्नल मेडॉक तसा कठीण काळजाचा माणूस. पण त्याच्याही कपाळावर घाम दिसू लागला. फार मोठी जबाबदारी त्यांनी स्वीकारली होती. अर्धापाऊण तास हे शस्त्रकर्म चाललं होतं. उघडलेल्या पोटाला शेवटचा टाका घालून कर्नल मेडॉक दाणकन् शेजारच्या खुर्चीत बसले. तासादोनतासांनी सेवकांनी स्ट्रेचर आणलं आणि गांधीजींना त्यांच्या खोलीत नेलं.

गांधीजी शुद्धीवर आले तेव्हा शेजारच्या चौपाईवर श्रीनिवास शास्त्री बसले होते. कोपऱ्यात मेरी हसतमुखानं उभी होती. क्लोरोफॉर्मच्या त्रासानं एखादीदुसरी उलटी होण्याचा संभव असतो. म्हणून मेरी तत्परतेनं हातात स्वच्छ टॉवेल घेऊन उभी होती.

''आपण बोलू नका. बोलण्याचा त्रास होईल. मी इथंच बसून राहतो.'' शास्त्रीजी म्हणाले. वक्तृत्वाचा फड गाजविणारा दिगंत कीर्तीचा हा वाचस्पती तशा रात्री जागरण करीत गांधीजींच्या जवळ बसून होता.

घशात डचमळून आल्यासारखं वाटलं. मेरी चटकन पुढं आली आणि टॉवेलनं तोंड पुसत ती म्हणाली,

''आज सगळ्या दवाखान्यानं जागरण केलंय. हॉस्पिटलमधले एकूण

एक रोगी जागे आहेत.''

"कशासाठी?'' शास्त्रीजींनी उत्सुकतेनं विचारलं.

"गांधीजींच्या ऑपरेशनसाठी.''

"अस्सं? वा!''

"आपल्याला गंमत बघायची आहे?''

"कसली?''

"लोकांची. रात्रीपासून गटागटानं बोलणी करताहेत. कुजबुजताहेत. आम्ही सांगितलं तरी जाम झोपत नाहीत.''

"मग त्यात गंमत कसली?''

"ती पुढंच आहे. आत्ता पहाटेचा कोंबडा आरवेल आणि मग बघा कोपऱ्या कोपऱ्यात आपल्याला काय दिसेल ते.''

गांधीजींचा डोळा लागला होता. शास्त्रीजी हळूच उठले. मेरीच्या मागोमाग गेले. दवाखान्याच्या व्हरांड्यातून आणि वॉर्डांतून अजून रात्रीचे मंद दिवे जळत होते. नीरव शान्तता होती तरी रुग्ण झोपले आहेत असे वाटत नव्हते.

मेरी दबलेल्या आवाजात म्हणाली,

"तसेच पुढं या. आणि त्या वॉर्डात चला.''

शास्त्रीजी तसेच पुढं गेले. वॉर्डातल्या जवळजवळ सगळ्या खाटा रिकाम्या होत्या. अत्यवस्थ रुग्ण तेवढे पडून होते.

"तो बघा त्या कोपऱ्यात. त्याचं नाव हुसेन. रक्तदाबाच्या विकारानं आजारी पडून इथं आलाय.'' मेरी म्हणाली.

हुसेन गुडघे टेकून अल्लाची याचना करीत होता.

"आता हा बघा कृष्णा गायतोंडे... समाधी लावून बसलाय.'' विषमज्वर झाला होता त्याला. आता बरा आहे.''

आणखी कुणीकुणी रुग्ण अशाच कुठल्यातरी प्रार्थनेत गुंग होते.

"तुमच्या हॉस्पिटलकडून अशी परवानगी कशी मिळते?'' शास्त्रीजींनी विचारलं.

"मिळते कुठली?'' मेरी म्हणाली, "त्यांनी परवानगी विचारलीच आहे कुठं?''

"मग हे काय सगळे धार्मिक लोक आहेत?''

"छे छे. ते गांधीजींसाठी प्रार्थना करतात रोज.''

"गांधीजीसाठी? म्हणजे?''

"त्यांच्या प्रकृतीला आराम पडावा म्हणून."

सकाळचा स्वच्छ सूर्यप्रकाश खिडक्यांच्या गजांशी खेळू लागला. पक्षी जागे होऊन घरट्यांबाहेर नित्य उद्योगासाठी बाहेर पडले. त्यांच्या सुखद चिवचिवाटानं गांधीजींना जाग आली. त्यांनी डोळे किलकिले करून बघितलं-तर समोर देवदास उभा. देवदासनं गांधीजींच्या कपाळावर हात ठेवून विचारलं,

"बरं वाटतंय?"

"हो."

"आईला कळवलंय."

"काय कळवलंय?"

"तुमचं ऑपरेशन झाल्याचं."

"तारेनं की पत्रानं?"

"तारेनं."

"कशाला कळवलं तारेनं?"

"नको होतं कळवायला?"

"त्यांना धक्का बसेल."

"आईलाच काय, सगळ्या जगाला धक्का बसलाय."

"आश्चर्य आहे."

"ही बघा वर्तमानपत्रं" असं म्हणून देवदासनं एक गठ्ठाच त्यांच्यासमोर ठेवला. गांधीजींनी पडल्यापडल्याच वाचायला सुरुवात केली. तेव्हा देवदास म्हणाला, "तुम्ही नका वाचू. मी वाचून दाखवतो."

अकरा वाजता कर्नल मेडॉक आले. त्यांच्या हातात तारांचा आणि पत्रांचा गठ्ठा होता. तो दाखवत ते म्हणाले,

"ऑपरेशन आपलं झालंय. पण अभिनंदन माझं करताहेत लोक."

"बरोबरच आहे. आमचा जीव तुमच्या हातात होता ना..." गांधीजी हसून म्हणाले.

"आपली प्रकृती लवकर सुधारेल. मात्र आपल्याला एक विनंती आहे."

"बोला."

"आपण फार बोलायचं नाही. फार श्रम घ्यायचे नाहीत."

"जशी आपली इच्छा."

"गांधीजींनी अभिवादन करून कर्नल मेडॉक निघून गेले आणि फ्लावियानं

दोनतीनशे पत्रांचा गठ्ठा आणखी आणून दिला. जगाच्या कानाकोपऱ्यातून त्या तारा आल्या होत्या. आभाराच्या होत्या. त्यांना आभाराची उत्तरं पाठवणं हाच एक उद्योग आता देवदासला पुरवला होता.

संध्याकाळी शौकतअल्ली आले. गांधीजी जागे नव्हते. देवदास म्हणाला, "उठवू का?"

"नको. मी इथूनच दर्शन घेतो."

"बरं. घ्या."

"प्रकृती बरीच खालावली आहे."

"हो."

शौकतअल्लीचे डोळे डबडबले होते. त्यांची ती आर्जवी अवस्था पाहून देवदास म्हणाला, "खरंच उठवतो."

"नको नको. त्यांना त्रास होईल. त्यांचे पाय फक्त पांघरुणाबाहेर काढा."

देवदासनं गांधीजींच्या पायांवरून पांघरूण हळूच दूर केलं. शौकतअल्लीन विलक्षण भावनावेगानं पुढं होऊन गांधीजींच्या उघड्या पायांचं चुंबन घेतलं आणि काही न बोलता तोंड फिरवून ते निघून गेले.

फ्लाविया आणि मेरी हे सगळं पहात उभा होत्या. शौकतअल्ली निघून गेल्यावर फ्लावियानं गांधीजींच्या पायांवर पुन्हा पांघरूण ओढलं. त्या स्पर्शानं गांधीजींना जाग आली. दचकल्यासारखं त्यांनी इकडेतिकडे पाहिले. कोपऱ्यातल्या चौपाईवर मेरीची समाधी लागली होती. देवदास दुसऱ्या बाजूला वृत्तपत्रं वाचत होता. त्यानं हळूच जवळ येऊन विचारलं,

"बापूजी, काय झालं?"

"देवदास, मला स्वप्नं कधी पडत नाहीत."

"मग? आज पडलं?"

"होय."

"कसलं?"

"भयंकर."

"लहान मुलांसारखं? राक्षसाचं?" देवदासनं हसून विचारलं.

"ते पडलं असतं तरी चाललं असतं."

"मग मृत्यूचं?"

"हो! जवळजवळ मृत्यूचंच. पण शारीरिक मृत्यूचं नव्हे."

"मग?"

"काँग्रेसमध्ये भांडणं चालू आहेत, हिंदु-मुसलमानांचे दंगे उसळलेत, असहकाराची चळवळ कुठल्याकुठे नष्ट झाली आहे. लोक बेभान आहेत. या वावटळीत मी कुठंतरी दूर उभा आहे. लोकांचे माझ्याकडं लक्ष नाही."

"असं स्वप्न पडलं बापूजी तुम्हाला?"

"हो, देवा."

"मग ते खरं आहे."

"काय खरं आहे?"

"तुमच्या स्वप्नातल्या सगळ्या गोष्टी सत्यसृष्टीत आहेत."

"खरं आहे तू म्हणतोस तेच."

"आणि बापूजी, मला वाटलं, हे एवढ्यावरच थांबायचं नाही"

"मग?"

"गेल्या दहा वर्षांत दहा तरी सच्चे अनुयायी तुम्हाला मिळाले?"

"दहा निश्चित मिळाले."

"पण त्यांनी समाज बदलला का?"

"थोडाफार तरी बदललाच असेल."

"बापूजी, तुमच्या अंवतीभंवती असणाऱ्या निष्ठावान माणसांच्यावरून तुम्ही सबंध समाजाचा अंदाज बांधू नका."

"तुला काय म्हणायचंय?"

"हिंदु-मुसलमानांच्या दंग्याचंच घ्या ना. या देशात हे विष इतकं खोलवर रुजलंय की सगळी जमीन नांगरलीत तरी कुठून तरी हे विषांकुर वर डोकावतील आणि उभ्या पिकाचा नाश करतील. या बघा रोज बातम्या येताहेत. बापूजी, मला तर असं भीषण दृश्य दिसतंय..."

"काय?"

"हिंदु-मुस्लीमाचं सख्य घडवण्याचं व्रत तुम्ही घेतलंय. तुमच्या साक्षीनंच इथून पुढं रक्ताचे पाट वहायचेत."

"देवदास!" गांधीजी अस्फुटपणे उद्गारले.

"बापूजी, मघाशी शौकतअली आले, आणि तुमच्या पायांचं चुंबन घेऊन गेले. पण असे शौकतअल्ली किती आहेत?"

"जे आहेत तेच इतर समाज बदलतील. ज्योतीने ज्योत लागते."

"खरं आहे. पण त्याच ज्योतीने आगही लागते. योग्य ठिकाणी नाही वापरली तर."

"देवदास, आज तू फार भयंकर बोलत आहेस."

"तुम्हाला पडलेल्या स्वप्नाचा विस्तार करून सांगतोय मी बापूजी. केव्हातरी मला हे बोलायचंच होतं. कारण माणूस हा अखेर माणूसच."

"दानव निश्चित नव्हे."

"पण देवही नव्हे. म्हणून त्याला वागविताना माणसाचेच नियम लावायला हवेत. तुमचे नियम देवांचे नियम आहेत."

"देवदास, माझा माझ्या मार्गावर विश्वास आहे. तुझा नसेल तर तू मला सोडून जाऊ शकतोस." असं म्हणताना गांधीजींचा चेहेरा विलक्षण व्यथित दिसत होता. देवदासला तो पाहवला नाही. गांधीजींच्या कॉटसमोर चट्कन गुडघे टेकून तो बसला आणि मान वर करून आर्जवीपणानं म्हणाला,

"बापूजी, माझ्या म्हणण्याचा विपर्यास नका करू. कलकत्ता, बिहार, दिल्ली इथं जे मी पाहिलं ते बोललो. माझी तुमच्या मार्गावर दृढ श्रद्धा आहे. पण माझ्याइतकी सर्व लोकांची श्रद्धा बसेलच असं नाही."

"मग तेवढंच पुरे आहे. पण तू कलकत्ता, बिहार, दिल्ली इथं काय पाहिलंस ते सांग."

"तुम्ही येरवड्याला असताना कलकत्त्याच्या मोहोल्ल्यात दंगल उसळली. तुमच्या नावाचा जयजयकार करीत सुरामारी चालली होती. दिल्लीला तेच..."

गांधीजींना खोकल्याची उबळ आली. तेव्हा फ्लाविया चटकन पुढं आली आणि तिनं सांगितलं, "आपण फार बोलू नये. त्रास होईल." जवाहरलाल आणि शंकरलाल बँकर आल्यामुळं देवदास मग बाहेर निघून गेला.

आठपंधरा दिवसात गांधीजींची प्रकृती चांगली सुधारली, आणि एके दिवशी सकाळी अचानक कर्नल मेडॉक मोठ्या खुषीत येऊन सांगत आले. "मि. गांधी, सरकारनं तुमची बिनशर्त मुक्तता केली आहे."

गांधीजींवर या उद्‌गारांची काहीच प्रतिक्रिया दिसली नाही.

"मि. मेडॉक, या बातमीनं मला आनंद होत नाही. सरकारच्या कृपेनं माझी सुटका व्हावी याची मला शरम वाटते."

"ते काहीही असो. आपण आता जुहूला विश्रांतीसाठी जावं असा माझा सल्ला आहे."

"अवश्य जाईन. आपण माझ्यावर शस्त्रक्रिया करून मला पूर्ण बरं करून पाठवीत आहात. मी आपला अत्यंत आभारी आहे." कर्नल मेडॉक जाताना भारावल्यासारखे दिसत होते.

संध्याकाळीच गांधीजींची निघण्याची तयारी झाली. गांधीजी खोलीच्या दारातून बाहेर पडतात तोच फ्लाविया आणि मेरी दोघी पुढं झाल्या. त्यांनी गांधीजींच्या पायांना स्पर्श करून अभिवादन केलं. दोघींचेही डोळे पाणावले होते. गेल्या दोन आठवड्यात त्यांनी एका अशा माणसाची सेवा केली होती की ज्याच्या जाण्यानं त्यांच्या काळजात स्पंदने होत होती. डोळ्यात आसवं आली होती. दोघींनाही उठवून गांधीजी म्हणाले,

"फ्लाविया, मेरी, तुम्हा दोघींची मला सदैव याद राहील. हे घ्या. माझी आठवण म्हणून. असं म्हणून गांधीजींनी दोघींना दोन खादीच्या शाली भेट दिल्या.

गांधीजींची मोटार ससूनच्या आवाराबाहेर पडून कितीतरी वेळ झाला तरी फ्लाविया आणि मेरी त्या वाटेकडे बघतच राहिल्या होत्या. त्यांच्या खांद्यावर गांधीजींनी स्वहस्ते पांघरलेल्या शाली होत्या. त्या समाधीतून जागी होऊन फ्लाविया मेरीला म्हणाली, "चल मेरी, अखेर आपण परिचारिका आहोत."

जुहूचा समुद्र हेलकावे खात होता. किनाऱ्यावरील पुळणीशी दंगामस्ती करीत करीत तो कधी मागं जात होता, कधी पुढं येत होता. आणि प्रत्येक वेळी किनाऱ्यावर एक लांबलचक ओली वेडीवाकडी रेषा उमटत होती. पुळणीला पाठमोरी टाकून एक झोपडीवजा बंगली होती. त्या बंगलीत गांधीजींचा मुक्काम होता. या बंगलीत फक्त किनाऱ्यावरचा वारा खेळायला यायचा. त्या आवाजात आता टकळीचा आवाज आणि प्रार्थनेचे सूर मिसळून जात होते. सागर किनारीची हवा गांधीजींना मानवत होती. गांधीजींच्या निवासामुळं जुहूच्या तुरळक वस्तीला आता यात्रास्थानाचं स्वरूप येऊ लागलं होतं. देशाच्या सर्व भागातले लोक जुहूचं दर्शन घेतल्याशिवाय मुंबईतून जात नव्हते.

सूर्य आता कलला होता. वारा मोकळा सुटला होता. पद्मजा नायडू भेटायला आल्या होत्या. त्यांच्याशी बातचीत करीत गांधीजी बसले होते. दुपारच्या डाकेचा गठ्ठा हातात घेऊन महादेवभाई आले आणि म्हणाले, "आज संध्याकाळी जमनालालजी येणार आहेत."

"फारच छान. मी त्यांची वाटच पहातो आहे."

जमनालाल येणार असल्याच्या वार्तेनं गांधीजींना बरं वाटलं. कडाक्याच्या उन्हात वाऱ्याची सुखद झुळूक अंगावरून जाताना अंग जसं मोहरून जातं तसं या वार्तेनं गांधीजींना वाटलं. गेल्या दोनचार वर्षांत जमनालालनी गांधीजींना विलक्षण वेड लावलं होतं. गांधीजींनीही त्यांना माया दिली होती. संपत्तीच्या

तलावात डुंबणारा हा लक्ष्मीपुत्र आपल्यासाठी उन्हातान्हात पायपिटी का करतो असा प्रश्न गांधीजींना नेहमी पडायचा. दूरवर हालत असलेल्या एका झाडाच्या शेंड्याकडे पाहून ते मनात हाच विचार करीत होते. विचार करता करता एक चटका लावणारी स्मृतीशलाका त्यांच्या नजरेसमोर उजळून गेली.

गांधीजी आश्रमात होते. साबरमती किनाऱ्यावरच्या त्या झोपडीच्या इमारतीतून नित्याचे व्यवहार चालले होते. इतक्यात मगनभाई सांगत आले,

"जमनालाल बजाज भेटायला आलेत."

"पाठवा त्यांना. मी इथेच आहे."

थोड्या वेळानं एक तेजस्वी चेहेऱ्याचा तरुण समोर आला. त्याचं वय तिशीच्या आसपास असावं. तो गौरकाय होता. स्थूल नसला तरी त्याची देहयष्टी पुष्ट होती. आणि मुख्य म्हणजे त्याच्या चेहेऱ्यावर संपत्तीचे विलक्षण तेज होते. डोळ्यात बुद्धिमत्तेची चमक होती. त्याच्या पावलात आत्मविश्वास होता. त्याला आपण आधी कुठंतरी पाहिलं असावं असं गांधीजींना वाटू लागलं. तो जवळ आल्यावर गांधीजी म्हणाले, "बसा."

चटईवर तो मोठ्या अदबशीरपणे बसला. त्याच्या बसण्यातही कमालीची नम्रता होती. म्हणून गांधीजी म्हणाले,

"ऐसपैस बसा. प्रशस्त बसा. संकोच नका करू."

त्या तरुणानं नुसताच एक पाय इकडचा तिकडं केला. तो गांधीजींकडे बघत होता. त्या बघण्यात आदर होता.

"बोला जमनालाल, काय काम आहे?"

"मला तुम्हाला काही विचारायचं आहे."

"असं? मग अवश्य विचारा."

"माझं नाव जमनालाल बजाज."

"हे विचारणं झालं?"

"नाही. विचारण्यापूर्वी माहिती सांगतो."

"मला थोडीशी माहिती आहे. तुम्ही व्यापारी आहात."

"हो."

"मग माझ्याकडे कसे आलात?"

"यावंसं वाटलं म्हणून."

"का वाटलं?"

"वाटलं खरं. का ते सांगता येत नाही. बापूजी, मी आपल्याला काय

सांगावं! पण स्वच्छ आकाशात जिथं पांढरे शुभ्र ढग जमा होतात तिथंच काळेकुट्ट ढग निर्माण होतात. त्याच आकाशाच्या रुपेरी कडा किती मोहक वाटतात. याचं कारण कुणी विचारलं तर काय सांगायचं?''

गांधीजींनी क्षणभर चमकून त्या तरुणाकडं पाहिलं. त्याच्या उत्तरात आणि त्याच्या प्रश्नातही बुद्धिमत्तेची फेक होती.

''बरं नका सांगू कारण. पण कार्य तर सांगाल.'' गांधीजी हसून म्हणाले.

''आपल्याकडे मी एक मागणी करणार आहे.''

''करा. शक्य असेल तर ती मागणी मी अवश्य पुरी करीन.''

''तुमच्या देवदासप्रमाणे...''

''हं... पुढं सांगा.''

''तुमच्या देवदासप्रमाणे मला तुमचा मुलगा म्हणा.''

कसलीतरी लोकविलक्षण तेजोरेखा नजरेसमोरून सर्रकन जावी तसं गांधीजींना वाटलं. गजान्तलक्ष्मी पायाशी लोळण घेत असताना डहाळ्या-फांद्यांनी डेरेदार झालेल्या वृक्षासारखा कुटुंबाचा मोठा पसारा असलेला हा तरुण! किती लोकविचित्र मागणी होती त्याची. त्याच्या प्रत्येक शब्दात आर्जवं होती, कळकळ होती. या मागणीत ढोंगाचा, दंभाचा लवलेशही नव्हता. गांधीजी हसले आणि म्हणले,

''कबूल. तुम्हाला मुलगा मानलं. पण...''

''पण काय?'' उत्सुकतेनं जमनालालनी विचारलं.

''पण मुलाला द्यायला माझ्याजवळ काहीच नाही. मुलानंच मला दिलं पाहिजे.''

''बापूजी, जेव्हा आपल्याकडे आलो तेव्हाच हे ठरवून आलो आहे की माझं सर्वस्व मला आपल्याला द्यायचं आहे.'' असं म्हणून जमनालाल झटकन उठले आणिं गांधीजींच्या चरणांना स्पर्श करून त्यांनी ती माती कपाळी लावली. गांधीजींनी आपल्या हातांनी ती पुसून टाकली आणि ते म्हणाले,

''मी आता तुमचा पिता आहे. देव नव्हे. मी सांगितलेलं ऐकणार ना?''

''अलबत!''

''नाहीतर देवदासच्या पाठीत लहानपणी बसली तशी ही काठी तुमच्या पाठीत बसेल.''

दोघांच्या हास्याच्या खळखळाटानं ती मठी भरून गेली. तो सुखद हास्यध्वनी गांधीजींच्या कानावरून आज नव्याने जात होता. ती स्मृतीशलाका

विरली तर हसण्याचे सूर नाही विरले.

पद्मजाबाईंनी कितीतरी वेळा हाका मारल्या तरी गांधीजींची ही स्मृतीसमाधी उतरेना. महादेवभाईंना सांगून त्या निघून गेल्या. तेव्हा त्यांच्या रिकाम्या आसनाकडे पाहून गांधीजी वर्तमानात आले. आणि आपल्याशीच हसले.

"का हसलात बापूजी?" महादेवभाईंनी विचारलं.

"जमनालालची याद आली."

"मग? येणार आहेत ना ते आता."

"हो. म्हणूनच याद आली. तो प्रथम माझ्याकडे आला त्यावेळची."

तासाभरात संध्याकाळच्या सावल्या उतरू लागल्या आणि जमनालालांची मोटार येऊन थडकली. संध्याकाळचा प्रकाश जमनालालांच्या चेहेऱ्यावर पडला होता. तो विशेष खुलून दिसत होता. भराभर पायऱ्या चढून त्यांनी गांधीजींना लवून नमस्कार केला. आणि बऱ्याच वर्षांनी भेटल्यासारखी प्रकृतीची चौकशी केली.

"बापूजी, बरं वाटतंय ना आता?"

"हो. आज आणखी बरं वाटतंय."

"म्हणजे?"

"तुम्ही भेटलात म्हणून."

संध्यासमयींची प्रार्थना झाल्यावर मनमोकळ्या गप्पांत वेळ केव्हाच निघून गेला. दूरवरच्या बंगल्यातून कुठल्याशा गाण्याचे सुंदर सूर हवेवर तरंगत येत होते. त्यासरशी आठवण होऊन जमनालाल म्हणाले, "बापूजी, दिलीपकुमार रॉयना बोलावून घेऊ."

"कशाला?"

"त्यांची भजनं ऐकल्यावर तुमची प्रकृती आणखी सुधारेल." गांधीजी हसले.

"जमनालाल, दिलीपकुमार इस्पितळातच आले होते."

"भजनं ऐकली?"

"हो."

"कशी वाटली?"

"सुरेख. पण त्यांचा माझ्याविषयी गैरसमज होता."

"कसला?"

"मला गाण्याबद्दल आस्था नाही."

"मग आपण काय सांगितलं?"

"मी रसिक आहे याची खात्री पटली त्यांना."

"रॉयनी भजन कोणतं म्हटलं?"

"मीराबाईचं. चाकर राखो जी."

"वा. हे भजन दिलीपकुमार फारच छान म्हणतात."

"पण जमनालाल" गांधीजींनी विचारलं. "आजच दिलीपकुमार आणि त्यांची भजनं यांची याद येण्याचं कारण?"

"बापूजी, तुमची शस्त्रक्रिया होऊन आता बरेच दिवस झाले. तुमची प्रकृती मला अजून सुधारलेली वाटत नाही."

"अतिमायेच्या माणसाला असंच दिसतं."

"पण ते सत्य असतं."

"छे. अरे, मला आता काही होत नाही. रोज पुळणीवर फिरायलादेखील जातो मी. आणि हे पहा जमनालाल, मला आता फार दिवस रुग्ण राहून चालणार नाही, अनेक कामं पडलीत."

"काही नवीन घेऊ नका म्हणजे झालं."

"घेऊ नका? घेतली नवी जबाबदारी."

"कोणती?"

"यंग इंडिया आणि नवजीवनच्या संपादनाची."

"बरं. मग आता झालं ते झालं. पण इथून पुढं तरी जबाबदारी वाढवूं नका."

"जमनालाल, किती काळजी कराल तुम्ही या एवढ्याशा माणसाची?"

"बापूजी, हा एवढासा माणूस अनेकांच्या मालकीचा आहे. म्हणून एवढी काळजी करायलाच पाहिजे.

"बरं बाबा. तसं."

"बापूजी मी आता निघतो."

"अरे वा? जेवण करून जा ना."

"नाही बापूजी. आज तुम्हाला भेटण्याची तीव्र इच्छा झाली. म्हणून कामांचा डोंगर लाथाडून आलोय. आता जाऊन सारी कामं उपसली पाहिजेत, विचार केला पाहिजे."

जमनालाल निघून गेले. महादेवभाई शेजारीच उभे होते. गांधीजी त्यांना अस्फुट स्वरात म्हणाले,

"महादेव, काही काही माणसं वेडी होतात ती अशी."

❖

# आठ

कलकत्त्याचा एक मध्यवर्ती चौक; माणसं गोलाकार बसली होती. सभा चित्रासारखी स्तब्ध होती. सभेला अध्यक्ष नव्हता. एकटे गांधीजी बोलत होते. उन्हाचा चटका लागूनही लोक स्तब्ध होते. ऐकत होते. देशबंधूंचे देहावसान झाले होते. राष्ट्राचा सच्चा सेवक पंचत्वात विलीन झाला होता. बंगालचे हृदय हलले होते. अवघ्या देशावर अवकळा पसरली होती. उज्ज्वल कार्याची ज्योत इतरांच्या हाती देऊन हा मूर्तीमंत प्रकाश लुप्त झाला होता. त्यांच्या स्मारकार्थ दहा लक्ष रुपयांचा निधी गोळा करायचा होता. गांधीजी याच कार्यासाठी कलकत्त्याला आले होते.

भाषण संपलं तेव्हा पेटी फिरवली गेली. नोटा, नाणी आणि चेकसुद्धा त्या पेटीत येऊन पडले. सभा संपली. लोक विखरून निघून जात होते. आजारानंतर प्रथम गांधीजी एवढ्या मोठ्या जाहीर सभेत एकटे बोलले होते. महादेवभाईनी लिंबूपाण्यानं भरलेला ग्लास पुढं केला. गांधीजींनी ग्लास रिकामा करून महादेवभाईंच्या हाती दिला. मोटरीत बसत असतानाच एका कार्यकर्त्यानं त्यांच्या हातात एक चिठ्ठी आणून दिली.

"मी लिन युटांग; आपल्याला मी आधी पत्र पाठवलं होतं. आपल्या पत्राप्रमाणे मी कलकत्त्याला आलो आहे. भेटू का?"

गांधीजींनी चिठ्ठी उलटीपालटी करून बघितली. त्यावर लिनचा पत्ता कुठंच नव्हता. चिठ्ठी आणून देणाऱ्या कार्यकर्त्याला त्यांनी विचारलं,

"पत्र आणून देणारा माणूस कुठं आहे?"

"तो पलीकडच्या गल्लीत झाडाखाली उभा आहे."

"बोलावून आणा इकडे त्याला."

महादेवभाईंनी विचारलं,

"कुणाची चिठ्ठी?"

"शांतिनिकेतनात एक चिनी विद्यार्थी राहतो. त्याची."

"म्हणजे लिन युटांग."

"हो."

"त्याची काय अडचण आहे?"

"शांतिनिकेतनातले लोक त्याच्याकडे संशयानं बघतात."

"का?"

"गुप्तहेर आहे तो; असा त्यांचा दावा. त्रासून गेलाय अगदी."

"हो. मागे एकदा पत्र आलं होतं खरं."

"तोच हा. तो बघ समोरून येतोय."

चपट्या नाकाचा तो काहीसा पीतवर्णी चिनी समोरून येताना गंमतीदार दिसत होता. त्याची चाल भरभर होती. पण नजर मात्र संथ होती.

"याच्याकडे पाहिल्यावर हा हेरगिरी करीत असेल असं वाटत नाही." महादेवभाई म्हणाले.

"मलाही तसंच वाटतं. पण आपण काळजी घेतली पाहिजे; जागरूक राहिलं पाहिजे."

लिन गांधीजींच्या जवळ आला. भारतीय पद्धतीनं त्यानं गांधीजींना नमस्कार केला.

गांधीजी म्हणाले, "लिन माझ्याबरोबर माझ्या निवासात चल. तिथं शान्तपणे बोलू."

मोटारीत गांधीजी सारखे त्याच्या नकळत त्याच्याकडे पहात होते. आपल्या डोळ्यांनी त्याच्या अंतरंगाचा ठाव घेत होते. निवासात येईपर्यत गांधीजींची खात्री पटली होती.

खोलीत गेल्यावर त्याला आपल्यासमोर बसवून गांधीजी म्हणाले, "बोल लिन; आता तुझी तक्रार मनमोकळेपणाने सांग."

"मी शान्तिनिकेतनात राहतो. प्रथम काही दिवस मी सगळ्यांचा लाडका होतो."

"मग आता काय ग्रह फिरले?"

"हो, तसंच म्हणायचं. माझ्यावर विद्यार्थ्यांचा सक्त पहारा आहे."

"का?"

"माझा त्यांना संशय आला आहे."

"गुप्तहेर म्हणून?"

"हो."

"मग. तुलाच त्यांची खात्री पटवता नाही आली?"

"नाही."

"का नाही?" गांधीजी किंचित आवाज चढवून म्हणाले. सत्य असेल तर सत्याबद्दल आत्मविश्वास हवा. भेकडपणा आला की तिथं पाप असतं म्हणून समजावं."

लिन काही बोलला नाही. तो खाली मान घालून कितीतरी वेळ बसला होता. मग गांधीजी मृदु स्वरात म्हणाले,

"लिन, अरे शांतिनिकेतनातले सारे माझे मित्र; मग असं कसं झालं? मी ओळखतो साऱ्यांना. मग तुझ्यासंबंधी त्यांना शंका का यावी बाबा?"

मग लिन दीनवाणेपणानं म्हणाला,

"तिथले लोक खरंच सज्जन आहेत. पण त्यांच्या मनात कुणीतरी विष कालवंलय माझ्याविषयी. मी आपल्याला खरंच सांगतो, मी गुप्तहेर नाही. हिंदुस्थानचा अभ्यास करणारा एक जिज्ञासू विद्यार्थी आहे मी."

लिनचा प्रत्येक शब्द हृदयाच्या तळातून येत होता. त्याच्या शब्दांत कारुण्य होतं, कळकळ होती.

गांधीजी म्हणाले, "तुझ्यावर विश्वास आहे माझा. मग सांग, तुला शांतिनिकेतनला पाठवू?"

लिनच्या डोळ्यात आसवं जमा झाली होती. ती गालांवरून ओघळू लागली. हातांनी ती पुसत तो म्हणाला,

"कृपा करून मला आपल्याजवळ ठेवा. शांतिनिकेतनात नको."

"आमच्या आश्रमातली शिस्त तर शांतिनिकेतनपेक्षा कडक आहे. तुला मानवेल?"

"बापूजी, मी चिनी आहे. आम्हा चिनी लोकांना कष्टांची पर्वा वाटत नाही. आम्हाला कष्टाचं भय नाही. वाटेल तितकी कडक शिस्त असू द्या. मी तिचं काटेकोर पालन करीन."

"ठीक आहे. मी आता दौरा आटोपून आश्रमात येणार आहे. तू अहमदाबादला मला भेट. तिथून मी तुला आश्रमात घेऊन जाईन." गांधीजींच्या आश्वासनानं त्याचा चेहरा उजळला.

पंधरा दिवसांनी गांधीजी आश्रमी आले. नरहरीभाई आश्रमात नुकत्याच लावलेल्या रोपट्यांना पाणी घालीत होते. कस्तुरबा स्वयंपाकघरात ताकाचा रांजण घुसळत होत्या. त्यांनी स्वयंपाक घराच्या खिडकीतून पाहिलं. गांधीजींबरोबर आज एक नवखा माणूस होता. जवळ आल्यावर गांधीजी कस्तुरबांना म्हणाले,

"आश्रमात नवा पाहुणा आला आहे. लिन युटांग याचं नाव."

"या हो. बसा असे." कस्तुरबा म्हणाल्या.

"याला आता तुमच्याच स्वाधीन करायचं आहे."

"का बाई?"

"याला स्वयंपाक घरात पाणी भरण्याचं अन् कपडे धुण्याचं काम हवंय."

"असू दे माझ्याकडं तो. पण त्याचं नाव बदलून टाका. सारखं युटांग, युटांग कसं म्हणायचं?"

"ठीक आहे. लिन, आज आपण नव्यानं तुझं बारसं करू या. आजपासून तुला आम्ही शान्ती म्हणणार."

"छान आहे नाव." कस्तुरबा म्हणाल्या.

लिन कस्तुरबांच्या पाया पडला आणि लगेच त्यानं पाण्याची कळशी हातात घेतली.

कस्तुरबा म्हणाल्या, "अरे, लगेच नको कामाला सुरुवात करू. हे घे. ताक पी."

शुभ्र आणि दाट ताकाचा एक मोठा ग्लास कस्तुरबांनी त्याच्यासमोर ठेवला.

गांधीजींच्या डोळ्यात समाधान दाटलं. हसत हसत ते कस्तुरबांना म्हणाले,

"पाहुणा एकदम लाडका झालेला दिसतो?"

"म्हणजे?"

"पाहुण्याला ताक दिलंत. अन् आम्हाला?"

"आपल्याला दुधाचे पदार्थ वर्ज्य आहेत ना म्हणून नाही दिलं. हे घ्या. आपल्यासाठी तुळशीचं बी भिजवून ठेवलंय. थंड वाटेल. गांधीजींनी कटोऱ्यातली तुळशीच्या बियांची खीर लाकडी चमच्यानं खायला सुरुवात केली.

शान्ती त्यांच्याकडं निरखून पहात होता.

उष:कालच्या प्रार्थनेनंतर आश्रमाची दिनचर्या सुरू झाली होती. रात्रीच्या स्थिरचित्राचं रूपांतर सकाळी गतीचित्रात झालं होतं. गवळी दुधाच्या कावडी

रित्या करून परतत होते. शेतकरी औतं घेऊन शेतावर पोचले होते. आश्रमाशेजारचं अहमदाबाद शहर केव्हाच जागं झालं होतं.

गांधीजी बाभळीच्या काड्या चावत आकाशातून जाणारे लहानमोठ्या पक्षांचे थवे पहात होते. त्यांनी इकडेतिकडे पाहिलं. आश्रमातले पायरस्ते अजून साफ झाले नव्हते. रात्री झाडलेला पाचोळा त्यावर फरफर करीत होता. हे सफाईचं काम रोज शांती करीत असे. गांधीजी महादेवभाईंच्या कुटीकडं गेले आणि त्यांनी विचारलं, "महादेव, आज शांती उठला नाही अजून?"

"बापूजी त्याला ताप आलाय."

"ताप आलाय?"

"हो. डासांचा त्रास झालाय त्याला. संवय नाही."

"औषध दिलंस ना त्याला?"

"हो. रात्रीच दिलं."

"महादेव, आपल्याला एकदा या डासांचा विचार करायला हवा."

"डासांचा काय विचार करणार बापूजी?"

"फार लोक आजारी पडतात या उपद्रवानं."

"हो आता तर मलेरियाची साथच आली आहे."

"महादेव, आज अहमदाबादेला अन् नडियादला निरोप पाठवा. डॉक्टर मंडळींची सल्लामसलत घेऊ या."

"आजच?"

"हो आजच. विचार आलाय तर करून टाकू. पुन्हा आपल्याला वेळ नाही व्हायचा. आणि हे बघ, शांतीकडे लक्ष दे. तो बरा झाला पाहिजे. संध्याकाळी मी त्याला पहायला येईन" असं म्हणून गांधीजी निघून गेले.

दुपारी आश्रमात वैद्य आणि डॉक्टर यांची सभा भरली. डॉक्टर मेहेता सभेचं संचालन करीत होते.

गांधीजी म्हणाले, "डॉक्टर, डासांचा उपद्रव नाहीसा होईल असा काही तरी उपाय सुचवा. मलेरियानं फार लोक त्रासलेत आणि विशेषत: गरीब माणसाला या आजाराचा फार उपद्रव होतो. हातावरचं पोट असतं बिचाऱ्यांचं."

डॉक्टर मेहेतांनी आपल्या अन्य सहकाऱ्यांशी बरीच उलटसुलट चर्चा केली. पण मलेरिया निर्मूलनाची अशी कोणतीच योजना चर्चेतून निष्पन्न होईना.

डॉक्टर मेहेता म्हणाले, "बापूजी, अजून तरी मलेरियानाशक अशा

द्रव्यांचा शोध लागलेला नाही. तेव्हा उपाय एकच...''

"तो कोणता?'' गांधीजींनी उत्सुकतेने विचारलं.

"मच्छरदाणी वापरणे.''

गांधीजी किंचित हसून म्हणाले-

"डॉक्टर, एखाद्या पंगू माणसाला पचनक्रिया सुधारण्यासाठी जोरबैठका काढ असं तुम्ही सांगितलंत तर त्याला ते शक्य आहे का? सांगा.''

"म्हणजे? आपल्याला काय म्हणायचंय?''

"मला म्हणायचंय एवढंच की तुमच्या मच्छरदाणीच्या उपायाचा उपयोग गरीब माणसाला कसा होणार? गरीबाजवळ धड अंथरुण नसतं तर मच्छरदाणी कुठून आणील बिचारा?''

डॉक्टर मंडळी काही बोलली नाहीत. अखेर डॉ. गोवर्धनदास म्हणाले, "बापूजी गरीबांना पेलेल असा एक उपाय मी सांगू शकतो.''

"सांगा अवश्य.''

"अंगावर चादर गुंडाळून झोपावं आणि झोपताना तोंडाला मातीचं तेल चोपडून झोपावं म्हणजे डासांचा उपद्रव होणार नाही.''

"वा, हा उपाय चांगला सुचवलात. पण प्रथम हा प्रयोग मी स्वत:वर करून पाहणार आणि मग इतरांना करायला सांगणार.''

सभा संपली. सायंप्रार्थना होऊन आश्रमीयांची जेवणं झाली. गांधीजींच्या मठात त्यांचं अंथरुण साफ करून मच्छरदाणी लावण्यासाठी कस्तुरबा आल्या. शालीची एक घडी उलगडून कस्तुरबांनी गांधीजींच्या चटईवर अंथरली आणि त्या मच्छरदाणीचे बंद बांधू लागल्या.

"आज मच्छरदाणी नका बांधू.'' गांधीजी म्हणाले.

"का?'' कस्तुरबांनी काहीशा आश्चर्यानंच विचारलं.

"आज मी मच्छरदाणीविनाच झोपणार आहे.''

"डास चावतील ना.''

"ते चावणार नाहीत असा प्रयोग करून झोपणार आहे.''

"आता कुठला आणखी नवा प्रयोग आहे?''

"ती बघा. ती कोपऱ्यातली बाटली आणा.''

"कशाची आहे ती?''

"तेलाची.''

"आज मी काशाच्या वाटीनं पाय चोळणार आहे आपले.''

"पायाचं नाही. हे तोंडाला लावायचं तेल आहे."

इतक्यात महादेवभाई दुसऱ्या दिवशीचे कार्यक्रम सांगायला आले. तेव्हा कस्तुरबा त्यांना म्हणाल्या,

"महादेव, आज बघ नवीन खूळ काढलंय. तोंडाला तेल चोपडून झोपणार आहेत."

"बा, बापूंना काही सांगून उपयोग आहे का? आम्ही मघाशीच त्यांना सांगितलं की हा प्रयोग तुम्ही करून बघण्याची आवश्यकता नाही. इतर पुष्कळ लोक आहेत. नाहीतर मी स्वत: करीन. पण ऐकतात कुठं? चला तुम्ही."

गांधीजी हंसून म्हणाले, "पहा महादेवला जी समजूत आहे ती तुम्हांला नाही."

"चल बाबा महादेवा. आपण जाऊ या. पण धोका आहे यांनी हा प्रयोग करण्यात. तो ध्यानात घे."

"धोका? तो कसला?"

"उद्या यांचा हा प्रयोग यशस्वी झालाच तर काय होईल माहीत आहे?"

"काय होईल?" गांधीजींनी उत्सुकतेनं विचारलं.

"आश्रमातल्या सगळ्या मच्छरदाण्यांचं विसर्जन करावं लागेल आणि सगळ्यांना तोंडाला तेल चोपडून झोपावं लागेल."

गांधीजी खळाळून हसले. तेव्हा बा निघून गेल्या होत्या. महादेवभाईंनी गांधीजींना दुसऱ्या दिवसाचा कार्यक्रम सांगितला. जाताना महादेवभाईंनी लिहिलेल्या कागदांचं एक पुडकं गांधीजींच्या हाती दिलं आणि ते म्हणाले, "वाचून ठेवा."

"काय आहे?"

"शांतीनं दिलंय तुम्हांला वाचायला."

"एवढा मजकूर? अन् लिहिला केव्हा?"

"आश्रमात येऊन महिना झाला त्याला."

"महादेव, तुझं त्याच्याविषयी काय मत आहे?"

"चांगला मुलगा आहे. मेहनती आहे. अलीकडे तो तर भंगीकामही मोठ्या हौसेनं करूं लागलाय तो."

"चल महादेव, मला आत्ताच त्याची भेट घ्यायची आहे."

"आत्ता? या वेळी?"

"हो. उद्या पुन्हा आपण दौऱ्यावर जाणार. मी भेटलो नाही तर त्याला बरं नाही वाटणार."

महादेवभाईंनी कंदिल उचलला आणि ते पुढं चालू लागले. त्यांच्यामागे गांधीजी. नरहरीभाईंच्या कुटीत मागच्या बाजूला शांती रहात होता. गांधीजी येताच आपल्या अंगावरचं पांघरूण दूर करून तो लगबगीनं उठून बसला.

गांधीजींनी आपल्या हातांनी त्याला पुन्हा झोपवून अंगावर पांघरूण घातलं आणि ते म्हणाले-

"शांती, तू आजारी आहेस हे विसरू नको. मीच काय, पण देव आला तरी अशा अवस्थेत उठायचं नाही. समजलं?"

"चुकलो बापूजी" शांती शरमून म्हणाला.

"शांती, तुझं हे लिखाण महादेवनं माझ्याकडं दिलंय. ते मी सावकाश वाचेन. पण त्याचा आशय तू मला सांग."

तक्क्याला टेकून उठून बसत शांती म्हणाला,

"बापूजी ते माझं आत्मचरित्र आहे."

"अरे वा. मला ते वाचलंच पाहिजे. पण तू आत्मचरित्र-लिहिण्यासाठी प्रवृत्त कसा झालास?"

खोकल्याची उबळ दाबून शांती म्हणाला,

"बापूजी, भारतात येण्यापूर्वी मी सिंगापूरला होतो. शेकडो चिनी तरुणांप्रमाणे मीही माझं जीवन घालवीत होतो."

"म्हणजे कसं?"

"रानटी. शुद्ध रानटी. त्या जीवनाला ना स्वाद ना सुगंध. नुसतं जगायचं. पण का जगायचं आणि कशासाठी मरायचं हे निदान मला तरी तिथं कळलं नाही. पण इथं येऊन मला माझ्यातला माणूस सापडला. ओसाड वाळवंटात पाण्याचे उच्छवास सापडावेत त्याप्रमाणं माझ्या उजाड आणि भकास आयुष्यात मला देव माणसांचे सहवास मिळाले. माझ्यातल्या सुरवंटाचं फुलपाखरू झालं. म्हणून मला आत्मचरित्र लिहावसं वाटलं. आणखी एक विनंती आहे."

"विनंती नको करू. तुझं म्हणणं काय आहे ते सांग."

"मला दहा दिवसांचं उपोषण करण्याची परवानगी द्या."

"उपोषण?" गांधीजी चमकून म्हणाले, "कशासाठी?"

"आत्मशुद्धीसाठी."

"शांती, उपोषण हे एक प्रबल शस्त्र आहे. पण ते दुधारी आहे. त्याचा नीट वापर केला नाही तर करणाऱ्यावरच ते उलटतं."

"उलटू दे माझ्यावर. मी करून पाहीन."

"छे बेटा. ते एक व्रत आहे. नुसती मजेनं करून पाहण्याची गोष्ट नव्हे."

"बापूजी मी केवळ गंमतीनं बोलत नाही. गंभीरपणे बोलतोय."

"ठीक आहे. आधी तू चांगला बरा हो आणि मग उपवास कर."

शांतीचा फिकट चेहेरा समाधानानं उजळला.

तो म्हणाला, "बापूजी मी आजारी असल्यानं गेले आठपंधरा दिवस आश्रमाचं काही काम करू शकलो नाही. पण मी बरा झालो नं की सगळा वचपा काढून टाकीन."

"शांती, ते काम तुझ्यासाठी आम्ही ठेवलं नाही. तू आधी लवकर बरा हो." महादेवभाई म्हणाले. आणि मग शांतीला चिडविण्यासाठी हंसून गांधीजी म्हणाले,

"शांती, त्यानंतर उपवास आहे तुझा. संभाळ रे बाबा. चिनी माणसं फार भोजनप्रिय असतात."

"खादाडखाऊ म्हणा नं बापूजी" महादेवभाई म्हणाले.

"आपण तसं म्हणायचं नाही. आपण आपलं त्यांना भोजनप्रिय म्हणू. शांती, तू या उपासातून पार पडलास ना, तर चीन देशाची जगात ख्याती होईल. उपवासाच्या बाबतीत." शांती हंसला. एवढ्यात नरहरीभाई आले.

"चला आता. किती वेळ या शांतीबरोबर गप्पा मारणार आहात बापूजी."

"नरहरीभाई तू का आलास मागून?"

"बानी पाठवलं."

"का?"

"तुम्हाला आठवण द्यायला."

"कसली?"

"उद्या सकाळी तुम्हाला दौऱ्यासाठी जायचंय. रात्रीची झोप पूर्ण झालीच पाहिजे."

"त्या अजून जाग्याच आहेत?"

"तुम्हाला झोप लागल्याशिवाय बा कधी झोपत नाहीत बापूजी" नरहरीभाई हळूच पुटपुटले.

गांधीजी कस्तुरबांच्या खोलीवरूनच आपल्या खोलीत गेले. तिथला दिवा जागरण करीत होता. आणि त्याच्यासंगे बांचे दोन डोळे होते.

दुसऱ्या दिवशीची पहाट उगवली. आश्रम नेहमीप्रमाणे जागा झाला. प्रार्थनेनंतर महादेवभाई म्हणाले, "आठ वाजता निघायचं आपल्याला."

"तू सांगशील तेव्हा मी बाहेर पडेन."

"बापूजी, एक शेतकरी तुम्हाला भेटायला आलाय. आत्ताच भेट मागतो."

"मग विचारतोस काय? आत घेऊन ये. नाहीतर थांब. मीच येतो." असं म्हणून पंचा सावरून आणि हातात काठी घेऊन गांधीजी कुटीबाहेर आले. समोर पाहतात तर मनमोहन! मनमोहनची साबरमतीच्या पलीकडं थोडीशी शेतजमीन होती. तिथंच एक खोपट उभारून तो राहात होता. गांधीजी एकदा त्याच्या शेतात गेले होते. तोच मनमोहन आज आला होता.

"काय मनमोहन, आज इकडं कुणीकडं?" गांधीजींनी विचारलं.

"एक अर्जी घेऊन आलोय बापा" मनमोहन अजीजीनं म्हणाला.

'अरे, अर्जी कसली? मोकळेपणानं सांग, काही अडचण आहे का?"

"होय देवा... कसं सांगू?"

"अनमान नको करू मनमोहन. काय असेल ते स्वच्छ सांग."

"देवा तुमच्या आश्रमातले लोक माझ्या शेतात कधीमधी येतात."

"येतात. मग? त्यांनी काही नुकसान केलंय तुझं? का पिकाची नासाडी केली आहे?"

"जमिनीतल्या पिकाचं काही नाही. पण माझं घरच पेट घेतंय."

"म्हणजे?"

"मला एक न्हातीधुती ल्येक आहे."

"हो माहीत आहे मला."

"तुमच्या आश्रमातला वेंकट..."

"त्यानं काय केलं?"

"अजून काही केलं नाही पण करेल, म्हणून वेळीच सांगायला आलो."

"काय करेल असं वाटतं तुला?"

"वर्षभर या ना त्या निमित्तानं रोज येतो. नेमका मी नसताना येतो. हे लक्षण मला बरं नाही दिसत."

"मनमोहन तू सांगशील ते खरं असेल तर खरोखरच बाब गंभीर आहे. तू निश्चिंत रहा. तुझी अब्रू आणि आश्रमाची शान या दोन्ही गोष्टींना काळजापेक्षा अधिक जपेन."

"आणखी एक सांगायचंय देवा."

"सांग."

"आश्रमातील तरुण मंडळी गुलजार होऊन फिरायला येतात माझ्या शेतात. अन् मग लोक वेडंवाकडं बोलतात आश्रमाविषयी." गांधीजी एकदम

चमकले. कुठेतरी खोलवर घाव बसल्यासारखं वाटलं त्यांना.

मनमोहन निघून गेला तरी गांधीजी कितीतरी वेळ विचारमग्न अवस्थेत बसून होते. महादेवभाई हळूच म्हणाले,

"बापूजी आता निघायला हवं."

"महादेव, मी दौरा रद्द केलाय."

"बापूजी! मग नागपूरचे लोक काय म्हणतील?"

"काहीही म्हणोत. त्यांना तारेनं कळव."

"का पण?"

"महादेव, आत्ता मनमोहन का आला होता माहीत आहे?"

"नाही."

"तक्रार घेऊन आला होता."

"कसली?"

"वेंकटबद्दल."

"तरीच."

"काय तरीच?"

"वेंकट आज आश्रमात नाही. गेले दोन दिवस तो असाच पिसाटासारखा वागतोय."

"आणि हे आज सांगतोस मला महादेव?"

"सांगण्यासारखं विशेष नाही वाटलं."

"का नाही वाटलं? महादेव, लोकसेवेचं व्रत घेतलेल्यांना काळजापेक्षा चारित्र्याला जपायला हवं. वेंकटसारख्या आणखी कुणाकुणाबद्दल तक्रारी आहेत?"

"फारशा काही नाहीत. पण ऐकीवात बऱ्याच आहेत."

"ठीक महादेव, आजपासून एक आठवडाभर मी उपोषण करणार.'

"बापू!"

"होय महादेवा, असत्याशी सामना देत देत, जीवनातली कुठलीही तडजोड न स्वीकारता मी सत्य-मार्गावर प्रवास करतोय, अन वाटेत ही तणं माजलीत. माझाच मार्ग चुकत असेल. मला आत्मशोधन करायला हवं."

"बापू, मी साऱ्यांना ताकीद दिली आहे; तुम्ही नका उपवास करू. तुमच्या पहिल्या आजाराजी काळी सावली अजून आश्रमावरून दूर झाली नाही तोच उपवास..."

"महादेव" गांधीजी तीव्रतेने म्हणाले. "नागपूरला तार करून टाक."

"ठीक आहे. करतो तार" असं म्हणून महादेवभाई निघून गेले. गांधीजींच्या

उपवासाच्या बातम्या त्याच दिवशी संध्याकाळच्या वृत्तपत्रांनी ठळक अक्षरात प्रसिद्ध केल्या.

गांधीजींनी उपवास सुरू केला. हा आश्रमाच्या जिव्हारी बसलेला घाव होता. सारा आश्रम विव्हल झाला. ज्यांच्यामुळं आश्रमात जे घडू नये ते घडलं होतं त्या तरुणतरुणींना तर गांधीजींना तोंड दाखवायची लाज वाटू लागली. वेंकटचा पत्ता नव्हता.

उपवासाचे दिवस वाढत होते. आणि त्याच वेळी आसामात हिंदु-मुसलमानांच्या दंग्यानं पेट घेतला. मोतीलाल, जवाहरलाल, न चिं. केळकर यांची पत्रं येऊन पडली होती. चरखासंघाच्या अधिवेशनला मार्गदर्शन करायचं होतं. पण सगळी कामं गांधीनी दूर सारली. राजकारणाच्या आखाड्याचं दार एक आठवड्याकरता बंद करून टाकलं आणि केवळ ईशचिंतनात आणि आत्मसंशोधनात ते आपला वेळ घालवू लागले.

पाच दिवस असे गेले. बापूजींना अशक्तपणा वाटू लागला. सहाव्या दिवशी बा दुपारच्या आल्या. कटोऱ्यात भाताची पेज आणली होती त्यांनी. कटोरा समोर ठेऊन त्या बसल्या आणि म्हणाल्या,

"किती शिणाल लोकांच्यासाठी? एवढी पेज घ्या."

गांधीजींनी हातांनीच नको म्हणून सांगितलं, आणि म्हणाले-

"महादेवाला पाठवून द्या."

महादेवभाई आले. त्यांना गांधीजींकडं पाहून भडभडून आलं. कोपऱ्यात तोंड करून त्यांनी हळूच ओघळणारा अश्रू पुसून टाकला. गांधीजी म्हणाले, "महादेव, कीव करण्याइतका लाचार मी झालो का रे? अरे, उपवास मी करतोय. समजून उमजून करतोय. चल, ते बायबलचं पुस्तक घे. अन् मला वाचून दाखव."

महादेवभाई बायबल वाचू लागले. गांधीजी शांतपणे पडून होते. महादेवभाईंच्या मुखातून बायबलचा एकेक शब्द स्वच्छ येत होता. डोळे मिटून गांधीजी ते ऐकत होते. अर्धा एक तास गेला आणि कुटीच्या दारात कुणाची तरी सावली दिसली, म्हणून महादेवभाईंनी इकडं तिकडं पाहिलं. पण कुणीच दिसेना, महादेवभाई पुन्हा वाचन करू लागले. तर जराशानं तोच प्रकार. म्हणून ते उठून बाहेर गेले; आणि त्यांनी पाहिलं तर तिथं वेंकट उभा. भिंतीला पाठ लावून भ्यालेल्या पालीसारखा वेंकट उभा होता. त्याच्या डोळ्यांत भीती होती. महादेवभाईंना बघताच वेंकट पुढं येऊन म्हणाला-

"मला बापूजींना भेटायचंच."

काहीशा क्रोधानं महादेवभाई म्हणाले, "तुला तोंड आहे का बापूजींना भेटायला?"

"भाई, माझी खात्री आहे, बापूजी मला क्षमा करतील."

"चल आत मग, आणि नाक घास त्यांच्यापुढं" महादेवभाई म्हणाले. पावलांचा आवाज न करता वेंकट आत आला आणि हात दुरमडून गांधीजींच्या समोर उभा राहिला. गांधीजींचं तोंड भिंतीकडं होतं. त्यांनी तसंच विचारलं,

"महादेव, वाचन बंद का केलंस?"

"बापूजी, वेंकट आलाय."

"गांधीजींनी तोंड फिरवून त्यांच्याकडं पाहिलं मात्र, वेंकट हमसाहमशी रडू लागला. त्याचा शोकावेग संपेपर्यंत कुणीच काही बोललं नाही. पैरणीच्या बाह्यांनी आपले गाल पुसत मग वेंकट म्हणाला, "बापूजी, चुकलो मी."

"इतके दिवस कुठं होतास?" गांधीजींनी तीव्र स्वरात विचारलं.

"पळून गेलो होतो."

"का!"

"लाज वाटली."

"कशाची?"

"ते आपल्याला माहीत आहे."

"मग का आलास?"

"चूक कबूल केल्याशिवाय चैन पडेना. वर्तमानपत्रात तुमच्या उपवासाच्या बातम्या वाचल्या."

"मग काय वाटलं?" महादेवभाईंनी उपरोधानं विचारलं.

"महादेव त्याच्यावर चिडू नको. तो काहीतरी वाटून परत आलाय ना. बस्स झालं."

"बापूजी, इतका रागराग करण्याइतका अपराध माझ्या हातून घडला नाही. मी फक्त मनमोहनच्या शेतावर जात होतो."

"वेंकट..." गांधीजी ओरडले. त्यांना धाप लागली होती.

"अपराध हा अपराध असेल तर त्याला प्रमाण नसतं. छोटा किंवा मोठा असला तरी तो अपधराच आहे. अरे, आभाळातून पडणाऱ्या विजेची रेषा स्पर्शून गेली काय किंवा विजेचा लोळ अंगावर पडला काय, अपाय होणारच. त्याला उपाय केलाच पाहिजे."

"बापूजी खरंच चुकलो मी. पण तुम्ही उपवास सोडा."

"उपवास सोडू? कसा सोडू वेंकट?"

"माझ्यासाठी सोडा बापूजी."

"अरे आज एका वेंकटसाठी सोडला, उद्या एखादा राघव निघेल, परवा एखादा गिरिधर निघेल... तुमच्या या अवखळ कृत्यांसाठी शासन मला घेतलंच पाहिजे."

"बापूजी, उपवास मी करतो."

"छे छे, वेंकट हा दुनियेचा रिवाजच आहे. आलिशान घरात राहणारे राहतात, मजा करतात, खिदळतात. पण भार जमिनीलाच वहावा लागतो."

"बापूजी!"

"होय वेंकट. तू चुकलास. तुझ्याकडून माझी अशी मुळीच अपेक्षा नव्हती. पण ठीक. तुला पश्चात्ताप तरी झाला. माझ्या आश्रमाच्या या स्वप्नभूमीत आणखी किती चोरटी पापं घडताहेत कुणास ठाऊक! त्या साऱ्यांच्या परिमार्जनासाठी हा उपास आहे बरं. केवळ तुझ्यावरचा राग म्हणून नव्हे."

"ते काही असो. बापूजी, आज तुम्ही उपास सोडलाच पाहिजे."

"वेंकटा, ते होणे नाही."

"बापूजी, तेच होणे आहे." वेंकट निश्चयानं म्हणाला. आता तो जरा धीट झाला होता. एकदम गांधीजींच्या पायांशी पडून त्यांचे पाय घट्ट धरले आणि तो म्हणाला,

"बापूजी, ठरवल्याप्रमाणे उद्या सातवा दिवस आहे. तुम्ही उद्या उपोषण सोडलंच पाहिजे. नाहीतर... नाहीतर मी उपोषणाला बसेन. मला वचन द्या."

महादेवभाईंना तेच हवं होतं. मागे कस्तुरबा आणि नरहरीभाई येऊन उभे होते. कस्तुरबा हळूच म्हणाल्या-

"पश्चात्तापानं पावन होतात माणसं."

"मग काय उपास सोडू म्हणता?" गांधीजींनी हसून विचारले.

"आणखी वेगळे शब्द कशाला हवेत?"

दुसऱ्या दिवशी सकाळीच सारे गांधीजींच्या कुटीत जमले. महादेव, नरहरीभाई, कस्तुरबा, अनसूयाबेन...

आणि वेंकटनं पुढं केलेला मोसंब्याच्या रसाचा पेला गांधीजींनी तोंडाला लावला. साऱ्यांनी निःश्वास सोडले. त्या निःश्वासात संकट टळल्याची भावना होती.

वेंकट गांधीजींकडं पाहून समाधानानं हसत होता.

❖

# नऊ

पठाणकोट एक्सप्रेसच्या तिसऱ्या वर्गाचा डबा. गांधीजी, महादेवभाई, नरहरीभाई, एका बाकावर बसले होते. गौहत्ती काँग्रेससाठी सगळ्यांना जायचं होतं. पण वाटेत दहापाच ठिकाणी तरी उतरावं लागणार होतं. अमरावती, नागपूर, गोंदिया या ठिकाणांना भेटी द्यायचं ठरलं होतं. राजेंद्रबाबू, सरदार पटेल, दिल्लीला येऊन मिळणार होते.

सोरभोग स्टेशन आलं आणि गाडीचा वेग मंदावला. फलाटाला येऊन गाडी चिकटली तेव्हा स्टेशनचा चेहेरा एखाद्या सुतकी माणसासारखा दिसत होता. कुणालाच काही कळेना. महादेवभाईंनी खिडकीबाहेर डोकं काढून पाहिलं. सर्वत्र शान्तता. लोकांचे घोळके काहीतरी कुजबुजत चर्चा करीत उभे होते.

वर्ध्याहून जमनालाल बजाज यांच्याकडून चिठ्ठी घेऊन एक माणूस आला.

"स्वामी श्रद्धानंदांचा खून झाला आहे. आपण वर्ध्यालाच यावे."

चिठ्ठीतल्या मजकुराची ती अक्षरं महादेवभाईंच्या डोळ्यापुढं वेडीवाकडी नाचू लागली. त्यांनी थरथरत्या हातानं तो कागद गांधीजींच्या हाती दिला. गांधीजींच्या हातातली काठी डब्याच्या फरशीवर दाणकन आदळून तिचा विचित्र आवाज झाला. गांधीजींनी ती चिठ्ठी हातात तशीच ठेवली आणि आपल्याशीच पुटपुटले,

"असं काहीतरी होणार, असं वाटतच होतं मला."

"कशावरून?" महादेवभाईंनी विचारलं.

"स्वामीजी सहा महिन्यापूर्वी आश्रमात आले होते. आठवतं?"

"हो आठवतं."

"त्यांना खुनाच्या धमकीची पत्रं येतात, असं त्यांनी सांगितलं होतं मला.

चल महादेव. आता आपण वर्ध्यालाच जाऊ.''

वर्ध्याला त्या रात्री मोठी सभा भरली. स्वामीजींच्या मृत्यूची छाया अवघ्या सभेवर पसरलेली होती. सर्व जातीजमातींचे लोक भक्तीभावानं गांधीजींचं भाषण ऐकायला जमले होते. विलक्षण तळमळीनं ते भाषण करीत होते. स्वामीजींचा खुनी अब्दुल रशीद हा होता. हिंदूंना सहनशीलतेचं आवाहन करून मग ते म्हणाले-

''मुसलमान बंधूंनीही विवेक दाखवायला हवा. सुरा आणि पिस्तुल यांचा मन मानेल तसा उपयोग करण्यासाठी त्यांचे हात शिवशिवत असतात; ही वस्तुस्थिती आहे. तुम्ही हातात जी तलवार घेता ती तलवार हे काही इस्लामचे प्रतीक नव्हे. पण तलवारीचेच जिथे प्रस्थ आहे आणि होते अशा वातावरणात इस्लामचा जन्म झाला. वातावरण प्रतिकूल असल्यामुळेच येशूचा संदेश मातीमोल ठरला, महंमदाचा संदेश धुळीला मिळाला आणि मुसलमानांनी हे ध्यानात घ्यावे की त्यांना शस्त्राची आजसुद्धा फार चटक आहे. इस्लामचा अर्थ आहे शान्ती; तो खरा असेल तर मुसलमानांनी आपली शस्त्रे म्यान करायला हवीत. स्वामीजींचा वध झाला, या नीच कृत्याबद्दल मुसलमानांना मनातून आनंद होत असेल, तर ती त्यांच्या आणि जगाच्या दृष्टीने एक आपत्तीच ठरेल. तलवारीवरील श्रद्धा ही परमेश्वरावरील श्रद्धेशी सर्वथा विसंगत आहे. मुसलमानांनी एकमुखाने, प्रांजलपणे या नीच कृत्याचा निषेध केला पाहिजे.''

टाळ्यांचा कडकडाट झाला. स्वामी श्रद्धानंदांची तेजस्वी मूर्ती मनात साकार करीत जमावातले लोक घरोघर निघून गेले.

गौहत्ती काँग्रेसला मालवीयजी भेटले. त्यांनी गांधीजींना पाहताच धावत येऊन मिठी मारली आणि ते म्हणाले-

''आज मी तुमचं मनापासून अभिनंदन करतो. तुम्ही केलेल्या भाषणाचा वृत्तांत वाचला. मुसलमानांच्या बाबतीत प्रथमच तुम्ही इतक्या परखडपणे बोललात. तुमच्या अशा वक्तव्याचीच आज जरूर आहे.''

''मालवीयजी'' गांधीजी म्हणाले, ''मी कुणाला दूषणही देत नाही, आणि कुणाला उगाच भूषवीत नाही. वस्तुस्थिती पाहून माझं सत्त्वप्रिय मन मला जे सांगेल ते मी बोलतो.''

''खरं आहे. पण आपल्या सत्त्वप्रियतेचा फायदा हिंदूपेक्षा मुसलमानांचाच अधिक मिळतो, असं लोक म्हणतात.''

"लोक भावनावश असतात. आपल्याला इतकं ज्वालाग्रही असून चालायचं नाही. थंड डोक्यानंच विचार करायला हवा."

"अब्दुल रशीदच्याबाबत आपला कौल काय आहे?'

"त्याला मुक्त करावा."

"काय?" मालवीयजी आश्चर्याने म्हणाले.

"होय होय. मीच बोलतोय. त्याला मुक्त करावा."

"आपला निर्णय भयंकर आहे."

"मालवीयजी, समजा सारं अंग सडलंय, पायाचं बोट कापून काही उपयोग होईल का? राहू दे ना त्या बिचाऱ्याला. त्यापेक्षा रक्तशुद्धीसाठी प्रयत्न करणं चांगलं."

"मोहनदासजी, आपलं म्हणणं तत्त्वदृष्ट्या अत्यंत उचित आहे. पण सर्वसामान्य नीतीनियम समाजभूमीत रुजविण्यासाठी नियम आणि कायदे यांच्या नांगराचा फाळ त्या जमिनीच्या पोटात खोलवर घुसवावा लागतो. बी कधी आपणहून रुजत नाही. कितीही चांगलं असलं तरी."

"मालवीयजी आपलंही म्हणणं बरोबर आहे. पण इथं तर जमीनही नाही, खडक आहे. आधी तिथं जमीन निर्माण करण्याचा प्रयत्न करू या. विनाकारण त्या बीजांना त्रास का?"

"मोहनदासजी, आपण आपल्या तत्त्वाशी प्रामाणिक राहावं हे ठीकच आहे. त्यातच आपला गौरव आहे. पण ही तत्त्वं पेलण्याइतका हा समाज अजून घडलेला नाही. अब्दुल रशीदला सोडलात तर काही जणांना आनंदाच्या उकळ्या फुटतील तर काहीजण पिसाळून जातील."

"मालवीयजी, कुणी पिसाळेल किंवा कुणी उधळेल म्हणून मी थांबणार नाही. मला जे बोलायचं ते मी बोललो आहे. आता जे करायचं तेच करणार."

"बरं ते असो. आमच्या विद्यापीठात तुम्ही येणार की नाही?"

"येणार ना. अवश्य येणार. आता परतताना आपण बनारसवरून जाऊ."

इतका वेळ चाललेल्या अप्रिय वादामुळे दोघांचेही चेहेरे गंभीर दिसत होते; ते आता उजळले आणि प्रसन्न हसून मालवीयजी निघून गेले.

"महादेव, आता काय कार्यक्रम आहे?" गांधीजींनी विचारलं.

"बापूजी आता बिहार, मध्यप्रांत, आणि खानदेशात दौरा."

"सगळीकडं पत्रं गेली आहेत?"

"हो."

“टिळक स्वराज्य फंडाबाबतची माहिती बरोबर घ्या. आपल्याला प्रश्न विचारले तर उत्तरं द्यावी लागतील.”

“माहिती घेतलेली आहे बापू.”

जळगावच्या सरकारी कचेरीसमोरच्या पटांगणात सभा भरली होती. हरिजन फंडासाठी आणि खादी प्रचारासाठी गांधीजी ठिकठिकाणी भ्रमण करीत होते. जळगावची सभा एक त्यातलीच होती. गांधीजींना देण्यासाठी हजारो हात पुढं झाले. लोक पै पै आणि मूठ मूठ देत होते. गांधीजी घेत होते.

पांढरा शुभ्र साफा, कपाळी दुबोटी नाम, गुडघ्यापर्यंत कोट, स्वच्छ धोतर आणि पायात पुणेरी लाल जोडा अशा वेषातली एक व्यक्ती पुढं आली आणि तिनं गांधीजींच्या हातात एक कागद ठेवला. गांधीजींनी उघडून पाहिला. पाच हजार रुपयांचा चेक होता. हरिजनकार्यासाठी.

“आभारी आहे मी आपला.” गांधीजी कृतज्ञतनं म्हणाले. “पण आपला परिचय?”

“मला दिवाणबहादूर चौधरी म्हणतात.”

“हो हो. ऐकलं होतं मी. आपण मोठे रईस आहात.”

“हो.”

“मला आपण तर याहून अधिक देणगी द्यायला हवी.”

“देईन. अवश्य देईन. पण लोकांचं दान लोकांच्या चरणी रुजू होत नाही असा दावा आहे लोकांचा.”

गांधीजींनी दिवाणसाहेबांकडं चमकून पाहिलं. महादेवभाई दोन पावलं पुढं सरकले.

“आपल्याला काय म्हणायचंय?” गांधीजींनी शांतपणे विचारलं.

“मि. गांधी” दिवाणबहादुर थोड्याशा आढ्यतेनंच म्हणाले, ‘टिळक स्वराज्य फंडाचे हिशेब नीट नाहीत अशी बोलवा आहे.”

“आपलं म्हणणं अर्धसत्य आहे. पै न पैचा हिशोब आहे.”

“पण त्यात गफलत आहे.”

“आहे. शक्य आहे.”

“पण हे माहीत असूनही...”

“दिवाणबहादूर, आभाळातून पडणारं पावसाच्या धारेचं स्वच्छ पाणी धरलंत तरी येताना हवेतली धूळ त्यात मिसळते. ते पाणी किती घाण असतं?

गढूळ असतं? त्याला आपण फेकून का देतो!''

''आपल्याला काय म्हणाचंय?''

''अशाप्रकारच्या अपराधांना काँग्रेसचाही अपवाद नाही. आपण एवढे किमान दोष गृहित धरले पाहिजेत.''

''पण दोष आहेत हे समजूनही आपण चिटणीस, खजिनदार यांना कधी जाब विचारलात?''

''चिटणीस आहेत जवाहरलाल आणि खजिनदार आहेत जमनालाल बजाज. दोघांचंही चारित्र्य संशयातीत आहे.''

''त्यांचं चारित्र्य ही आपली एकट्याची ठेव नव्हे, शुद्धतेबद्दल ग्वाही द्यायला.''

''आपला विश्वास नसेल तर आपणही हिशेब तपासून पाहू शकता.''

''दिवाणबहादुर, हिशेब लिहिण्यात आणि तपासून घेण्यात पराकाष्ठेची काळजी घेतली होती. घडलेली गफलता ही केवळ नजरचूक आहे. अपरिहार्य आहे. मुद्दाम केलेला कट नव्हे.'' गांधीजींचा स्वर आता काहीसा तीव्र होऊ लागला होता.

''महादेव, मला थोडंसं पाणी दे प्यायला'' ते म्हणाले.

महादेवभाईंनी पुढं केलेला पाण्याचा पेला गांधीजींनी तोंडाला लावला. महादेवभाई दिवाणबहादुरांना म्हणाले,

''बापूजींना बोलताना फार त्रास होतो. कृपा करून त्यांना त्रास होईल असं काही बोलू नका.''

''ठीक आहे येतो मी.'' असं म्हणून दिवाणबहादुर चौधरींनी तोंड फिरवलं आणि ते तावातावानं चालू लागले.

''थांबा'' गांधीजी म्हणाले.

गांधीजींनी तो चेकचा कागद हातात घेतला आणि चौधरी उभे होते तेथपर्यंत जाऊन त्यांनी तो त्यांच्या हातात दिला.

''हा चेक आपण घेऊन जा.''

''एकदा दिलेलं धन मी परत घेत नसतो.'' दिवाणबहादुर भुवया उंच करीत म्हणाले.

''मग राहू द्या. मलाही त्याचा स्वीकार करता येणार नाही.'' गांधीजींनी प्रत्येक शब्दावर जोर देत सांगितले.

दिवाणबहादुर निघून गेले. वेंकटनं एक तार महादेवभाईंच्या हातात ठेवली.

चेकचा तो पिवळसर तांबूस कागद टेबलावर तसाच फडफडत होता. संध्याकाळ संपून अंधार जमिनीवर उतरू लागला होता. एकुलती एक गॅसची बत्ती तिथं अंधार पिंजत उभी होती. गांधीजींचा चेहेरा खूप दमल्यासारखा दिसत होता. त्यांचं मन कसल्यातरी खोल वेदना सोसत असावं असं दिसत होतं. मनावर होणारे आघात चहेऱ्यावर येऊ न देण्याचा ते कसोशीनं प्रयत्न करीत होते. दिवाणबहादुर चौधरींच्या प्रत्येक शब्दातील ती धार, तो तिरस्कार, ती जळजळ अजून मनातून जाईना.

मोटारीतून निवासात जाऊन पोचले तरी गांधीजी अस्वस्थ होते. महादेवभाईंनी विचारलं,

"बापूजी आपल्याला एवढं अस्वस्थ झालेलं मी कधीच पाहिलं नाही. एवढं काय मनाला लावून घेता?"

"महादेव, चारित्र्यावर घाला आला की वज्रकठोर पुरुषांची हृदयं दुभंगतात."

"बापूजी, तो चेक का घेतला नाही?"

"महादेव, तो घ्यायलाच नको होता. अरे, नजर गेलेलं अन्न पचत नाही म्हणतात ना, तसं अविश्वासाचं धन उपयोगी नाही यायचं. त्याचा त्यागच केलेला बरा."

वेंकट पुन्हा आला आणि त्यानं सांगितलं,

"जमनालाल आलेत."

जमनालाल गांधीजींच्या शेजारी येऊन बसले आणि म्हणाले,

"आज मी अगदी वेगळ्या कामासाठी आलोय."

"ओळखलं मी."

"सांगा पाहू."

"मणिलालचं वधू संशोधन."

"बरोबर ओळखलंत."

"मुलगी कुठली?"

"अकोल्याची मश्रुवाला कुटुंबातील."

"मणिलालला पसंत आहे?"

"आहे. आपली संमती घ्यायला आलोय."

गांधीजी हसून म्हणाले-

"जमनालाल, हे चांगलं आहे तुमचं. झाडाची फळं खाऊन झाल्यावर झाडाला परवानगी विचारताय होय?"

"बापूजी, जरी तुम्ही आणि मणिलालनं माझ्यावर हे नाजूक काम सोपवलेलं असलं तरी तुम्ही मणिलालचे वडील आहात."

"आमचा हात केव्हाही वरच आहे तथास्तु म्हणायला."

"मुलीचं नाव काय?" गांधीजींनी विचारलं.

"सुशीला."

"चांगलं नाव आहे. आता पुढचा बेत?"

"आपण असेच अकोल्याला चला. आम्ही बांना आणि इतरांना साबरमतीहून आणण्याची व्यवस्था करू."

"मणिलाल कुठं आहे?"

"तो नागपूरला आहे. परस्पर येईल अकोल्याला."

"वा: म्हणजे कट आधीच ठरलाय तर सगळा!"

"कट नाही, बेत."

"ठीक आहे. महादेव, आज सायंकाळी अकोला. आता आपण वऱ्हाडी मंडळी. या जमनालालच्या कृपेनं."

विशेष कधी न हसणारे जमनालाल खळाळा हसू लागले.

माणसांनी गच्च भरलेला मांडव आता हळूहळू रिकामा होऊ लागला होता. सकाळपासून उत्साहानं ताठ मानेनं उभ्या असलेल्या दारावरच्या केळीच्या पानांनी माना लवविल्या होत्या. येणाऱ्याजाणाऱ्याचं हसतमुखानं स्वागत करताकरता ती पानंही बिचारी जणु दमून गेली होती. सनईवाला कोपऱ्यात दमून घोरत पडला होता. मणिलालचा विवाह मोठ्या थाटामाटात साजरा झाला होता.

आता आवरासावरीला सुरुवात झाली होती. सकाळी गच्च भरून ठेवलेली पानाची तबकं विस्कटलेली होती. पानांचे देठ, विखुरलेल्या लवंगा आणि वेलदोड्याची सालं मळलेल्या बैठकींवर कुठंकुठं पसरली होती. तांबूस गालीच्यावर लोकांनी पुसलेली चुन्याची बोटं उठली होती. इतका वेळ गर्दी सहन करून तो मंडपही जणु भागला होता.

कस्तुरबांना धन्यता वाटत होती. निमित्तापुरता का होईना पण गांधीजींनी या लग्न समारंभात रस घेतला होता. खेळीमेळीनं ते वागले होते. जेवणाच्या पंक्तीत व्याह्यांना आग्रह करायला ते स्वत: उभे राहिले होते. नानाभाई मश्रूवालांना तर धन्यतेचं ओझं वागवणंच कठीण झालं होतं. गांधी कुटुंबाशी सोयरीक झाली. त्याक्षणीच ते स्वप्नातल्या स्वर्गभूमीत जाऊन दाखल झाले होते.

देवदास रामदास आगतस्वागत आणि पाठवणी करण्यात गुंतले होते. गांधीजींच्या अकोला भेटीची पर्वणी साधून त्यात आंघोळ करायला आसपासचे अनेक महाभाग आले होते. त्यांनी आता गांधीजींना घेरलं होतं. त्यांच्यापासून गांधीजींना वाचवता वाचवता महादेवभाईची तारांबळ उडत होती. कस्तुरबा वरपक्षाकडच्या जानोस घरात एका भिंतीला टेकून डोळे मिटून स्वस्थ पडल्या होत्या. दिवसभराचा चित्रपट त्यांच्या पापण्यांच्या आडून झराझर पुढं सरकत होता. नेहमीच्या रीतीरिवाजांप्रमाणे लग्नसमारंभ करायला गांधीजींनी विरोध केला नव्हता. जेवणावळी उठल्या होत्या. सनई-चौघडे वाजले होते, मानपान झाले होतं. पक्वान्नांचे वास दरवळत होतं, सारं सारं कसं जनलोकांप्रमाणे घडलं होतं. स्वत: गांधीजींनी मात्र पक्वान्नाला स्पर्शदेखील केला नव्हता. एवढा मोठा मुदपाकखाना निरनिराळ्या खमंग वस्तूंनी भरला होता, पण गांधीजींनी चवदेखील पाहिली नाही. ते त्या सबंध जेवणावळीत फक्त दोन पेले मठ्ठा प्याले. तरीही इतरांनी लग्नसमारंभाचा आनंद लुटायला त्यांची परवानगी होती. ते स्वत:ही स्वत:ची राहणी कायम ठेवून जेवढं मिसळता येईल तेवढं लोकांत मिसळत होते.

गांधीजींनी पंक्तीत यावं म्हणून साऱ्यांनीच आग्रह धरला. तेव्हा गांधीजी उठले. कस्तुरबाईंनी त्यांच्या हातात एक चांदीचं ताट दिलं. त्या ताटात माहीम हलवा आणि कोरडे गुलाबजाम होते. मांडवात प्रवेश करण्यापूर्वी कस्तुरबा गांधीजींना म्हणाल्या-

"अहो, एवढं सगळं करताहात. आता आणखी एक करा ना."

"बोला. काय करू?"

"हा पंचा... उघडं अंग..."

"मग काय म्हणता?"

"नवीन धोतर नेसा चांगलं. घोट्यापर्यंत. देवदासनं आणलेली ती काश्मीरी शाल पांघरा आणि मग जा पंक्तीत."

गांधीजींची चर्या एकदम बदलली. ते म्हणाले,

"असं करायला आपण का सांगता?"

"वाईट दिसतं म्हणून!"

"कुणाला? तुम्हांला की लोकांना?"

"मलाही आणि लोकांनाही. हा लग्नसमारंभ आहे. दाराशी जमलेले भिकारीसुद्धा अंगभर कपडा लेवून आलेत."

"मग त्यांच्यापेक्षा मी भिकारी आहे असं समजा."

"आई, जाऊ दे, बापूजींना सांगण्यात काही अर्थ नाही, एखाद्यावेळी बर्फालासुद्धा आग लागू शकेल पण बापूजी आपलं मत सोडणार नाहीत." देवदास हंसत हंसत म्हणाला.

हा आणि असे अनेक प्रसंग कसतुरबांच्या मिटल्या डोळ्यांसमोरून सरकत होते. दिवसभराच्या ऊठबशीनं शरीर गळाठून गेलं होतं. तरी एक प्रकारचं सुख त्यातही वाटत होतं. किती तरी दिवसांनी मुलं माणसं, गणगोत, गाजावाजा, हंसणं-खिदळणं या निमित्तानं झालं होतं. गांधीजींच्या राजकीय जीवनाच्या कोलाहलात कस्तुरबांना कौटुंबिक आयुष्याचे असे सुखद सूर क्वचितच ऐकायला मिळत असत. ते आज मिळाले होते. त्या आनंदानंच त्यांच्या पापण्या जडावल्या होत्या.

देवदास काही तरी विचारायला म्हणून समोर येऊन उभा राहिला तरी त्यांचं लक्ष गेलं नाही. त्यांचे डोळे अजून ती गतिमान चित्रं पाहण्यात विलक्षण गुंगून गेले होते.

गजबजाट, हंड्याझुंबर, उपाध्यायांनी म्हटलेले वेदमंत्र, सनईचे सूर, विविध वेषातली तरुण-वृद्ध माणसं, पक्कान्नांच्या थाळ्या, हास्यविनोद...

पण या साऱ्यात हवा असणारा माणूस तिथं नव्हता... तो दूर कोपऱ्यात उभा होता. किट्ट अंधारात बुडाला होता. फक्त मायेच्या माणसालाच दिसला असता, बाकी कुणाला दिसला नसता. दिसला असता तर कुणी भिकारी समजून उष्ट्या पत्रावळीही त्याच्यापुढं केल्या असत्या... कस्तुरबांनी त्याला ओळखला. पक्षिणीनं पिलाकडं धाव घेतली. आईचं काळीज हललं. त्या जोरानं ओरडल्या,

"हरिलाल, अरे ये रे पुढं. असा अंधारात उभा का?"

त्याची काहीच हालचाल दिसेना. तो मख्ख पुतळ्यासारखा उभा होता. त्याचा चेहेरा भेसूर दिसत होता. पण डोळ्यात गरिबी होती. मधेच त्या गरीबगाय चेहेऱ्यावर क्रोधाची एक लाट उसळून गेली...

कस्तुरबांनी पाहिलं. गांधीजी इकडून तिकडे जात होते. त्यांना पाहूनच त्याच्या चेहेऱ्यावर क्रोध उमटला.

त्याचं पोट खपाटीला गेलं होतं. मणिलाल कसा सुरेख दिसत होता. देवदास तर संतुष्ट होता. रामदासही शुभ्र, स्वच्छ वेषात होता. आणि हा! हा त्यांचा भाऊच. अगदी सख्खा. एकाच वृक्षाच्या या चार फांद्या. पण तीन

लहडलेल्या तर ही एकच सुकी, निष्पर्ण, वाळलेली, ओसाड. कस्तुरबांना ते पाहवेना. त्यांनी हरिलालला हळूच खुणावलं.

"ये हरिलाल. अरे, तुझ्या भावाचं लग्न ना! बघ, सगळी माणसं कशी मजेत आहेत. ये. तू पण येरे बाळा. हो. मी तुला बाळाच म्हणणार. मुलगा कितीही मोठा झाला तरी आपल्या आईला तो लहानच दिसतो. ये, आज मी तुला स्वच्छ न्हाऊ घालते. किती दिसांचा भुकेला असशील! चांगलं पोटभर गोडधोड जेव. संन्याशासारखा या गावाहून त्या गावाला कुठं हिंडत असतोस बेटा! अरे, वडलांचं पटत नाही तर आईवर सूड का? ये. पुढं ये. असा प्रकाशात ये. मला की नाही अलीकडं दिसत नाही, म्हणून तुला हाताला धरून आणायला त्या काळोखात मी येत नाही. नाहीतर तशीही आली असते."

हरिलालचं खरं नाव हिरालाल. पण कस्तुरबा त्याला लाडानं हरिलाल म्हणायच्या. हरिलालची काहीच हालचाल दिसेना. तशी मग कस्तुरबा जोरानं ओरडल्या,

"हिरालाल..."

आणि आपल्याच आवाजानं त्या दचकून जाग्या झाल्या. समोर देवदास उभा होता.

"काय झालं आई? भाईची याद आली का?" देवदासनं मृदु स्वरात विचारलं.

"होय बेटा. आज मी सुखात आहे. पण तो कुठं आणि कसा असेल ते परमेश्वरालाच ठाऊक." असं म्हणताना पापणीचे बांध फोडून आसू टपाटप ओघळले आणि कस्तुरबांच्या गालांवरून ते वाहू लागले. पण व्याही मंडळी आता भेटायला यायची होती. प्रसंग ओळखून त्यांनी चट्‌कन पदरानं आपलं तोंड पुसलं आणि दु:खाला आणि वेदनेला पुन्हा हृदयाच्या खोल कप्प्यात कोंबून हास्याचा बेमालूम मुखवटा चढवला.

देवदासनं कस्तुरबांच्या हाताला धरून हळुहळू त्यांना मांडवात आणलं. आता प्रयाणापूर्वी एकमेकांचे निरोप घ्यायचे होते. सुशीला आणि मणिलाल कस्तुरबांच्या पाया पडले. त्यांनी दोन्ही हातांनी सुनेला उठवलं. एकदा सूनमुख डोळे भरून पाहून घेतलं.

सुशीला आणि मणिलाल गांधीजींच्या पाया पडले. गांधीजींनी आशीर्वाद दिला-

"भाग्यवती भव."

आणि मग महादेवभाईंना ते म्हणाले,

"महादेव, अरे हे दोघं आता नंदनवनाचे प्रवासी. आपल्याला फार वेळ इथं थांबून चालायचं नाही. आपला प्रवास कुठला ते सांग पाहू?"

महादेवभाईंनी डायरी काढली आणि तिची पानं उलटत ते म्हणाले, "बापूजी, फैजपूर, कर्नाटकात हुदली आणि पुणं एवढा प्रवास आहे आपला. आता निघायलाच हवं."

व्याही माश्रुवालांनी गांधीजींना दृढ आलिंगन दिलं आणि करुण गदगद स्वरात ते म्हणाले,

"तुमच्या घराण्याशी आमचं नातं जोडलं गेलं हे माझं भाग्य समजतो मी. मुलगी तुमच्या ओटीत घातली आहे. संभाळा." गांधीजी त्यांच्या पाठीवर थोपटत म्हणाले,

"नाती योगायोगांनं जुळतात. ती टिकवायची आणि वाढवायची असतात, प्रयत्नांनी ! आणि हे पहा, मुलगी संभाळणारा मी नाही. तो सगळा मक्ता आम्ही यांच्याकडे दिलाय. कारण आम्हालाच या संभाळतात." असं म्हणून गांधीजींनी कस्तुरबांच्याकडं निर्देश केला. तेव्हा सगळे मनमुराद हसले आणि उगाचच निर्माण होणाऱ्या गंभीरतेला फाटा मिळून वातावरण हलकंफुलकं झालं.

साऱ्यांचा निरोप घेऊन गांधीजी वाड्याच्या उंबऱ्याबाहेर पडले. दोनचार दिवस लौकिक जीवनाच्या व्यवहाराला त्यांनी बहाल केले होते ते संपले. त्या जीवनाच्या सरोवरात डुंबणाऱ्यांना तसंच मागं टाकून हा राजहंस आपल्या आवडत्या लोकमानस सरोवराच्या शोधार्थ पुन्हा बाहेर पडला.

गांधीजी मोटारीत बसले. मोटार सुरू होताच कस्तुरबा एकदम पुढं आल्या आणि म्हणाल्या,

"पंधरवड्यानं परत साबरमतीला या."

"का?"

"सूनबाईची तीथ आहे. हिरालालच्या बायकोची."

गांधीजींची मोटार वेगानं दूर दूर जात होती आणि कस्तुरबा तिची बारीक बारीक होत जाणारी प्रतिमा निरखीत होत्या.

❖

# दहा

फैजपूरच्या सभा आणि बैठकी आटोपून गांधीजी परत यायला निघाले. तेव्हा कर्नाटकातून हुदलीहून पत्र आलं होतं; गंगाधरराव देशपांड्यांचं. सेवा-संघाच्या अधिवेशनाची जय्यत तयारी सुरू होती. पण कस्तुरबांनी अकोल्याहून निघताना आठवणीनं साबरमतीला यायला सांगितलं होतं. म्हणून गांधीजी महादेवभाईंना म्हणाले, ''महादेव, आता प्रथम पुण्याला जाऊन साबरमतीला परत जाऊ आणि मग तिथून हुदलीला जाऊ. चालेल ना?''

''चालेल. पण वाटेत बेळगावला एक मुक्काम करायचा होता तो रद्द करावा लागेल.''

''कशासाठी?''

''तिथल्या कार्यकर्त्यांमध्ये दोन गट पडलेत. त्यांचं भांडण मिटवायला आपल्याला जायचंय. गेल्या महिन्यात ते लोक आले होते. तुम्हांला आठवत नाही बापू?''

''आता आठवलं. पण त्यांना पत्र टाक. म्हणावं हुदलीहून येताना आम्ही तुमची भेट घेऊ.''

''ठीक आहे. टाकतो पत्र.'' महादेवभाई म्हणाले.

पुण्याला आल्यावर श्रीनिवासशास्त्रीकडंच गांधीजींचा मुक्काम होता. दुपारपासून भेटायला येणाऱ्यांची ये-जा सुरू होती. चार वाजता वर्दळ जरा कमी झाली. शास्त्रीजी आणि गांधीजी बोलत होते. राजकारण, सत्याग्रह, ब्रिटिश सरकार यावर शास्त्रीजी आपली मतं सांगत होते. एवढ्यात काहीतरी आठवल्यासारखं करून गांधीजी उठले आणि शास्त्रीजींना म्हणाले-

''शास्त्रीजी, जरा मोकळा वेळ आहे तोवर आमचं नित्यकर्म उरकून घेतो.''

"कसलं नित्यकर्म? संध्या, जप वगैरे की काय?"

"छे छे. चरखा."

"चरखा? हे कसलं नित्यकर्म?"

"त्याच कामासाठी मी पुण्याला आलोय. सर्वांना भेटतोय."

"मोहनदासजी, एक अप्रिय बोलू का?"

"बोला ना. संकोच का?"

"तुमच्या चरखा कार्यक्रमावर माझा विश्वास नाही."

"पण माझा चरख्यावर पूर्ण विश्वास आहे."

"चरख्यासारख्या पोरकट गोष्टीत आपण उगाच वेळ दवडता."

"शास्त्रीजी, या भारतातला प्रत्येक माणूस नियमितपणे रोज सूत कातेल तर आपल्याला तत्काळ स्वराज्य मिळेल."

"ओ हो हो!" शास्त्री हसत म्हणाले, "मोहनदासजी हा तर फारच मोठा विनोद झाला. अहो, लुटुपुटीच्या तरवारी हातात घेऊन कुणी महायुद्धे जिंकलीत का? जगाचा इतिहास पहा जरा."

"इतिहास हाही अखेर माणसानंच घडवायचा असतो. चरखा ही एक संजीवनी आहे. ब्रिटिशांशी जुंपलेल्या युद्धात तीच आपल्याला तारेल."

"मोहनदासजी, स्वावलंबन हे चरख्याच्या कार्यक्रमाचं प्राणभूत तत्त्व असल्यामुळं तुम्ही म्हणता तसं कदाचित होईलही. पण केव्हा? या भारतातल्या प्रत्येक कळू लागलेल्या माणसाच्या हातात चरखा दिसेल तेव्हाच ब्रिटिशांच्या बंदुका इथून पळ काढतील. पण ती शक्यता मला फार कमी वाटते."

"आमच्या चरखा-संघाचं काम फार जोरात चाललंय."

"ते मीही वर्तमानपत्रात वाचतो. पण मला पटत नाही. चरख्याचा गाजावाजा होणं निराळं आणि चरख्याची शक्ती एकत्रितपणे निर्माण होणं निराळं. आत्ता फक्त गाजावाजा आहे."

"मला तसं वाटत नाही."

"तो तुमचा भ्रम आहे."

"असेलही कदाचित. पण मला माझ्या मार्गानं गेलंच पाहिजे."

"तसे आपण जाणारच; यात मला तिळमात्र संदेह नाही. पण तुम्ही ज्या मार्गानं विजयश्रीकडं जाऊ पाहता त्या मार्गावर एकएक अनुयायी तुम्हाला फसवा भेटेल आणि तुम्ही मागं वळून पाहिलंत तर तुम्ही असहायपणे एकटे असलेलं दिसेल तुम्हाला?"

"एकटा दिसेल कदाचित पण असहायपणे नव्हे. एकटेपणातलीच शक्ती मला अनुभवायची आहे."

"ठीक आहे. आपण उद्या यावर आणखी बालू. मला एका सभेला जायचं आहे. आपण येता?"

"नको. चरख्याची इतकी वकिली मी तुमच्याकडं केली आणि तो सोडून मी तुमच्याबरोबर आलो तर तुम्हीच पुढं मला कोंडीत पकडाल. आपण जाऊन या. तोपर्यंत मी सूत कातते."

शास्त्रीजी निघून गेले. गांधीजींनी आपल्या सामानाच्या पडशीतून चरखा काढला आणि छोट्या पत्र्याच्या डबीत ते पेळू पाहू लागले. पण पेळू संपले होते. सगळी पडशी उपसून पाहिली पण पेळू मिळेना. गांधीजी अस्वस्थ झाले. केवळ पेळू नसल्यानं आज सूत कातता येणार नव्हतं.

महादेवभाईंना गांधीजींची ही अस्वस्था जाणवली. त्यांनी विचारलं,

"बापू, काय शोधताय तुम्ही?"

"पेळू."

"पेळू संपले."

"संपले? मग आणखी आणून ठेवायचे नाहीत?"

"विसरलो."

"येतानाच जास्त का नाही घेतले बरोबर?"

"फैजपूरला संपले सगळे."

"महादेव, हे काय उत्तर झालं?"

"बापू, कधी कधी प्रवासात सामान फार होतं आणि मग चरखासुद्धा बरोबर घेण्याचं राहून जातं."

"असं होता कामा नये."

"पुन्हा नाही होणार बापू"

"पण आज मला सूत कातता येणार नाही त्याचं काय?"

"मी पेळूंची व्यवस्था करतो."

"कशी करणार?"

"पुण्यात आपले खूप कार्यकर्ते आहेत. त्यांच्याकडून आणतो."

"तुला खात्री आहे पेळू मिळण्याची?"

"तुम्हाला नाही?"

"मला विश्वास आहे, आशा आहे."

"मग झालं तर. आत्ता येतो." असं म्हणून महादेवभाई निघून गेले. ती संध्याकाळ त्यांनी हिंडण्यात घालविली. दुसऱ्या दिवशी सकाळीही ते घरोघर वणवण हिंडले. पुण्यात चरखा संघाच्या कार्याची मोठी जाहिरात होती. पुण्यातल्या कार्यकर्त्यांबद्दल इतरांना कमालीचा विश्वास होता. पण महादेवभाईंच्या पदरी निराशा आली. जसे गेले तसे हात हलवीत महादेवभाई परत आले. कालचा दिवस वाया गेला होता. आज तरी कताई करता येईल म्हणून चरख्याचं चाक नुसतंच हळूहळू फिरवत गांधीजी बसले होते.

अकरा वाजता उन्हाचा कडाका वाढल्यावर जड पावलं टाकत महादेवभाई आले. त्यांचा चेहेरा उतरला होता. पेळू आणण्यासाठी नेलेली पिशवी तशीच रिकामी होती.

"बापू, पेळू मिळाले नाहीत."

"कुठंही नाहीत? कुणाकडंही नाहीत?"

"नाहीत."

"याचा अर्थ काय होतो महादेव?"

"बापूजी..."

"याचा अर्थ एवढाच की माझे लेख मोठ्या आवडीनं वाचणारे, विचारांचा प्रचार करणारे प्रत्यक्ष आचरण करीत नाहीत. नुसतीच तोंडपाटिलकी आहे. कुणाचे हात काम करायला तयार नाहीत." गांधीजींच्या स्वरात त्यांच्या मनातली वेदना स्पष्ट होत होती.

दुपारच्या वेळी चरखा संघाचे काही कार्यकर्ते त्यांना भेटायला आले. शास्त्रीजींच्या निवासाच्या व्हरांड्यात हा छोटासा मेळावा भरला होता. गांधीजींच्या शेजारी शास्त्रीजीही बसले होते. गांधीजींनी विचारलं,

"आपण सारे क्रियाशील कार्यकर्ते आहात. आपल्यापैकी कोण कोण स्वत: सूत कातता?"

सर्वांनी हात वर केले.

मग गांधीजींनी विचारलं,

"आपल्यापैकी कोण कोण दररोज सूत कातता?"

एकही हात वर झाला नाही.

गांधीजी व्यथितचित्त झाले. शेजारी बसलेल्या शास्त्रीजींकडे निर्देश करून ते म्हणाले,

"कालच मी शास्त्रीजींबरोबर तुमच्या वतीनं भांडलो. आमचे कार्यकर्ते

दिखाऊ नाहीत, हाडाचे कार्यकर्ते आहेत, अशी तुमची तरफदारी केली मी. आपण सर्व लोकांनी मला तोंडघशी पाडलंय. शास्त्रीजींचा चरखा कार्यक्रमावर विश्वास नाही. ते तर प्रामाणिक आहेत. पण आपण? कार्यकर्ते म्हणवता आणि कार्य करीत नाही. मित्रांनो, ही शुद्ध फसवणूक आहे. तुम्ही मला खूष करण्यासाठी सूतकताईचं प्रदर्शन करता असाच याचा अर्थ होतो. आपल्याला प्रदर्शनासाठीच कार्य करायचं नसून उत्तम कार्याचं प्रदर्शन करायचं आहे.''

गांधीजी बोलणं संपवून खाली बसले तेव्हा त्यांचा चेहेरा विलक्षण थरथरत होता.

सभेतनं मधेच उठून गेलेला एक कार्यकर्ता धावत धावत आला. त्याच्या हातात कागदाचं आवरण असलेलं एक फडकं होतं. त्यानं ते आणून गांधीजींच्या पुढं ठेवलं. आणि तो म्हणाला,

''बापूजी, पेळू आणलेत. मी स्वत: तयार केले. काल भाई माझ्याकडं आले होते तेव्हा तयार नव्हते.''

गांधीजींनी वरचा कागद सोडून पेळू हातात घेतले. पेळू खरोखरीच दृष्ट लागण्यातके सुंदर होते. स्वच्छ, पारदर्शक. आणून देणाऱ्याकडं समाधानानं पहात गांधीजी म्हणाले,

''ज्या तत्परतेनं तुम्ही हे पेळू तयार केलेत त्याच तत्परतेनं रोज कताई केली पाहिजे. या तत्परतेला तुमच्या शारीरिक दुखण्याचाही अपवाद असता कामा नये. इतक्या पराकाष्ठेला जाऊन जेव्हा आपण कार्य करू तेव्हाच सामान्य माणसाला आपल्या कार्याबद्दल प्रेम वाटू लागेल.''

मघाचं वातावरण आता जरा बदललं होतं. सर्व कार्यकर्त्यांना हायसं वाटलं. गांधीजी म्हणाले,

''आज रात्री मी साबरमतीला जात आहे. तिथून कर्नाटकात जाईन, परतांना आपण सर्वांनी मला पुण्याच्या स्टेशनवर भेट द्या आणि येताना प्रत्येकानं स्वत: कातलेली पाच वार खादी घेऊन या. आहे मंजूर?''

''मंजूर.'' शे-शंभर आवाज एकदम उसळले.

स्टेशनवर गांधीजींना निरोप द्यायला लोक आले तेव्हा गाडी सुटताना हात उंच करून गांधीजी म्हणाले,

''लक्षात आहे ना? पंधरा दिवसानंतर प्रत्येकी पाच वार खादी! आणि अनेक हात त्या हाताला प्रतिसाद देण्यासाठी उंच झाले. गाडी दूर दूर गेली. ते पताकांसारखे उंच हात अजून खाली झाले नव्हते.

हुदलीच्या जमिनीवरून आज उत्साहाचे वारे वहात होते. त्या एवढ्याशा गावाता एरवी नेहमीच्या दिनक्रमात मशगुल असणारे लोक स्वगृही लग्नसमारंभ असल्यासारखे प्रसन्न होते. गांधी-सेवा-संघाचं वार्षिक संमेलन हुदलीला भरत होतं. हुदलीला तो आपला गौरव वाटत होता. गांधीजी येणार आणि ते येणार म्हणून आणखी बडी बडी मंडळी येणार. आपलं यजमानपद शोभलं पाहिजे आणि यजमानकृत्यात कुठं उणेपणा पडता कामा नये. हुदली उद्योगाला लागली होती. रात्रंदिवस मेहेनतीनं गावाबाहेर साधाच पण प्रशस्त मांडव उभारला होता; लोकांनी, हुदलीच्या पश्चिमेच्या गावालगत डोंगरटेकड्यांची रांग होती. टेकड्या हिरव्याचार वनश्रीनं बहरलेल्या होत्या. त्यात चरायला जाणारी पांढऱ्या रंगाची गुरंढोरं पाचूच्या बेटात शुभ्र मणी विखुरल्याप्रमाणे दूरवरून दिसत होती. या टेकड्यांच्या सावलीत मांडव उभा होता. गंगाधरराव देशपांडे जातीनं सारी व्यवस्था पहात होते. युद्धाच्या तळासारख्या छावण्या पडल्या होत्या. गांधीजींनीही छावणीतच राहणार असं सांगितलं होतं.

गांधीजी हिरालालभाईंच्या पत्नीची तिथी आटोपून साबरमतीहून आले. येताना त्यांच्याबरोबर कस्तुरबा, मणिबेन, महादेवभाई, नरहरीभाई सारे होते. सरदार पटेल, अब्दुल गफारखान, राजेंद्रबाबू एकेकजण येऊन दाखल झाले. एरवी शान्त आणि संथ असणाऱ्या हुदली गावाला आज यात्रेचं स्वरूप आलं होतं. तरीसुद्धा यात्रेतील बेशिस्त आणि गोंधळ तिथं नव्हता. शेकडो माणसं परकी येऊनही गावाचे व्यवहार नेहमीसारखेच सुरळित सुरू होते.

दिवस उन्हाळ्याचे होते. तरी टेकड्यांवरून येणारा मोकळा वारा मंडपावरून जात असल्यानं मंडपात उन्हाळा जाणवत नव्हता. बाहेर नजर टाकली तर मात्र डोळ्यांना उन्हाची धूप सहन होत नव्हती. दुपारी चारला अधिवेशनाला सुरुवात होऊन चर्चेचा उपोद्घात झाला. किशोरलाल मश्रूवाला आणि गफारखान तळमळीनं बोलले. विधायक कार्याकडं जास्तीत जास्त लक्ष दिलं पाहिजे याबद्दल कुणाचंच दुमत नव्हतं. गांधीजींनी आपला पुण्याचा अनुभव सांगितला.

घराबाहेर कधी फारशा न पडणाऱ्या स्त्रियाही आज मंडपात येऊन बसल्या होत्या. सर्वांच्या पुढं कस्तुरबा होत्या. संध्याकाळ अवतरू लागली होती. कोवळी उन्हं मावळत होती आणि मग काही वेळातच निसर्गाचं गोजिरवाणं रूप पालटलं. त्याच्या अंगात संचारलं. वाऱ्याच्या झुळुका जोरानं वाहू लागल्या. हळूहळू त्यांचं रूपांतर वादळात झालं. स्वच्छ आकाशात चमत्कारिक रंगाचे

ढग जमा होऊ लागले.

गंगाधरराव देशपांडे काळजीनं मंडपाबाहेर आले. धूळवारा चुकवीत डोळ्यांवर हात देऊन त्यांनी आकाशाकडे पाहिलं आणि त्यांच्या चेहेऱ्यावर चिंतेची जाळी उमटली. चार-पाचशे लोकांची सोय ऐनवेळी गावात कुठ करायची? उन्हाळ्याचे दिवस म्हणून लोकांनी कपडे, अंथरुण-पांघरूण बेताचेच आणले असणार. आणि उभारलेल्या या छावणीवर तर अक्षरश: पाणी पडणार. मनातल्या मनात त्यांनी पावसाची करुणा भाकली. पण ती ऐकू जायच्या आतच पावसानं ढग सोडून पृथ्वीवर पळायला सुरुवात केली.

चर्चा जवळजवळ संपलीच होती. पाऊस कोसळू लागला तशी मंडप ठिकठिकाणी गळू लागला. जागोजाग अभिषेकपात्रं लावल्यासारख्या धारा गळू लागल्या. तास दोन तास त्याच मांडवात न भिजता उभे राहिलेले लोक कंटाळले. गंगाधररावांनी पुढे जाऊन गावात नवीन व्यवस्था केली होती. काहीजण भिजत गेले. काहीजण अंगावर कांबळी घेऊन गेले.

गंगाधररावांनी एक छत्री आणली आणि ते म्हणाले,

"चला बापूजी गावाकडं."

"गंगाधररावजी, सगळ्यांची व्यवस्था झाली का?"

"होत आहे. साऱ्यांची व्यवस्था होईल."

"ठीक. सर्व कार्यकर्ते सुरक्षित पोचले, त्यांची व्यवस्था झाली म्हणजे शेवटी मी येईन. तुम्ही पुढं व्हा. गावाकडं जा." सरदार पटेल, राजेंद्रबाबू यांना घेऊन गंगाधरराव पुढं गेले. जाताना ते महादेवभाईंना म्हणाले, "बापूजींना लगेच घेऊन या."

सकाळी गंगाधरराव साऱ्यांची चौकशी करायला बाहेर पडले. राजेंद्रबाबू भेटले, सरदार दिसले. पण बापूजी कुठंच दिसेनात. म्हणून त्यांनी सरदारांना विचारलं,

"बापूजी रात्री आले नाहीत?"

"नाही."

"रात्रभर पावसात छावणीतच राहिले वाटतं?" असं म्हणून ते छावणीकडे गेले. पाऊस पहाटेचाच बंद झाला होता. तरी छावण्यांच्या ताडपत्र्या अजून ठिबकत होत्या. चिखलात पाय रुतत होता. गांधीजी छावणीतच होते. कुठला तरी एक पत्रा छावणीवर एका बाजूनं टाकून कसाबसा पावसापासून बचाव केला होता. बा आणि मणिबेन बापूंच्या खाटेशेजारीच जमिनीवर झोपल्या

होत्या. तशा गारठ्यातही त्यांना गाढ झोप लागली होती.

सकाळ झाली तेव्हा इतकं स्वच्छ ऊन पडलं होतं की, पावसानं रात्रभर थैमान घातलं असेल याचा मागमूसही लागत नव्हता. तरी पण खबरदारी म्हणून सर्व लोक शेजारच्याच कुमरी आश्रमात गेले आणि अधिवेशनाचं उर्वरित काम तिथं उरकलं.

अधिवेशन आटोपल्यावर बेळगावपर्यंत गंगाधरराव पोचवायला आले होते. स्टेशनवर निरोप घेताना ते व्यथितचित्तानं गांधीजींना म्हणाले,

"पावसानं घोटाळा केला. नाहीतर आमच्याकडून आम्ही चांगली व्यवस्था केली होती."

गांधीजी त्यांच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाले,

"एवढ्या अनपेक्षिततेची सवय कार्यकर्त्यांनी ठेवायलाच हवी. अशी संकटं उपकारक ठरतात."

गाडी सुटली. वेगानं पुण्याकडे धावू लागली. महादेवभाई गांधीजींना म्हणाले,

"बापूजी, पुण्याच्या स्टेशनवर आज तुम्हाला देणगी मिळायची आहे. प्रत्येकी पाचवार खादीची."

"महादेव, बघू या काय होतं ते."

पुण्याच्या फलाटाला गाडी लागली. पुण्यालाच ती रिकामी होणार असल्यानं माणसं उतरून धावत होती. पाचदहा मिनिटात फलाटावर शुकशुकाट झाला. वचनपूर्तीसाठी एकही कार्यकर्ता खादी घेऊन आलेला नव्हता. महादेवभाई, कस्तुरबा, मणिबेन यांना घेऊन गांधीजी मुंबईच्या गाडीत बसले. आणि डब्यातल्या एका कोपऱ्यात स्वस्थ पडून राहिले. त्यांच्या मनात गीता वाचली जात होती-

मा फलेषु कदाचन...

❖

# अकरा

साबरमती आश्रमावर दु:खाची छाया पसरली होती. आश्रमाचे सर्व कार्यक्रम नित्याप्रमाणे सुरू होते तरी आश्रमात कुठे चैतन्य आहे असं वाटत नव्हतं. आश्रमाचा एक निष्ठावंत सोबती आश्रमाला सोडून कायमचा निघून गेला होता. मगनलाल गांधींचं देहावसान झालं. गांधीजी तीन दिवस फक्त लिंबूरस आणि पाणी यावरच राहिले होते. आफ्रिकेतल्या फिनिक्स आश्रमापासून मगनलालनी गांधीजींना साथ दिली होती. संकटात आणि सुखात सावलीसारखी सोबत केली होती. मगनलाल आप्त होते. पण रक्ताच्या नात्यापेक्षा हृदयाचं नातंच अधिक दृढ झालं होतं.

मगनलालच्या करुणघन स्मृतीत गांधीजी विलीन झाले होते. गीतेच्या स्थितप्रज्ञ लक्षणांना पचवूनही प्रेमाचा नाजुक अंकुर वर डोकावतच होता. गांधीजींच्या कुटीत कोपऱ्यात एक दिवली संथपणे जळत होती. दिवलीच्या मंद प्रकाशानं कुटीचं गांभीर्य आणखीच वाढलं होतं. गांधीजी चरख्यावर सूत कातत होते. महादेवभाई आले. त्यांच्या हातात मगनभाईंची तसबीर होती. गांधीजींनी ती कुटीतल्या एका खुंटीला टांगली. कस्तुरबा, मणिबेन, अनसूयाबेन आल्या. गांधीजींनी सुताचा एक हार मगनलालच्या तसबिरीला घातला. क्षणभर सर्वजण डोळे मिटून मगनलालचं चिंतन करीत स्तब्ध उभे होते. त्या क्षणी त्यांच्या मिटल्या डोळ्यांसमोर मगनलाल गांधीजींची मूर्ती केवल होती.

इतर सर्वजण निघून गेले तेव्हा खोलीत फक्त महादेवभाई आणि गांधीजी होते. गेले दोनतीन दिवस गांधीजींच्या मनाची अवस्था महादेवभाईंनी पाहिली होती. ते म्हणाले,

"बापूजी, 'वासांसि जीर्णानि यथा विहाय' असं तुम्हीच सांगता ना?"

"महादेव, हे सांगणारा श्रीकृष्ण हाही अखेर एक मनुष्यच होता."

"मग स्थितप्रज्ञाची लक्षणं कशाला वाचायची?"

"स्थितप्रज्ञ म्हणजे जीवन्मृत नव्हे. जीवन्मुक्त."

"पण स्थितप्रज्ञाला तर सुख आणि दुःख दोन्ही सारखीच ना?"

"हो. पण म्हणजे सुखदुःखाच्या संवेदनाच न होणं असा त्याचा अर्थ नव्हे. संवेदनाक्षम मन असूनही ते समतोल राहिलं पाहिजे."

हे बोलणं चालू असतानाच मणिबेन हातात आंबोणाचं एक पातेलं घेऊन आली. त्यात एक मोठा लाकडी चमचा होता. पातेलं खाली ठेवत मणिबेन म्हणाली,

"बापूजी, गोपूचं काही बरं नाही. लक्षण ठीक नाही."

गोपू म्हणजे आश्रमातल्या एका गाईचं वासरू होतं. वासराला काही तरी रोग होऊन गेले आठपंधरा दिवस तेही आजारी होतं. आश्रमाच्या खास वैद्यांनी त्या इटुकल्या वासरावर मनापासून उपचार केले होते. गांधीजी त्याला प्रेमानं गोपू म्हणायचे. गांधीजी एखद्या दिवशी दिसले नाहीत तर गोपू अस्वस्थ व्हायचा. गांधीजींच्या हातून मूठभर चारा मिळाला तरी गोपू खूष असे.

एके दिवशी गोपू कुठून तरी हुंदडून आला तो हंबरतच. कधी आवाज न काढणारा गोपू आज हंबरत होता. कस्तुरबांना काही कळेना. त्यांनी गोपूचे दोन्ही कान खाजवले. मानेखाली हातानं थोपटलं. मग तर त्यांनी त्याला गरम पाण्यानं आंघोळ घातली आणि आंबोणाचं पातेलं समोर ठेवलं.गोपूनं पातेलं हुंगलं आणि त्यानं तोंड फिरवलं. त्याची सारखी तडफड चालली होती. दोन दिवस असे गेले. तिसऱ्या दिवशी गोपूची तडफड फार वाढली. त्याचं भरलेल्या पोत्यासारकं दिसणारं पोट खपाटीला गेलं होतं. डोळ्यात विलक्षण व्याकुळता होती. तेव्हा कस्तुरबांनी मणिबेनला सांगितलं,

"मणी, आंबोणाचं पातेलं घे आणि चमच्यानं भरव त्याला."

मणिबेननंही एखाद्या आजारी बाळाला भरवतात तसं आंबोण गोपूला भरवलं. एकदोन चमचे घेतले नाहीत तोच तिसरा चमचा जसाच्या तसा बाहेर आणि दातखीळ बसलेल्या माणसासारखं तोंड करून गोपू खाली पडला.

डॉक्टर, वैद्य येऊन तपासून गेले होते. पण त्यांच्या मतानं गोपूच्या प्रकृतीत फरक पडणार नव्हता. आता मणिबेन तेच सांगायला आली होती. मगनलालच्या मृत्यूचं दुःख अजून पुरतं बाहेर पडलं नव्हतं. तोच गोपूच्या अंतिम वेदनांनी गांधीजींच्या काळजावर मूठ मारली. गांधीजी गोपूजवळ गेले

तेव्हा वाळक्या बांबूच्या काठ्यांसारखे त्याचे चारी पाय फाकून पसरले होते. शेपटीच्या गोंड्यावर माशा घोंघावत होत्या. त्यानं मान वर लांब करून जमिनीला टेकवली होती. डोळे अर्धवट मिटलेले होते.

गांधीजींनी वत्सलतेने हाक मारली "गोपू..."

गोपूनं मान वर करण्याचा प्रयत्न केला. पण त्याला मान वर करता आली नाही. तरी कसातरी तिडमिडत तो उठला... आणि सहन न होऊन धाडकन खाली कोसळला.

नडियादहून डॉ. बच्चुभाई खास गोपूसाठी आले होते. गांधीजींनी बच्चुभाईंना विचारलं, "भाई, गोपू सुधारेल?"

"ती आशा करण्यात आता तथ्य नाही." बच्चुभाई खेदानं म्हणाले.

"मग? तो सुटेल तरी केव्हा."

"तेही सांगणं कठीण आहे."

"त्या मुक्या जनावरानं या यातना कोठपर्यंत सोसायच्या?"

"यातना संपेपर्यंत. म्हणजेच मरेपर्यंत."

"मग बच्चुभाई, एक मार्ग सुचवतो."

"सुचवा आपण."

"गोपूला इंजेक्शन द्या एखादं."

"कसलं?"

"वेदना संपवा. त्याचं आयुष्य संपवा म्हणजे वेदना आपोआप संपल्याच."

"गांधीजी!" बच्चुभाई जवळजवळ ओरडलेच."

"का? आश्चर्य वाटलं?"

"नाही. कल्पना नव्हती आपण असं काही सांगाल म्हणून."

"का बरं? एवढं अकल्पित मी काय बोललो?"

"आपण अहिंसावादी आणि वासराला ठार मारणं..."

"दुसऱ्याला अटळ असलेल्या वेदनांतून सोडवणं ही देखील एक प्रकारची अहिंसाच आहे डॉक्टर."

"ठीक आहे. मी तसं इंजेक्शन देतो. पण जबाबदारी आपली राहील."

"ते उघडच आहे. या बछड्याला आपण लौकर मुक्त करा."

गांधीजींनी नेहमीप्रमाणं त्याला कुरवाळलं. त्याचे पडलेले दोन्ही कान खाजवले आणि अगदी माणसाशी बोलावं तशा सुरात ते त्याच्या कानात म्हणाले, "बेटा माझाही नाइलाज आहे. मी तुला बरं करू शकत नाही. तुझ्या

या वेदनाही पाहवत नाहीत. जा. सुखाने जा.''

डॉक्टरांनी जीवघेण्या विषारी द्रवानं इंजेक्शनची सीरिंज भरली. ती खसकन ती त्यांनी गोपूच्या पाठीत खुपसली. आधीच दुर्बळ असलेल्या गोपूनं एकवार थोडीशी हालचाल केली आणि कसा तरी प्रयत्न करून एक वेळ गांधीजींकडे बघून त्यानं कायमची मान टाकली.

कस्तुरबा, मणिबेन यांनी डोळ्यांना पदर लावल होते. महादेवभाई डोळ्यांच्या ओल्या कडा रुमालानं पुसून काढत होते.

एका आठवड्यात आश्रमाला बसलेला हा दुसरा धक्का होता. एकाला काळानं ओढून, खेचून नेलं होतं, तर दुसऱ्याला गांधीजींनी आपणहून काळाच्या जबड्यात फेकून दिलं होतं.

वासराला मारण्याच्या घटनेचा फायदा घेऊन अनेकांनी गांधीजींवर टीका केली. त्यांच्या अहिंसेची टवाळी केली. गांधीजीविरोधकांच्या हातात हे आयतंच कोलीत मिळालं. त्यांनी वावटळ उठवली. गांधीजी शान्त होते. पण महादेवभाईंना राहवेना. ते म्हणाले,

''बापूजी, आधीच तुम्हाला विरोध दांडगा. त्यात तुम्ही वासरू मारून त्यांच्या हाती आयतंच कोलीत दिलंत.''

''महादेव, कोलीत केव्हा तरी विझेलच ना?''

''पण त्यानं लागलेली आग?''

''ती सहन करू. तीही केव्हा तरी विझेल ना?''

''लोक म्हणतातच तुम्ही अहिंसेच्या क्षेत्रातून निवृत्त व्हावे.''

''तो सर्वस्वी माझा प्रश्न आहे. मनुष्य आपल्या हक्कावर पाणी सोडू शकतो. पण त्याने आपल्या कर्तव्याला पारखे होणे हा भयंकर गुन्हा आहे, हे त्या लोकांना कळव महादेव.''

सायमन कमिशनचं ठिकठिकाणी काळ्या निशाणांनी स्वागत होत होतं. सायमनच्या कानावर जिथं तिथं हेच आवाज येत होते. 'सायमन परत जा. सायमन परत जा.' मुंबई, लाहोर, दिल्ली, कलकत्ता, मद्रास इथं उग्र निदर्शनं झाली. त्या निदर्शनांना प्रत्युत्तर म्हणून सरकारनं तितकीच उग्र दडपशाही केली. संगिनी रक्ताळल्या. रस्ते भिजले. अश्रू ठिपकले. लाहोरला लाला लजपतराय हुतात्मा झाले. त्यांच्या मृत्यूनंतर देशातले तरुण चवताळून उठले. भयंकर प्रकोप झाला. जवाहरलाल, सुभाषचंद्र, युसुफ मेहेरअल्ली इ. लोक

तरुणांची दैवते बनली. अलीबंधूंनी राजकारणात नेहमीप्रमाणे मुसलमानांचा सवता सुभा उभारायचा प्रयत्न केला होता. नेहरू रिपोर्टाला त्यांनी कडाडून विरोध केला. एकूण काय देश ढवळला होता. शेषानं आपलं मस्तक गदागदा हलवल्यानं जमीन जणू आंदोळत होती. कुठं म्हणून स्थिरता नव्हती, शान्तता नव्हती.

हे वादळवारे वहात असतानाच गांधीजी हिंडत होते. पहात होते. कलकत्त्याला एका खादी भांडाराचं उद्घाटन करायला ते गेले आणि त्या दिवशीच्या वर्तमानपत्रात त्यांना जे वाचायला मिळालं ते वाचून त्यांना अपरिमित धक्का बसला.

गांधीजींच्या साबरमती आश्रमातले काही गैरप्रकार वृत्तपत्रांनी मोठ्या चविष्टपणे रंगवून लिहले होते. काही घटनांना गैरप्रकार समजून त्या लिहिल्या होत्या. एकूण काय, वृत्तपत्रांनी लोकांना चघळायला एक मोठाच विषय त्या दिवशी आयताच समोर ठेवला. गांधीजींनी महादेवभाईंना सांगितलं, "ताबडतोब साबरमतीला जाऊ या."

गांधीजी साबरमतीला पोचले. वृत्तपत्रात आधीच झालेल्या गवगव्यानं आश्रम कसा कावराबावरा होऊन गेला होता. गांधीजी आलेलं समजलं तेव्हा तर आश्रमानं मानच खाली घातली. सामानाच्या वळकट्या आणि पेट्या खोलीत टाकल्या तेव्हा महादेवभाई म्हणाले,

"बापू, आता थोडी विश्रांती घ्या. आणि मग संध्याकाळी पाहू काय करायचं ते."

"नाही महादेव. आता विश्रांतीसुद्धा घेता येणार नाही. आज मला कधीही न आवडणारी न्यायाधीशाची भूमिका घ्यायची आहे. वास्तविक ते मला आवडत नाही, पण नावडती वस्त्रं कधीकधी परिधान करावी लागतात. जा छगनलालला बोलाव."

छगनलाल गांधीजींचा पुतण्या. तो आश्रमातच रहात होता. आश्रमाच्या कठोर नियमाचं पालन त्यानं आतापर्यंत केलेलं होतं. पण चिरेबंदी वाड्यालाही कुठं कुठं बिळं पडतात. छगनलाल तर जिताजागता माणूस होता. भावना असलेला, चैतन्य असलेला.

छगनलाल आला तेव्हा गांधीजी काँग्रेसकमिटीचे ठराव वाचत बसले होते. त्याची पावलं दिसताच त्यांनी कागद दूर ठेवले आणि मूकपणेच त्याला शेजारच्या आसनावर बसण्याची खूण केली.

छगनलाल उभाच राहिला.

"छगन, वृत्तपत्रात वाचलं ते खरं का?" गांधीजींनी गंभीरपणे विचारलं.

"बापू, वृत्तपत्रातली अतिशयोक्ती आहे."

"मग सत्योक्ती काय आहे ते सांग."

"मी फक्त दहा हजार रुपये जमा केले आहेत."

"कुठून आणलेस?"

"गेल्या पाच वर्षांत तुमच्याबरोबर हिंडताना मिळालेल्या देणग्या, भेटी, आणि मी स्वत: एक कंत्राट घेतलं होतं वाळूचं. त्यातून मिळालेले हे पाच हजार. असे दहा हजार."

"छगन, आश्रमाची नियमसंहिता तुला ठाऊक आहे ना?"

"हो."

"तरीही तू संग्रह केलास."

"चुकलो."

"नाही. या शब्दाच्या पश्चात्तापानं काम भागणार नाही."

"मग कोणतं शासन घेऊ?"

"तुला यापुढं आश्रमात राहता येणार नाही."

"जशी आज्ञा. पण बापू, माझ्या प्रामाणिकतेबद्दल संशय घेऊ नका."

"तसा मी कधीच संशय घेणार नाही. पण असंग्रह हे प्रत्येक आश्रमीयाचं तत्त्व असलं पाहिजे, त्याचा भंग तुझ्या हातून झाला."

छगन ओणवा होऊन गांधीजींच्या पाया पडला. त्यानं तसंच मान वर करून गांधीजींकडे पाहिलं. छगनच्या डोळ्यात पाणी जमा झालं होतं. त्याला उठवून गांधीजी म्हणाले,

"छगन, आजवर मी तुला मुलाप्रमाणे वागवलं. अजूनही माझ्या वैयक्तिक आयुष्यात तुला हीच जागा मिळेल. पण आज मी तुला दूर न करीन तर इतरांवर अन्याय होईल. जा, सुखानं आणि सत्प्रवृत्तीनं जग. तुला काही कमी पडणार नाही."

छगन जड आणि धीमी पावलं टाकत कुटीबाहेर पडला तेव्हा आपल्या हृदयावर कोणीतरी दगड ठेवला आहे असं गांधीजींना वाटलं. एक सुस्कारा सोडून महादेवभाईंकडं वळून ते म्हणाले,

"महादेवा, भीष्म-द्रोणादिकांवर बाण मारताना अर्जुनाला का यातना झाल्या हे अशा प्रसंगी कळतं नाही?"

महादेवभाई हळूच म्हणाले,

"बापूजी, छगनलाल तसा अश्राप मुलगा आहे."

"ते मलाही कळतं महादेव. पण कोणतंही अवैध कृत्य घडलं तरी ते अश्रापपणाच्या नावाखाली वैध ठरत नाही. लोकांच्या नजरा सर्वसामान्यांपेक्षा आपल्यावर अधिक असतात. त्यांच्या परीक्षेत आपण उतरलंच पाहिजे. ते जाऊ दे. एक अवघड काम उरकलं. आता दुसरं. सरिताबेन आणि मनोहर यांना कडक सूचना द्या."

"बापूजी!" महादेवभाई जवळजवळ ओरडलेच.

"होय महादेव. आश्रमाला ही कीड लागली तर सारा आश्रम नासून जाईल. हे संकट वेगळी निपटायला हवं."

"पण सरिताबेनला सांगायचं कसं?"

"का? भीती वाटते?"

"बापूजी, मी हे काम करू शकणार नाही."

"महादेव, समजत होतो मी तितका तू अजून तयार झालेला नाहीस. ठीक आहे. मलाच ते काम केले पाहिजे." असं म्हणून गांधीजी सरळ कस्तुरबांच्या कुटीत गेले. कस्तुरबा हरिविजयाची पोथी वाचत होत्या. गांधीजींना पाहताच डोळ्यांवरचा चष्मा काढून त्यांनी पोथीच्या पानात खूण म्हणून घालून ठेवला आणि पोथी बंद करून ठेवली.

"कसली पोथी वाचता?" गांधीजींनी विचारलं.

"हरिविजय."

"स्वत: का वाचता?"

"मग कोण वाचणार?"

"इतके दिवस कोण वाचत होतं?"

"सरला वाचत होती."

"मग आता?"

"कालपासून ती वाचेनाशी झाली."

"का?"

"ते आपल्यालाही ठाऊक आहे."

"हो. तिचं वैधव्य ध्यानात घेऊन तिला तुम्ही आसरा दिलात."

"आपणही दिला."

"हो. मीही दिलाच. तिच्याविषयी ऐकलं ते खरं आहे?"

"काय ऐकलं."

"मनोहरलालचे आणि तिचे संबंध चांगले नाहीत."

"आपण स्वत: पारख केली?"

"नाही. पण ते काम मी तुमच्यावर सोपवतो."

"मी ते काम केलंय."

"अध्याहृत बोलू नका. स्पष्ट बोला."

"आपल्याला जे कळलंय ते खरं आहे."

गांधीजींनी चमकून पाहिलं. कस्तुरबा शान्त होत्या.

"या बाबतीत काय करावं असं आपल्याला वाटतं?"

"काहीही करू नये. स्वस्थ बसावं. सरला समंजस आहे. मनोहरला मी कानपिचकी दिलीय."

"तेवढं पुरे आहे?"

"हो. आपल्याला काय वाटतं?" कस्तुरबांनी विचारलं.

"मलाही तसंच वाटतं. पण आश्रमात हे वर्तन योग्य नव्हे. आज मी त्यांना काही बोलत नाही. पण एक महिन्यानंतर त्यांची गाठ घेईन."

असे म्हणून गांधीजी कस्तुरबांच्या कुटीतून बाहेर पडले. जाताना ते सरलाच्या खोलीवरून गेले. सरला चरख्याशी अगदी पुतळ्यासारखी बसली होती. चाक फिरवताना तिचा हात तेव्हा यंत्रासारखा हलत होता. रडून रडून डोळे सुजल्यासारखे वाटत होते. गांधीजींच्या मनात शब्द उमटले-

"बेटी, एवढी हळवी आहेस तर पापाच्या वाटेला का ग गेलीस?"

❖

# बारा

कलकत्ता शहरातील एक सुनी संध्याकाळ! गांधीजींचा मुक्काम भूपेंद्रबाबूंकडे होता. कलकत्त्यात गांधीजी आले तर त्यांची आवभगत करायला आता पुष्कळ माणसं अक्षरशः टपून बसलेली असत. गांधीजींनी आपल्याकडेच उतरावं असं प्रत्येकाला वाटे. पण गांधीजींनी भूपेंद्रबाबूंकडे उतरण्याचा आपला शिरस्ता बदलला नाही. स्वदेशीच्या प्रचारासाठी नेहमीप्रमाणे कलकत्त्याच्या एका झोपडपट्टीत गांधीजींचं व्याख्यान आयोजित करण्यात आलेलं होतं. आज वल्लभभाईही योगायोगानं कलकत्त्यात होते. बहुधा सुभाषचंद्रही येणार होते.

संध्याकाळचेच वल्लभभाई आले तेव्हा गांधीजी भूपेंद्रबाबूंच्या नातवाबरोबर खेळत होते. तो एवढासा चिमुरडा पोर; सरळ गांधीजींच्या मांडीवर दोन पाय रोवून उभा होता आणि आपले इवलेसे तळवे पसरून तो गांधीजींच्या डोक्यावर कुंभार थापटण्यानं मडकं थापटतो तसा थापटत होता. त्या थापटण्याचा फिट् फिट् असा आवाज येत होता.

भूपेंद्रबाबूंच्या सूनबाई आतून धावत आल्या आणि जवळ जवळ ओरडल्याच, "अरे अरे, आशु काय चाललंय? तुला काही कळतं का?" असं म्हणून आशूच्या दंडाला धरून त्यांनी खसकन् ओढलं. त्यासरशी आशूचा प्रफुल्ल चेहरा पार कोमेजून गेला. गांधीजींनी आशूला जवळ घेऊन मांडीवर बसवलं आणि हसून ते म्हणाले, "बहू, बच्चे लोकांना पारख चांगली असते."

"कशाची पारख बापूजी?" वल्लभभाई न कळून म्हणाले.

"आमचं मडकं अजून कच्चं आहे. म्हणून हा बेटा थापटून बघतोय ते."

वल्लभभाई गडगडाट झाल्यासारखे हसले. इतक्यात आत पळालेल्या आशूनं दोन ग्लास समोर आणून ठेवले. त्यात तांबूस पेय होतं. कसलंतरी.

"बापूजी घेता ना?" आशूनं विचारलं.

गांधीजींच्या कपाळावर एक सूक्ष्म आठी उमटली. उंबऱ्याआडून आशूच्या आईनं ती पाहिली.

"आमसुलाचं सार आहे. आपल्यासाठी."

"अरे? दक्षिणेतल्या पेयानं बंगालात उडी कशी मारली?" साराचा एक घुटका घेत वल्लभभाई म्हणाले. इथं तर माशाची आमटी."

"जाताना सांगून गेलेत, कोण आल्यावर काय द्यायचं आणि कसं स्वागत करायचं ते." आतून आवाज आला.

सभेची वेळ होत आली होती. वल्लभभाई धोतराचा सोगा सावरीत उठले आणि म्हणाले, "बापूजी चलायचं ना आता?"

"हो चला, निघू या" आमसुलाच्या साराचा शेवटचा घोट घेत गांधीजी म्हणाले.

गांधीजींनी आपल्या देशी वहाणा पायात सरकवल्या. घड्याळ कमरेला खोवलं आणि काठी घेऊन ते बाहेर पडले. उपनेत्राची आठवण झाली म्हणून मागं फिरले. पण कुठंच ते दिसेना. नोकरानं सारं घर धुंडाळलं. पण चष्मा सापडेना.

"चला बापूजी, आपण दुसरा घेऊ" वल्लभभाई म्हणाले. बाहेर मोटरीचं दार उघडलं गेलं आणि मागून गोड बाळस्वर ऐकू आला,

"बापूजीऽ..."

"गांधीजींनी आणि वल्लभभाईनी मागे वळून पाहिलं. त्या वाड्याच्या भव्य दरवाजात आशु उभा होता. त्याच्या नाकावर गांधीजींचा चष्मा होता आणि वाकडी मान करून तो बघत होता. एखाद्या भव्य गुहेच्या तोंडापाशी इवलासा पण गुबगुबीत ससा उभा असावा तसा आशू त्या महाद्वाराच्या चौकटीत उभा असलेला दिसत होता.

"अरे लबाडा, चष्मा तुझ्याकडे आहे होय." असं म्हणून गांधीजींनी त्याच्या पाठीत एक धपाटा घातला आणि त्यानं दिलेला चष्मा आपल्या डोळ्यांवर बसवला.

मोटार वेगात सुरू झाली. आशूनं हात उंच करून गांधीजींना निरोप दिला.कलकत्ता शहरातले राजरस्ते आणि हमरस्ते कापत मोटार चालली होती. वळणे घेत होती, वेग वाढत होता. हावरा ब्रिजच्या पूर्वेला नदीकाठाला एक झोपडपट्टी होती. तिकडे जायचं होतं. मधेच एक रस्ता लागला. तो इतर

रस्त्यांहून वेगळा दिसत होता. दाबून माती बसवल्यासारखा वाटत होता.

"बापूजी, हा रस्ता ठाऊक आहे?" वल्लभभाईंनी विचारलं.

"नाही."

"याला चौरंगी रस्ता म्हणतात."

"का म्हणतात?"

"ते ठाऊक नाही. पण हा रस्ता इंग्लंडच्या मातीनं तयार झाला आहे. एवढं खरं."

"इंग्लंडच्या मातीनं? म्हणजे?"

"इंग्लंडमधून खास आयात केलेली माती या रस्त्यांवर टाकली जात असे."

"का?"

"जहाजाला भरताड म्हणून माती टाकत असत. इथं आल्यावर ती माती उपसून रस्त्यावर टाकायची."

"आणि परत जाताना?"

"इथलं मीठ भरून न्यायचं."

"वा. छान व्यापार आहे."

"म्हणून आपलं मीठ महागलं. कारण नंतर मातीऐवजी मीठच भरून आणायला लागले."

"भाई, इंग्रजांचा हा कावा मोठा धूर्त आहे."

"हां. आमचा समुद्र, आमचं मीठ, पण आम्हीच ते खाऊ शकत नाही. काय न्याय आहे."

वल्लभाईंनी पाहिलं. गांधीजी मोटारीच्या काचेतून बाहेर पहात होते. कसलीतरी विचारचक्रं वेगानं त्यांच्या मनात फिरत असावीत असं वाटत होतं. न राहवून वल्लभभाईंनी विचारलं,

"बापूजी, कसला विचार चाललाय एवढा?"

"मिठाचा भाई."

"मिठाचा विचार?"

"हं. भाई, मीठ ही तर गरीबाची किमान आवश्यक वस्तू. ती स्वस्त असायला नको का?"

"हां बापूजी."

"लिव्हरपूलची जहाजं भारतात मीठ आणतात ते स्वस्त आणि भारताच्या

किनाऱ्यांवरील मिठागरांत तयार होणारं मीठ महाग!"

"खासा न्याय!"

"सरदार, याविरुद्ध लढा द्यायला हवा."

"करबंदीचा?"

"हो. आपण मीठच आणायचं उचलून."

इतक्यात सभेचं स्थान आलं. झोपडपट्टी रिकामी पडली होती. मधल्या मोकळ्या मैदानात माणसं जमा झाली होती. दोही बाजूंनी गटारं फतफतली होती. माशा-डास घोंगावत होते. केरकचऱ्याच्या ढिगाऱ्यातून रिकामी जागा अशी दिसतच नव्हती. त्या तशा उकिरड्यावरही सभेचं सुंदर चित्र रेखाटलं जात होतं.

सभा संपल्यावर गांधीजी वल्लभभाईंना म्हणाले,

"आता आपल्याला तडक साबरमतीला जायचं."

"आणि नैनिताल आलमोऱ्याला जायचंय ते?" महादेवभाईंनी विचारलं.

"ठीक आहे. नैनिताल-आलमोरा आटोपून मात्र साबरमतीच."

"हो," म्हणून महादेवभाईंनी ड्रायव्हरला स्टेशनकडे गाडी घ्यायला सांगितली.

या प्रवासात गांधीजींची प्रकृती बरी नव्हती म्हणून महादेवभाईंनी कुणालाच त्यांना भेटू दिलं नाही.

आलमोऱ्याला गांधीजींचा ताप उतरला. तिथल्या भेटीगाठी होतात न होतात तोच एक माणसांचा घोळका गांधीजींच्या समोर येऊन उभा राहिला. त्यांच्या वेषावरून ते वन्य जमातीतले लोक असावेत असा कुणीही तर्क केला असता.

त्यांच्या पुढाऱ्याच्या गळ्यात रंगीबेरंगी माळा होत्या. कसली तरी रानटी फुलं त्या सर्वांनीच आपल्या कानावर बसवली होती. दोन मांड्यांभोवती त्रिकोण ठेवून त्यांनी कमरेला सुडकी गुंडाळली होती. ती माणसं पाहून गांधीजींना आणि सर्वांनाच मौज वाटली. ते काय म्हणत होते हे फारसं कुणाला कळत नव्हतं. तरी त्यांना काही तरी सांगायचं होतं असं त्यांच्या आर्जवी चेहऱ्यांवरून स्पष्ट दिसत होतं. इतक्यात त्यांच्या पुढाऱ्यानं एखादी मौल्यवान वस्तू जपून पुढं करावी तशी हाताची मूठ उघडून एक कागदाचा बोळा पुढं केला. आधी त्या कागदाची घडी केलेली असावी असं त्यावर पडलेल्या घड्यांवरून स्पष्ट दिसत होतं.

अत्यंत सुवाच्य अक्षरात त्यावर लिहिलं होतं-

"परमपूज्य बापूजी, आम्हा गरीबांच्या वस्तीला आपण भेट द्याल काय?"

- ताडीखेत वन्यजमात.

ते वाचून महादेवभाईंना हसू आलं. हा उपाय ह्या लोकांनी छान केला होता. फार बोलायला नको. कधीकधी कमी बोलण्यानंही काम साधतं. तसं ते साधलंच. गांधीजींनी हसून मूक संमती दिली आणि महादेवभाईंनी त्या जमावाला हातवारे करून, खुणा करून सांगितलं, "संध्याकाळी येतो."

"भौमन, भौमन..." असं काहीसं पुटपुटत ते लोक निघून गेले. बहुधा याचा अर्थ आभारी आहोत असा असावा.

संध्याकाळी ताडीखेतच्या मार्गानं गांधीजींची मोटार धावू लागली. विलक्षण धुळीनं भरलेले हे रस्ते अरुंद होते. या प्रदेशात इतकी धूळ विसंगत होती. पण या भागात ती होती. क्वचित धुळीचा मोठा फुफाटा पुढं गेलेल्या वाहनामुळं उडून क्षणभर पुढचं काही दिसत नसे. त्यामुळं ड्रायव्हरला गाडी थांबवणं भाग पडे.

ताडीखेतची वस्ती दुरून दिसू लागली. तसं ड्रायव्हरला हायसं वाटलं. एवढ्यात वाऱ्याचा एक प्रचंड झोत आला आणि त्यानं धुळीचा पडदा सोडला. ड्रायव्हरनं ब्रेक लावण्याच्या आतच एक कर्णभेदक किंकाळी धुळीचा पडदा फाडून अस्मानात पोहोचली आणि गपकन गाडी थांबली. महादेवभाईंचे मस्तक पुढच्या सीटवर आदळलं. गांधीजींच्या पाठीला लचक भरली.

पण असं झालं तरी काय? सारे गाडीतून उतरले. यावेळी वल्लभभाई बरोबर नव्हते. महादेवभाईंनी पाहिलं तर गाडीखाली एक देह कण्हत होता. सुदैव की त्याचा केवळ पायच चाकाखाली सापडला होता. तो मात्र उसाचं सपाट चिपाड व्हावं तसा झाला होता. तो बहुधा बेशुद्ध झाला होता. आसपास कुठंच घर किंवा झोपडी दिसत नव्हती. पण काही इलाज नव्हता. म्हणून महादेवभाई पाणी आणायला गेले.

महादेवभाई वळले आणि त्या विद्ध देहानं चाळवाचाळव केली. ड्रायव्हर, गांधीजी, महादेवभाई या तिघांनी मिळून त्याला अलगदपणे बाहेर काढलं.

फर्लांग दोन फर्लांग अंतरावर एका शेतकऱ्याची झोपडी होती. तिथं थांबून रांजणातल्या पाण्याचे हबके तोंडावर मारले तेव्हा त्यानं डोळे उघडले.

"भैय्या, तुझं नाव काय?" गांधीजींनी मृदुल स्वरात विचारलं.

"पदमसिंग." त्याचे ओठ पुटपुटले.

पदमसिंग चांगला धष्टपुष्ट होता. त्याची सहनशक्ती अचाट असावी. पाय एवढा चेचला होता. पण त्याच्या तोंडावरचा तजेला तसाच होता. वेदना जबर होत असली पाहिजे हे त्याच्या डोळ्यात दिसत होतं. पण त्याचबरोबर वेदनेला मुठीत धरून त्यानं चेहेरा शान्त ठेवलाय हेही जाणवत होतं.

"पदमसिंग, तुला आता इस्पितळात नेऊ या." गांधीजी म्हणाले.

"नका मायबाप असं करू. मला इस्पितळात जायचं नाही."

"अरे! मग तुझा पाय कसा बरा होणार?" गांधीजींनी काळजीच्या सुरात विचारलं.

'पाय बरा होईल आणि न झाला तर मरेन." कडवटपणे पदमसिंग म्हणाला.

"इस्पितळात यायचं नसेल तर आमच्याबरोबर आमच्या आश्रमात चल."

"नको नको." आवेगानं पदमसिंग म्हणाला. "माझ्या बायकोला धक्का बसेल. असं काही ऐकायची तिची ताकद नाही. मायबाप, मी तुम्हाला ओळखलंय... आपण... आपण..."

पद्मसिंगच्या डोळ्यांतून आसवं गळू लागली. मुसमुसणाऱ्या ओठांनीच त्यानं वाक्य पूर्ण केलं-

"आपण... महात्माजी... गांधीजी!"

"पद्मसिंग, तुझ्या इच्छेवर आक्रमण करण्याची माझी इच्छा नाही. पण मला माझी जबाबदारी टाळता येणार नाही. तुला इस्पितळात नाहीतर आश्रमात तरी माझ्याबरोबर यायलाच हवं."

"बापूजी, मी कुठंच येणार नाही. मी माझ्या घरी जाईन. घरी पोचवा. इस्पितळात गेलो नाहीतर आश्रमात आलो तरी..."

"तरी काय..."

"बापूजी... मी येणार नाही."

"अरे का पण?"

"भाई, लोक वेडे असतात." एकदम तोंड फिरवून आवेगानं पद्मसिंग म्हणाला, "बापूजींच्या मोटारखाली मला अपघात झाल्याचा बोभाटा झाला तर लोक त्यांचं नाव खराब करतील."

"अरे, पण पद्मसिंग!" महादेवभाई त्याचं बोलणं तोडून म्हणाले.

"काही सांगू नका देवा. त्याच्याऐवजी माझी एक इच्छा पूर्ण करा."

"काय इच्छा आहे तुझी पद्मसिंग?"

“मला मृत्यू आलाच तर...”

“आम्ही नुकसानभरपाई द्यावी असंच ना?” महादेवभाईंनी विचारलं.

पद्मसिंगनं एकदम दोन्ही हातांनी आपल्या थोबाडीत मारून घेतल्या आणि तो म्हणाला, “तोबा, तोबा. काय बोलता हे देवा. बापूजी, मला मरण आलंच तर आपण माझ्या मुलाला आशीर्वाद द्या.”

“बस्स?”

“हो. मला त्यातच धन्यता वाटेल.”

“चल. आता तुला घरी तरी पोचवतो गाडीतून. का तेवढीही सेवा तू करू देणार नाहीस.” गांधीजींनी विचारलं.

पद्मसिंग ओशाळं हसला. मग महादेवभाईंनी आणि ड्रायव्हरनं, दोघांनी मिळून त्याला गाडीत ठेवलं. पद्मसिंगाला घरी पोहोचतं करून गाडी परत फिरली तेव्हा गांधीजींनी महादेवभाईंना विचारलं,

“महादेव, इथं कुणी आपल्या परिचयाचे डॉक्टर आहेत?”

“हो. नुकतेच एकदाने महिन्यांपूर्वी डॉक्टर बसू ताडीखेतला येऊन राहिलेत.”

“मग त्यांना पद्मसिंगच्या घरी पाठवून दे. त्याची नीट शुश्रूषा झाली पाहिजे आणि त्याच्या प्रकृतीविषयी वारंवार कळवायला सांग.”

“हो.”

“आता सभा संपली की, तडक आपण अहमदाबादला जायचं आणि तेथून तडक साबरमती.”

साबरमती आश्रमात गांधीकुटुंबियांचा मेळावाच भरला होता. आभा, मणिबेन, छोटी मनु, कनु गांधी, देवदास, आश्रम सोडून गेलेला छगनलाल, सुशीला, प्यारेलाल, वनमाला ही सारी छोटीमोठी मंडळी दिवाळीला जमतात तशी जमली होती. त्यामुळं कस्तुरबा मोठ्या आनंदात होत्या. अलीकडे मणिलालच्या लग्नानंतर असं मुलांमाणसांत बसायला त्यांना मिळालंच नव्हतं. पण कुठल्यातरी योगायोगानं आश्रमाच्या पटावर या दूरदूरच्या सोंगट्या जमा झाल्या होत्या. गांधीजी आणि महादेवभाई आश्रमात नव्हते. ते आले की पट पूर्ण! गप्पाष्टकं रंगली होती.

कस्तुरबांनी परोठे केले होते. त्याची एक परात भरूनच त्यांनी मधे ठेवली. त्यावर प्रथम हात मारला तो देवदासनं आणि आज त्याच्याबरोबर

खायला एक नवलाईचा पदार्थ- सांबार. किती तरी दिवसांनी आज आश्रमात मसाल्याच्या पदार्थांचा वास येत होता. अर्थात गांधीजी खाणार नाहीतच ही खात्री असल्यानं त्यांच्यासाठी कुणी थांबलं नाही. प्रभावतीबेनला खमंग खाण्याची आवड होती हे कस्तुरबांना ठाऊक होतं. आजचा खास बेत त्यासाठीच त्यांनी आखला होता.

इतक्यात मीराबेन रुमालाला हात पुसत आली. तिच्या खांद्याला पडशीसारखी भली मोठी पिशवी अडकवली होती.

"या मिस् स्लेड. कुठली स्वारी जिंकून आलात?" सांबाराचा एक चमचा जिभेवर सोडत देवदासनं विचारलं.

"त्या आज संशोधन करायला गेल्या होत्या." तिथं असणारे काकासाहेब कालेलकर म्हणाले.

"कसलं संशोधन?"

"गांधींना खाद्य कोणतं घालावं!"

"हे पहा स्लेड..."

"देवदास, स्लेड काय म्हणतोस? तिला मीरा म्हण." कस्तुरबा मोठे डोळं करीत म्हणाल्या.

"आईसाहेब, यांनी वेष कितीही भारतीय पद्धतीचा केला, तरी त्यातून यांचा चेहेरा आणि डोळे पाहिले की तोंडावर स्लेड हेच त्यांचं नाव येतं."

"पण तसं ते आणायचं नाही."

"जशी आज्ञा."

मीराबेन हात धुवायला म्हणून निघून गेली. प्रभावतीबेनचा मघाशी प्रश्नार्थक झालेला चेहेरा अजून तसाच होता. म्हणून मग देवदासनं सांगितलं-

"बेन, अग, पाच वर्षं झाली की या बाईंना येऊन."

"मी तर आताच बघतीय."

"हो. तुझी चुकामूक व्हायची."

"पण ही आहे तरी कोण?"

"मेडेलिन स्लेड. एका नाविक अधिकाऱ्याची मुलगी." देवदास नाटकातल्यासारखे हातवारे करून म्हणाला.

"बाई ग. एवढं सातासमुद्रापलीकडून येऊन राहिली इथं?"

"हो. रोमाँ रोलांनी पाठवलं तिला."

"इथलं जीवन आवडतं तिला?"

"तुमच्या आमच्यापेक्षा जास्त रमली आहे ही आश्रमात." कस्तुरबा म्हणाल्या.

"आमच्या बापूजींची सत्य-अहिंसेची पुंगी इतकी मोहक आवाज देते की जगातले कुठल्याकुठल्या बिळातले नाग आश्रमात वस्तीला येतात." देवदास हसून म्हणाला.

"च्च्. उपमा गैरलागू आहे." प्रभावतीबेननी देवदासला हटकलं.

"मीराबेन आली. आता तिचा चेहेरा जास्त प्रसन्न दिसत होता. गुजराती पद्धतीची साडी नेसून ती एखाद्या अस्सल गुजराती गृहिणीसारखी चालत होती. त्या चालण्यात सफाई, विनम्रता, आत्मविश्वास, सारं काही होतं.

"मीराबेन, या परोठा-सांबार खायला." आभानं मीराला बोलावलं. मीरा जागच्याजागी उभी होती. हलली नाही की बोलली नाही.

काकासाहेब हसले आणि म्हणाले, "बापूजींच्या संमतीशिवाय ती यातलं काहीच खाणार नाही."

मोटारीचा आवाज आला आणि देवदासनं ओळखलं की ही बापूजींची मोटार आहे."

गांधीजी आश्रमात आले. बरोबर महादेवभाई, वल्लभभाई होतेच.

काठी कोपऱ्यात ठेवत ते म्हणाले,

"वा वा. आज आश्रमावर गांधी कुटुंबाचं आक्रमण झालेलं दिसतंय."

"बापूजी, आज आश्रमातलं वातावरण तुम्ही पाहिलंत तर तुमच्या मते सारा भ्रष्टाचार चाललाय असं वाटेल." देवदास म्हणाला.

"भ्रष्टाचार! तो कसा?"

"आम्ही सगळे मिळून आज खूप गप्प मारणार."

"बांनी आज परोठे आणि सांबार केलंय."

"सकाळी आम्ही कॉफी पण घेतली बांबरोबर."

"आज संध्याकाळी साबरमतीवर फिरायलाही जाणार." प्रत्येकानं एकेक पुस्ती जोडली.

"आणि सगळ्यात आश्चर्य म्हणजे बापू, तुमच्या परमभक्त मिस स्लेड ऊर्फ मीराबेन आज आमच्याबरोबर आत्ता परोठे-सांबार खाणार."

गांधीजींनी कलती मान करून मीराकडे पाहिलं. त्याच वेळी मीराबेनचे डोळे गांधीजींना पहात होते.

"बापूजी, तुमची आहे ना परवानगी तिला?" सुशीलानं विचारलं.

"मी कोण परवानगी देणार? तिला पटलं तर तिनं जरूर खावं."

"आणि आम्हांला?" देवदासनं अधीरतेनं विचारलं.

"देवदास, पाण्याला घातलेला बंधारा आपल्या उंचीइतकंच पाणी अडवू शकतो. पण पाण्यानं त्याच्याहीवरून वहायचं ठरवलं तर बंधारा काही नाही म्हणत नाही त्याला."

"बापूजी तुम्हाला वाईट वाटत असेल तर आमचं हे संमेलन आम्ही रद्द करतो."

"नका करू."

"पण तुम्ही..."

"माझा विचार करू नका."

मीराबेन अजून तशीच ओठंगून उभी होती.

"मीरा, तू का अशी उभी?" गांधीजींनी विचारलं.

"तिला दही खाऊ का मही खाऊ असं झालंय." देवदास म्हणाला.

"का?"

"बापूजी, आम्ही गहन कोडं टाकलंय तिच्यासमोर."

"कसलं?"

"सांबार खाण्याचं!"

"मीरा, तुला वाटत असेल तर तू जरूर खा. बाह्यात्कारी बंधनं काय कामाची?"

असं म्हणून गांधीजींनी स्वत; एका चिनी मातीच्या वाडग्यात सांबार भरलं आणि तो वाडगा मीराच्या पुढं ठेवला.

"खा मीरा. इंग्लंड-फ्रान्स सोडल्यापासून मांसाशनच काय पण साधे खमंग पदार्थही तुला खायला मिळाले नाहीत. खा."

मीराच्या डोळ्यात पाणी तरळू लागलं होतं. तशा पाणावल्या डोळ्यांनी ती एकदा गांधीजींकडे आणि एकदा कस्तुरबांकडे पहात होती.

अखेर गांधीजी हसून म्हणाले,

"तू आता खाल्लं नाहीस तर लहान मुलासारखं भरवावं लागेल मला."

गांधीजी एकदोन पावलं पुढं आले तेव्हा अगतिकतेनं मीरानं एक चमचा तोंडाच्या दरीतून आत सोडला.

सारे हसू लागले. प्रभावतीबेन, सुशीला, प्यारेलाल यांनी तर टाळ्या वाजवल्या. मीरा डोळ्यांनी रडत होती आणि ओठांनी हसत होती.

एवढ्यात मीराला जोराचा ठसका लागला. प्रभावतीबेननं पाण्याचा ग्लास पुढं केला. तो रिकामा केला, तेव्हा मीराबेन बरीच कासावीस झालेली होती.

"हं. मनाला पटलेलं नसलं म्हणजे असा ठसका लागतो." गांधीजी म्हणाले.

या सगळ्या गडबडीत महादेवभाई कुठंच दिसत नव्हते. कस्तुरबांनी सांबाराचा एक वाडगा त्यांच्यासाठी बाजूला ठेवला होता. हातात डायरी घेऊन महादेवभाई आले तेव्हा कस्तुरबांनी त्यांच्या हातून डायरी हिसकावून घेतली आणि त्या म्हणाल्या,

"महादेव, जरा शान्त बैस आता. एवढं खा."

महादेवभाईंनी गांधीजींकडे पाहिलं. गांधीजी हसले आणि म्हणाले, "खा बाबा, खा. आमची फळी फोडायला यांनी केव्हाच सुरुवात केली आहे. तू तरी कशाला राहतोस आमच्याबरोबर?"

महादेवभाईंनी कसाबसा एक परोठा आणि तो वाडगा पोटात रिचवला आणि तोंड खळाळून धुवून पंचाला पुसत ते म्हणाले,

"चला बापूजी."

"अरे अरे, खाल्लंच आहेस तर आता नीट पचू दे तरी. किती घाई करतोस?" असं म्हणून गांधीजींनी दोन्ही खांदे धरून महादेवभाईंना खाली बसवलं.

"बोल आता." ते म्हणाले.

"उद्यापासून आठवड्याचे कार्यक्रम सांगायला आलो होतो."

"बोला. आपण बोला."

"सुरत, भडोच, दिल्ली आणि लाहोर काँग्रेस."

"या वेळेला खूपच आटोपता घेतलेला दिसतोय कार्यक्रम."

"सुभाषचंद्राची काय वार्ता?"

"ते बहुधा लाहोरला येतील."

"महादेव चला आता आपल्या मठीत जाऊ. खूप पत्रव्यवहार सांगायचाय तुला."

"आत्ता तर आलात आणि... काही घेतलं नाहीत." कस्तुरबा व्यथितचित्तानं म्हणाल्या.

"आमचं आणि महादेवचं ताट आमच्या मठीत पाठवा." गांधीजी शान्तपणे म्हणाले आणि निघालेदेखील.

देवदास, प्रभावती, प्यारेलाल, सुशीला, मणिबेन सारेच त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात होते.

सांबाराच्या मोकळ्या बशा वाळून गेल्या होत्या. त्यावर एखादीदुसरी माशी घोघावू लागली होती. कस्तुरबांनी सारी आवराआवर करायला सुरुवात केली तेव्हा सगळ्यांची समाधी उतरली.

रावी नदीचे काठ थरारले.
संथ जलाशयावर रोमांच उठले
मृत्तिकाकणांनी अस्मानात उडी घेतली.
रातकिडे क्षणभर ओरडायचे थांबले.

जवाहरलालजींनी केलेली संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा अंधाराचे पडदे फाडून ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या कानावर आदळली. गांधीजी इथं आले होतेच. जवाहरलालजींनी ती अभूतपूर्व घोषणा करताच हजारो हृदयं उचंबळी. मनाची कवाडं फोडून आवेग बाहेर आला. लाहोर काँग्रेसचं ते अधिवेशन जवाहरलालजींच्या अध्यक्षतेखाली भरलं होतं. ऐन मध्यरात्र! शेकडो देशभक्त रावीच्या वाळवंटात जमलेले; जवाहरलालनी मांडलेला ठराव संमत झाला आणि...

**''क्रांती चिरायू होवो!''**
**''इन्किलाब झिंदाबाद!''**

या विजयघोषणांनी प्राकार दुमदुमले. रावीचा तळ खडबडून जागा झाला. निद्रिस्त वृक्षांना जाग आली.

आणि हे होत असतानाच तिकडे सुखदेव, राजगुरू, भगतसिंग आतून पेटले होते. त्यांचे निखारे फुलले होते. रक्त सळसळले होते. या विजयघोषांनी त्याला आणखी गती मिळाली.

लाला लजपतरायांवर झालेल्या लाठीमाराचं भीषण दृश्य त्यांना अस्वस्थ करीत होतं. कराकरा मुठी वळत होत्या. सँडर्ससाहेबाचा मुखडा नजरेसमोरून हलत नव्हता. देशातल्या हरेक तरुणाच्या हृदयात अशीच ठिणगी पडली होती.

गांधीजींच्या मनात दुसराच विचार जळत होता. मिठाचा सत्याग्रह. ही कल्पना जवाहरलाल, वल्लभभाई, सुभाषचंद्र यांना सांगून गांधीजी आश्रमात परत आले आणि अकरा मागण्यांचा एक लखोटा त्यांनी व्हाइसरायला लिहिला.

व्हाइसरायनं त्याला केराची टोपली दाखवली.

आणि मग गांधीजींनी काठी हातात घेतली.

एका भल्या सकाळी ते महादेवभाईंना म्हणाले,

"महादेव, दांडीला जायचं."

"कशाला?"

"कायदेभंग. मीठ उचलायचं आपण."

"सर्वांना कळवू?"

"हो. चालत जायचं. आणि..."

"आणि काय बापूजी?"

"स्वराज्य मिळेतोवर साबरमती आश्रमात परत नाही यायचं."

"बापूजी!"

"होय महादेवा. माझा निर्णय अगदी पक्का झाला आहे."

"बापूजी, दांडीपर्यंत जायचं म्हणजे अनेक गावं आपण हिंडणार."

"मग?"

"देवीची साथ आहे."

"म्हणणं काय तुझं?"

"लस टोचून घ्या."

"शरीर वाचवण्यासाठी?"

"अर्थातच."

"आणि तत्त्व मेलं तरी?"

"बापूजी, आश्रमातली तीन मुलं साथीला बळी पडली आहेत."

"महादेव, तुझ्याइतकंच मलाही दुःख होतं. जास्तच होत आहे. पण मी लस टोचून घेतली तर दुःख वाढेल."

"तुमच्याबरोबर अधिक वाद करायचा नाही असं मी ठरवलंय."

"मग तेच बरोबर आहे."

"पण जीव रहात नाही."

"तेही ठीक आहे. पण आता पुरे. बारा मार्च ही तारीख. त्या दिवशी आपण निघायचं."

"बरोबर कोण?"

"येतील ते. नाहीतर तू आणि मी. आणि तूही नाही आलास तर मी एकटाच." गांधीजी हसून म्हणाले.

"बापूजी!" महादेवभाई उद्वेगाने ओरडले.

"ओरडू नको महादेव, अरे, तुझी गंमत केली. माझी खात्री आहे की तू येणारच."

सकाळ झाल्याचा संदेश देऊन पक्षी घरट्यांतून बाहेर पडले आणि घुबडा-वटवाघळांनी वळचणींचा आश्रय घेतला. साबरमतीवरून वाहाणारा वारा झाडावेलींच्या पानांशी कुजबुजू लागला. आश्रमात आज लगीनघाई उसळली होती. गुजरात विद्यापीठातले विद्यार्थी आणि प्राध्यापक पहिल्या तुकडीत भाग घेण्यासाठी डेरेदाखल झाले होते.

युद्धाची जय्यत तयारी होती. युद्ध खरे; पण त्यात हस्तनाले, सुतरनाले नव्हते की बंदुका, तोफा नव्हत्या. होती फक्त निश्चयाने धगधगलेली मनं. उणेपुरे अठ्ठ्याहत्तर लोक. साबरमतीपासून दांडी सव्वादोनशे मैल. रोज दहा मैलांची पायपीट करायची ठरली होती.

साबरमतीचे दोन्ही तीर माणसांनी फुलून गेले होते. पंडित खऱ्यांच्या हातात एकतारी होती. ती छेडून त्यांनी 'वैष्णवजन' आळवायला सुरुवात केली. पंडित खरे एखाद्या तापसासारखे दिसत होते. त्यांच्यामागून सत्याग्रही. सर्वांपुढं गांधीजी. त्यांनी पाठीला लहानसा बिछाना बांधून घेतला होता. खांद्याला गरजेपुरत्या वस्तूंची थैली होती. मागे छगनलाल आणि प्यारेलाल.

गांधीजींनी पहिले पाऊल उचलले आणि सहस्र मुखातून घोषणा कल्लोळल्या,

"महात्मा गांधी की जय."

"नमक का कायदा तोड दो."

"भारत माता की जय."

सत्याग्रह यात्रा पुढे पुढे सरकत होती. पंडित खरे एकतारीवर तल्लीन झाले होते. रात्र पडली तशी मुक्काम झाला.

नवसारीजवळ यात्रा आली तेव्हा प्यारेलालनी सांगितलं,

"बापूजी, वल्लभभाईंनाही पकडलं."

"बरं झालं. माझ्यासाठी ते तुरुंगात जागा करून ठेवतील."

"बापूजी, देशातून प्रचंड प्रतिसाद आहे. सर्व भागात सत्याग्रह चाललाय. इथंही तुकड्या येताहेत."

"गोष्ट चांगली आहे प्यारेलाल. पण आपण हुरळून जाता कामा नये. आपल्याला करायचं ते शेवटपर्यंत केलंच पाहिजे."

"आता निघायला हवं बापू. चारसहा दिवस अजून लागतील दांडीला

पोहोचायला.'' प्यारेलाल म्हणाले.

आणि दिंडी पुढे सरकू लागली.

दांडीच्या किनाऱ्यावर समुद्र उसळत होता तेव्हा दिंडी येऊन पोहोचली आणि एक प्रचंड लाट किनाऱ्यावर फुटून तुषारांनी सारे चिंब भिजून गेले. सागरानं तर चांगलं स्वागत केलं. सूर्याच्या स्वच्छ उन्हात किनारा तळपत होता. सूर्याची पहिलीच किरणे होती तरी तो प्रकाश जाणवत होता.

**उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान् निबोधत**
**क्षुरस्य धारा निशिता दुरात्मया**
**दुर्गं पथस् तत् कवयो वदन्ति**

कठोपनिषदातला हा मंत्र गंभीर सुरात किनाऱ्यावर घुमला आणि मग पंडित खरे पुन्हा एकदा गाऊ लागले,

**शूरा जागो रे।**
**वीरा जागो रे।**

किनाऱ्यावर मिठाचे पांढरे शुभ्र पट्टे दूरवरून दिसत होते. कुठे कुठे मीठ उन्हात चमचमत होतं. या मिठाला मुठीत घेऊन कायदा तोडायचा होता. ते मीठ कायदा तोडणाऱ्यांची वाट पहात होतं.

दांडी गावातून आलेल्या सुवासिनींनी गांधीजींना आणि अठ्ठ्याहत्तर सैनिकांना पंचारत्यांनी ओवाळलं. त्यांच्या कपाळी कुंकवाचे टिळे लावले. गांधीजींच्या गळ्यात हातसुताचा हार होता. पंडित खऱ्यांनी शेवटची ललकारी दिली.

**जागो रे, जागो रे...**

आणि गांधीजींनी ती सागरसंपदा एक मूठभरून उचलून घेतली. फक्त एकच मूठ. पण त्या मुठीनं वर्षानुवर्षांचा जुलमी कायदा ठोकरला होता. अन्यायाला आव्हान दिलं होतं. बळजबरीला रामटोला हाणला होता. त्या एकाच मुठीनं स्वत्वाचा जयजयकार केला होता.

आणि मग अशा हजारो हातांनी, मूठमूठ घेऊन, ठिकठिकाणचे सागरकिनारे ओस पाडले.

''म्हणे मीठ घेऊन कायदेभंग करणार!''

''करताहेत तर करू द्या मिठाचे खेळ.''

''फुंकर घालून पर्वत का हलवता येतो.''

''योग्य वेळी पाहून घेऊ.''

सरकारस्वारीच्या आणि व्हाइसरायच्या डोक्यात असे विचार घोळत होते.

आणि त्याचवेळी देशापरदेशातील वृत्तपत्रांच्या वार्ताहरांनी आपले कॅमेरे दांडीच्या किनाऱ्यावर रोखले होते.

आठवडाभर सत्याग्रह. जिकडेतिकडे कायदेभंग; सगळीकडे वणवा. धरपकड आणि मारहाण सुरू झाली. तुरुंग ठेचून भरले. जवाहरलाल तुरुंगात, वल्लभभाई तुरुंगात. आणि अखेर गांधीजींनाही पकडले.

आणि मग वणव्यात तेल पडले. धारासन आणि मुंबईस वडाळा इथं तुंबळ संग्राम झाले. बाबू गेनू कामास आले.

"बापूजी मला वाटतं वाटाघाटींना आपण तयार व्हावं." प्यारेलाल म्हणत होते.

"आपण तयार आहोतच."

"तर मग छानच. कारण मी त्यांना तसं कळवून टाकलंय."

"कुणाला?"

"व्हाइसरायला."

"छान. प्यारेलाल, आधी करायचं आणि मग सांगायचं का रे?"

"बापूजी, माझ्यावर तुमचा विश्वास आहे. त्याचा थोडासा फायदा घेतला मी. गैरफायदा म्हणा हवा तर."

"हो. पण वाटाघाटींचा मसुदा नीट तयार कर. लक्षात आहे ना? सरदारांची आई ऐंशी वर्षांची. पोलीस सरदारांना अटक करायला गेले. बाई स्वयंपाक करत होत्या. चुलीवरचं भांडं पाडलं पोलिसांनी."

"हे सांगणार तुम्ही व्हाइसरायला?"

"काय हरकत आहे?"

"काहीच हरकत नाही."

"मग बापूजी, माझा तर कयास आहे, आपली बिनशर्त सुटका होणार."

"झाली तरी वाहवा, नाहीतरी वाहवा."

इतक्यात वर्दी आली, "कुणी बाई भेटायला आल्यात."

गांधीजी उठले आणि वॉर्डरच्या पाठोपाठ गेले. प्यारेलालही मग चालू लागले. अतिथिगृहातल्या बाकावर गुडघ्यावर हनुवटी टेकवून मीराबेन बसली होती.

गांधीजी तिच्याशी काही बोलायच्या आतच तुरुंगाधिकाऱ्यानं हुकूमाचा कागद आणून दिला- "बिनशर्त मुक्तता."

“बोल मीराबाई, तुझा काय हुकूम आहे?” गांधीजी म्हणाले.

“तुमचं इकडं राजकारण चाललंय.”

“मग?”

“तुमच्या घरात काय चाललंय ठाऊक आहे?”

“ती आघाडी आम्ही तुमच्या कस्तुरबांकडे दिली आहे.”

“कस्तुरबा काय करणार?”

“का?”

“तुमचा लाडला बेटा देवदास...”

“म्हणतेस काय मीरा?” गांधीजींनी थबकून विचारलं.

“प्रेमात पडलाय.”

“पडलाय?... वा छान छान” गांधीजी हसून म्हणाले.

“कुणाच्या ते नाही विचारलंत?”

“अग त्यांच्याइतकी आपल्याला घाई नाही. आता तू सांगणारच आहेस ना? म्हणून नाही विचारलं.”

“लक्ष्मीच्या-”

“लक्ष्मी?”

“राजाजींची मुलगी.”

“वा, मग तर छानच. वाईट काय त्यात?” प्यारेलाल चुटकी वाजवून म्हणाले.

“अहो महाशय, वाईट काही नाहीच. पण त्यांची कुणीतरी दखल घ्यायला नको का?”

“मीरा, तू कशाला आहेस मग?”

“मी! माझा काय बाई उपयोग?”

“तुझाच जास्त उपयोग आहे. मुलाला गुदगुल्या करून हसवायचं असलं तर मोरपीसच फिरवावं लागतं त्याच्या गालांवरून. आमच्यासारख्या सरधोपट खराट्यांचा काय उपयोग?” प्यारेलाल खोखो हसत म्हणाले.

“प्यारेलालजी, थट्टा पुरे.” मीराबेन काहीशा तीव्रतेने म्हणाली. “बापूजी, मी खरंच तुम्हाला विचारायला आले आहे.”

“काय?”

“तुम्ही दिल्लीला जाणार आहात?”

“हो.”

"मग तिथं गेल्यावर या गोष्टीत जरा लक्ष घाला."

"तिथं आयर्विनशी बोलायला जातो आहे मी."

"पण हेही बोला."

"वा! छान. पण तू हे सगळं इतक्या जोरानं..."

"बापू, बांची इच्छा आहे तशी."

"अस्सं. आता समजलं. स्वयंपाकघरातून ही शिष्टाईची कामगिरी तुझ्यावर आली आहे."

"मग? करणार ना?"

"करणार म्हणजे? मीरा, केलीच पाहिजे. अग, आयर्विनशी नाही बोललो तरी चालेल पण राजाजींशी बोललं पाहिजे."

"मग व्याह्याला घोडं धाडा आधी."

"काही जरूर नाही धाडायची. स्वतः व्याहीच घोडं घेऊन जातील." प्यारेलाल हसत म्हणाले.

तुरुंगाची सर्व दारं उघडी होती. ठासून भरलेला तुरुंग अरण्यातल्या गुहेसारखा आता रिकामा दिसत होता. महादेवभाईंनी आणलेल्या मोटारीत गांधीजी, प्यारेलाल, मीरा, सारेजण बसले. तेव्हा प्यारेलाल म्हणाले, "आता चलो दिल्ली."

❖

# तेरा

सक्तमजुरीच्या कैद्यांना वेठीच्या कामासाठी ओळीनं तुरुंगामागच्या पटांगणात नेण्यात येत होते. वॉर्डर ओरडत होते. क्वचित दिरंगाई करणाऱ्या एखाद्या कैद्याच्या पाठीवर हातातल्या सपाटण्यानं फटका देत होते. तुरुंगाला वेढणाऱ्या उंचच उंच भिंतीच्या आत अनेक कोठड्या होत्या. मधल्या रस्त्याच्या बाजूला भिंत घालून त्यापलीकडे खास कोठड्या तयार करण्यात आलेल्या होत्या. तिथंच महात्माजी, महादेवभाई, वल्लभभाई यांना ठेवलं होतं.

गोलमेज परिषदेचं सूप वाजलं हातं नि गांधीजी भारतात परत येईतो दंगे उसळले होते. ज्या खिलाफत चळवळीला गांधीजींनी मोठ्या मायेने हात दिला तिनंच आज वेगळं अनपेक्षित रूप धारण केलं होतं. इकडे अस्पृश्य लोक डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली वेगळा आवाज उठवीत होते. या भाऊगर्दीत गांधीजींचं ऐकायला कुणीच तयार नव्हतं. ज्या हरिजनांसाठी गांधीजी प्राण वेचायला तयार होते त्यांनी आपला सवता सुभा उभा करण्यासाठी आकान्त केला. ज्या क्राँग्रेसला त्यांनी खतपाणी घातलं तिच्या डंवरलेल्या वृक्षावर जातीयतेच्या जहरी विषवल्ली उगवल्या होत्या. ज्या मुस्लिम बांधवांना 'आपलं म्हणा' असा गांधीजींनी टाहो फोडला त्यांनीच तांडवनृत्य करायला सुरुवात केली. आणि गांधीजींची अहिंसा हातात घेऊनच मग हिंदू त्याला उत्तर देऊ लागले.

"भगतसिंगाला फाशी दिलं गांधीनी! आयर्विन करारात अट घातली असती तर भगतसिंग वाचला असता."

"खिलाफतीच्या वेळीच गोरक्षणाची हमी घेतली असती तर बिघडलं असतं?"

"गोलमेज परिषदेला जाऊन यांनी काय केलं?"

"अहिंसा हे ढोंग आहे."

असे विविध आवाज देशाच्या कानाकोपऱ्यात उठत होते. या विरोधवादळात गांधीजी स्थितप्रज्ञ राहिले.

आणि एका भल्या दिवशी सरकारनं त्यांना तुरुंगात टाकलं.

तिकडे कस्तुरबांना साबरमतीच्या तुरुंगात डांबलं.

सरदार आणि महादेवभाई, जेलर भंडारी यांच्याकडे गेले होते. गांधीजी समोरच्या आंब्याच्या झाडावर बसलेल्या पक्षिणीकडे एकाग्रतेनं पाहत होते. एकाएकी त्यांच्या अंतरात्म्याने त्यांना दिव्य संदेश दिल्याचा भास झाला. विजेसारखा लख्ख प्रकाश समोर चमकून गेला आणि मग महादेवभाई आले तेव्हा गंभीरपणानं गांधीजी म्हणाले,

"महादेव, उद्यापासून मी उपवास सुरू करणार."

महादेवभाई चमकले.

"कशासाठी बापू?"

"अस्पृश्यतेच्या बाबतीत कुणाचं एकमत होत नाही म्हणून."

"पण बापू..."

"काही बोलू नको महादेव. मी अंत:प्रेरणेनं उपवास करतोय. कुणाच्या सांगण्यानं नव्हे, कुणाला दाखविण्यासाठी नव्हे."

महादेवभाईंनी सरदारांना ही उपवासवार्ता सांगितली तेव्हा सरदारांच्या भव्य कपाळावर आठ्या उमटल्या. ते तरातरा चालत गांधीजींकडे गेले.

"बापूजी..." थोडंसं दरडावल्यासारखंच सरदार ओरडले.

"अरे अरे! सरदार, कुठं आगबिग लागली काय?" गांधीजींनी हसून विचारलं.

"हो. लागली आहे. तुम्हीच लावलीत ना."

"म्हणजे?"

"बापूजी, आता येरवड्यात आहात तोवर तरी स्वस्थ बसा."

"मग मी अस्वस्थ कुठं आहे?"

"लोक आता दमले आहेत. लोकांना चार दिवस निवांत बसू द्या."

"मग मी काय लोकांच्या पाठीस लागलो?"

"तुमचा उपवास म्हणजे लोकांना काम. मग काही लोक काय म्हणतात ठाऊक आहे?"

"काय?"

"हा गृहस्थ रिकामटेकडा आहे. उठल्याबसल्या उपासच करतो. तुरुंगातून सुटण्याकरिता उपासाचं ढोंग करतोय."

"सरदार, तुम्ही नाही ना तसं म्हणत?"

"बापूजी!" सरदार गदगदून म्हणाले.

गांधीजी पुन्हा मघासारखे एकटक बघत होते. झाडाच्या पानांकडे बघता बघता एकदम स्वत:शीच खुदकन हसले.

"का हसलात?"

"गोलमेज परिषदेला गेलो होतो. तेव्हाचा बोटीवरचा प्रसंग आठवला."

"कसला प्रसंग?"

"बोटीवर चार्लस लाँगफेलो म्हणून एक अधिकारी होता. माझ्याविषयी त्याच्या मनात काय किंतु होता कुणास ठाऊक, पण सारखा माझ्याविषयी चर्चा करायचा."

"चांगली का वाईट?"

"अर्थातच वाईट."

"मग तुम्ही त्याला काही सुनावलं का नाही?"

"कशाला? पण असा एक प्रसंग आला. त्यानं मला एकदा खिजवण्यासाठी माझ्यावर एक कविता केली."

"कविता? अन् तुमच्यावर! वा. बरं पुढं?"

"बरीच दूषणं दिली होती मला त्या कवितेत. कवितेसोबत मला एक पत्र लिहून ते कागद एका टाचणीनं जोडून त्यानं माझ्याकडे पाठवले."

"मग? कविता कशी होती?"

"असायची तशीच होती. यथातथाच. मी काय केलं सांगू?"

"हं..."

"टाचणी काढून ठेवली आणि कागद टाकून दिले. तो आला तरातरा. त्याला वाटलं मी चिडलो असेन, रागावेन. पण मी तर शान्त. त्याला वाटलं मी कविता वाचलीच नाही. म्हणून तो अधिरतेनं म्हणाला, 'मि. गांधी, कविता वाचा तर!' "

मी म्हणालो, "कविता वाचली आणि बाकीचा भाग टाकून देऊन ठेवण्यासारखा भाग ठेवलाय."

"कुठला?"

“ही टाचणी.”

सरदार खळाळून हसले.

“सरदार, लोकांनी दिलल्या दूषणांना शस्त्रं न मानता कापसाच्या म्हाताऱ्या मानावं. त्या आपल्याभोवती फिरत राहतात; पण त्यांचा फारसा उपद्रव नसतो. कापसाच्या म्हातारीनं कुणाला जखम झाली आहे का कधी?”

“आत्ताच एका उपवासातून उठलात तुम्ही आणि आता पुन्हा लगेच उपास!”

“करणाऱ्याला सहन होतं ते पाहणाऱ्याला सहन का होऊ नये?”

“सूर्याला स्वत:चा दाह कधीच होत नसतो, पण सृष्टी मात्र भाजून निघते बापूजी. तुम्ही उपवास जाहीर केलात की लोकांचा घास घशात अडकतो.”

“मी माझ्यासाठी उपवास करतोय सरदार; लोकांना उपद्रव देण्यासाठी नाही.”

“बापूजी, प्यारेलालही इथं नाहीत. ते नाशिकच्या तुरुंगात. बांना येऊ देतील की नाही शंकाच आहे. अशा वेळी तुम्ही उपवास करू नये असं मला वाटतं. आपण योग्य ते करा.” असं म्हणून धीमी पावलं टाकत सरदार निघून गेले.

महादेवभाई पत्रोत्तराची यादी तयार करीत होते. गांधीजींना आलेल्या प्रत्येक पत्राचा लिफाफा फोडलेला होता. महादेवभाईंनी त्यावर चीड व्यक्त केली तेव्हा गांधीजी म्हणाले,

“अरे आपलं काम कमी करतात हे लोक. इतकी पत्रं फोडण्याचा आपला वेळ वाचला.”

“ते असू दे बापूजी. आज ही तीन पत्रं महत्त्वाची आहेत. बघा.” असं म्हणून महादेवभाईंनी पत्रं पुढं केली.

“असू दे. तूच सांग मला.” गांधीजी म्हणाले.

“हे आहे शांतीचं आणि दुसरं लिनचं.”

“अच्छा! काय म्हणतो लिन?”

“तो आता संपादक झालाय. एका चिनी पत्राचा.”

“छान! त्याला अभिनंदन कळवून टाका.”

“आणि हे आता बिहारीचं.”

“बिहारी?”

“हो, चंपारण्यातला बिहारी.”

"आता आठवलं. काय म्हणतोय?"

"भेटायला येणार म्हणतोय. तारीख कळवा असं लिहिलंय."

"मग कळवून टाक; ठिकाण येरवडा कारागृह, दिनांक कोणताही, वेळ क्विनसाहेब देतील ती."

"बरं. आता हे तिसरं पत्र आहे बादशहाखानांचं."

"काय म्हणताहेत?"

"पख्तुनी लोकांत जाग येऊ लागली; पेशावरला एक सभा घेतली त्यांनी, त्याचा वृत्तांत लिहिलाय; पहिल्या उपवासाच्या वार्तेनं आपण फार व्यथित झालो असं लिहिलंय त्यांनी."

"गफारखानांना उत्तर मी स्वत: लिहीन. बिहारी आणि शांतीला तूच लिहून टाक."

महादेवभाई निघून गेले. संध्याकाळी वल्लभभाई पुन्हा आले. ते फार खुशीत होते. हातात कसलंसं पुस्तक होतं. हसत हसत गांधीजींना त्यांनी विचारलं,

"बापूजी, 'संघर्यो साप पण कामनो' ही म्हण तुम्हाला माहीत आहे?"

"आहे ना!"

"ही म्हण कशी प्रचारात आली?"

"सांगतो. ती एक गोष्ट आहे."

"मग ऐकलीच पाहिजे. महादेवलाही बोलावतो."

वल्लभभाईंच्या निरोपाप्रमाणं महादेवभाई येऊन बसले. गांधीजी म्हणाले, "मी काही व्युत्पत्तीशास्त्रज्ञ नव्हे, पण माझ्या मनानं या म्हणीची व्युत्पत्ती या गोष्टीत आहे-

एक म्हातारी होती. तिच्या घरी साप निघाला. तो तिनं मारला. आणि दूर टाकून देण्याऐवजी छपरावर ठेवून दिला. आकाशात एक घार घिरट्या घालत होती. तिच्या चोचीत मोत्याचा हार होता. तिनं छपरावरचा साप पाहिला. घारीनं मनात विचार केला- चोंचीतल्या हारापेक्षा छपरावरचा साप जास्त उपयोगी, आणि म्हणून हार टाकून देऊन तो साप घेऊन ती निघून गेली. हार म्हातारीला मिळाला."

"वा वा वा! हिअर हिअर." टाळ्या ऐकू आल्या.

गांधीजी, महादेवभाई आणि वल्लभाई यांनी पाहिलं तो जेलर क्विन तिथं उभे.

“तुम्ही गोष्टी सांगत आहात हे आधी कळतं तर आम्हीदेखील येऊन बसलो असतो ना इथं.” पुढं जेलर क्विन म्हणाले.

“अजूनही बसा, आपल्याला कोणी अटकाव केलाय? तुरुंग आपलाच आहे” गांधीजी हसत म्हणाले.

“पण आता गोष्टीचं काय? तुमची गोष्ट तर संपली!”

“इथं गोष्टींला तोटा नाही. हे सरदार सांगतील.”

“अच्छा सरदार, आजवर आम्ही तुमची भाषणं ऐकलीत. आज आता गोष्ट ऐकू या. सांगणार?” क्विननी विचारलं.

“बापूजी, माझ्या माहितीप्रमाणे ‘संघर्यो साप पण कामनो’ ही म्हण ज्या गोष्टीवरून प्रचारात आली ती गोष्ट अशी आहे.”

“सांगा सांगा. प्रास्ताविकात फार वेळ घालवू नका. बोलावणं आलं तर गोष्ट अर्धवट टाकून जावं लागेल मला.” पायरीवर सावरून बसत क्विन म्हणाले.

“एक वाणी होता. त्याच्या घरी साप निघाला. वाणी होता भित्रा. सापाला मारायची हिंमत होईना. मग त्यानं एक भलं मोठं तपेलं घेतलं आणि टाकलं पालथं त्या सापावर.

“रात्री वाण्याच्या घरी चोर आला. चोराला वाटलं- एवढं मोठं तपेलं. असं बाजूला पालथं घालून ठेवलंय. नक्कीच तपेल्याखाली डबोलं असलं पाहिजे. तो पुढं आला आणि त्यानं आपल्या दणकट हातांनी खस्कन ते पातेलं दूर केलं आणि... सापानं कडाडून दंश केला. जागच्या जागी चोर कोसळला.”

“वा वा, सरदार, तुम्ही मोठ्यांनाच कानगोष्टी सांगता असं नाही. छोट्यांनाही छान गोष्टी सांगता येतील तुम्हाला. आमचे छोटेबाबू आत्ता असते तर तुमच्या गळ्यात पडून तुम्हाला आणखी गोष्टी सांगायला लावल्या असत्या त्यांनी.” क्विन म्हणाले.

इतक्यात एक वॉर्डर आला आणि खाडकन सलाम ठोकून म्हणाला, “दिपुटी सायेबांनी आपल्याला बलिवलंय.”

“का?”

“नवीन कैदी आल्यात. झेंडेवाले.”

“ओ हो. मि. गांधी, झेंडेवाले कैदी म्हणजे तुमचेच लोक. सत्याग्रही. चला बराच मोठा घोळका असणार.” क्विन गांधीजींना म्हणाले आणि लांब

लांब ढांगा टाकीत ते निघून गेले.

रात्र पडली. आभाळात चांदण्यांनी गर्दी केली. गांधीजींनी कालपासून किपलिंगचं एक पुस्तक वाचायला घेतलं होतं- जंगल बुक. शेवटचं प्रकरण हातावेगळं करून त्यांनी पुस्तक बंद करून ठेवलं आणि झोपी जाण्याच्या इराद्यानं ते कस्टडीसमोरील अंगणात ठेवलेल्या कॉटवर जाऊन बसले. वॉर्डरनं आधीच त्यावर अंथरुण घालून ठेवलं होतं. त्यावर आडवे होऊन गांधीजी रामनाम जप करू लागले आणि डोळे मिटू लागले तोच पाण्याचे थंडगार शिंतोडे अंगावर येऊन थडकले.

जाग येऊन गांधीजींनी आभाळाकडे पाहिलं तर आभाळ गच्च भरलेलं मघाशी चांदण्यांनी फुलून गेलेलं आकाश कुठं तरी लुप्त झालं होतं. जलमेघांनी चांदण्या खाऊन टाकल्या होत्या. कॉट व्हरांड्यात नेणं आवश्यक होतं, म्हणून गांधीजींनी वल्लभभाईंना उठवलं. नवार विणलेली ती कॉट फारच जड होती. वल्लभभाईसारखा दणकट माणूससुद्धा ती कॉट व्हरांड्यात नेताना घामाघूम झाला. व्हरांड्यात कशीबशी कॉट आडवी टाकून वल्लभभाईंनी कपाळावरला घाम पुसला. बाहेर पाऊस कोसळत असतानाही वल्लभभाई आत चिंब भिजले होते.

हात झटकून टाकत वल्लभभाई म्हणाले, "उद्या दुसरी कॉट मागून घेऊ. ही फार जड आहे."

दुसरे दिवशी सकाळी क्विन राऊंडला आले तेव्हा गांधीजी म्हणाले, "एखादी हलकी कॉट असली तर पाठवा आणि ही घेऊन चला. अहो, आम्ही अंगणात झोपतो ना; पाऊस आला म्हणजे मला तर ही कॉट उचलताच येत नाही पण आमचे हे लोह-पुरुषसुद्धा अगदी घामाघूम होतात."

जेलरनी भांडाररक्षकाला बोलावलं. त्यानं सांगितलं,

"दुसरी कॉट नाही. काथ्याच्या दोरीची बाज आहे."

"चालेल का!" जेलरने विचारले.

"चालेल ना."

"तुम्ही म्हणत असाल तर काथ्या काढून टाकू आणि त्यालाच नवार बांधून देऊ."

"काही आवश्यकता नाही. काथ्याही चालेल. त्यावरच पथारी टाकून मी झोपेन."

संध्याकाळी काथ्याची बाज आली. वल्लभभाई तिथं होतेच. कपाळाला

आठी चढवून त्यांनी नाखुषी दर्शवली.

"हे काय बापू? या काथ्याच्या बाजेवर झोपणार?" वल्लभभाईंनी विचारलं. त्यांच्या सुरात नापसंती होती.

"हो. का बरं? काय हरकत आहे?" गांधीजी हसत म्हणाले. वल्लभभाई काहीच बोलले नाहीत. तिरप्या नजरेने फक्त गांधीजींकडे पाहत राहिले.

"पहा ना. ही बाज स्वच्छ राहू शकेल." गांधीजी म्हणाले.

"ते ठीक आहे. पण आता बाजेला चार बाजूंच्या चार खुंटांना नारळ तेवढे बांधायचे बाकी आहेत."

"सरदार..."

"हो. बापूजी, असल्या अपशकुनी बाजेवर तुम्ही झोपू नका. मी उद्या नवार बांधून देईन. मग ही बाज चालेल."

"नवारीत धूळ साचते. ती धुता येत नाही. काथ्यावर पाणी ओतलं की साफ; स्वच्छ काम."

"नवार धोब्याला देता येते. दुसरे दिवशी मिळते धुऊन."

"पण काथ्याची दोरी न काढता धुता येते. नवारीचं तसं नाही."

"बाजेत ढेकूण होतात. तुम्ही तीवर झोपू नका."

"मी यावरच झोपणार."

"एकूण तुमचा हट्टच आहे तर?"

"काय हरकत आहे हट्ट असायला?"

"हरकत कुणाची आणि कसली असणार?"

"लहानपणी मी अशाच बाजेवर झोपत असे. मला चांगलं आठवतंय. हो. सरदार, काथ्याचा आणखी एक उपयोग सांगू?"

"हं."

"आल्याचं लोणचं करायचं असलं म्हणजे आल्याची साल सुरीने न काढता आलं काथ्यावर घासावं म्हणजे साल निघून जाते."

"मग? आता आल्याचं लोणचं करायचा विचार आहे वाटतं?"

गांधीजी आणि सरदार दोघेही खळखळून हसले.

"उपयोग चांगला आहे ना?" गांधीजींनी विचारलं.

"छान आहे. पण आल्याच्या सालीप्रमाणे हाडावरची सालही काथ्या सोलून काढील. माझं ऐका. आपण नवार बांधू."

"या बाजेला नवार शोभणार नाही."

"का?"

"बुड्ढी घोडी, लाल लगाम असं होईल."

"एकूण काय, तुमच्या उपवासाच्या हट्टासारखा हा बाजेचा हट्ट तुम्ही चालवणारच तर!"

"हो."

"पण पाऊस आला तर?"

"तर नेहमीप्रमाणे बाज पुन्हा व्हरांड्यात घेऊ."

"ततो दु:खतरं नु किम्!"

"वा सरदार, आता संस्कृत चांगलं बोलू लागलात. मला ठाऊकच होतं!"

"काय?"

"या श्लोकाचा उपयोग करण्यासाठी तुम्ही मला आधीच प्रश्न विचारलात. होय की नाही?"

सरदार फक्त संथ हसले. त्यांच्या त्या मंद हसण्याला जणू म्हणायचं होतं, "काय हा हट्टी माणूस?"

आपल्या कोठडीकडे सरदार निघून गेले आणि गांधीजी बाजेवर आडवे झाले. तुरुंग शान्त, निद्रिस्त होता. रातकिडे तेवढे रात्र जागवीत होते.

सरकारची मन:स्थिती मोठी चमत्कारिक झाली होती. त्यातून सुटण्याचा मार्ग एकच. म्हणजे गांधीजींना सोडून देणे आणि मग एक दिवस व्हाइसरायचा हुकूम येऊन थडकला की, 'गांधीजींना मुक्त करावे.' तुरुंगाच्या मोटारीतून मुक्त कैद्यांची वरात येरवड्यासमोरच्या टेकडीवर असलेल्या पर्णकुटीत गेली. विठ्ठलदास ठाकरसी आणि लेडी प्रेमलीला ठाकरसी यांची ती शानदार वास्तु! तो वैभवानं तळपणारा महाल होता की वैराग्यतेजानं उठून दिसणारी कुटी होती, याचा संभ्रम पडावा असं तिथलं वातावरण.

पर्णकुटीत आज गर्दी मावेनाशी झाली होती. गांधीजींचा सर्व राजकीय, सामाजिक आणि कौटुंबिक परिवार पर्णकुटीच्या छायेखाली गोळा झाला होता. आपण भूषवीत असलेलं यजमानपद संभाळण्यात एवढीही कसूर होऊ नये म्हणून ठाकरसीबाई विलक्षण जागरूक होत्या.

कस्तुरबा, प्यारेलाल यांनाही सरकारनं मुक्त केलं होतं. ते येऊन पोचले होते.

टेकडीच्या माथ्यावर उभारलेली ती डौलदार वास्तु मोठी ऐटबाज दिसत होती. एका गोलाकार सज्जात महादेवभाई आणि प्यारेलाल उभे होते. वेळ रात्रीची होती. गांधीजींना भेटायला पुण्याचे कार्यकर्ते येणार होते. म्हणून गांधीजी दिवाणखान्यातच बसून राहिले होते. ठाकरसीबाई आणि कस्तुरबा यांना आज पोटभर गप्पा मारायच्या होत्या.

टेकडीचे पाय धुवत नदी संथ वाहात होती. हिरव्या-पिवळ्या वनस्पतींनी टेकडीच्या मागल्या बाजूला गर्दी केली होती. समारे येरवडा गाव गाढ झोपी गेलं होतं. नदीच्या पल्याड दूरवर पुणे शहरातले मंद दिवे लुकलुकत होते.

''सरसाहेबांनी हा महाल मोठा छान बांधलाय नाही?'' प्यारेलाल म्हणाले.

''हो. पण महालात नुसते श्रीमंतच राहतात. इथं बापूजींसारख्या लोकांचीही आवभगत होते.'' महादेवभाई महालाकडे नजर फिरवत प्यारेलालना म्हणाले.

''प्यारेलाल, बापूजी मोठे कसबी आहेत, कलावंत आहेत.'

''ते कसे काय?''

''कलावंत जसा सर्व जातींच्या, स्वभावांच्या, लोकांना एकत्र खिळवून ठेवतो तसं बापूजींनी केलंय. राजकारणी, श्रीमंत, विद्वान, गरीब, हरिजन, सारे बापूजींनी आपलेसे केलेत.''

''ते खरं आहे. पण कलावंताच्या अंतर्मनाला कुणीच जाणत नाही. कलावंत दुसऱ्यांना हसवतो. इतर हसतात तेव्हा कदाचित हा आतून रडत असतो.''

''खरं आहे भाई तुमचं म्हणणं.''

एवढ्यात खालून निरोप आला- ''जवाहरलाल आलेत. बोलावलंय.''

मधल्या दिवाणखान्यात सभा भरल्यासारखी माणसं बसली होती. हंड्या-झुंबरं असलेल्या त्या शाही दिवाणाखान्यात एकच गर्दी झाली होती. मणीबेन, मीराबेन आल्या होत्या. जमनालाल बजाज आले होते. कस्तुरबा नेहमीप्रमाणं मुदपाकखान्याकडे वळल्या होत्या.

दोन मोठ्या उपवासानंतर गांधीजींची चौकशी करायला सारे जमले होते. चंपारण्यातून बिहारी आला होता. बिहारी अजून होता तसाच हुमदांडगा होता. त्याच्या चेहेऱ्यावरचा रानगटपणा वाढलाच होता. डोळ्यात मात्र भक्ती होती.

''बापूजी, तुमचा उपवास म्हणजे साऱ्या देशाला उपवास.'' एक कार्यकर्ता हसत म्हणाला.

''आम्हाला तर वाटलं, या दोन उपवासात केव्हातरी बापूजींना...''

"होय! मला तो उपवास सुटला त्या दिवशीचं चित्र दिसतंय-"

वल्लभभाई म्हणाले... रंगमंचावर उभ्या राहिलेल्या एखाद्या नटासारखे वल्लभभाई शून्यात पाहून स्वगत म्हणू लागले-

"येरवड्याचा तुरुंग! ती उदासवाणी दुपार. नेहमीसारखी रखरखीत. पण आजची दुपार जरा वेगळी; बापूजी उपवास सोडणार या वार्तेनं उदासवाणे. पणाला आनंदाची किनार! बा आल्या होत्या. सरोजिनी, गुरुदेव समोर बसले होते. गुरुदेवांनी आपल्या करुण गंभीर आवाजात गीत म्हटलं-

"जीवन ज्यारे सुकाम त्यारे..."

"देशबंधूंच्या पत्नी वासंतीदेवी होत्या. त्यांचे डोळे ओलावले. आंब्याच्या झाडाखाली हा उपवास समाप्तीचा सोहोळा चालला होता. आणि बापूंनी... बापूंनी मोसंब्याच्या रसाचा पहिला घोट घेतला. अनेक दिवसानंतर..."

"वा वा! वा वा! सरदार, तुमने तो कमाल कर दिया" जवाहरलाल जवळ जवळ ओरडलेच.

बा दिवाणखान्याच्या दारातून सरदारांचं हे स्वागत पहात होत्या, ऐकत होत्या-

"सरदारांना म्हणावं, नाटकातही तुम्ही चांगलं काम करू शकाल." बा हळूच म्हणाल्या.

"हे सगळं खरं. पण बापूजींचे प्राण वाचले हे किती छान झालं!" कुणी एक कार्यकर्ता म्हणाला.

"वाचले नसते तर?"

"नसते तर त्यांना वीरमरण लाभलं असतं. उघड आहे." जवाहरलाल हसत हसत म्हणाले.

"छे! हे काय वीरमरण आहे काय?" गांधीजी म्हणाले.

'वीरमरण नाहीतर काय बापूजी?" मीराबेननं हळूच डोकावून विचारलं.

"माझी तर अशी इच्छा आहे की, खरं वीरमरण म्हणजे मी कुणाच्या तरी गोळीला निर्भयपणे छातीवर झेलून कोसळण्याचा प्रयत्न करतोय..."

"बापूजी!" दोन्ही कानांवर हाताचे तळवे दाबून मीराबेन एकदम ओरडली.

"त्या खेळीमेळीच्या वातावरणाचं मग एकदम रूपच पालटलं. पठारावर मंद वाऱ्याच्या झुळुका अंगावर घेत घेत पक्ष्यांचा चिवचिवाट ऐकावा आणि एकदम खोल दरीत जाऊन कोसळावं तशी सर्वांची स्थिती झाली.

"उपवासात खाटेवर पडून मरणं हे काय वीरमरण म्हणायचं?"

"बापूजी, तुम्ही म्हणता असं होण्यासारखं वातावरण तुम्हीच निर्माण करता, हे मात्र खरं." सरदार म्हणाले.

"म्हणजे?" जवाहरलालजींनी आश्चर्यानं विचारलं.

"कुठंही, आणि केव्हाही, कसेही जातात. कुणातही मिसळतात. शत्रूच्या खांद्यावरही लोभानं हात टाकतात. आम्हाला फार खबरदार रहावं लागतं." प्यारेलाल चटकन म्हणाले.

"आता हेच पहा ना. गफारसाहेबांबरोबर यांना दौऱ्यावर जायचंय पठाणी मुलुखात. आम्ही गफारखानसाहेबांना कळवलं होतं की पठाणी मुलूख आहे. बापूजींच्या रक्षणाची नीट व्यवस्था करा. त्याप्रमाणे खानसाहेबांनी खुदाई खिदमतगार रक्षणाला ठेवतो असं लिहिलंय, तर यांनी परस्पर कळवून टाकलं..."

"काय?"

"असं काही असेल तर मी येणारच नाही."

"बापूजी, हे मात्र खरं हं. तुम्ही संकटाला अगदी आमंत्रण देता आणि आमचा जीव मग टांगणीला लागतो." जमनालाल बजाज म्हणाले.

"यांना वाटतं यांच्या हातात चरखा आणि सुताच्या गुंड्या असतात त्याप्रमाणे साऱ्या जगाचे हात चरख्याचं चाक फिरवत बसलेत, पण काहींच्या हातात जीवघेणी शस्त्रंही असतात ना." सरदार विलक्षण गंभीरतेने म्हणाले. तेव्हा गांधीजी हसले आणि सरदारांच्या पाठीवर हात ठेवून म्हणाले,

"मग त्यापैकीच एखाद्याचा मी बळी झालो तरी आनंद वाटेल."

"कुणाची माय व्याली आहे बापूजींवर शस्त्र चालवायला! मुंडी मुरगळून त्याला लंबे करीन आणि त्याच शस्त्राच्या घावानं त्याच्या रक्ताचा सडा बापूजींच्या पायांवर शिंपेन..." बाह्या सरसावून एकदम पुढे येत बिहारी म्हणाला. बिहारीचा आवेश असा काही जोरदार होता की साऱ्यांना हसूच आलं.

"अरे अरे, बिहारी, इथं तसं काही घडलेलं नाही." वल्लभभाई म्हणाले. आणि गांधीजींकडं वळून त्यांनी विचारलं,

"बापूजी, या बिहारीलाच तुमचा शरीररक्षक नेमू या आपण."

"शरीररक्षकाची मला आवश्यकता नाही. इथे गमतीनं चाललेल्या संवादाप्रमाणं खरोखरच घटना घडली तर मला बरं वाटेल. तुम्ही मला 'महात्मा' म्हणता ना! मग महात्म्याचा अंत असाच झाला पाहिजे. सर्वसामान्य माणसाप्रमाणे त्याला मृत्यू आला तर तो महात्मा कसला?"

"तुमची हत्या करणाराला मी कच्चा खाऊन टाकीन." बिहारीच्या डोळ्यात

अंगार फुलला होता.

"हत्या! माझी हत्या कोण करणार! ख्रिस्ताची कोणी हत्या केली? कृष्णाला कुणी मारलं? बुद्धाचं काय झालं?"

"ख्रिस्ताला खिळे ठोकून मारलं लोकांनी."

"तत्त्वासाठी मरतो त्याची हत्या होत नसते. ते बलिदान असतं. तत्त्वासाठी मरण्यानंही तो अनेक जन्म जगतच असतो. माझ्या तत्त्वासाठी मला मृत्यू आला तर त्याचं मी स्वागतच करीन. सरदार, मृत्युपत्र करण्याच्या कल्पनेच्या विरुद्ध मी आहे. पण जर मी मृत्युपत्र केलं असतं तर त्यात असं लिहिलं असतं की माझे प्राण घेऊन मला शरीरप्रपंचातून मुक्त करणाऱ्याला काहीही शासन देऊ नये."

"हे मात्र भयंकर बोललात बापूजी. मग तुम्ही मृत्युपत्र करीत नाही तेच ठीक आहे." जवाहरलाल शहारून उद्गारले.

"का बरं? तुम्ही त्याच्या दृष्टिकोनातून विचार करा. तुम्हाला असंच वाटेल. जो कुणी माझ्यावर पिस्तुल घेऊन चालवेल तो जर वेडा असेल तर निरपराधच ठरेल आणि शहाणा असेल तर तोही कुठल्याही तरी तत्त्वाने भारलेला असल्यामुळेच ते कृत्य करील. कदाचित ते तत्त्व तुमच्या-माझ्या तत्त्वाच्या विरुद्ध असेल. पण त्याच्या तत्त्वाशी प्रामाणिक राहण्यासाठीच तो एवढा लोकक्षोभ पत्करून ते कृत्य करील हे तर खरे ना?"

"बापूजी, पण त्याला शासन होऊ नये म्हणजे..." महादेवभाई उद्गारले.

"मी जसे म्हणतो की माझी हत्या कुणी करू शकणार नाही; माझा अशा प्रकारे मृत्यू हे माझे बलिदानच ठरेल; तसंच त्याच्या बाबतीतही का म्हणू नये?"

"तुम्ही म्हणा. आम्ही म्हणणार नाही." वल्लभभाई म्हणाले.

"मग तीच माझी खरी हत्या ठरेल. तत्त्वाला तिलांजली यापेक्षा घोर हत्या कोणती? शरीर राहिलं काय नि गेलं काय, तत्त्व जगलं पाहिजे सरदार; तत्त्वाची हत्या होता कामा नये."

विषयाला इतकं गंभीर वळण लागलं होतं की साऱ्यांच्याच मनावर कसलंतरी चमत्कारिक दडपण आलं होतं.

जवाहरलालजींनी या गंभीरतेचा फुगा विनोदाच्या टाचणीने टच्कन फोडला. मनगटावरच्या घड्याळाशी चाळा करत ते म्हणाले, "आमच्या मनावर या चर्चेनं इतकं दडपण आलंय की कदाचित आम्हालाच तिलांजली द्यायची वेळ

यायची आता. तेव्हा बापूजी, तुमची ही तत्त्वचर्चा आणि तिलांजली प्रश्न बंद कराल तर बरं!"

हास्याच्या स्फोटानं तो दिवाणखाना दणाणून गेला तेव्हा कुठं वातावरणाला कलाटणी मिळाली.

जवाहरलाल, देवदास वगैरे लोक दुसऱ्या दिवशी निघून गेले. सुभाषचंद्र येणार होते म्हणून गांधीजी पुण्यालाच थांबले होते. जमनालाल बजाज मुंबईहून जाऊन आले आणि दुसऱ्या दिवशी भोजनाच्या वेळी ते गांधीजींना म्हणाले,

"बापूजी, तुम्ही मला आश्रमासाठी चांगली जागा निवडायला सांगितली होती ना?"

"मग? निवडली का?"

"हो. वर्ध्याजवळ छान जागा आहे."

"वर्ध्याजवळ? म्हणजे शहरवस्तीत? नको नको."

"शहरवस्तीत नाही. शहरापासून दूर. तिथं एक वस्ती आहे. तिथं तुम्ही रहा. नाहीच आवडलं तिथं तर शेगाव म्हणून एक गाव आहे जवळ तिथं रहा."

"शेगाव खेडं आहे?"

"ठार खेडं."

"मग चालेल."

"पण तुम्ही साबरमती आश्रमाची काय व्यवस्था केली?"

"तो तर हरिजनांसाठी संघाला केव्हाच देऊन टाकला मी. मला वाटतं तुम्हाला कळवलं होतं मी. आठवणीत नाही?"

"नाही. बरं मग, शेगाव ठरलं?"

"ठरलं."

"बांना विचारलंत?"

"त्यांना काय विचारायचंय? आफ्रिकेत माझ्याबरोबर आल्या त्या. आता शेगावला येणार नाहीत?"

"नक्की येतील. शेगावलाच काय पण तुम्ही हिमालयात गेलात तरी बर्फ तुडवीत तुमच्या मागोमाग येतील. आम्हांला खात्री आहे."

एवढ्यात मीराबेननं एक पत्रांचा गठ्ठा आणि बरोबर एक मोठी टोकरी आणली. टोकरीत निरनिराळ्या वस्तू होत्या. पत्रं फोडलेली होती. महादेवभाईंनी वाचली होतीच. पण आता वेळ असल्यानं त्यांना त्याबाबत ते सांगणार होते.

"हे काय आहे सर्व?" गांधीजींनी विचारलं.

"तुम्हांला आलेल्या भेटी आणि पत्रं." मीराबेननं सांगितलं. आणि त्यांनी एक हस्तिदंती बांगड्या जोड आणि कुंकवाचा करंडा पुढं केला.

"हे काय आहे? कुणी दिलं?" गांधीजींनी आश्चर्यानं विचारलं.

"बांसाठी सौभाग्यचिन्हं पाठवलीत."

"कुणी?"

"कादरभाईंनी. मुंबईहून पाठवलीत."

"कादरभाईंनी? आणि सौभाग्यचिन्हं?"

"हो. आता ही बघा. नऊ पैशांची पोस्टाची तिकिटं."

"ही कुणी पाठवली?"

"एका हरिजन मुलानं."

"त्याला पत्र लिहून टाका. सही मी स्वतः करीन." गांधीजी समाधानानं म्हणाले.

आता मिराबेननं एक छोटासा करंडा पुढं केला. त्याच्या बंद झाकणातून आतला तांबडा पातळ भुरभुरीत कागद डोकावत होता.

"हे काय आहे?" गांधीजींनी उत्सुकतेनं विचारलं.

"डाळिंबाचा करंडा?"

"कुणी पाठवला?"

"गुजरातेतल्या तीन मुलांनी. तुमच्या उपवासाच्या दिवसांतले खाऊचे पैसे वाचवून त्यातून पाठवलाय त्यांनी."

"मीरा, महादेव," गांधीजी म्हणाले, यातल्या आपल्याजवळ ठेवून घेण्यासारख्या गोष्टी असतील त्या ठेवून घ्या आणि फळफळावळ आजच येरवड्याच्या तुरुंगात रवाना करा. कैद्यांना वाटून टाका."

पण हे ऐकायला महादेवभाई तिथं नव्हते. ते खाली दरवाजाजवळ कोणाशीतरी बोलत उभे होते. धांदलीनं परत येऊन त्यांनी गांधीजींना विचारलं,

"लग्नाचे एक बिऱ्हाड आलंय. आशीर्वाद मागताहेत नवदांपत्यासाठी. येऊ दे त्यांना वर?"

"हरिजनकार्यासाठी काही देणगी देत असतील तर येऊ द्यात."

महादेवभाई गेले आणि लगेच परत आले. आठदहा माणसांचा घोळका पर्णकुटीचा नजरेनं वेध घेत, इकडे तिकडे पहात येत होता.

दांपत्यानं बापूजींना वाकून नमस्कार केला. बा पुढं आल्या. त्यांनाही

दोघांनी नमस्कार केला. बांनी साऱ्यांना पेढे दिले. वऱ्हाडी मंडळीच्या चेहेऱ्यावर विलक्षण समाधान दिसत होतं.

पाचदहा मिनिटांतच ती मंडळी उठली. वरपित्यानं एक सोन्याचं सलकडं काढून गांधीजींच्या हाती ठेवलं आणि पायावर डोकं ठेवून तो म्हणाला, "हरिजनांसाठी दिलंय. ठेवा."

"थांबा. मला आणखी एक गोष्ट करू द्या. मग मी हे तुमचं कडं घेतो" गांधीजी म्हणाले.

"काय करायचंय आपल्याला." नम्रपणे त्यानं विचारलं.

गांधीजी उठले. दोन पावलं चालून त्यांनी वधूच्या डोक्यावरला खूप खाली लोंबणारा पदर दूर केला आणि म्हणाले,

"हिला अशीच मोकळी, मुक्त राहू द्या. स्त्रीला बंधनात आणि अज्ञानात ठेवणं योग्य नाही."

साऱ्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला. त्यात बाही सामील झाल्या मग.

❖

# चौदा

ठेंगणीठुसकी मगनवाडी आता चांगली डौलदार दिसू लागली. तिचा पसारा वाढला तरी बांधेसूदपणा कमी झाला नव्हता. मूळ वस्तीच्या आसपास आता छोट्या छोट्या झोपड्या आणि क्वचित टुमदार कौलारू इमारती दिसू लागल्या होत्या. गांधीजींच्या बराचसा वेळ आता मगनवाडीत जाऊ लागला. ग्रामोद्योगाची लहानशी शाळा सुरू झालेली होती. कस्तुरबांना इथंही नेहमीप्रमाणं स्वयंपाकघर सांभाळायचं होतं.

मीराबेन शेगावला जाऊन राहिली होती. तिथल्या खेडुतांत राहून ती निरलसपणे काम करीत होती. गांधीजींनीही शेगावला जाण्याचा निश्चय केला होता. विनोबा, काका कालेलकर यांच्यासारखे प्रत्यक्ष अंग मोडून काम करणारे साबरमती आश्रमातले कार्यकर्ते इथेही रुजू झाले होते. गुजरातीच्या कोशाचं काम कालेलकरांनी फार चांगलं केलं होतं. तशाच स्वरूपाचं एखादं काम त्यांना इथेही द्यावं अशा विचारात गांधीजी होते. पण शेगावला जाऊन राहण्याचा त्यांचा विचार प्यारेलाल, वल्लभभाई यांनाही आवडला नाही.

"बापूजी, शेगावला कुठला स्वर्ग आहे?" वल्लभभाईंनी त्यांना एकदा विनोदानं विचारलं.

"तिथे स्वर्ग नाही, पण मला स्वर्ग निर्माण करायचाय."

"तिथे ना पोस्ट ना तार ऑफिस. कसलीही सोय नाही."

"माणसं तरी राहतातच ना तिथे? त्यांच्यासाठीच जायचंय."

"पण एवढा जाऊन राहण्याचाच हट्ट का?"

"त्याशिवाय ग्रामोद्धाराच्या माझ्या कल्पनेला मूर्त रूप येणार नाही."

"देशभर तुम्ही खेड्याखेड्यातून दौरे काढा. कार्यकर्त्यांना चालना द्या.

एवढं पुरेसं आहे.''

''हे पहा सरदार, चालना म्हणजे काय? भाषणं द्यायची. दौरे काढणं आणि भाषणं करणं हे तर तुम्ही लोक करणारच आहात. सध्याही करताहात. प्रत्यक्ष काम करणारी माणसं हवीत. माझ्या भाषणात मी जो उपदेश करतो त्याची सुरुवात माझ्यापासूनच व्हायला हवी.''

''नेहमीप्रमाणे तुमचा हट्ट तुम्ही चालवणारच तर?''

''हा हट्ट नाही. ही अंत:स्फूर्ती आहे. प्रत्येक राजकारणी माणसानं आधी शेताच्या मातीत हात खुपसले पाहिजेत, चरख्याचं चाक फिरवलं पाहिजे, भाषणं देण्याऐवजी खेडुतांना शिकवलं पाहिजे आणि धुळीतून चाललं पाहिजे. तरच या देशाचं राजकारण उंचावेल.''

''हे सगळं खरं, पण तुम्हीच ते केलं पाहिजे असं नाही. आम्ही करू.''

''छे छे. कदाचित तुम्ही दोघेचौघे मला समाधान देण्यासाठी करालही. पण सारेच करतील असं नाही. देशाचं राजकारण ग्रामोद्धाराच्या मोहिमेतून चाललं पाहिजे.''

एवढ्यात महादेवभाई आले. त्यांनी विचारले,

''बापूजी, आज दुपारी निघायचंय. लक्षात आहे ना?''

''कुठं जाणार महादेव?'' वल्लभाईंनी विचारलं.

''ठाण्याला.''

''महाशय, आपल्यालाही यावं लागेल. आपण काँग्रेस वर्किंग कमिटीचे सभासद आहात. तुमचे लोक तिथंच जमलेत.'' महादेवभाईंनी वल्लभभाईंना आठवण करून दिली.

''स्वामी आनंद आहेत तिथं?''

''हो. त्यांनी एक आश्रम सुरू केलाय. तिथंच जायचंय आपल्याला.''

''मग आता मला उठलंच पाहिजे.'' असं सरदार म्हणतात तोच कस्तुरबांचा निरोप आला-

''डिंकाचे लाडू केलेत. खायला या.''

''चला सरदार, हे तुमच्यासाठी आहे बरं का?'' गांधीजी हसून म्हणाले, ''तुम्ही आता हे डिंकाचे लाडू खा आणि देशासाठी लढायला घट्ट व्हा.''

''असे जर रोज लाडू मिळणार असतील तर कितीही घट्ट व्हायची तयारी आहे आपली.'' हसू दाबत वल्लभभाई म्हणाले.

एवढ्यात जमनालाल बजाज आले. गांधीजी कस्तुरबांना म्हणाले,

"लाडूंची संख्या वाढवा हो. तुमचे पाचवे पुत्र आलेत."

जमनालाल हसून म्हणाले, "ते सांगायची गरज नाही. आमच्यासाठी खाऊचा पुडा नेहमी तयार असतो."

"पण आज खाऊचा पुडा नाही. लाडू आहेत डिंकाचे."

"ते तुमच्याआधी मला ठाऊक आहे. मी लाडू खाऊनच आलो."

"याला म्हणतात प्रेम." गांधीजी वल्लभभाईंकडे वळून म्हणाले, "आपल्याला लाडू खाण्यासाठी या, असा निरोप पाठवला आणि यांना मात्र वाटेवरच गाठून लाडू खाऊनच पाठवलं!"

"असंच काही म्हणू नका हं. त्या बघा बा इकडेच येताहेत." जमनालाल म्हणाले.

कस्तुरबा हातात एक छोटं ताट घेऊन येत होत्या. ताटात बशा होत्या. त्यावर झाकणं होती.

"निरोप पाठवून अर्धा तास झाला. आला नाहीत. म्हटलं आपणच जावं." बा काहीशा रागातच बोलल्यासारखं म्हणाल्या.

"आम्ही विचार केला, जमनालालनं खाऊन लाडू शिल्लक राहिले तर आपण जावं. उगीच हेलपाटा कशाला?"

गांधीजींच्या बोलण्यावर जमनालाल आणि वल्लभभाई मनसोक्त हसले. बांनाही मग हसू आवरेना.

गांधीजी स्वामी आनंद यांच्या आश्रमात जाणार हे बांनी ऐकलं तेव्हा त्या म्हणाल्या,

"संभाळा हं. आश्रमातल्या मैदानात पुष्कळ साप निघतात."

"मीही ऐकलंय खरं." गांधीजी म्हणाले. आणि काहीतरी विचार करून आठवल्यासारखं बोलले,

"हाफकिन इन्स्टिट्यूटच्या कर्नल सोखींना पत्र लिहितो- सापांविषयीचं सगळं वाङ्मय पाठवून द्या."

"बापूजी, माझ्या ओळखीचा एक साधू आहे. त्याच्याजवळ आहेत पुष्कळ साप."

"मग? त्याला बंदोबस्तासाठी आश्रमात नेणार काय?" वल्लभभाईंनी विचारलं.

"पहा प्रयोग करून. त्याला सर्पविद्या चांगली अवगत आहे असं लोक म्हणतात."

"ठीक आहे. जमनालाल, आम्ही ठाण्याहून जाऊन येतो. येताना काँग्रेसचा तांडा इकडेच येणार आहे. त्या वेळी तुमच्या त्या साधूला बोलवा. आपण त्याचे प्रयोग बघू."

आणि जमनालालनी खरोखरीच त्या साधूला मगनवाडीत आणून उभा केला. गांधीजी परत आले होते. बरोबर जवाहरलाल, वल्लभभाई, सुशीला नायर, प्यारेलाल, महादेवभाई ही नेहमीची माणसं होतीच आणि इतर अनेक होते.

संध्याकाळी मगनवाडीच्या पटांगणात हा सापाचा खेळ सुरू झाला. साधुमहाराज उग्र चेहेऱ्याने उभे होते. त्यांच्याजवळ आज मात्र एकच साप होता. खाटेवर गांधीजी, महादेवभाई, वल्लभभाई होते. समोर चटई अंथरून बा, मीराबेन, सुशीला या साऱ्या बसल्या होत्या. डाव्या बाजूला खुर्ची टाकून तीवर जमनालाल बसले होते. शे-पाचशे लोक बघायलाही जमले होते.

गांधीजींनी साधूला विचारलं, "तुमच्याजवळचा साप कोणत्या जातीचा?"

"मण्यार." त्यानं उत्तर दिलं.

"मण्यार, फुरसं, नाग यातली अधिक विषारी कुठली जात?"

"माझ्या मतानं फुरसं."

"नाग डूक धरतो हे खरं का?"

"नाही. तसा माझा अनुभव नाही."

गांधीजी जवळजवळ त्याची उलटतपासणीच घेत होते. गांधीजींची सर्पविद्येतील ही प्रगती पाहून सगळे आश्चर्यात गुरफटून गेले.

"यांच्या हातात हा साप गोगलगाईप्रमाणे दिसतो," महादेवभाई म्हणाले.

एवढ्यात साधू जवळ आला आणि त्यानं तो साप गांधीजींच्या गळ्याभोवती वेढला. समोर चटया अंथरुन बसलेला स्त्रीसमाज थरथरला. महादेवभाईही म्हणाले,

"बापूजी, सापाला गळ्यात घेऊ नका."

पण गांधीजी स्थिर होते. लोकांचा जीव खाली वर होत होता. साधूला तो आपलाच विजय वाटला. तो हरखला. त्यानं सापाचं तोंड उघडून त्याचे सुळे, विषाची पिशवी इत्यादी गोष्टी दाखवल्या आणि आव्हानात्मक आवाजात तो म्हणाला,

"कोणी साप चावून घ्यायला तयार असेल तर मी ताबडतोब विष उतरवून दाखवतो.

साऱ्यांचे डोळे एकमेकांकडे पाहू लागले. आता गांधीजी या नव्या प्रयोगासाठी पुढं येणार अशी सर्वांना भीती वाटत होतीच ती खरी झाली. गांधीजी म्हणाले,

"या प्रयोगामुळे गरिबांचे प्राण वाचविण्याची विद्या मला येत असेल तर मी साप चावून घेण्यास तयार आहे."

कुणी काही बोलत नव्हते. साऱ्यांच्या नजरा गांधीजींवर खिळल्या. वाटलं आता बापूजी हात पुढं करणार!

साधुमहाराज आपले चंबुगबाळे आवरू लागले आणि म्हणाले, "दुसरे कोणी दंश करून घ्यायला तयार असेल तर मी प्रयोग करतो." सापाचे तोंड हातात धरून साधुमहाराज मध्ये उभे होते.

मगनवाडीतला एक शेतकरी पुढे झाला. दंश करून घेऊन मृत्यूशी झुंज घेण्यासाठी तो सिद्ध झाला.

साधुमहाराज सापाला टिचक्या मारू लागले. पण सापानेही जणू सत्याग्रह केला होता. आपले वेटोळे सोडून साप तोंड वर काढीना. खूप चुचकारले, खूप चुचकारले. पण सापाने जात सोडली नाही आणि तो गपगार बसून राहिला. तेव्हा बांनी सुस्कारा सोडला आणि शेजारी बसलेल्या सुशीलेला म्हणाल्या,

"सुटले एकदाची या प्रसंगातून मी. नाहीतर दंश त्यांना आणि वेदना मला असं व्हायचं होतं."

एवढ्यात एक छकडा येऊन थांबला. आणि त्यातून एक उमदे गृहस्थ उतरले. छकडेवाल्याला पैसे देऊन त्यांनी सामानाच्या वळकट्या स्वत:च खांद्यावर घेतल्या आणि नेमकं कुठं जायचं ते न समजल्यानं ते गोंधळून इकडे तिकडे पाहू लागले.

गांधीजी पाठमोरे होते. महादेवभाईंनी वळून पाहिलं तो तिथे जे. सी. कुमारप्पा पाठीवर वळकट्या घेऊन उभे आहेत! महादेवभाई पुढं धावले.

"आधी कळवायचं नाहीत? आम्ही आलो असतो आपल्याला उतरवून घेण्यासाठी," महादेवभाई काहीसे ओशाळून म्हणाले.

"आधी कळवून सारेच येतात. न कळवता येण्यात काय मौज असते ती पहावी म्हटलं, म्हणून आलो." कुमारप्पा म्हणाले.

गांधीजींनी कुमारप्पांना दृढालिंगन दिलं. स्वयंसेवकांनी कुमारप्पांचं सामान त्यांच्या खोलीत नेऊन ठेवलं आणि बांच्या नजरेच्या इशाऱ्यानुसार दोघेही

स्वयंपाकघराकडे गेले.

पुढल्याच आठवड्यात ग्रामोद्योग संघाच्या कार्यकर्त्यांची बैठक होती. म्हणूनच कुमारप्पा आले होते. हा पट्टीचा विचारवंत मगनवाडीच्या आश्रयाला आला होता तो समाजसेवेच्या लोभाने आणि लोककल्याणाच्या वांछेने!

सकाळी कुमारप्पा झोपेतून जागे झाले तो समोर झाडांच्या बुंध्याशी पाच पंचवीस माणसं भांडी घासत होती. त्यात महादेवभाई होते. आपल्या पैरणीच्या बाह्या दंडापर्यंत दुमडून महादेवभाईंनी बचकभर माती घेतली आणि ती ओली करून एक मोठ्या पातेल्याच्या पोटावरून ते हात फिरवू लागले. पातेलं विसळलं तेव्हा ते लख्ख झालं होतं. पाठीमागून गांधीजी आले आणि लोक नको नको म्हणत असताना एक एक वाटी घासून स्वच्छ करायला त्यांनी सुरुवात केली.

कुमारप्पांनी आता इथेच राहायचं ठरवलं होतं. तेही मग धोतर कमरेला खोवून रोजच्या या घासापुशीत सामील होऊ लागले. गांधीजींनी भांडी घासलेली बांना आवडत नसत. म्हणून शक्यतो हे कामा बांचा डोळा चुकवूनच गांधीजींना करावे लागले.

बांचं डोकं एका सकाळी खूप दुखू लागलं. गांधीजींनी स्वत: सुंठीचा लेप त्यांच्या कपाळावर घातला आणि त्यांचा जरासा डोळा लागला आहे हे पाहून हळूच गांधीजी उठले.

बांच्या वाट्याचं कामही ते आज उरकून टाकणार होते. स्वयंपाकघरात धुरकटलेली भांडी स्वच्छ करण्यासाठी कुणाच्या तरी हातांची वाट पाहात होतीच. गांधीजी स्वत: गेले आणि ती भांडी त्यांनी बाहेर आणली. हातांचे तळवे काळे झाले. कुमारप्पा तयार होतेच. दोघांनी मिळून तालात भांडी घासायला सुरुवात केली. यांचा डावा हात की त्यांचा उजवा; त्यांचा उजवा की यांचा डावा. एक एक भांडं लख्ख होऊ लागलं.

पण या साऱ्या उद्योगात गांधीजींचे हात कोपरापर्यंत मातीने आणि राखेने भरून गेले. कुमारप्पांच्या शुभ्र पोशाखावर मातीची खडी ठिकठिकाणी उमटली होती. दोघांच्याही हातात नारळाचा काथ्या होता.

आणि...

समोरच्या खिडकीतून दोन डोळे हे दृश्य टिपत होते.

डोळे ताणले गेले.

डोळ्यांवरच्या कपाळावर नापसंतीची सूक्ष्म रेषा उमटली.

बा झटकन आपल्या झोपडीबाहेर पडल्या. काहीशा रागानंच झपाझप पावलं टाकीत त्या पुढं गेल्या. गांधीजींचं आणि कुमारप्पांचं लक्ष नव्हतंच.

"अहो" बांनी हाक मारली.

तरी गांधीजी कामात चूर होते.

"ऐकलं का?" बा आणखी मोठ्या आवाजात ओरडल्या. घासताना भांड्यांचा आवाज होत होता आणि एकीकडे गप्पाही चालल्या होत्या. त्यामुळे गांधीजींना बांचं बोलणं ऐकूच आलं नाही. मग मात्र बा आणखी पुढं गेल्या आणि गांधीजींच्या हातातून घस्‌कन घासणी हिसकावून घेत त्या म्हणाल्या,

"तुमच्यासारख्या महात्म्याला हे काम शोभत नाही. जा. दुसरं काम करा."

गांधी बांकडे नुसते बघत राहिले. बांचा आवेश, ती तप्त मुद्रा आणि तो अवतार पाहून गांधीजींना हसू आलं.

एव्हाना बा पदर बांधून स्वत: भांडी घासू लागल्या होत्या.

"अहो, तुम्ही कशाला घासता? तुमचं डोकं दुखतंय ना?"

बा न बोलता घासणी फिरवत राहिल्या.

"पहा. अजून सुंठीचा लेप पुरा वाळलासुद्धा नाही." गांधीजी म्हणाले.

"बानी एकदम तोंड फिरवलं आणि त्या म्हणाल्या,

"सुंठीचे दहा लेप घालून वाळवले तरी माझं डोकं आता थांबायचं नाही."

"का बरं? तुमच्या डोक्याला सुंठ फार आवडू लागली आहे वाटतं?"

"माझ्या डोक्याला जे आवडतं ते तुम्ही करीत नाही. मग ते थांबायचं कसं?" खोटं रागावून बा म्हणाल्या.

"बोला काय करू?"

"हात धुवा आणि मुकाटपणे जाऊन स्वस्थ बसा, नाहीतर चरखा फिरवा. पुन्हा राखोडीत हात घालू नका म्हणजे माझं डोकं नाही दुखायचं."

बा गालातल्या गालात हसत होत्या ते गांधीजींनी पाहिलं. कुमारप्पा या संसारी भांडणाचा देखावा पाहत स्वस्थपणे उभे होते. विहिरीच्या पाटात हात बुचकळून धुता धुता गांधीजी त्यांना म्हणाले,

"तुम्ही फार सुदैवी आहात."

"तो कसा?"

"अहो तुमच्यावर अधिकार गाजवायला बायको नाही."

"हे आमचं सुदैव?"

"हो, घरात तंटेबखेडे नकोत म्हणून मला बायकोचं ऐकावं लागतं."

"मग तर तुम्ही आमच्यापेक्षा सुदैव आहात!"

"तो कसा?"

"अहो जगात कुणी तरी कुणाचं तरी ऐकावं. त्यात सुख असतं. आम्ही ऐकायचं कुणाचं?" कुमारप्पा हसत हसत म्हणाले.

एवढ्यात एक माणूस शेगावहून पत्र घेऊन आला. पत्र होतं मीराबेनचं. मीराबेन आता शेगावला जाऊन राहिली होती. तिथल्या शेतकऱ्यात ती मिसळून गेली होती. शेगावचे जमीनदार बाबासाहेब देशमुख आणि जमनालाल बजाज मीराबेनला सर्वतोपरी मदत करीत होते. गांधीजींच्या सांगण्यावरून मीराबेननं तिथं एक झोपडी उभारली होती आणि आता तर मोठ्या कलात्मकतेनं गांधीजींसाठीही एक झोपडी तिनं तयार करून घेतली. निरोप तोच होता.

गांधीजी कुमारप्पांना म्हणाले, "येणार? आमची झोपडी बघायला?"

"बघायलाच काय, राहायला सुद्धा येऊ." कुमारप्पा म्हणाले.

आणि दुसऱ्या दिवशी सकाळीच पंधरावीस माणसांचा मोर्चा शेगाववर गेला.

गांधीजी जाऊन पोहोचले तेव्हा झोपडी जवळजवळ पूर्ण झालेली होती. मीराबेनची धांदल सुरू होती. इकडे कामकऱ्यांना सूचना देत होती. इकडे शेणखळा शिंपत होती, तर मध्येच कुणाला तरी कसला निरोप सांगत होती.

स्वच्छ केलेल्या अंगणावर मीराबेन दोही हाती सपासप शेणखळा शिंपत होती. गांधीजी येताहेत याकडे तिचं लक्षच नव्हतं. शेणखळ्याचे कच्च शिंतोडे गांधीजींच्या अंगावर उडाले. तेव्हा लक्ष जाऊन ती ओशाळली आणि म्हणाली,

"अर्र ! बापूजी, माझं लक्षच नव्हतं हं."

"असू दे मीरा. तू एक चांगलं काम केलंस."

"कसलं?"

"आमच्या अंगावर आतापर्यंत कुणी खडी काढली नव्हती, ती तू काढलीस. छान झालं की!"

गांधीजींनी त्या आसमंताकडे पाहिलं. स्वच्छ आभाळ पृथ्वीकडे टक लावून बघत होतं. झोपडीच्या मागच्या अंगाला जमिनीचा पसारा होता. दूरवर जमिनीला टेकलेलं क्षितीज सुबक दिसत होतं. मधूनच झाडं आभाळाला खुणवीत होती. क्वचित एखादा मोठा थोरला दगड ध्यानस्थ मुनीसारखा भासत हाता. शहरगावाची घरांची टोकं दूरवरून दिसत होती. आणि या

मोकळ्या जमिनीवर एखादं गोजीरवाणं मूल आभाळाकडे पाहत उभं राहावं तशी ती झोपडी दिसत होती.

गांधीजींनी कस्तुरबांना विचारलं,

"आवडली झोपडी?"

"हो. फार आवडली."

"आणि नसली आवडली तरी बा आता म्हणणार, हाच माझा ताजमहाल." मीराबेन हसून म्हणाली.

गांधीजींचं लक्ष त्यावेळी समोरून जाणाऱ्या खिल्लारांच्या कळपाकडे होतं. त्यात काही गायी होत्या, वासरं होती, एकदोन बैलही होते. जनावरांची जिवंत मढी पुढं सरकत असल्यासारखं वाटत होतं.

"काय बघता बापूजी?" महादेवभाईंनी विचारलं.

"ही बघ महादेव, भारताची पशुसंपत्ती!"

"त्यात काय बघायचंय?"

"अरे, या जनावरांच्या फासळ्या बघितल्यास?"

"चारापाणी नीट नसतं त्यांना."

"हेच आमच्या देशातल्या शेतकऱ्याला शिकायचंय. दिव्याला भरपूर तेल द्यावं, वारंवार काजळी झटकावी आणि मग त्याच्याकडून भरपूर प्रकाश घ्यावा."

"हे शिकायला या लोकांना सात जन्म घ्यावे लागतील. तो बघा, या जनावरांचा मालक. तो त्यांच्यापेक्षा मरतुकडा आहे. तरी हातातल्या काठीनं जीव खाऊन सपासप बडवतोय बैलांना!"

"महादेव, आपल्याला आता इथं राहून हेच करायचंय."

"काय? हेच काय?"

"इथल्या माणसाला माणूस बनवायचा."

"आणि मग ते राजकारण, दिल्ली, व्हाइसराय..."

"ते सगळं इथूनच."

"बापूजी, या खंदकात बसून किल्ल्यातलं राजकारण करता येणार नाही."

"अरे, पण खंदकच किल्ल्याचं रक्षण करतो ना? तेच खरं राजकारण आहे. आणि तेच करून दाखवण्याचा माझा संकल्प आहे."

"तुमच्याकडं मोठमोठे लोक येतात त्यांची सरबराई..."

"त्यांना माझ्याकडे यायचं असेल तर त्यांना इथल्या मातीत मिसळायला

हवं, इथला वारा खेळवायला हवा, इथंच त्यांनी रमायला हवं... नाहीतर...''

''नाहीतर काय?''

''माझ्याकडे येणं बंद करावं.''

''बापूजी!''

''होय महादेवा. समाजोद्धारणाचं कार्य महालात बसून नाही व्हायचं. ते झोपडीमधूनच झालं पाहिजे.''

''बरं. मग आता पुढच्या योजना सांगा.''

''प्रथम आपण असं करू, या वस्तीचं शेगाव हे नावच बदलून टाकू.''

''आणि कोणतं नाव द्यायचं?'' मीराबेन म्हणाली.

''तुम्हांला कुणाला काही सुचत असल्यास पहा.''

कस्तुरबा, मीरा, महादेव, एकमेकांकडे बघू लागले. जमनालाल बजाज, कुमारप्पा, कालेलकर, विनोबा मागं उभे होते. बराच वेळ कुणी काही बोलेना. तेव्हा गांधीजी म्हणाले,

''आश्चर्य आहे. इथं एवढे विद्वान, रसिक, कवी, अनुभवी , विचारवंत असताना एक नाव सापडू नये?''

''नावं पुष्कळ आहेत. पण तुम्हांला पसंत पडायला हवीत ना?'' महादेवभाई म्हणाले.

''तुम्ही सांगा तर खरी.''

''महादेव, तू मुळीच नाव सुचवू नको. यांच्या आणि आपल्या वाटा कधी जमल्यात का?'' बा हसून महादेवभाईंना म्हणाल्या.

''आयुष्यभर तुमच्याच वाटेवर तर चालतोय मी. आणखी वाटा कुठल्या जमायच्या?'' काठी जमिनीत रुतवत गांधीजी म्हणाले.

''बापूजी, मतामतांच्या चर्चेत मूळ मुद्दा जाईल. तुम्हीच नाव सांगून टाका ना?'' मीराबेन घाईघाईनं म्हणाली.

''आणि तुम्हांला ते नाही पसंत पडलं तर?''

''वडिलांनी पसंत केलेली मुलगी डोळे झाकून मुलानं करावी अशी चाल आहे आपल्याकडे अजून.'' महादेवभाई म्हणाले.

''पण मला डोळे झाकून पसंती नकोच आहे. अगदी डोळे उघडून, डोके जागे ठेवून पसंती करा.''

''वधूला समोर तर आणा. नुसतीच चर्चा का?'' बा उद्गारल्या.

''गांधीजी, आता टाका सांगून.'' कुमारप्पा झटक्यात म्हणाले.

गांधीजींनी एकवार सर्वांकडे पाहिलं आणि ते म्हणाले,

"सेवाग्राम."

सेवाग्राम! एक समसंवेदना सर्वांनाच जाणवली.

सेवाग्राम; नव्या नावाची वार्ता पसरविण्यासाठी वारा लहरींवर स्वार होऊन त्वरेने गेला.

"नाव छानच आहे!"

"फारच सुरेख."

"आणि मूळच्या नावाशी संबंध सुटलेला नाही!"

"तो कसा काय?"

"सेगावचं सेवाग्राम. फारच थोडा बदल!"

"काका, तुमच्यातला भाषाशास्त्रज्ञ इथं जागा झालेला दिसतोय."

"हे सगळं झालं. बारसं झालं. पण बारशाचे पेढे?"

कुमारप्पांनी हसून विचारलं.

"हे सेवाग्राम आहे. इथं कुठले पेढे?"

"हवेच असले तर मिळतीलही. पण माझ्या झोपडीत यावं लागेल तुम्हा सर्वांना." आपल्या टुमदार झोपडीकडे हात दाखवून मीराबेन म्हणाली, "आणि... शिवाय..."

"शिवाय काय?"

"मी पेढे देईन. पण खाण्यासाठी तुम्हाला बापूजींची परवानगी काढावी लागेल."

"मग काही या जन्मात पेढा तोंडात जाण्याची आशा नको." महादेव हसून म्हणाले. त्यावेळी गांधीजी झोपडीच्या मागील दारातून बाहेर पडत होते. एखाद्या गुहेतून ऋषी बाहेर पडत असावेत तसे ते दृश्य होते. गांधीजींच्या डोळ्यात समाधान ओतप्रोत होतं. त्यांना झोपडी फार आवडली होती.

"बोल मीरा, आता आम्ही केव्हा वस्तीला येऊ इथं?'

"बापूजी, मंदिर तयार आहे. मूर्तीनं केव्हाही यावं."

"मूर्तीला लोकांनी आणून बसवावं लागतं. तशी तू आम्हाला इथं केव्हा आणून बसवणार आहेस?"

"बापूजी, आणखी एक आठवड्यात आपण इथं रहायला येऊ." महादेवभाई म्हणाले.

"महादेव तू आता इथेच रहा. आणि आठवड्यात आणखी एक चांगली

झोपडी इथं तयार ठेवा.''

''ती कुणाला?''

''उघड आहे. तुमच्या कस्तुबांसाठी झोपडी नको का?''

''हवी ना. आता मला कामाला सुरुवातच केली पाहिजे.'' महादेवभाई म्हणाले.

मोटार वाट पहात होती. झोपडी बघायला आलेले सारे परत मगनवाडीकडे मार्गस्थ झाले.

मीरा हात उंच करून म्हणत होती,

''बापूजी, आता आपली भेट- एक आठवड्यानं.''

गांधीजींच्या वास्तव्यानं सेवाग्रामच्या परिसराला बाळसं आलं होतं. झाडाझुडपांनी अंग धरलं होतं, लतावेली सेवाग्रामात फुलू लागल्या होत्या. ओसाडी कमी कमी होऊ लागली होती. सेगावच्या शेतकऱ्याला रोज काही तरी नवं ऐकायला मिळू लागलं. नित्य नवी माणसं सेवाग्रामच्या धुळीत पावलं बुडवून जाऊ लागली. वर्ध्याच्या पोस्टात सेवाग्रामच्या पत्त्याची पत्रं येऊन पडू लागली. नुसती पत्रंच नव्हे, पार्सलं, मनिऑर्डरी, रजिस्टरं यांचा खच पडू लागला.

आश्रमाचा एकएक अवयव आकार घेत होता. टुमदार झोपड्यांनी शोभिवंत दिसणारी ती वस्ती आता जगाचं लक्ष वेधून घेणारी होती. साबरमती आश्रमातली दिनचर्या, तिथले कडक नियम, आचारपद्धती यांची आवृत्ती इथेही होतीच.

अशीच एक प्रसन्न पहाट! अंध:काराचं पांघरूण पृथ्वीनं पूर्णपणे टाकून दिलेलं नव्हतं. तरी हळूहळू ती दूर करत होती. सेवाग्रामची तपोभूमी केव्हाच जागी झाली होती. पहाटेपूर्वीच उठून गांधीजींनी पत्रव्यवहार पाहिला आणि प्रार्थनेसाठी ते उठून बाहेर आले. मावळती नक्षत्रे आणि तारका एकमेकांना निरोप देण्यासाठीच जणू आभाळात लुकलुकत होती.

गांधीजी आपल्या खाटेवर येऊन बसले. खाटेच्या पायाशी चटईवर मीराबेन होती. उजव्या पायाशी कस्तुरबा, महादेवभाईंच्या पत्नी; आणि समोर महादेवभाई, काका, विनोबा, सारी मंडळी. सेगावातले काही शेतकरी, आश्रमात झोपायला येत होते. आणि दक्षिणेतले तरुण विद्यार्थी प्रवासाला जाताना मुद्दाम सेवाग्रामला आले होते तेही भल्या पहाटे उठून प्रार्थनेला बसले होते.

गांधीजी मीराबेनला म्हणाले,

"मीरा, मेनन, कुटाप्पा, रंगाचारी हे सगळे तरुण पंडित आपल्या प्रार्थनेला हजर आहेत. आज तू एखादं इंग्रजी भजन म्हण."

खाटेखालची सूरपेटी काढून मीराबेननं सूर धरला आणि तिच्या गळ्यातून शब्द सुरात लपेटून बाहेर पडू लागले,

**"Lead kindly light,**
**amid the encircling gloom**
**Lead thou me.**

मीरा तन्मय होऊन गात होती. त्या गोड गंभीर सुरांनी वातावरण भरून गेलं. कार्डिनल न्यूमनची ही कविता! मार्ग दाखविणाऱ्या दिव्य दीपज्योतीची.

**The night is dark and I am far from home,**
**Lead thou me on...**

"किती बरं वाटतंय नाही?"

"आपण हीच कविता कितीतरी वेळा वाचली आहे."

"पण अर्थ आज उमगला खरा."

"मीराबेन म्हणतेही छान."

"ए, बोलू नकोस ना..."

त्या विद्यार्थ्यांची ही कुजबूज सुरू होती.

**And with the morn,**
**Those angel faces smile**
**Which I have loved long**
**Since and lost awhile."**

या शेवटच्या ओळी आर्ततेनं म्हणून मीराबेननं सूरपेटी जागच्या जागी ठेवून दिली. गीताचा प्रभाव अजून संपला नव्हता. कानात ते शब्द अजून घुमत होते.

**Lead kindly light...**

आणि खरोखरीच आभाळात शुक्रतारा दिसत होता. तो एकटा होता. त्याच्या मागे शेकडो निस्तेज फिक्या चांदण्या होत्या. काळ्याशार आभाळाच्या अंधाऱ्या रस्त्यावरून जणू शुक्र या चांदण्यांना घेऊन जातो आहे असं वाटत होतं.

सकाळ झाली. जगाचं चलचित्र सुरू झालं. आणि गांधीजींना कससंच वाटू लागलं. सर्वांगाला मुंग्या आल्याचा भास होऊ लागला. पाहुणे म्हणून आलेल्या विद्यार्थ्यांना त्यांनी नुकताच निरोप दिला होता. शरीराप्रमाणे मनालाही

शिणवटा जाणवू लागला.

आपल्या झोपडीतल्या चौपाईवर गांधीजी स्वस्थ पडून होते. अलिकडेच रक्तदाबाच्या विकारानं त्यांच्या शरीरावर मोर्चे बांधले. फार काम पडले की रक्तदाबाचा राक्षस जागा व्हायचा. डॉ. अन्सारी चांगले उपाय करत. पण गेल्या आठवड्यात अन्सारीही गेले. गांधीजींच्या मनावर त्या दु:खाचं मळभ दाटलं होतं. गेल्या काही वर्षांत एकापाठोपाठ प्रिय, परिचित, प्रसिद्ध अशा अनेकांचे मृत्यू बघण्याचा प्रसंग आला होता. मोतीलाल नेहरू, दासबाबू, कमला नेहरू, मगनलाल आणि आता डॉ. अन्सारी!

या मृत्युमालिकेने ते विचलीत झाले नव्हते. तरी व्यथित झाले होते. खास म्हणूनच रक्तदाबाला कधी कधी वाट मिळे. सुंद झाल्यासारखे खाटेवर पडलेल्या गांधीजींनी बघताच प्यारेलाल मनात चरकले. त्यांनी बांना वार्ता दिली. घाईघाईनं बा आल्या. तेव्हा जणू काही घडलंच नाही अशा स्थितप्रज्ञ अवस्थेत एखाद्या शिल्पासारखे गांधीजी खाटेवर बसून होते.

बांनी त्यांचे हातपाय चोळले. गरम पाण्यात कापड भिजवून वाफारे दिले. तेव्हा कुठं गांधीजींना बरं वाटलं.

दुपारी जमनालाल आले. तेव्हा जड आवाजात बा म्हणाल्या,

"जमनालाल, हे इथं राहिले असेच तर प्रकृती आणखी बिघडेल."

"खरं आहे बा. पण ऐकत नाहीत बापूजी."

"निदान चार दिवस हवापालट म्हणून तरी यांना इथून हलवलं पाहिजे."

"तरीही चालेल. नंदीहिलवर जाता? तुम्हीही जा संगे."

"मी तर जाईनच. पण यांचं मन वळवायला हवं."

"ते काम माझ्याकडे. तुम्ही नंदीहिलला जाण्याची तयारी करा. बाकीची सगळी व्यवस्था मी बघतोच आहे." असं सांगून जमनालाल निघून गेले. तेव्हा बांच्या मनावरलं ओझं जरा हलकं झालं.

नंदीहिलवर विश्रांतीमुळं गांधीजींची प्रकृती जरा बरी झाली. उत्साह वाटू लागला. ते सेवाग्रामला परत आले. त्याच दिवशी संध्याकाळी झाशी, इटारशी, खांडवा या भागातली काही मुसलमान मंडळी त्यांना भेटायला आली होती. त्यांना निरोप देऊन गांधीजी आपल्या कुटीत परत आले. आणि मीराबेननं त्यांच्यासमोर एक वृत्तपत्र उघडे करनू दाखविले. त्यावर ठळक अक्षरात एक बातमी छापली होती. वाचून गांधीजींनी ते वृत्तपत्र गादीखाली ठेवून दिलं आणि शान्तपणे ते बसून राहिले.

आश्रमात, आश्रमाबाहेर गावात आणि देशातही ती वार्ता कधीच पसरली होती. बा गडबडीनं आल्या. त्यांचा चेहेरा विलक्षण काळवंडलेला होता. अपार दु:ख त्यांच्या हृदयात दाटलं असलं पाहिजे असं त्यांच्या चर्येवरून दिसत होतं. महादेवभाई आणि प्यारेलाल शान्तपणे येऊन बसले.

"तुम्ही ऐकलंत का?" बानी विचारलं.

"हो. ऐकलं आणि वाचलंदेखील." गांधीजी शान्तपणे म्हणाले.

"हरिलाल मुसलमान झाल्याबद्दल तुम्हाला काही वाटलं नाही?"

"नाही. धर्मांतर केल्याबद्दल राग नाही. धर्मांतरामुळं तरी त्याचं आचरण सुधारलं तर बरं वाटेल मला."

"मला फार चीड आली."

"मला त्याच्या दुर्वर्तनाबद्दल नेहमीच चीड येते. तुम्हाला तशी येत नव्हती. आता आली हे फार बरं झालं."

"मलासुद्धा चीड येतच होती. दारू, बाहेरख्यालीपणा, याबद्दल मी नेहमीच त्याची कानउघाडणी केली आहे. पण..."

"पण काय."

"माझ्या काळजाचा एक कोपरा आईच्या मायेचा आहे..."

बांना हुंदका आवरेना. आईच्या कोपऱ्यातील ती माया त्यांच्या डोळ्यांवाटे पाझरू लागली.

"बा!" मीराबेन आवेगानं म्हणाली.

बांच्या चेहेऱ्यावरचे भाव आता बदलू लागले. आर्त डोळ्यात क्रोध दिसू लागला. फुलांच्या जागी निखारे फुलावेत तसं वाटू लागलं. त्यांची गौर चर्या तांबूस दिसू लागली. त्या आता कुणावर तरी रागावणार असं वाटू लागलं.

"हरिलाल... हरिलाल," असं काहीसं त्या पुटपुटू लागल्या. "मीरा, आत्ता माझ्याबरोबर चल. आणि मी सांगते तो मजकूर तू लिहून घे."

"काय लिहिणार आहात बा?"

"पत्र."

"कुणाला?"

"हरिलालला. माझ्या सर्वांत थोरल्या मुलाला."

"काय लिहिणार तुम्ही?" गांधीजींनी उत्सुकतेनं विचारलं.

"ते तुम्हाला पत्र लिहिल्यावरच सांगेन." बा निश्र्चयानं म्हणाल्या-

"तुम्हाला वाटतं तुम्हीच फक्त कठोर आहात, ध्येयवादी आहात, तत्त्वनिष्ठ

आहात. पण आई कठोर झाली म्हणजे किती होऊ शकते ते तुम्हाला आता समजेल. आई ही आई असते म्हणून तिला वेळोवेळी लोकनिंदेचा मारा सहन करूनही मायेचा पाझर जतन करावा लागतो. पण तोही संपला की त्याच मऊशार काळजाच्या जागी उरतो फक्त दगड, भावनाहीन, स्नेहहीन. चल मीरा, चल.''

गांधीजी आवाक होऊन कस्तुरबांकडे पहात होते. झट्कन तोंड वळवून बा फिरल्या आणि आपल्या कुटीत जाऊन त्यांनी बिछान्यावर स्वत:ला झोकून दिलं. उशीत तोंड खुपसून त्या हमसू लागल्या-

''हरिलाल कारे असा माझा सूड घेतोस...''

मीराबेन दारात उभी होती. तिला म्हणायचं होतं,

''बा, मी कागद अन् लेखणी आणलीय.'' पण तिचे शब्द आतल्या आत विरले. कारण...''

कारण दु:खावेगानं एक दरड कोसळताना ती पहात होती.

❖

# पंधरा

जयरामदास दौलतराम, प्यारेलाल, महादेवभाई, प्रभावतीबेन या सगळ्यांचं नेतृत्व करीत गांधीजी पुढे चालले होते. कार्यक्रम रोजचाच होता, फिरण्याचा. सायंप्रार्थनेला अजून पुष्कळ अवकाश होता. आश्रमाच्या दारातून गांधीजी बाहेर पडले आणि क्षणभर थबकले.

कापडाचं बोचकं पाठीवर घेतलेला एक अत्यंत कृश देह समोर येऊन ठाकला होता. चेहेरा तांबूस, पण भयंकर दिसत होता. विशेषत: नाकाचा शेंडा लाललाल दिसत होता. भलंथोरलं पाठीवरचं बोचकं त्यांच्या पाठीला आवळून आल्यासारखं दिसत होतं. नाक तेवढं तांबूस नसतं तर तो चेहेरा ऋषीचाच वाटला असता.

ते होते परचुरेशास्त्री. त्यांची तेजस्वी काया महारोगानं पछाडली होती. फुलांचा ताटवा असलेली बाग जळून गेली म्हणजे जशी भयंकर दिसते तसा परचुऱ्यांचा देह झाला होता. हाताची बोटं फतफतली होती. पाय सुजलेले होते आणि या रोगप्रादुर्भावामुळं डोळ्यात मात्र विलक्षण कारुण्य निर्माण झालं होतं. असहाय्यता आली होती.

परचुरेशास्त्र्यांनी पाठीवरलं बोचकं जडपणे खाली ठेवलं आणि पाया पडण्यासाठी ते खाली वाकले, तोच त्यांच्या दंडांना मऊगार हातांचा स्पर्श झाला आणि विलक्षण मृदू शब्द त्यांच्या आसुसलेल्या कानांवरून मोरपीस फिरवू लागले-

"उठा परचुरेशास्त्री. पाया नका पडू."

परचुऱ्यांनी मान वर करून पाहिलं. केवढा आधार वाटला त्यांना त्या मृदू शब्दांचा!

त्यांच्या डोळ्यांतून आसवं ओघळली, आणि हृदय भरून आलेल्या आवाजात ते म्हणाले,

"बापू, येरवड्याला तुमच्याबरोबर होतो तेव्हा कसा होतो आणि आता तुमच्याकडे आलो तो कसा होऊन आलो-"

"परचुरे, आपला हिरवेपणाचा अभिमान असणाऱ्या झाडाच्या पानाला निसर्गक्रमानं पिवळट व्हावं लागतं, वठावं लागतं; आकाशाला भिडणाऱ्या भक्कम पर्वतशिखराच्या कड्यालाही कोसळून पडावं लागतं, धुंवाधार पावसाच्या पाण्यालाही दोन्ही काठात सामावून घेऊन फुगलेल्या नदीला उन्हाळ्यात कोरडं ठणठणीत व्हावं लागतं, संगमरवरी महालाला उभारी संपली की मातीत कोसळावं लागतं, हाच ना निसर्गक्रम! माणूस त्यातून सुटला का? उठा."

"बापू!" परचुरेशास्त्री भारावून म्हणाले.

"परचुरे, तुम्ही येरवड्याला जितके मला प्रिय होता, तितकेच आताही आहात. मनात संशय येऊ देऊ नका. पण मला हे सांगा, तुम्ही आता आलात कुठून?"

"हरद्वारहून."

"मग आता शान्तपणे, निस:संकोचपणे इथं रहा."

"बापू, तुमची कृपादृष्टी असल्यावर..."

"महादेव यांची ताबडतोब व्यवस्था कर." असं सांगून गांधीजी पुढं गेले.

परचुरेशास्त्री आश्रमात दाखल झाले. रात्री प्रार्थना झाल्यावर महादेवभाई तिथेच घुटमळू लागले. नेहमी मोकळेपणानं वागणाऱ्या महादेवभाईंना असं घुटमळताना पाहून गांधीजींना आश्चर्यच वाटलं.

"महादेव, तुला काही बोलायचंय का?" गांधीजींनी जरा खोदूनच विचारलं.

"हो बापू..."

"अरे, मग बोल की."

"त्याचं काय आहे बापू..."

"कशाचं काय आहे..."

"लोक म्हणतात..."

"काय म्हणतात."

"परचुरेशास्त्र्यांना इथं राहू दिलं तर..."

"लोकांना त्यांचा संसर्ग होईल, असंच ना?"

"हो."

"विचार करण्यासारखी बाब आहे."

"पण परचुरेशास्त्र्यांना काय वाटेल?"

"मी त्यांना तसं स्पष्टच सांगेन." गांधीजी म्हणाले.

रात्री गांधीजींनी परचुरेशास्त्र्यांना सांगितलं. शास्त्रीबुवांनी खेद नाही मानला. उलट कातर आवाजात ते म्हणाले,

"बापूजी, मला यामुळं वाईट नाही वाटलं. माझा इथं येण्यातला हेतू सफल झाला आहे."

"कोणता?" गांधीजींनी जिज्ञासेनं विचारलं.

"तुमचं दर्शन मला हवं होतं."

"बस्स! हा काय हेतू झाला?" हसत हसत गांधीजी म्हणाले.

"आणखी एक आहे ना. हे बघा. हरद्वारला मी हे सूत कातलं होतं. ते समक्ष तुम्हाला द्यायचं होतं. घ्या. घेता ना?"

"हो हो. परचुरे, व्यापाऱ्याला जसा पैसा, राजकारण्याला सत्ता आणि पंडिताला विद्या प्रिय असते तसं मला आपलं सूत प्रिय आहे. आणा. आणा ती गुंडी इकडे."

गांधीजींनी सुताच्या त्या गुंड्या हातात घेऊन इकडे तिकडे फिरवून पाहिल्या आणि ते म्हणाले,

"छान कातलंय सूत. हात मुलायम दिसतो तुमचा."

या कौतुकानं परचुरेशास्त्र्यांच्या पंजरदेहात प्राण आला. पण त्याचवेळी स्वत:च्या हातांपायांकडे लक्ष जाऊन ते म्हणाले,

"बापूजी... मी पलीकडच्या झाडाखाली रात्र काढीन आणि... आणि सकाळी उठून हरद्वारला निघून जाईन."

"आत्ताचं तुमचं जेवण झालं का?"

परचुरे काहीच बोलले नाहीत.

"कनू... गांधीजींनी हाक मारली. कनू गांधी आल्या.

"कनू, यांची जेवण्याची नीट व्यवस्था कर. आणि हे बघ, तू स्वत: लक्ष दे."

ती रात्र परचुरे झाडाखाली गाढ झोपी गेले आणि गांधीजी झोपडीच्या छताखाली तळमळत होते.

"परचुरेशास्त्र्यांचा त्याग की स्वीकार... हेच" द्वंद्व मनात चालू होतं. स्वत:पुरताच प्रश्न असता तर गांधीजींनी विचारच केला नसता. पण आश्रमातल्या

इतरांच्या भावना जपण्याची जबाबदारीही त्यांच्यावर होती.

पहाटेची प्रार्थना संपली. आणि गांधीजींनी आश्रमवासीयांपुढं एक नाजूक प्रश्न ठेवला- परचुरेशास्त्री!

आश्रमवासीयांनी दाद दिली आणि गांधीजींना हायसं वाटलं. मनावरलं एक दु:सह ओझं आपणहून खाली उतरलं. कसोटीचा प्रसंग पार पडला. अग्निपरीक्षा टळली आणि त्या दिवसापासून परचुरेशास्त्री आश्रमाचे झाले.

"परचुरेशास्त्री, ही तुमची झोपडी." एक नवी उभारलेली कुटी त्यांना दाखवत दुसऱ्या दिवशी गांधीजी म्हणाले. गांधीजींच्या झोपडीशेजारीच त्यांची झोपडी उभारली होती.

झोपडीवर छप्पर केलं होतं. पांढऱ्या स्वच्छ खादीचं; एकदोन ठिकाणी तळव्याच्या रुंदीचे झापे ठेवले होते.

"हे झापे कशाला ठेवले बापूजी?" महादेवभाईंनी उत्सुकतेनं विचारलं.

"महादेव, या झोपडीत परचुरेशास्त्री राहणार. सूर्याची स्वच्छ किरणं त्यांच्या तोंडावर पडावीत अशी व्यवस्था आहे ही."

दुपारी गांधीजी परचुऱ्यांच्या झोपडीत गेले. परचुरे बाजेवर अंग मुडपून पडले होते. कुठलातरी भक्कम आधार मिळाल्याचा आनंद त्यांच्या चेहेऱ्यावर दिसत होता. गांधीजींच्या काठीचा आवाज कानांवर पडताच परचुरे उठून बसण्याचा प्रयत्न करू लागले. पण त्यांना शरीर लवकर आवरता आलं नाही. बाज करकरली.

"असूं दे परचुरे. तसेच पडून रहा." गांधीजी त्यांच्याजवळ जात स्नेहार्द्रतेने म्हणाले.

मागाहून बिंदू आला. बिंदू एक आश्रमवासी. गांधीजींच्या प्रत्येक बारिकसारिक कामात बिंदू लक्ष घालायचा.

"बिंदू, आणलंस सगळं सामान?" गांधीजींनी विचारलं.

"बाकी सगळं आहे. पण मोहरीचं तेल संपलंय, बापूजी."

"माझ्या झोपडीत जा. नाहीतर महादेवला विचार. संबंध आश्रमात कुठेच मोहरीचं तेल मिळणार नाही?"

"आणतो एवढ्यात." असं म्हणून हातातलं बाकीचं सामान खाली ठेवून बिंदू गेला.

"बापूजी, तेल कशाला?"

"शास्त्रीजी, आज मी स्वत: मालिश करणार आहे तुम्हाला."

परचुरेशास्त्री कडमडत एकदम बाजेवरून उठले. त्यांचे डोळे विस्फारले गेले. आनंद, आश्चर्य, आदर या संमिश्र भावनांनी त्यांचं हृदय भरून आलं. डोळ्यात पाणी तरळू लागलं.

"काय! बापूजी आपण मालिश करणार! नको नको."

"नको काय! शास्त्रीजी; नुसतं मालिश नाही करणार, तुमच्या जखमा धुवून टाकणार आहे मी."

"बापूजी!" शास्त्री तीव्रतेने म्हणाले, "याचा परिणाम काय होईल याचा विचार केला आहे तुम्ही?"

"काय होईल? शास्त्रीजी, चिखलात हात घातला की, चिखल लागायचाच हाताला. पण कमळ हवं असलं तर तेही करायला हवं. चिखल लागेल म्हणून कमळाचा कुणी अव्हेर का केलाय!"

तितक्यात बिंदू आला. त्याच्या हातात मोहरीच्या तेलाची बाटली होती. एक स्वच्छ टॉवेल होता आणि पसरट भांड्यात त्यानं पाणी आणलं होतं. गरम वाफा पाण्याच्या पृष्ठभागावरून सुटत होत्या.

शास्त्रीबुवांच्या हाताची दोन बोटं अगदीच फतफतलेली होती. त्यावरची पट्टी सोडताच समोर उभा असलेल्या बिंदूनं आपले डोळे मिटून घेतले.

गांधीजींनी कापडाचा एक बोळा गरम पाण्यात भिजवून तो बोटांवर धरून पिळला. त्याबरोबर एक सुखद कळ शास्त्रीबुवांच्या सर्वांगातून शहारली.

"आहाहा!" अभावितपणे त्यांच्या तोंडातून उद्‌गार बाहेर पडले.

"बरं वाटतंय ना?" गांधीजींनी मृदू स्वरात विचारलं.

बोटांवर पट्ट्या बांधून झाल्या.

"दुपारी आता काळ्या मातीचा लेप देऊ." असं म्हणून गांधीजींनी परचुऱ्यांच्या पाठीवर तेलाचा ओघळ सोडला. हलक्या हातांनी ते परचुऱ्यांच्या पाठीवर तेल पसरू लागले. परचुरे शहारले. एक फार मोठा हात आपल्या पाठीवरून फिरतो आहे या जाणिवेनं तंचं मन हललं, कल्लोळलं. आणि बोलायचं होतं तरी तोंडून शब्द फुटेना.

अनावर झालेला भावनावेग छातीत न मावल्यामुळं हुंदक्याच्या रूपानं बाहेर पडला. त्यांचा घुसमटणारा आवाज गांधीजींच्या कानी आला तेव्हा क्षणभर थांबून आणि मान पुढे झुकवून गांधीजींनी विचारलं,

"परचुरे, रडता तुम्ही?"

"नाही बापूजी" परचुरे आसवं पुशीत म्हणाले.

“मग हुंदका कसला?”

“मी नाही, माझं भाग्य रडतंय बापूजी.”

“म्हणजे!”

“आनंद! बापूजी, उभं आयुष्य अशा वनवासात नाहीतर तशा सुखात काढलं. लोकमानसाला मंजूर असलेले आनंदाचे अनेक क्षण अनुभवले. पण आजच्यासारखा आनंद मला कधीच झाला नव्हता. बापूजी...” घोगऱ्या आवाजात परचुरे म्हणाले.

“काय परचुरे?”

“भाग्याची व्याख्याच करायची झाली तर माझ्या या आजच्या प्रसंगावरून करावी लागेल.”

“ती कशी?”

“एक महारोगी, एक महापुरुष; एक तिरस्कृत तर एक सदा स्वीकृत, एक सामान्य जंतू जीव, तर दुसरे असामान्य चैतन्य. बापूजी, दिव्याने काजळीची सेवा करावी तसा हा प्रकार आहे...”

बोलता बोलता परचुऱ्यांना धाप लागली. ते बाजेवर कलंडले. त्यांना ग्लानी आली होती.

गांधीजींनी तेलाचे हात फडक्याला पुसले आणि बिंदूला ते म्हणाले, “त्यांच्या अंगावर पांघरूण घाल.”

दारातून कस्तुरबा हे सर्व बघतच होत्या. गांधीजी पुढे आले तेव्हा त्या म्हणाल्या,

“चला, पाणी तापून तयार आहे.”

“कशाला?”

“आता मला तुम्हाला आंघोळ घातली पाहिजे. सचैल स्नान!” आणि गांधीजी हसत हसत कस्तुरबांच्या मागून निघून गेले.

परचुऱ्यांना कितीक दिवसानंतर अशी गाढ झोप लागली होती.

परचुरे पुन्हा हरद्वारला निघून गेले. त्यांचा रोगच इतका भयंकर होता की, परचुऱ्यांनाही त्याची कल्पना होती. आपण शरीरानं बरं होण्यासाठी आश्रमात आलोच नाही याची त्यांनी मनाला खात्री दिली होती. पण आश्रमातून परचुरे गेले ते प्रेम घेऊन. परचुरे निघाले तेव्हा मीराबेननं त्यांना ओंजळभर बकुळीची फुलं दिली. ओंजळीत फुलं घेऊन परचुरे जणू आपलं प्रतिबिंब पाहिल्यासारखे

तीत पहात होते. दोन कढत अश्रू त्या नाजुक फुलांच्या अंगावर पडले. तीही मग गद्‌गदली.

"मीरा, ही फुलं कशाला?"

"आठवण म्हणून."

"कुणाची?"

"आम्हा साऱ्यांची."

"पण माझी आठवण तुम्हाला राहील?"

"निरंतर."

"ती कशी?"

"ते नाही सांगता येणार. पण राहील."

"मीरा, ही बकुळीची फुलं मी जपून ठेवणार आहे, आणि..." परचुरे थरथरत बोलत होते.

"आणि काय? मीराबेननं विचारलं.

"आणि माझी चिता रचली जाईल ना..."

"परचुरे!"

"माझी चिता रचली जाईल तेव्हा माझ्या उशाशी ही बकुळीची फुलं ठेवा असं मी सांगणार आहे." गद्‌गदून परचुरे म्हणाले.

परचुरे गेले तेव्हा गांधीजी आश्रमात नव्हते. दिल्लीला व्हाईसरॉयनी भेटायला बोलावलं होते तिकडे गेले होते.

इथून पुढची वर्षे दोन वर्षे देशात आता वेगळे वारं वाहू लागले. महायुद्धाची खाई पेटू लागली होती. जपानमध्ये उठाव झाला होता. लोकांचा लाडका नेता सुभाषचंद्र सैन्य खडे करून उभा ठाकला होता. मुस्लिमलीगने मुस्लिमराज्याची मागणी पुढे केली होती आणि गांधीजींनी जे जे म्हणून नको म्हटले ते ते होऊ लागले आणि इकडे सरकारची दडपशाही वाढू लागली. दंगेधोपे उसळू लागले. रक्ताचे पाट वाहू लागले.

हे असं कुठवर चालणार!

यातून निर्माण तरी काय होणार!

गांधीजी अस्वस्थ होते आणि मग एके दिवशी या अस्वस्थतेतूनच 'चले जाव' घोषणेचा जन्म झाला. दोन शब्दांचा या लहानशा घोषणेत देश उठवण्याचं सामर्थ्य होतं. दोन शब्दांची ही फेक! पण इंग्रजांचं बलवत्तर सिंहासन डळमळविण्याची प्रचंड शक्ती त्या फेकीत होती. चले जावची आग देशभर

भडकू लागली.

आणि मग सरकारनं नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे गांधीजींना अटक केली.

पोलीस अधिकारी अटक करायला आले तेव्हा गांधीजींनी हसत मुखानं त्यांचं स्वागत केलं.

"या. आम्ही तयारच आहोत. कुठं नेणार आम्हांला?"

"आगाखान महालात. पुण्याला." अधिकारी मख्खपणे म्हणाला.

"वा. मग फारच छान. एरवी आम्ही झोपडीत राहतो. आता कैदेत तरी महालात राहणार. सरकारची आम्हां मंडळींवर एकूण मेहेरनजर आहे."

त्या दिवशी आगाखान महालात गांधीजींच्या बरोबर सरोजिनी नायडू, मीराबेन आणि महादेवभाई यांनाही आणण्यात आलं.

संध्याकाळी मीराबेननं महालाच्या आवारातून एक फेरी मारली. छोट्यामोठ्या फुलझाडांनी महालाभोवती गर्दी केलीह ोती. मधूनच उंच झाडं आभाळाकडे बघत होती. दूरवर पुणे शहराचा विस्तार महालाच्या उंचीवरून दिसत होता. दोन-अडीच पुरुष उंचीच्या भिंतींनी महालाला वेढून टाकलं होतं, भिंतीबाहेर पोलिसांनी किल्ल्यावर वेढा घालतात तसा वेढाच घातला होता.

"बापूजी, बंदोबस्त फार कडक आहे." मीराबेन हसत म्हणाली.

"वेडे आहेत झालं."

"का बरं? तुम्ही पळून गेलात तर?"

"कुठे जाणार?"

"कुठेही."

"ज्यासाठी कैदेत पडलो त्या हिंदुस्थानच्या बाहेर तर खचित पळून जाणार नाही."

"ते काहीही असो. तुरुंग म्हटला की बंदोबस्त आलाच."

"या बंदोबस्तावर होणारा खर्च यांनी आमच्या गरीब जनतेवर केला तर मी उर्वरित आयुष्य तुरुंगात काढीन."

"बापूजी, उद्या बाही येणार असं कळतंय."

"सरकारला काळजी आहे आमची. म्हातारपणात बायको हवी काळजी घ्यायला."

बा, बापू, महादेवभाई, मीरा सारे बोलत बसले होते. शामवर्णी संध्या उतरू लागली होती. हास्यविनोदाला बहर आलेला होता. बा बापूजींच्या

पायाला तूप चोळत होत्या. काशाच्या वाटीनं पाय घासून त्यांनी वाटी खाली ठेवली. महादेवभाई कशाला तरी म्हणून पलीकडच्या खोलीत गेले होते. त्या खोलीतून काहीतरी कोसळल्याचा चमत्कारिक आवाज आला आणि पाठोपाठ सारे धावले...

मीराबेन खोलीतून बाहेर आली ती तोंडावर हात दाबतच. तिला दुःख अनावर होत होतं.

"बापूजी..."

"मीरा, काय झालं..."

"बापूजी, महादेव... भाई..."

"मीरा..." गांधीजी काहीसे ओरडलेच.

खोलीत महादेवभाईंचा अचेतन देह पहुडला होता. चेहेरा शान्त होता. नेहमीसारखाच.

बा आल्या तेव्हा रडायचंही भान त्यांना राहिलं नाही. त्यांच्या डोळ्यांनी फक्त एवढंच पाहिलं, गांधीजींनी कधी नव्हे तो डोळे हातांनी घट्ट झाकले होते.

आभाळात दहापाच ढग संगतीने पळत होते. त्यातला एक लहानखोर आता लुप्त झाला होता. बाकीचे थबकले होते.

❖

# सोळा

आगाखान महालाच्या विस्तीर्ण आवाराला कोंडून टाकणारा भव्य लोखंडी दरवाजा कुरकुरला आणि दारावरचे पहारेकरी अधिकच सावध झाले. त्यांचेही डोळे महालाकडेच लागले होते. आतलं वातावरण अधिकच गंभीर झालं होतं. महालाच्या पूर्वेकडील गुलमोहराच्या फुलांनी माना टाकल्या होत्या. प्रखर सूर्याला ती शरण गेली होती का महालातली व्याकुळता बघायला लीन झाली होती कुणास ठाऊक!

पुण्याचे ख्यातकीर्त वैद्य जोशी आपली सर्व शक्ती पणाला लावून झटत होते. कस्तुरबांच्या प्रकृतीला आराम पडावा म्हणून आपल्या उभ्या हयातीचा अनुभव त्यांनी इथं ओतला. अखेर त्यांनीही हात टेकले आणि शून्यचित्ते त्यांनी महाल सोडला.

कस्तुरबांची बेचैनी क्षणाक्षणाला वाढत होती. मला वैद्याचं औषध घ्यायचं नाही असं म्हणून सुशिलाबेनकडे त्यांनी आपल्या आर्जवी डोळ्यांनी पाहिलं. आपलं औषध कस्तुरबा घेतात. हाच सात्त्विक आनंद वैद्यराजांना मिळणार होता; पण तेही त्यांच्या ललाटी नव्हतं.

संध्याकाळच्या सावल्या महालावर उतरू लागल्या. उन्हात अंग आखडून बसलेल्या वृक्षवेलींनी आपले हातपाय आता सैल सोडले. क्वचित पानांच्या सळसळी मागोमाग वाऱ्याची एखादी मंद झुळूक शरीराला सुखावू लागली. बापूजी नेहमीप्रमाणं फिरायला जाण्याच्या तयारीत होते.

मीराबेन आपल्या खोलीतून बाहेर पडली. तिच्या हातात होतं तुपाचं निरांजन. मनू बांना औषध देऊन नुकतीच येत होती.

"येतेस मनू?"

"कुठं?"

"तिनिसांजेपूर्वी हे निरांजन लावू या कृष्ण मंदिरात. रोज बा चौकशी करतात दिवा लावला का म्हणून."

ते छोटसं कृष्णमंदिर मीरानं लावलेल्या निरांजनाच्या स्निग्ध प्रकाशानं उजळून गेलं. कस्तुरबांच्यासाठी मीराबेननी हे मुद्दाम बांधवून घेतलं होतं.

"मीराबेन, बांचं कसं होणार?"

"मनू, माझ्याइतकंच तूही जाणतेस काय होणार ते."

"बेन, बांना किती वेदना होतात नाही? मला बघवत नाही. त्यांची तडफड पाहून आतडी गोळा होतात."

"ही माया बोलतेय, वेडे माया. मायेनं दु:ख वाढतं ग बाई. वेडे, अग, बापूंच्याकडे बघ. त्यांना का दु:ख होत नसेल? दिसतंय कधी चेहेऱ्यावर? परवा अपरात्री उठून सरकारला ते खरमरीत पत्र लिहिलं. झपाटल्यासारखं झालं होतं त्यांना."

"बेन, बापूंनी गीता पचवलीय. आपल्याला अजून ती नीट वाचता येत नाही. मला तर नाहीच नाही. म्हणून आपण असंच दु:ख करायचं, आसवं गाळायची. चल बाई, उशीर झाला तर बापू रागावतील. 'दिवा लावायला एवढा वेळ खर्च केला तर देशासाठी किती वेळ उरेल?" असं मागं एकदा म्हणाले होते. चल लौकर."

व्हरांड्यात सुशीलाबेन काहीतरी वाचत होती. कस्तुरबांच्या या सगळ्या लेकी; आईच्या जीवघेण्या दुखण्याची व्याकुळता त्यांच्याही चेहेऱ्यावर दिसत होती. बापूजी फिरून आले होते.

"सुशीलाबेन, तुम्ही डॉक्टर. बांच्या प्रकृतीची जानपहेचान आमच्यापेक्षा तुम्हाला अधिक. सांगा ना सुशीलाबेन-" मनूनं लहान मुलीसारखा हट्ट धरला.

"बांची प्रकृती सुधारणार आहे मनू. उद्या वैद्यराज शिवशर्मा येणार आहेत. आताच पर्णकुटीवरून निरोप आलाय. त्यांचा हातगुण चांगला आहे म्हणतात."

"बेन, तुम्हाला माहीत आहे, परवा संक्रांत होती. बांनी मला तिळाचे लाडू करायला लावले. संध्याकाळी प्रत्येक कैद्याला आणि शिपायाला आपल्या हातानं एकएक लाडू देत बा म्हणाल्या, "हीच शेवटची संक्रांत रे बाबांनो. पुढल्या संक्रांतीला..."

"बेन, ही तर निरवानिरवीची भाषा."

मीराबेनची नजर सहज पलीकडं गेली. दाराच्या चौकटीत बापूजी उभे होते, हे सारं ऐकत. त्यांच्या चेहेऱ्यावर अथांग विषण्णता होती. मुलींनी

आपल्याला पाहिलं, हे समजताच त्यांची आकृती सर्र्कन नाहीशी झाली. मीरा, सुशीला आणि मनू तिघी बापूंच्या खोलीकडे गेल्या. गवताच्या चटईवर भिंतीला पाठ लावून बापू शान्त बसले होते. उदासीनतेचा मागमूस दिसत नव्हता. कंदिलाच्या सौम्य प्रकाशात त्यांचा गोरापान चेहेरा अधिक शान्त, स्निग्ध, स्थिर दिसत होता- एखाद्या स्थितप्रज्ञासारखा.

कस्तुरबांच्या आजारानं ब्रिटिश सरकारच्या पाषाणाहृदयाला पाझर फुटेल अशी वेडी आशा कुणीच केली नव्हती, पण निदान औषधपाण्याची चोख व्यवस्था करण्यासाठी आवश्यक त्या सोयी देण्यात येतील असं वाटलं होतं. पण छे. कस्तुरबांच्या आजाराच्या वार्तेनं जनता अस्वस्थ होईल हे ओळखून गोऱ्या कातडीनं आगाखान महालाचे दरवाजे आणखी घट्ट लावले. बंदोबस्तात वाढ झाली. वाऱ्याचीदेखील करता आली असती तर तपासणी करून आणि झडती घेऊनच त्याला जाऊ दिलं असतं.

लाहोरचे पंडित शिवशर्मा आले. हाताला गुण असला तरी पायाला भिंगरी असलेला हा माणूस. पण आला आणि खरोखरीच चमत्कार झाला. बांना त्या दिवशी बरं वाटू लागलं. शर्मांच्या रूपे धन्वतंरीच आला असं सगळ्यांना वाटलं. बांच्या सुरकुतल्या चेहेऱ्यावर आज टवटवी फुटली होती. बापूंना कळलं तेव्हा त्यांच्याही निर्विकार चेहेऱ्यावर समाधानाची एक रेषा उमटून गेली. फिरून येता येता बापू आले. बा बाळकृष्णाच्या प्रार्थनेत चूर होत्या. बापू एकदम म्हणाले, ''बोल, सिंह का शेळी?''

''मी समजले नाही आपलं बोलणं?''

''सिंहाप्रमाणं रोगाशी सामना देणार की, शेळीप्रमाणं माघार घेणार?''

''माघार का म्हणून'' बा आत्मविश्वासाने म्हणाल्या, ''सामनाच देणार. देत आले आहे आणि... आणि मला वाटतं मी जिंकलाय तो.''

''छान बोललात.''

''पण एक करा नं.''

''सांगा नं.''

''माझ्या हरिलालची भेट घडवा मला.''

बापूंनी एकदम तोंड फिरवलं आणि बांच्या क्षणिक उजळलेल्या चेहेऱ्यावर पुन्हा दुःखाची छाया पसरली. हरिलाल! उभ्या आयुष्यातली एक वाहती जखम! कधीही बरी न होणारी. स्वतःच्याच देहाला झालेली. दूर तरी कशी करणार! बापूजी राष्ट्रपिता झाले होते. मायामोहाच्या बंधनापलीकडे, सुखदुःखांच्या

जंजाळापासून मुक्त, एका स्वात्म वातावरणात ते जाऊन पोहोचले होते. पण बा! त्याही राष्ट्रमाता होत्या. तरीही नऊ महिन्यांच्या वेदना, स्वत:च्याच मांसाचा गोळा त्या विसरू शकत नव्हत्या. झाड वाढून पुढं किडलं तरी झाडाखालची माती म्हणते, "ते माझं आहे, मी याला जन्म दिला, वाढवला, पोसला."

हरिलालभाईची आठवण! जगाला न कळणारी वेदना होती ती. बापू निघून गेले आणि बा काय समजायचं ते समजल्या.

देवदास आला. तो आईचा अधिक लाडका. त्यानं आईच्या अंतरीची व्यथा ओळखली आणि हरिलालभाईचा शोध सुरू झाला. हरिलालभाई म्हणजे वाऱ्याशीही द्वंद्व खेळणारा, गतीबरोबर धावणारा आणि मनमानी करणारा विद्ध माणूस! कसा शोध लागावा त्याचा! पण बांची इच्छाशक्ती जबर. हरिलालभाई आला. जगानं टाकलेला, जगाशी टक्कर द्यायला आसुसलेला, पित्याला आव्हान द्यायला निघालेला, हरिलालभाई आला आणि बांचं धगधगतं काळीज पळभर शान्त झालं.

हरिलालभाई आपल्या शरपंजरी मातेच्या वक्षावर डोकं विसावून पोटभर रडला. त्याच्या करुण अश्रूंत त्याची कर्तुक विरघळून गेली. तो आता जगाचा हरिलालभाई नव्हता, राष्ट्रपिता गांधींचा पुत्र नव्हता, देवदासचा भाऊ नव्हता, या क्षणी तो होता फक्त बांचा मुलगा. मोठा मुलगा. ज्याच्या जन्मानं त्यांच्या स्त्रीत्वाचं सोनं झालं होतं असा ज्येष्ठ पुत्र! हरिलालभाईच्या केसातून हात फिरवता फिरवता बांना तो बाळस्वरूप दिसू लागला. कसाही असला तरी तो त्यांचा हरिलाल होता. त्याच्या स्पर्शानं बांची काया शान्त झाली. रक्तदाब कमालीचा उतरला होता, तरी दाहकता कमी झाली नव्हती. आईची इच्छा आपण पुरी करू शकलो याचं देवदासला समाधान वाटलं.

आनंदाचे कोणतेही प्रसंग ही क्षणचित्रं असतात. फार काळ टिकत नाहीत ती. तसंच झालं. दिवसभर फुलारलेल्या बा संध्याकाळ उतरताच सुकून गेल्या. पुन्हा वेदना! तीच तळमळ, तोच दाह! रात्र भरू लागली अंधार अधिक गडद होत चालला. बा विलक्षण बेचैन झाल्या. आपल्या खोलीत बापूजी पत्रलेखन करीत होते. मध्यरात्रही उलटून गेली. भयाण काळोखी वाढू लागली. सुशिलाबेननं कटेलीसाहेबाला उठवलं. साहेबानंही ताबडतोब तबकडी फिरवली. पर्णकुटीवर दूरध्वनी गेला आणि वैद्यराज शिवशर्मा लगबगीनं आगाखान महालाकडे गेले. त्यानी कसलं तरी औषध दिलं. पुन्हा एकदा बेचैनी कमी झाली, वाढण्यासाठी.

"वैद्यराज, तुम्ही आता रात्रभर इथंच राहा." सुशिलाबेन म्हणाल्या.

"माफ करा बेन. वैद्यांना इथं थांबता येणार नाही. सक्त हुकूम आहे तसा." कटेलीसाहेबाची नोकरशाही बोलली.

शर्माजी तडक बाहेर पडले. आवार तुडवीत ते आपल्या मोटारीकडं गेले आणि दार उघडून कोचावर शान्तपणे झोपले. दुसऱ्याला जीवदान देणारा हा धन्वंतरी आपल्या रोग्यासाठी थंडीत कुडकुडत मोटारीत पडला. असा कायद्याचा जाच.

मृत्यूशी चाललेला हा सामना अजून संपत नव्हता. वैद्यराजांनी पुण्याच्या बाजारात जाऊन स्वत: काढ्याचं सामान आणलं. पण तो गुणकारी काढा इथं काही करू शकला नाही. आराम पडेना. धन्वंतरी अखेर दैवाचा दास बनला.

"माझ्याकडून जेवढं झालं तेवढं मी केलं. आता डॉ. गिल्डर किंवा डॉ. सुशीलाबेन काही नवा उपाय करीत असतील तर पहा." असं वैद्यराजांनी बापूजींना सांगितलं. हे सांगताना त्यांना विलक्षण खेद होत होता. "आपली विद्या कुठं गहाण पडली का? मग आपले आडाखे का चुकावेत? अपयश का यावं?" असंच जणू त्यांना वाटत होतं. बापूजींनीच त्यांचं सांत्वन केलं.

"वैद्यराज, तुम्ही प्रयत्नांत कसूर केली नाहीत. मग वाईट का वाटून घेता? मनुष्य यथाशक्ती प्रयत्न करतो; फळ देणे ईश्वराचे हाती. जा तुम्ही. शान्तचित्ते जा."

बापूजींच्या सखोल अंत:करणाचा ठाव घेतघेतच वैद्यराज निघून गेले.

नेहमीसारखी एक रात्री संपली आणि नेहमीसारखाच अंगावर प्रकाशाला खेळवत तो दिवस उजाडला. पण उजाडत्या दिवसानं कानात कुजबुजून सांगितलं ते हे की बांची तब्बेत आणखी बिघडली आहे. अखेर आगाखान महालात ती दिव्यौषधी पेनिसिलीन येऊन पोहोचली. पूर्व आघाडीवर युद्धाचा डोंब उसळला होता. तिथल्या लष्करी इस्पितळातच हे औषध होतं. खरं तर पूर्वीच यायचं. पण नाही आलं आणि आज ॲलन वॉल- लष्करी वैद्यकीय अधिकारी- ते घेऊन आला. तिथं असलेल्या डॉक्टर मंडळींना फार बरं वाटलं. पण बांनी आता औषध घ्यायला नकार दिला. त्यांना आपला मार्ग कळून चुकला होता. मृत्यू त्यांना अगदी जवळून खुणावीत होता. आता कोणतीही संजीवनी त्यांच्या प्रयाणाला रोखू शकणार नव्हती. बापू तर बांची सेवा करण्यात मग्न होते. त्यांचं अंग पुसणं, तस्त देणं, इ. कामं बापू स्वत: करीत होते. आपली इतर सर्व कामं त्यांनी पूर्णपणे बंद ठेवली होती.

पेनिसिलिन द्यावं किंवा नाही यावर जणू परिषदच भरली.

देवदास म्हणाला, "देऊ या पेनिसिलीन."

बापूजींना ते आवडलं नाही. ते रुद्ध स्वरात म्हणाले,

"बाला आता उगाच का त्रास देता? स्वस्थ राहू द्या तिला आता."

पेनिसिलीन देण्याचा बेत रद्द झाला. कालपासून बांनी औषध घेतलं नव्हतं, काही खाल्लं नव्हतं. जणू मृत्यूची वाट त्यांनी आणखी सोपी करून ठेवली होती. तेवढाही अडसर नको त्याला. बापूजी उशाशी बसून होते. मनूनं विचारलं, "बा, काही घेणार का थोडं" बा समाधानानं हसल्या. कापसाचं बोंड फुलावं तशा. त्या हसण्यानं सर्वांनाच बरं वाटलं.

"मनू, आज मी घेणार आहे."

"घेणार?" मनू आनंदली. "मग आणू काहीतरी? काय आणू?"

"गंगाजल. जा लौकर घेऊन ये."

मनूच्या हातातलं पुस्तक गळून पडलं. बांच्या हसण्याचा अर्थ आत्ता तिला कळला होता.

"जा बेटी. गंगाजल घेऊन ये. तिला आपण जे हवं ते देऊ आता." बापूजी म्हणाले आणि मनू गंगाजल आणायला गेली.

बापूंचा एक हात बांच्या कपाळावर थोपटत होता.

मनूनं गंगाजल आणलं. एखादादुसराच थेंब तोंडात गेला असेल. चातकाच्या आतुरतेनं आणि भक्तीनं बांनी ते घेतलं. तेवढ्या थेंबानंही त्यांच्या शिणल्या कायेला आणि मनाला शान्तता मिळाली. धगधगणारा अग्नी मधेच थोडा शान्त व्हावा तशा बा शान्त, स्थिर झाल्या. आता आतली वेदना चेहेऱ्यावर नव्हती. जणू त्या गंगाजलानं वेदनेलाच तिलांजली दिली.

दुपारचे तीन वाजले होते, उन्हं कलल्याची साक्ष देणाऱ्या सावल्या लांबल्या होत्या. बांनी देवदासाला हाक मारली. क्षीण आवाजात. देवदास अगदी जवळ बसला. आईचा एक सुरकुतला हात आपल्या हाती घट्ट दाबून धरला होता त्यानं. जणू त्या हाताच्या रूपानं आईचा हरवणारा प्राण त्याला जपून ठेवायचा होता. बांना काही तरी बोलायचं होतं. ओठ हालत होते. पण भावनेचा आवेग इतका जबरदस्त होता की शब्दाला बाहेर यायला जागाच नव्हती. देवदासलाही तो जीवघेणा एकांत सहन नाही झाला. तो अजाण मुलासारखा मुसमुसू लागला आणि मग थांबला. शब्द जिंकला. ओठांची कवाडं फोडून तो बाहेर आला.

"देवदास, मी आता जाणार. एक ना एक दिवस जायलाच हवं. मग आजच का नको?"

"आई, तू फार बोलू नको ग."

"बोलू दे मला देवदास. बोलू दे."

"त्रास होईल तुला आई, बोलू नको."

"बेटा, आता अखेरच्या क्षणी कसला त्रास न कसलं सुख. मला आधार दे. उठून बसते मी."

देवदासनं आधार दिला. बा उठून बसल्या. हात जोडून त्या परमेश्वराची करुणा भाकू लागल्या, परमेश्वरप्रार्थनेत लीन होताना भोवतालचं सारं जग त्या विसरल्या. त्यांना दिसत नव्हता देवदास, दिसत नव्हती मनू, नव्हता दिसत आगाखान महाल. मिटल्या डोळ्यांनीच उच्च स्वरात म्हणत होत्या, "हे दीनदयालु, दीनानाथ, मैं तेरी दया चाहती हूँ! तेरी शरणमें मैं आयी हूँ..."

देवदास, मनू, मीरा, प्रभावती, सुशीला सारे अंवतीभोवती होते. माणसांच्या जगात परमेश्वरी जगातून परत आलेल्या बा म्हणाल्या, "अरे कुणी दु:ख नका करू. मी गेल्यावर लाडू खायला हवेत हं तुम्ही."

यातला प्रत्येक शब्द बांची जीवनयात्रा संपत असल्याचं सांगत होता. आणि प्रत्येक वेलांटी दु:खाचे अधिक वळसे देत होती.

पाच वाचले. आता फक्त घडी मोजायची. तरीही बा गृहिणीपद विसरल्या नव्हत्या. त्यांनी मनूला बोलावलं,

"बेटा मनू, बापूजींच्या बाटलीतला गूळ संपला आहे. दुसरा तयार ठेवलास का तू?"

"होय बा. काळजी नको करू. दुसरा गूळ तयार होतोय."

"पहा बरं बेटी, तू जा आता. माझ्यापाशी पुष्कळ लोक आहेत. तू बापूजींच्या खान्याची तयारी कर आणि स्वत:ही खाऊन घे."

असेच आणखी तास-दोन तास गेले. क्षणाक्षणाला ती घटिका जवळ येत असल्याचे सर्वांनाच जाणवत होते. दिवस होता महाशिवरात्रीचा. सूर्यास्त केव्हाच होऊन गेला होता, अंधारानं वातावरणाचा पूर्ण कबजा घेतला होता. बापूजी प्यारेलालजींच्या खोलीत देवदासबरोबर बोलत बसले होते.

बांनी क्षीण पुसटत्या आवाजात सुशीलाबेनला विचारलं,

"बापूजी कुठं आहेत?"

बेननं बापूजींना बोलावलं. बापू आले. बांच्या शेजारी बसत हसत म्हणाले, "तुम्हाला असं वाटतंय ना की इतक्या साऱ्या नातलगांनी येऊन तुम्हाला माझ्यापासून दूर केलं?"

बापूंनी बांचं डोकं आपल्या मांडीवर घेतलं. त्या आधारानं बा पूर्ण

विसावल्या. बापू त्यांच्या मस्तकावरून हळूहळू हात थोपटत होते. शेवटच्या शब्दांसाठी बांचे ओठ उलगडले.

"मी आता जाते. आपण खूप सुखदु:खं भोगली. माझ्यासाठी कोणी रडू नका. मी समाधानी आहे."

श्वासोच्छ्वासाची जोरदार पाठशिवणी सुरू झाली. बांचे डोळे शून्यात विसावले होते. मृत्यूनं आता महालात प्रवेश केला.

"राजा राम राम राम
सीता राम राम राम"

रामनामाचा गजर वातावरण गंभीर करत होता. मृत्यूला शान्तपणे येण्याचं आवाहन करीत होता.

अखेर तो आला. जन्मावेळीच ज्याच्या येण्याची वर्दी मिळालेली असते, तो मृत्यू आला. सुखदु:खांच्या फेऱ्यांतून आत्म्याला मुक्त करणारा, आयुष्याला पूर्णविराम देणारा तो महामंडल मृत्यू आला. बापूजींच्या स्कंधावर टेकलेली बांची मान जराशी कलली आणि मृत्यूनं आपला कार्यभाग साधला. एका कृतार्थ जीवनाची परिसमाप्ती झाली.

बापूंच्या डोळ्यांतून दोन आसवं गळाली. क्षणभर तो निश्चयाचा मेरूमणीही गद्‌गदला. पण क्षणभरच. पुन्हा तो शान्त, अविचल, स्थिर.

शिवरात्रीच्या त्या संध्याकाळी आगाखान महाल पोरका झाला. महालाबाहेर कित्येक मंडळी केव्हाची येऊन थांबली होती. प्रत्येकाचा चेहरा दु:खमिश्रित उत्सुकता असल्याचं दाखवीत होता. बांच्या देहावसानाची बातमी महालाच्या भिंती फोडून, बंदोबस्ताचे तट तोडून बाहेर आली. प्रेमलीला ठाकरसी आणि शांतिकुमार यांनाच मग आत जायला परवानगी मिळाली.

बांचा पार्थिव देह मग स्नानगृहात नेण्यात आला आणि त्या देहानं आज अखेरचं स्थान केलं. अहेव मरण आलं होतं त्यांना. या सारखं भाग्य कोणतं? चुडा भरला, कुंकू लावलं. गळ्यात फुलमाळा घातल्या. कनुभाई आणि मनू यांनी बांची खोली गाईच्या मूत्रानं आणि शेणानं सारवली. मीराबेननं शवाच्या जागी चुन्याचा चौरस तयार केला. मस्तकभागी फुलांची ओम् आकृती तयार केली, पायांतळी फुलांचं स्वतिक केलं.

आता अंत्यसंस्काराची तयारी सुरू झाली. बांच्या इच्छेप्रमाणे बापूजींनी कातलेल्या सुताची साडी त्यांना नेसवण्यात आली आणि सारवलेल्या जागी बांचा पार्थिव देह ठेवण्यात आला. तुपाचा दिवा गंभीरपणे जळत होता. बापूजी कोपऱ्यात समाधिस्थासारखे बसले होते. गीतापाठ सुरू होता. रात्रभर रामनामाचा

जप सुरू होता.

सकाळपर्यंत लोकांनी आगाखान महालाला जणू वेढा दिला होता. पण त्यांच्या आधीच शिपायांच्या वेढ्यानं मजबुती जास्त केली होती. कुणालाही, कोणत्याही कारणानं आत जाऊ दिलं जात नव्हतं. लाटेत लाट मिसळून पाणी फुगावं तशी तासाला गर्दी फुगत होती.

शवयात्रा निघाली. शवयात्रा कसली ती! गंभीरपणे चालणाऱ्या शे-दोनशे माणसांचा- जी ब्रिटिश सरकारच्या कृपेनं आणि कनवाळूपणशनं महालात- जाऊ शकली अशांचा एक जथाच होता तो. महालाबाहेर मोकळ्यावरून अंत्ययात्रा काढायला सरकार परवानगी देतं तर खरोखरच ती यात्रा झाली असती. या यात्रेचा मार्ग तरी आता किती? महालातल्या व्हरांड्यापासून महादेवभाईच्या समाधीपर्यंत! उणीपुरी दोनचारशे पावलं. महादेवभाईच्या समाधीशेजारीच चिता रचण्याचं ठरलं. बांची तशीच इच्छा होती.

शांतिकुमारभाई म्हणाले, "बापूजी, चंदनाची चिता रचू या."

"शांतिकुमार, बा एका गरीब माणसाची पत्नी! गरीबाला कुठली चंदनाची चिता? तुम्ही मला ती द्याल, पण मला नाही पसंत. मी सरकारचा कैदी आहे. सरकारनं चंदन देऊ केलं तर मी अवश्य घेईन."

कटेलीसाहेबांनी हा संवाद ऐकला. आगाखान महालाच्या बागेत एक चंदनाचं झाड होतं. त्याची लाकडं साठवून ठेवण्यात आलेली होती.

कटेली म्हणाले, "बापूजी, सरकार जरूर चंदन देईल. मग तर घ्याल?"

"अवश्य घेईन."

चंदनाचे भारे येऊन पडले. शांतिकुमारभाईंनी पुढाकार घेऊन चिता रचली. चितेवर बांचा चिरविश्रांती घेणारा देह ठेवण्यात आला. हिंदू, पारशी, ख्रिश्चन, मुस्लीम धर्मांच्या प्रार्थना म्हणण्यात आल्या. ब्राह्मणाच्या हस्ते यथाविधी सर्व संस्कार करण्यात आले.

इकडे गीतेच्या बाराव्या अध्यायाचं पठण सुरू होतं. ते संपलं.

मंगल मंदिर खोलो, दयामय! मंगल मंदिर खोलो...

या भजनाचे करुणगंभीर सूर वातावरणात मिसळत होते. अंधार होता तरी प्रकाशाची आवश्यकता कोणालाच भासत नव्हती. तो अंधार जणू सर्वांना लपेटून घेत होता. आपलं दुःख दुसऱ्याला कळायला नको. वेदमंत्रोच्चारानंतर शवाला प्रदक्षिणा घालून देवदासानं चितेवर अग्नी ठेवला आणि ज्वाला भडकली. अंधकाराचा गडद भेसूर पडदा फाडून ज्वाला वर सरकत होत्या आणि दृश्य अधिकच विषण्ण करीत होत्या. बांचा आत्मा केव्हाच मुक्त झाला होता. उरला

होता देह! आता तोही ज्वाळांबरोबर तिळातिळानं सरकारच्या बंदीगृहातून मुक्त होत होता.

खूप वेळ गेला. त्या देहाला जळायचं नव्हतं. बापूजी बाजूलाच एका झाडाखाली बसले होते. चंदनी लाकडांवर तुपाचे डबे रिचवले; इतकं तूप खाऊनही आग धरेना, शव जळेना. दिल्लीला वरिष्ठ अधिकारी कान लावून समाचाराची वाट पहात बसले.

बापूजींना कोणी म्हणालं, "बापूजी, आपण आता जा."

"अरे, आयुष्य सगळं बरोबर घालवलं, आता अर्ध्या तासाकरता तिला कशाला सोडून जाऊ?" बापूजी हे हसत हसत म्हणाले खरे. पण त्याला विषण्णतेची सूक्ष्म धार होती, हे चितेच्या तांबड्यानिळ्या प्रकाशात अधिकच जाणवत होतं.

रात्रीचे तीन वाजले. रामदासभाई येऊन पोचले आणि त्याच वेळी शवानं आग धरली. ते जळू लागलं. जणू रामदाससाठीच बा थांबल्या होत्या.

"बापूजी चला, येता ना."

"चला निघू या. आणखी कोण कोण आहे?"

"सारेच आहेत. मनू आहे, प्रभावती आहे, रामदासदादा आहे. चला"

आज राख सावडायची. अस्थि गोळा करायच्या. सारे उदास होते. नव्हते फक्त बापूजी. दांडी यात्रेला ज्या कर्तव्यबुद्धीनं आणि बेडरपणं ते बाहेर पडले तितक्याच साधेपणानं ते आजही निघाले.

महादेवभाईंच्या समाधीशेजारी आज बा विसावल्या होत्या. भाराभर चंदनाच्या राखेत त्यांच्या देहाची तीन चिमटी राख मिसळून गेली होती. अस्थि गोळा करायला सुरुवात झाली. इतक्यात सुशिलाबेन जवळजवळ किंचाळली.

"बापू, हे पाहिलंत. बांची बांगडी."

"बापू, मलाही सापडल्या दोन" प्रभावतीबेन ओरडल्या.

"मलाही एक सापडली बापू" मनू म्हणाली.

बापू शान्त होते. वेड्यांनो, यात नवल काय? हे बघा, मलाही एक बांगडी सापडलीय."

"सतीचे चुडे जळत नाहीत बेटी, चुडे जळत नाहीत."

असं म्हणतानाचा बापूंच्या डोळ्यांतली आसवं माळ तुटून मोती गळावे तशी गळाली आणि त्यात त्या साध्वीचे चुडे भिजले. अग्नीलाही शरण न गेलेले, न पिचलेले.

❖

# सतरा

सेवाग्रामच्या माथ्यावरून उत्साहाने वारे वहात होते. गांधीजींना पंचाहत्तर वर्षे पूर्ण होणार म्हणून सेवाग्रामात उत्सवाची बोलणी घाटत होती. किशोरीलाल, प्यारेलाल, मीराबेन या साऱ्यांनी जणू लगीनघाईची तारांबळ चालवली होती. कस्तुरबा स्मारकाच्या हाकेला देशभरातून आवर्जून जे प्रतिसाद मिळाले त्यांची संख्या कौतुकास्पद होती. गांधीजींना त्यांच्या वाढदिवशीच बांच्या स्मारकासाठी पंचाहत्तर लाखांची थैली देण्याचं ठरलं.

प्रत्यक्ष वाढदिवसाच्या दिवशी कार्यकर्त्यांची धांदल झाली. मीराबेनजवळचं एक पुस्तक गांधीजींना हवं होतं. ते आपल्या कुटीत कताई करीत होते, मीराबेन तासाभरानं आली.

"मीरा, मी तुला तासापूर्वी निरोप पाठवला होता."

"हो."

"मग आली का नाहीस?"

"व्यवस्था करायची होती, पाहुण्यांची."

"कोण पाहुणे?"

"आज आत्ता काही पत्रकार यायचेत."

"कशाला?"

"निधिसमर्पणाच्या समारंभासाठी."

"समारंभासाठी पत्रकार! ते कशाला?"

"आपणहून येताहेत ते."

"जाहिरात करायला. होय ना?"

"ते मला नाही माहीत."

"आले म्हणजे प्रथम माझी भेट घ्या म्हणावं,"

"सांगेन."

"आपल्या देशात हेच झालंय सध्या..."

"काय?"

"काम कमी. कामाची प्रसिद्धी जास्त."

"बापूजी, लोकांचं प्रेमच कळत नाही तुम्हाला. आता मी एवढी हृषिकेशहून धावत आले तर तुम्ही म्हणाल..." मीरा काहीशा रागानंच म्हणाली.

"काय म्हणाल? सांग तरी."

"मीरा आपलं काम सोडून माझा वाढदिवस साजरा करायला कशाला आलीस?" गांधीजींच्या आवाजाची नक्कल करीत मीराबेन म्हणाली.

गांधीजी खळाळून हसले. मग मीराबेनना बरं वाटलं.

"बापूजी, तुमची रीत सकाळच्या सावलीसारखी आहे."

"म्हणजे कशी?"

"माणूस तिच्यामागं धावतो, तर ती आपली पुढंच."

"पण ती सावली असते. मग माणसानं तिच्या मागं का धावावं?"

"श्रद्धा म्हणून, प्रेम म्हणून."

"या आंधळ्या प्रेमानेच कार्यनाश होतो."

"आणि ते नसलं तर कार्य करता येत नाही."

"न यायला काय झालं? कार्यावरच श्रद्धा असावी."

"म्हणजे अखेर श्रद्धा हवीच ना?"

श्रद्धेचा हा वाद रंगात आला असतानाच मनू आली आणि सेवाग्रामला बरीच माणसं येऊन पोहोचल्याची वार्ता तिनं सांगितली.

"एकूण तुम्ही गर्दी जमवली तर?" गांधीजी म्हणाले.

"बापूजी, तुमच्या कुंडलीत गर्दीचा ग्रह उच्चीचा आहे. तुम्ही जाल तिथं गर्दी होते, त्याला आम्ही तरी काय करणार?"

"निदान त्या गर्दीत भर घालत जाऊ नका."

"म्हणजे, बापूजी, आमची गर्दी वाटते तुम्हांला?" मनुबेन काहीशा रागानंच म्हणाली.

"मीरा, आता आमची मनुडी रागावली आहे बरं का. सावध." गांधीजी खोचकपणे म्हणाले.

"बापू, तुम्ही आम्हाला नीट रागावूनसुद्धा देत नाही."

"तुम्ही आता काही उद्योग कराल का इथंच गप्पा मारीत बसाल?" मागून प्यारेलालांचा खणखणीत आवाज आला.

प्यारेलालांच्या काखोटीला पत्रांचा ढीग होता. मनू-मीरा पटकन निघून गेल्या आणि प्यारेलालनी ओझं उतरून ठेवल्यासारखा तो ढीग जवळच्या चौपाईवर ठेवला आणि ते गांधीजींशेजारी चटईवर बसले.

"प्यारेलाल, आज महादेवाची फार आठवण येते." गांधीजींचा स्वर गद्‌गदलेला होता.

"आणि मला बांची आठवण येते."

"प्यारेलाल, महादेव गेला त्या दिवशी माझा एक हात गेल्यासारखा वाटलं. हातच नव्हे..."

"बापू, मी तुमच्या सेवेत काही कमी पडतोय का?"

"छे रे बाबा, तुम्ही सारे स्वत:ला विसरून माझं करता. पण मी आता तुम्हांला तसं करू नका म्हणून सांगणार आहे."

"का बरं?"

"अरे, या म्हाताऱ्याला फार लाडावून ठेऊ नका."

"बापूजी..."

"होय प्यारेलाल."

"बापू, तुमचा स्वर रुद्ध का?"

"प्यारे, आज तुम्ही सारे माझा वाढदिवस साजरा करताहात. पण मला काय दिसतंय सांगू?"

"काय दिसतय बापू?"

"फार विचित्र! तुमच्या आनंदाचं कारण माझा वाढदिवस. पण तोच माझ्या चिंतेचा विषय. मी पंचाहत्तर वर्षांचा झालो. होय ना प्यारे?"

"होय बापू..."

"गेली पन्नास वर्ष मी राजकीय आणि सामाजिक जीवनात आहे. पण मी मिळवलं काय! मला बेरीज वजाबाकी काही कळेनाशी झालीय."

"म्हणजे काय बापू... आज तुमच्या तोंडून असे निराशेचे..."

"छे छे प्यारे, ही निराशा नाही, हे आत्मपरीक्षण आहे. मीच माझ्या जीवनात डोकावून बघतोय. पंचाहत्तराव्या वर्षी तर मला हे फार जाणवू लागलंय. आज देशभर चित्र काय दिसतंय! एक विस्कटलेलं घरटं, एक रंग उडालेलं चित्र..."

"असं का म्हणता बापू? आज तुमच्या प्रयत्नानी तर स्वातंत्र्याची पहाट उगवणार असं वाटू लागलंय."

"तसं असेल तर देवाची कृपा. पण त्या पहाटेपूर्वीचा हा काळोख मात्र फार भयंकर आहे. प्यारे, काँग्रेसमध्ये प्रत्यक्ष काम करणारे कार्यकर्ते किती राहिलेत? साऱ्यांचा डोळा आहे तो सत्तेच्या खुर्चीकडे. मानाच्या पानाकडे. हिंदू-मुसलमान आज एकमेकांना पाण्यात बघताहेत. आणि माझी स्थिती तर अशी विचित्र आहे की मी हिंदू म्हणून मुसलमान मला दूषणं देतात आणि मुसलमानांचा पक्षपाती म्हणून हिंदू माझ्या नावानं बोटं मोडतात. मला त्याबद्दल वाईट वाटत नाही प्यारे. पण या साऱ्यातून गैरसमजांतून, अपसमजातून, विद्वेषातून निर्माण काय होणार? हा विद्वेष केव्हा तरी विझणार आहे का? का असाच भडकत राहणार आहे? मला चिंता आहे ती ही."

"बापू, आज तुम्ही फारच अंतर्मुख झालेले दिसता."

"मी नेहमीच तसा असतो. आज मी बोलतोय एवढंच." बोलता बोलता गांधीजींना खोकल्याची उबळ आली.

प्यारेलाल चटकन बाहेर गेले आणि मुदपाकखान्यातून पेलाभर गरम पाणी घेवून आले.

गांधीजींनी पेला तोंडाला लावला आणि त्या उष्ण पाण्याचा एक एक घोट ते घशाखाली उतरवू लागले. घशाला पाण्याचा शेक बरा वाटत होता.

"प्यारे, मला आता संध्याछाया दिसू लागली आहे..."

"बापू..." अर्धस्फुट किंकाळीच जणू प्यारेलालच्या तोंडून आली.

"पुन्हा सांगतो प्यारे, मी आयुष्याविषयी निराश नाही किंवा त्या निराशेमुळेच उगाच मरून जावं असं मला वाटत नाही. पण शरीर आता काम देईनासं झालंय. ते मला चांगलं जाणवतंय."

"बापू, तुम्ही आता नाही बोललात तर नाही का चालणार?" प्यारेलालनी किंचित तीव्र आवाजात विचारलं.

"नाही चालणार प्यारेलाल. केव्हा तरी, कुणी तरी अंतरंगावर कोरलेला लेख उघडा करून वाचायला द्यायलाच हवा. नाही तर माझ्या मृत्यूबरोबर तोही बिचारा कालोदरात तसाच गडप होईल. मला काय वाटलं, हे कधीच कुणाला मग समजणार नाही. आणि लोक मात्र उगाच वेड्यासारखे ओरडत राहतील- "महात्मा गांधी की जय." जयजयकार का करायचा, कुणाचा करायचा, हे लोकांना समजलं पाहिजे. मुखानं जयजयकार करताना हातानं कृती करण्याची

जबाबदारी येते, हे लोकांना कळलं पाहिजे.''

"हे कळायला अजून अवकाश आहे. पण बापूजी, आज आम्हाला तुमचा वाढदिवस नितांत आदरानं साजरा करू द्या. आमच्या आनंदाला तुम्ही आपल्या हातावर जोजवा. त्याला असं क्रूरपणे खाली नका फेकून देऊ.'' प्यारेलाल उत्कटतेनं म्हणाले.

"नाही प्यारेलाल. मी तुमच्यासाठीच आहे. तुमचाच आहे. चल, आपण आता आश्रमात एक फेरी मारू. आज हा आश्रम डोळे भरून पाहावासा वाटतोय.''

"चला बापूजी.''

प्यारेलाल आणि गांधीजी कुटीबाहेर पडले तेव्हा दाराबाहेर मनू आणि मीरा एकमेकींकडे प्रश्नार्थक मुद्रेने बघत दाराबाहेर उभ्या होत्या. दोघींनाही एकमेकीचं समाधान करता आलं नव्हतं.

जड पावलांनी दुपार उतरली. सावल्या आपले काळे हात पसरू लागल्या. प्रत्येक झाडाझुडपाच्या तळाशी त्याची वेडीवाकडी आकृती सावलीनं तयार केली होती. आश्रम मात्र फुलला होता. आश्रमात उत्साह होता पण उनाडपणा नव्हता. समारंभ होता पण झगमगाट नव्हता; सारं कसं शान्त, संथ आणि लयबद्ध वातावरण होतं.

कस्तुरबांच्या झोपडीसमोर गर्दी झाली होती. गर्दीनं गांधीजींना वाट करून दिली. हातात एक तुळशीचं रोप घेऊन जड पावलं टाकीत गांधीजी आले. त्यांच्या मागे प्यारेलाल आणि मनुबेन ही दोघं होती. थरथरत्या हातांनी गांधीजींनी ते रोप तिथल्या जमिनीत लावलं आणि क्षणभर त्या इवल्या परमेश्वरी साक्षात्काराकडे प्रगूढ नजरेनं पहात ते तिथं थबकले.

ते रोपटं आगाखान महालातलं होतं. याच तुळशीची कस्तुरबांनी पूजाअर्चा रोज केली होती. त्यांच्या हातून पवित्र पाणी त्या रोपट्याच्या अंगावर शिंपडलं गेलं होतं. अनेक वेळा ती तुळस समाधानानं वाकली होती. अनेक वेळा कृतार्थतेच्या भावनेनं शहारली, थरारली होती. बांनी स्वत: त्या तुळशीला पोसलं, जपलं होतं. तिचे लाड-प्यार केले होते आणि तिची भक्तीही केली होती. आगाखान वाड्यातून सुटताना गांधीजींनी तुळशीलाही तिथून मुक्त केली आणि आपल्याबरोबर सेवाग्रामला ते घेऊन आले तिला. आज त्याच तुळशीची स्थापना तिच्या अनन्यभक्ताच्या पवित्र भूमीत गांधीजींनी केली होती.

हातातल्या झारीनं तुळशीवर जलसिंचन केलं, तेव्हा तुळस शहारली. ती टवटवीत दिसू लागली. तिची पानं डोकावून बघू लागली- "बा कुठाय?"

गांधीजींनी आपला मृदुल हात त्या ओल्या तुळशीच्या अंगावरून फिरवला आणि तिच्याशी जणू कानगोष्ट करीत ते म्हणाले,

"तुळशीमाई, बा आता नाहीत. मी त्यांच्याकडे जाईन तेव्हा घेऊन जाईन हं तुला."

मनूनं तबकातून पुढे केलेला एक सुताचा हार प्यारेलालनी गांधीजींच्या गळ्यात घातला. अलगद हातांनी गांधीजींनी हार आपल्या गळ्यातून काढला आणि हळूवारपणे त्या रोपट्याभोवती त्याची गुंडाळी केली. हिरवट काळ्या पानांच्या तळाशी तो पांढरा स्वच्छ सुताचा हार खुलून दिसत होता. आलेल्या पत्रकारांपैकी कुणा एकानं हळूच हळूच त्या दृश्याची छबी टिपली आणि सुताच्या हारानं सुशोभित झालेली ती तुळस कायमच्या आठवणीसाठी कॅमेऱ्यात जाऊन बसली.

वाऱ्याच्या झुळुकीबरोबर तुळशीची पानं हलू लागली. आणि मग सारे परत फिरले.

"बापू, आज मला बांची सारखी आठवण येतेय" रात्री मनू म्हणाली.

"आणि मनुडी, तुला काय वाटतं, मला आठवण येत नाही? वेडे, आज मी जो पंचाहत्तर वर्षांचा दिसतोय ना, तो तिच्यामुळंच. गाढ झोपेची वेळ सोडून सारा वेळ मला तिचीच आठवण असते."

"चला बापू. उद्या तुम्हाला सकाळीच प्रवासाला निघायचंय. आता तुम्ही झोपा."

"हो पण आपली तयारी झाली का सगळी?"

"तयारी कशाला? बिर्लाजींच्या घरीच उतरायचं आहे आपल्याला दिल्लीला. तिथं आपण सामान नेण्याची गरज नाही."

क्षणभर गांधीजी काही बोलले नाहीत. तेव्हा मनू काय समजायचं ते समजली आणि पटकन बाहेर गेली.

गांधीजी आपल्या कुटीत वृत्तपत्रं वाचत बसले होते. अर्ध्या एक तासानं मनूबेन आली.

"बापूजी, सर्व तयारी झाली."

"काय काय घेतलंस बरोबर सांग पाहू."

"आपला नेहमीचा संच."

"तरी पण यादी सांग" गांधीजी तीव्र सुरात म्हणाले.

"कुकर, पोळपाट-लाटणं, तवा, सांडशी, दोन पातेल्या, चाकू, ताट, खाण्यासाठी दगडी, शिवाय मातीचा कटोरा, ग्लास..."

"बस. एवढंच? कच्ची रे कच्ची."

"थांबा ना. मला श्वास तर घेऊ द्याल! बादली, साबण..."

"आणि लाकडाचा चमचा विसरलीस..."

"हो खरंच की. तोही घेते हं."

"चालायचंच. तू नुकतीच कुठं आमच्या या चमत्कारिक वातावरणात आली आहेस. तू विसरणं शक्य आहे. पण पुन्हा विसरू नको, कळलं?"

"छे छे! आता तुमच्या या वस्तूंची यादी झोपेतही पाठ म्हणून दाखवू शकेन. दाखवू म्हणून?"

"आत्ता तर तू जागीच आहेस. तुला झोप लागली म्हणजे सांगेन यादी म्हणून दाखवायला. जा आता तूही झोप."

"मी उद्या तुमच्याबरोबर निघून दिल्लीपर्यंत येईन. आणि मग..."

"मग कुठे जाणार?"

"अजमेरला जाईन म्हणते."

"जा, अवश्य जा. आमच्या आश्रमाच्या काटेरी कुंपणात तू कंटाळली असशील."

"बापू, तसं नाही हं" असं म्हणून मनू निघून गेली आणि गांधीजींनी कंदिलाची वात खाली सरकवून ते अंथरुणावर आडवे झाले. सेवाग्राम निद्राधीन झालं होतं. आभाळातल्या चांदण्या या निद्रिस्त आश्रमाचं सकौतुक अवलोकन करीत होत्या.

नंतरच्या वर्षादीड वर्षात अवघा हिंदुस्थान तळापासून घुसळून निघाला होता. मुस्लीमलीगला चेव आला होता. भारतीय जनता आक्रंदत होती. तुरुंग ठेचून भरत होते. जाळपोळीला ऊत आला होता. असुरक्षित जीवन, कसंबसं जगण्याची धडपड काही लोकांना करावी लागत होती.

आणि एक काळ जो उगवला तो हाती शस्त्र घेऊनच. या दिवसानं विद्वेषाची वस्त्रं परिधान केली होती. अत्याचाराचे अलंकार अंगावर वागविले होते. क्रूरतेची शस्त्रं या दिवसाच्या हातात तळपत होती. आपला जबरदस्त संहारक जबडा उघडून त्यानं हिंसेचे फूत्कार सोडले आणि मग...

नोआखलीतल्या सहापूर गावी त्या काळ्याकुट्ट दिवशी या
सर्व संहारक हिंसाचाराचा मसुदा ठरला.
हिंदू दिसला तर जिवंत नाही ठेवायचा!
मृत दिसला तर देह नाही राखायचा!
खांडोळ्या झाल्या पाहिजेत.
हाडं दिसली पाहिजेत.
मांसाचे लचके लोंबले पाहिजेत.
रक्त वाहिलं पाहिजे.
काफर औषधालाही दिसता कामा नये.

हाच तो भयंकर मसुदा. या मसुद्याची कलमं तोंडानं घोळवीत पंधरा हजार अल्लाचे सच्चे सेवक सहापूर गावातून बाहेर पडले आणि त्यातल्या प्रत्येकानं पंधरा हजार जीव घेण्याचा आव आणला.

आणि मग नोआखली पेटली. पेटलेल्या घरांची आग आभाळात पसरू लागली. वस्त्रहीन स्त्रियांच्या आर्त किंकाळ्या त्या धूसर आभाळाचे पडदे फाडू लागल्या. भीषण बलात्कारांनी जमीनही गदगदू लागली. रक्ताच्या पाटांनी धरती ओलीचिंब झाली. अनाथ पोरांनी फोडलेला टाहो कुणाला ऐकायला जाईना. कारण त्या अनाथ पोरांच्या बापांचे सांगाडे जिकडं तिकडं आ वासून पसरले होते.

नोआखली अशी तर कलकत्ता तसा. कलकत्ता जाम पेटला. तिथं हिंदू भडकले आणि नोआखलीला शान्त करण्यासाठी गांधीजींनी प्रस्थान ठेवलं.

या शान्तीयात्रेत मनुडी त्यांच्याबरोबर होती.

सोदपूर, ग्वालन्दा, चांदपूर, चौमुहानी, या गावातून शान्ततेचा ध्वज फिरला.

शान्तियात्रा काजरखिलला आली. या अतिसामान्य गावात गांधीजींचा मुक्काम पडला आणि त्यांनी तिथंच जाहीर करून टाकलं की यापुढं, ''मी यात्रा एकट्यानं करणार.''

सुधीर घोष, निर्मलबाबू आणि इतर अनेकांना रजा देण्यात आली. प्रत्येकाला एकेक खेडं नेमून देण्यात आलं आणि शेवटी नेहमीसारखे गांधीजी एकटे राहिले.

काजरखिलला त्या रात्री तंबूत गहनभंगीर चर्चा सुरू होती. मध्ये फक्त एक कंदील जळत होता. रातकिडे वातावरणाचं गांभीर्य वाढवत होते.

"बापूजी, तुमचं वय आता २अठ्ठ्याहत्तर वर्षांचं. तुम्हाला हा एकटेपणा सोसायचा नाही." विनित आवाजात सुधीरबाबू म्हणाले.

"सुधीर, कोणत्याही माणसाची कृती त्याच्या वयावर अवलंबून असू नये. तर आत्मिक बळावर अवलंबून असावी." गांधीजी निश्चयानं म्हणाले.

"ते खरं. पण या वयात आता चिखलपाण्यातून, नदीनाल्यातून आडव्यातिडव्या मार्गातून प्रवास करणं तुम्हाला शारीरिकदृष्ट्या सोसायचं नाही, असं म्हणायचं होतं मला."

"सुधीर, मी आता निश्चय केलाय."

"कसला?"

"करीन, नाहीतर मरीन."

"बापूजी, तुमचा निश्चय चांगला, तुमचं आत्मबळही फार मोठं; पण इथं जो वडवानल पेटलाय तो विझवायला तुमच्या आत्मबळाचं पाणी पुरेसं पडेल असं मला नाही वाटत."

"मग मीच त्यात जळून खाक होईन. पण पाऊल नाही मागे घेणार."

"बापूजी, का उगीच आम्हाला यातना देता?"

"यातना फक्त मीच, माझ्या मीच सहन करणार आहे."

"तुमच्या आधी आम्हाला अग्निप्रवेश करावा लागेल. त्यालाही आमची तयारी आहे. पण ही नोआखली आता नोआखली राहिली नाही. नरक झालाय तिचा."

"मग त्याचाच स्वर्ग झाला तर प्रयत्न करणे आणि नाही झाला तर स्वर्ग होण्याचा प्रयत्न करता करता त्या नरकाच्या मातीत मिसळून जाणे."

इतक्यात एका स्वयंसेवकानं नारायणपुराहून निरोप आणला-

"नारायणपूरला हिंदू-मुसलमान एकमेकांना भिडलेत-"

"ठीक आहे. उद्या प्रस्थान नारायणपुराकडे." गांधीजी म्हणाले.

आणि मग शान्तियात्रेचा मोर्चा नारायणपुराकडे वळला. "गांधी येणार" या नुसत्या बातमीनंच नारायणपूर शान्त झालं. गांधीजींनी गावात प्रवेश केला तेव्हा गावावर स्मशानकळा पसरली होती.

गांधीजींचा मुक्काम बिन्नू विणकराकडे होता. त्याच्या चंद्रमौळी झोपडीतच गांधीजी राहिले. फक्त मनू बरोबर होती. बिन्नूला आपल्या घरी देव आल्यासारखं वाटलं होतं. त्याची पोरंबाळं गांधीजींच्या सरबराईत दंग होती. एका काथ्याच्या बाजेवर शान्तियात्रिकांची यात्रा विसावा घेत होती.

गांधीजींची स्नानाची वेळ झाली होती. मनूबेननं सारी तयारी करून ठेवली होती. गरम आणि गार पाण्याच्या दोन बादल्या तयार होत्या. पण बापूजींचा अंग घासण्याचा दगड कुठं सापडेना. तो दगड मीराबेननी बापूजींना दिलेला होता. साबणाऐवजी अंग घासण्यासाठी त्याचाच उपयोग केला जाई. शोधशोधूनही दगड सापडेना.

मनुबेनला अपराध्यासारखं वाटलं. बराच वेळ थांबून ती चाचरत म्हणाली, "बापूजी, मी दगड कुठंतरी विसरून आले. काल आपण ज्या वाडीत राहिलो तिथं कदाचित विसरला असेल."

गांधीजींनी आपलं उपनेत्र डोळ्यावरून दूर केलं आणि मान वर करून त्यांनी तिरक्या डोळ्यांनी पाहिलं.

"ही तर तू चूकच केलीस." ते म्हणाले.

"हो बापू" मनू अस्फुट उद्‌गारली.

"आता तू स्वत:च तो शोधून आण."

"मी! एकटी..."

"हो, एकटीच. एकदा तू एकटीच गेलीस म्हणजे पुन्हा विसरणार नाहीस."

"या गावात खूपसे स्वयंसेवक आहेत. त्यांच्यापैकी एखाद्याला बरोबर पाठवा. नाहीतर मीच जाते त्यांना सोबतीला घेऊन."

"सोबतीला? का?"

"बापूजी, या नोआखलीत नारळी-पोफळीची दाट बनं आहेत. डोळ्यात बोट घातलं तरी टळटळीत सूर्य असतानाही पुढची वाट दिसत नाही. रस्ते निर्मनुष्य असतात. त्यात हे दिवस असे दंग्याचे. मी एकटीनं कसं जावं..." मनूला असं खूप खूप बोलायचं होतं पण ती बोलली नाही. बोलू शकली नाही. अपराधाची जाणीव होतीच ना!

अखेर धीर करून मनू म्हणाली, "बापू, आणते मी दगड शोधून." आणि पट्‌कन तोंड फिरवून तिनं रस्ता कापायला सुरुवात केली. थोडं-थोडकं नव्हे, मैलाचं अंतर तुडवायचं होतं. ज्या रस्त्यानं बापूजी आणि ती स्वत: नारायणपुरी आले. त्यावरची पावलं पहात पहात मनू पुढं जाऊ लागली. आणि दैवानं कोणताही उलटा फासा न टाकता तिला वाडी सापडली. मुक्कामाची जागा सापडली. आणि आश्चर्य म्हणजे तो दगडही सापडला.

एरवी त्या दगडाला कसलीच किंमत नव्हती. पण आता जेव्हा तो दगड

तिच्या दृष्टीस पडला तेव्हा हरपले धन गवसल्याचा आनंद तिला झाला.

एखाद्या मौल्यवान माणकासारखा तो दगड हातात घट्ट दाबून धरून मनू मैलभर धावत गेली. सकाळी साडेनवाला बाहेर पडलेली मनू रणरणरणत्या उन्हात दुपारी एक वाजता परत आली. पोटात भुकेनं कल्लोळ उठविला होता.

"बापूजी, दगड आणला." समोर दगड ठेवून मनू म्हणाली. तिला विलक्षण धाप लागली होती. कपाळावरून घामाचे ओघळ चेहेऱ्यावर उतरले होते.

गांधीजींनी आपल्याजवळच्या खरबरीत पंचानं तिच्या कपाळीचा घाम पुसला. मनूला रडू आवरेनासं झालं होतं. असावं टपाटप ओघळत होती डोळ्यांतून. गांधीजी तिच्या पाठीवर थोपटत म्हणाले,

"बेटी, आता तुझी परीक्षा झाली."

"फार भयंकर परीक्षा झाली हो. मला फार फार भीती वाटली."

"मनुडी, ईश्वर करतो ते भल्यासाठीच करतो. मी तुला सांगितलं होतं बेटी, माझ्या यज्ञात सामील व्हायचं म्हणजे हिंमतीचं काम आहे. अजूनही तुला महुव्याला परत जायचं असलं तर जा."

"नाही बापू, मला महुव्याला जायचं नाही."

"आणि आता जायचं कारणही नाही. तू परीक्षा पास झालीस. तुला वाटलं असेल, हा क्षुल्लक दगड! त्याचं एवढं काय? पण हे बघ, हा दगड माझा पंचवीस वर्षापूर्वीपासूनचा मित्र आहे. तुरुंगात आणि महालात तो माझ्याबरोबर हिंडलाय. त्याची जिम्मेदारी मी तुझ्यावर सोपवली होती. तो हरवला असता तर मला दुःख झालंच असतं, पण मीराला काय वाटलं असतं... दगडासारखा दगड दुसरा मिळेल. पण त्या मागची भावना... ती कुठं मिळणार! म्हणून मला तुला अशी सुळावर उभी करावी लागली बेटी." बोलता बोलता गांधीजींनाही धाप लागल्यासारखं झालं.

"बापूजी, आज तुमच्या रामनामाच्या शक्तीचा अनुभव आला मला"

"तो कसा काय?"

"रस्ते कसे उजाड, निर्मनुष्य, भकास आणि भयंकर होते. जळलेल्या घरा-झोपड्यांचे अवशेष, मेलेल्या किंवा अर्धवट जळलेल्या कुत्र्या-मांजरांचे सांगाडे, डोकं भिरभिर करणारा दर्प... हे सारं पाहून हृदयाचा कसा थरकाप उडत होता. पाय लटपटत होते. अंगाला दरदरून घाम सुटत होता, आणि मी पळत होते. पण तोंडानं मात्र रामनाम घेत होते. अगदी मनापासून. सारखा जप

करीत होते.''

''कुठल्याही शक्तीचा अनुभव यायला तसा प्रसंग यावा लागतो बेटी.''

''बापूजी, आता तुम्ही छान आंघोळ करा.''

''हो आणि तू आता जेवण करून घे. उपाशी पोटी आज तुझी सत्त्व-परीक्षा झाली. आणखी अंत नको.''

बिन्नूच्या बायकोनं झापड उघडून जेवण तयार असल्याची वर्दी दिली आणि पोटात ओरडणाऱ्या कावळ्यांना शान्त करण्यासाठी मनू आत गेली.

गांधीजी तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे सकौतुक नजरेनं पहात होते.

❖

# अठरा

नारायणपूरचा मुक्काम त्याच रात्री हलला. नारायणपुरात तसं काही विशेष घडलंच नव्हतं. ठिणगी पडली होती. नाही असं नाही. पण तिनं दुसरं काही पेटवण्याच्या आत ती स्वत:च विझून गेली होती. उगीच चुळबुळ करून पहाटेच्या वेळी पुन्हा शान्त झोपी जाणाऱ्या लहान बाळासारखं नारायणपूर शान्त झोपी गेलं होतं. आणि दहा मैलांवरच्या पुढच्या वस्तीवर मुक्काम करण्यासाठी गांधीजींनी नारायणपूर सोडलं.

तीही तशीच वस्ती. दारिद्र्याचे भेसूर प्रदर्शन मांडलेलं. तिथं एका यवनाच्या घरीच गांधीजी राहिले.

सकाळी हवा फार सर्द होती. गांधीजींना थंडीचा त्रास होऊ लागला होता. पाणी गरम करायचं होतं. चूल पेटत नव्हती. चूल फुंकून फुंकून मनूचा जीव कासावीस झाला. मग तिनं साडीचा एक काठ टर्रकन फाडला आणि त्याचा काकडा करण्यासाठी एका लांब काडीला तो फाटका पदर गुंडाळला. गांधीजी बरामद्यात बसून सारं पहात होते. नुकतीच गावकरी माणसं त्यांना भेटून गेली होती.

"मनुडी, तो काकडा दाखव पाहू." गांधीजी बरामद्यातून ओरडले. मनू काकडा घेऊन आली. गांधीजींनी काकडा पुरा उलगडला. चांगली लांबलचक चिंधी होती त्याची. ती पुढं करीत ते म्हणाले,

"मनू, ही धुऊन काढ आणि उन्हात चांगली वाळव."

"कशाला बापू?"

"नाडी करता येईल एवढी लांब चिंधी आहे ही. काकड्याला कशाला वापरायची?"

"पाणी लवकर गरम नको व्हायला?"

"पाणी उशीरा गरम झालं तरी चालेल. हा काकडा किती रॉकेल प्याला? आणि इतकी ही चिंधी? उगाच जळून गेली असती. मनू, आपण काटकसरीनं वागलं पाहिजे. गवताच्या काडीनं चूल कशी पेटवायची ते मी तुला शिकवतो चल."

"काही नको. लोक माझ्या नावानं बोटं मोडतील."

"कां?"

"ज्यानं स्वातंत्र्याचं आंदोलन पेटवलं त्याला चूल पेटवायला लावली या मुलीनं असं म्हणतील ना."

"मी तर उलटं म्हणेन. ज्याला चूल पेटवता येत नाही तो आंदोलन कसलं पेटवणार? चल. आज तुला हा धडा शिकवलाच पाहिजे."

"तुम्ही जा. ते बघा आमकीचे लोक तुम्हाला भेटायला येणार होते, ते येताहेत इकडंच आणि बापू, त्या लोकांना लवकर निरोप द्या. मी आंघोळीचं पाणी तयार ठेवते तोवर." असं म्हणून मनू निघून गेली.

आमकीची दहा-पंधरा गावकरी मंडळी भेटायला आली होती. त्यांचे चेहेरे ओढगस्त दिसत होते. प्रत्येकजण भीतीची छाया पांघरून मारून मुटकून जिणं जगत असला पाहिजे असं वाटत होतं त्यांच्या चेहेऱ्यावरून. बरामद्यातच चट्या अंथरल्या होत्या, त्यावर संकोचून सावरून ते लोक बसले होते.

गांधीजी खोदून खोदून प्रश्न विचारीत होते. पण कुणाच्या ओठांतून शब्द फुटेल तर शपथ. हारीनं उभारलेल्या दगडी पुतळ्यांसारखे ते जीव निस्तब्ध होते. गांधीजी आपल्या स्नेहार्द्र शब्दांनी त्या पुतळ्यात दडून बसलेला जीव जागा करण्याचा प्रयत्न करीत होते.

"मित्रांनो, मला भेटायला म्हणून आलात आणि असे गप्प का?" गांधीजींनी कळवळून विचारलं.

"उपयोग आहे का काही बोलून?" मागून एक धुसफुसला आवाज. गांधीजी चमकले.

"उपयोग नाही? मग मी इथवर कशाला आलो आहे?"

"आमच्या दु:खावर डागण्या द्यायला." तो आवाज जास्त तीव्र होता.

"असं नका म्हणू. मी का आलो आहे हे आपल्याला नीट कळलं नसेल म्हणून आपण असं बोलता."

"आम्हाला सारं कळलंय. साऱ्या जगाला कळलंय. तुम्ही मुसलमानांच्या

भल्यासाठी आलात.'' आता तो आवाज जरा अधिक स्पष्ट येऊ लागला.

''तसं म्हणा हवं तर. मुसलमानांचं भलं आपल्याला नको आहे का? हवं आहे. पण मी तुमच्याही भल्यासाठीच आलो आहे. दोघांचंही जिणं सुरक्षित झालं पाहिजे.''

सगळ्या माणसांना ओलांडून तो झेप टाकून पुढं आला आणि दोन्ही हात आडवे बांधून गांधीजींसमोर उभा राहिला. त्याच्या बळकट छातीवर ते आडवे हात एखाद्या किल्ल्याच्या मोठ्या दरवाजाला लावलेल्या अडसरांसारखे वाटत होते. केस पिंजारलेले होते. पोटावर बेंबीच्या खाली लुंगी बांधलेली होती त्यानं. आणि... डाव्या खांद्याला कुबडी होती. काळ्याभोर मिशांमुळं चेहेरा भरदार तरी भयकारी दिसत होता.

''मुसलमानांचं कल्याण हवं नाही का तुम्हाला.'' तो आता जवळजवळ गरजला. ''आमच्यातल्या प्रत्येकाची कहाणी ऐकलीत तर वर्ष नाही पुरायचं. ती नीट ऐका आणि मग तुमच्या तोंडातून 'मुसलमानांचं कल्याण' हा शब्द आला बाहेर तर आपण जीव उतरवून ठेवायला तयार आहोत.'' तो दरडावल्यासारख्या सुरात म्हणाला.

''जीव नको उतरवून ठेवूस. पण काय हकिकत आहे ती मनमोकळेपणानं सांग. दुःखभार हलका कर मनावरचा.''

त्यानं एकदम डाव्या हातानं लुंगी वर खेचली आणि... तिथं पायच नव्हता. गुडघ्याच्या वाटीपर्यंत मांडीच तेवढी. टोकाला जखम चिघळली होती.

''माझा दीड पाय राहिला'' तो रुद्ध स्वरात म्हणाला. ''कसा गेला अर्धा पाय सांगू?'' रात्रीची वेळ... दावा साधून आले. मी बसलो होतो जेवायला. चाळीस-पन्नास जण होते. कुऱ्हाडी, भाले, बरचे, कोयते, विळे... शस्त्रांचे हात पिंजारून पसरून आले. कडब्याची पेंडी कुऱ्हाडीनं खट्‌कन तोडतात तसा माझा हा पाय तोडला. मला पंगू करून ठेवला आणि... बोलता बोलता तो कोसळला.

मनू मागे दारात उभी होती. तिनं चटकन पाण्याचा ग्लास पुढं केला. गांधीजींनी त्याच्या तोंडावर पाण्याचे हबके मारले. दोनचार मिनिटात त्यानं डोळे उघडले. पापण्यांची उघडझाप करीत तो इकडं-तिकडं पाहू लागला, आणि काही बोलण्यासाठी त्याचे ओठ पुन्हा थरथरू लागले....

''तू आता बोलू नकोस. स्वस्थ पडून रहा'' गांधीजी प्रेमभरानं म्हणाले.

''नाही नाही, मला तुम्हाला सारं सांगू दे. सगळं सगळं सांगू दे.

त्याशिवाय चैन नाही पडायचं मला... असं म्हणताना त्याला पुन्हा अवसान आलं. ज्वालामुखी पुन्हा उसळला. पुन्हा तो खदखदू लागला.

"तुम्ही सांगता आपापल्या वस्त्यांतून पुन्हा जाऊन रहा. राहू. पण आमची थडगी बांधली जातील तिथं. तर आधी काय सांगत होतो मी... माझा अर्धा पाय खचूकन तोडला... कोपऱ्यात माझं मुटकुळं बसवलं आणि... माझ्या डोळ्यांदेखत... तो हमसू लागला.

"शरण, तू जरा शान्त हो" एक म्हातारा उठून पुढं आला आणि शरणला शांत करू लागला.

"थूत् तुमच्या," मामाजी, मला शान्त व्हायला सांगता? विसरलात... तुमच्या डोळ्यांदेखत तुमच्या घरात... तुमच्या लाडक्या मुलीची थानं कापली त्या खून चढलेल्या सैतानांनी आणि तोंडात फेस येऊन राधा... तुमची मुलगी कोसळली. विसरलात? मला शान्त व्हायला सांगता? तुम्ही का नाही जीव दिलात?"

शरण विलक्षण थरथरत होता. त्याच्या डोळ्यांतून जणू ठिणग्या पडत होत्या.

"बापूजी, इथं घडलंय ते फार भयंकर घडलंय. तुमची शान्तीघोषाची केशरी वस्त्र इथले रक्ताचे वाहते पाट पुसून काढायला उपयोगी येणार नाहीत. त्या वस्त्रालाच रक्तलांछित व्हावं लागेल. बापू, माझ्या डोळ्यांदेखत माझी बायको, माझी बहीण, माझी म्हातारी आई आणि आजी देखील यांच्या पापी वासनेला... बापू... मी बघतोय सारं... कल्पना करा... बायकोच्या लुगड्याला कुण्या दु:शासनानं हात घातला आहे.. ती आर्त असहायपणे ओरडतीय... तिच्या देहाचा मालक कोपऱ्यात जिवंत लोळागोळा होऊन पडलाय... आणि त्या देहावर अनेकांचे हात फिरताहेत... वासनेचा शेणखळा ओतला जातोय... आणि दुर्दैव असं की नवरा बघतोय... आणि बापू, एवढ्यावरच थांबलं नाही... माझ्या ऐंशी वर्षांच्या म्हाताऱ्या आजीवरदेखील... बापू काय वाटलं असेल आणि आतासुद्धा काय वाटत असेल याची तुम्हाला नाही कल्पना यायची... त्याला प्रत्यक्ष भोगायला लागतं. जखम झाल्याशिवाय, घाव बसल्याशिवाय ती वेदना समजायची नाही. ती समजली असती तर शान्तीचा जप करायला तुम्ही इथवर आलाच नसता. हातात तरवारच घेतली असती... नाहीतर... नाहीतर."

"शरणभाई, मला समजतं तुझं दु:ख, पण असं ते उकरून काढून

वाढेल आणि बघ, मला का तुमच्या दुःखाची जाणीव नाही? अरे, दुःख तुमच्या उरी जळत असलं तरी चटके मला बसताहेत. मी सावलीला असलो तरी प्रखर सूर्याचे चटके मला बसल्याजागी बसताहेत'' गांधीजी शान्तपणे म्हणाले.

''नाही नाही, बापूजी, शक्य नाही. इथला वणवा तुम्ही पाहिला नाहीत, इथल्या किंकाळ्या ऐकल्या नाहीत. इथले टाहो तुमच्या कानापर्यंत आले नाहीत. म्हणून तुम्ही म्हणताय असं. माझा पाय जर त्यांनी लंगडा केला नसता तर खचित मी दहापाच जणांचे गळे घोटले असते. त्यांच्या छाताडांवर बसून त्यांचे पापी हात उखडून टाकले असते, डोळ्यांची बुबळं बाहेर काढली असती आणि निर्लज्जपणानं हसल्यामुळं दिसणारी त्यांची दंतावळी उपटून तोंडाच्या उखळात माझ्या बायकोच्या रक्तानं भरलेल्या मातीचा तोबरा दिला असता. पण... करणार काय... त्या बेट्यांनी दावा साधला... आधी माझा पायच तोडून ठेवला... आयाई... मी कशाला जगलो बापूजी... कशाला मी जिता राहिलो. आयाबाहिणींच्या अब्रूची खिरापत वाटली जात असताना मी कोपऱ्यात बसून षंढासारखा निपचित बघत होतो... आयाई...'' शरणचा भावनावेग अनावर झाला होता. तो पुन्हा एकदा गांधीजींच्या पायांशी कोसळला.

मामाजी, बिधन आणि आणखी दोघेतिघे धावले. शरणची काया फेफरं आलेल्या माणसासारखी ताठरली होती. तो गद्‌गदत होता. अर्धवट शुद्धीत असलेल्या त्याच्या तोंडातून कसलातरी चमत्कारिक आवाज येत होता.

दोघातिघांनी त्याला तसाच उचलून आत नेला. खाटेवर आडवा करून पांघरूण घातलं.

''मनू, मधपाणी घोटून आण जरासं.'' गांधीजींनी सांगितलं.

त्याच्या तोंडात चामचाचमचा मधपाणी गांधीजी स्वतः रिचवू लागले. जराशानं शरण पूर्ववत भानावर आला.

''आम्ही आता घेऊन जातो'' मामाजी गांधीजींना अभिवादन करीत म्हणाले. शरण आता उठून बसण्याचा प्रयत्न करीत होता.

''घेऊन जा त्याला. गाडीतून न्या. उद्या सकाळी आम्ही आमकीला येतच आहोत. जा शरण. नीट जा हो.'' गांधीजी शरणच्या पाठीवर थोपटत म्हणाले.

दुसऱ्या दिवशी आमकीला गांधीजी पोचले तेव्हा आमकी झोपेतून जागी व्हायची होती. दंगलींच्या आणि अत्याचाराच्या पुसट खुणा आमकी गावात

दिसत होत्या. पण मन सुन्न करण्यासारखं दृश्य स्वरूप सर्वत्र होतं.

दुपारी शरण, मामाजी, बिधन ही सारी मंडळी भेटायला आली. शरणच्या चेहेन्वर आदल्या दिवशीच्या खळबळीचा मागमूसही नव्हता. अथांग सागराशयासारखा तो दिसत होता. शरण निघून गेल्यावर मनू म्हणाली, "बापूजी, शरणची कहाणी सुन्न करणारी आहे. तुम्ही मात्र स्थितप्रज्ञासारखे ऐकत होतात."

"माझं मन सुन्न झालं नव्हतं असं नव्हे मनू. पण अशाही वेळी आपण स्थितप्रज्ञच राहिलं पाहिजे. दु:खावर मात करायची असेल तर दु:खाच्या लोंढ्यात वाहून न जाता दु:खाच्या काठावर उभं राहूनच प्रयत्न करायला हवेत." गांधीजी म्हणाले.

"बरं, बापूजी, आज आमकीत आणखी एक अडचण आली आहे."

"ती कसली?"

"तुमच्यासाठी बकरीचं दूध नाही मिळत इथं"

"नाही तर नाही. नारळाचं दूध चालेल."

"आणि तूप?"

"पण मला कुठं करता येते?"

"तेही नारळाचं तेलच खाईन."

"मी शिकवतो ना. खूप गोष्टी शिकवायच्या आहेत तुला."

नारळाचं दूध आणि तेल तयार करण्यासाठी रीत त्या दिवशी मनूला शिकायला मिळाली. पण त्यामुळंच एक नवं संकट उभं राहिलं.

नेहमीप्रमाणे आठ औंस नारळाचं दूध घेतलं मात्र... दूध पचायला फार जड होतं. दुपारीच गांधीजींना रेच होऊ लागले. संध्याकाळी अंगणातून गांधीजी झोपडीत येत होते. आणि त्यांना सरसरून चक्कर आली. जमीन हलल्यासारखी वाटली. मनू चट्कन पुढं धावली. तिनं गांधीजींच्या कोसळत्या कायेला आपल्या दोन्ही हातावर झेललं आणि हळूहळू पुढं आणून त्यांना खाटेवर बसतं केलं, चेहेरा ओढला होता. डोळे खोल गेल्यासारखे वाटत होते. पोट खपाटीला गेलं होतं आणि मधूनच एखादी कळ पोटात सणाणून उठे.

मनू कावरीबावरी झाली. आमकीसारखं एक ठार खेडं. तिथं ना डॉक्टर, ना औषधपाणी. बापूजींची हालत तर अशी खराब झालेली. त्या भयाण निर्जन एकांतातल्या झोपडीत आपण एकाकी आहोत असं वाटून मनूला रडू आलं.

ती रात्र तिनं जागून काढली. चक्कर येण्याआधी खूप जांभया येत, घाम

सुटे, हातपाय थंड होत आणि कधी तर बापूंचे डोळेही वर जात.

योगायोगाने रात्री निर्मलबाबू आले तेव्हा भयाण अंधारात काजवा सापडल्यावरही जसा आनंद होतो तसा आनंद मनूला झाला.

मध्यरात्रीला गांधीजींना आणखी एकदा चक्कर आली आणि ते बसल्याजागीच कोसळले.

"बापू, मी सुशीलाबेनला बोलावून घेते. जवळच्याच वस्तीवर त्या आहेत."

"कशाला बेटी, तिला नको कळवू." क्षीण आवाजात गांधीजी म्हणाले.

"जास्तकमी काही झालं तर लोक मला मूर्खांत काढतील. मला सुशीलाबेनला कळवलंच पाहिजे."

"मी सांगतो ना, कळवू नको. तुझी चिठ्ठी वाचून ती आपलं काम सोडून धावत येईल. मला ते आवडणार नाही. माझं दुःख मला सहन केलंच पाहिजे. आणि तुला मी मागंच सांगितलंय, रामनामाचं एवढं मोठं औषध असताना मला दुसऱ्या औषधाची गरज काय?"

"बापूजी, या नोआखलीतून तुम्ही सुरक्षित बाहेर गेलात तरच ठीक आणि ती जबाबदारी माझ्यावर आहे." मनू हसून म्हणाली.

"मनू, तू माझं रक्षण कसलं करणार आणि मी तरी सुरक्षित बाहेर कसला जाणार, कर्ताकरविता राम आहे. आपल्या आयुष्याची दोरी त्याच्या ताब्यात देऊन, त्याचं नाव घेत आपण निश्चिंत राहायचं."

"तुमच्या आजाराची बातमी आपण कितीही गुप्त ठेवली तरी पसरतेच. या बघा, वीस-पंचवीस तारा आल्या आहेत."

"कशाबद्दल?"

"तुमच्या प्रकृतीची चौकशी आणि काळजी करणाऱ्यांच्या."

"सर्वांना सब ठीक म्हणून कळवून टाक."

गांधीजी नीट बोलू लागले, त्यांनी थोडंसं गरम पाणी मध घालून घेतलं, आणि मग मनूच्या मनावरचा ताण नाहीसा झाला. गांधीजींचा डोळा लागला आणि मनूनं अंथरुणाला पाठ लावली. तिच्या मिटल्या डोळ्यांसमोरून नोआखलीची यात्रा चित्रमालिकेसारखी पुढं पुढं सरकू लागली...

तो पहिला दिवस...

श्रीरामपुरीत ठेवलेलं पहिलं पाऊल...

विध्वंसाला सृजनाने केलेले आवाहन...

कृतांत संहाराला नितांत सत्याने केलेली खूण....

एका चिखलमातीच्या घरात, नारळीच्या झांवळ्यांच्या छपराखाली केलेला निवास.

गवताची शय्या, झोपडीचाच महाल...

श्रीरामपुरापासून दोन मैलांवर असलेल्या चंडीपुरापासून शान्तियात्रा आरंभित झाली. चंडीपुरापासूनच नोआखलीतल्या हत्याकांडाला सुरुवात झाली होती.

शान्तियात्रा सुरू झाली तेव्हा हत्याकांड संपलेलं होतं. अधून मधून कुठं धुसफूस ऐकू येत होती. क्वचित कुठे भडकाही उडत होता. चंडीपुराच्या टोकाला असलेल्या हरिजनांच्या झोपडीतून यात्रा निघाली. शेपन्नास गावकरी, त्यांच्या बायका, पोरं आणि कार्यकर्ते.... बायकांनी बापूजींच्या कपाळी कुंकुमतिलक लावला आणि पहिलं पाऊल टाकण्यापूर्वी बापूजींनी पायतणं पायातून काढून ठेवली.

"बापूजी, अनवाणी चालणार आपण?" सुधीरबाबूंनी आश्चर्यानं विचारलं.

"होय बाबू. आपल्या मंदिरात, चर्चमधे, मशिदीत, कोणत्याही पवित्र जागी आपण जातो तेव्हा अनवाणी जातो. मला तर साक्षात दरिद्रनारायणाकडे जायचंय. त्याची शेकडो मंदिरं आवतीभोवती आहेत. पायात जोडे घालून कसा जाऊ?"

त्या सकाळी साडेसातला यात्रा सुरू झाली.

एक हात मनूच्या खांद्यावर होता, दुसऱ्या हाती कळकीची काठी होती. आधार काय तो एवढाच.

नारळी-पोफळीच्या बनातून यात्रा पुढे सरकत होती. मधूनच झावळ्यातून एखादा अल्लड प्रकाशकिरण लडिवाळ मुलासारखा डोकावून जाई. एखादा शुभ्र कापसाचा ढग सकौतुक नजरेनं पाही.

गीतसुरांनी वातावरण भरून गेलं होतं. हवेवर सूर तरंगत होते.

यदि तोर डाक शुने केऊ ना आसे
तबे अेकला चलो रे।

कविवर्य रविंद्रांचं हे गीत... ते गात गात यात्रा चालली होती. वाटेत घडून गेलेल्या घटनांच्या अवशेष खुणा दृष्टीस पडत होत्या. अमानुष कत्तलीची साक्ष देणाऱ्या वेड्यावाकड्या पावलांचे ठसे, विखुरलेली हाडे, जळून गेलेल्या झोपड्या...

यदि सबाई थाके मुख फिराये
सबाई करे भय-

तबे पराण खुले
ओ तुइ मुख फुटे तोर मनेर कथा,
एकला चल रे...

अशी ही 'एकला चलो रे' यात्रा... माणसं असूनही एकट्याची, प्रकाश असूनही भयाण अंधाराची, आवाज असूनही स्मशानशान्ततेची.

आणि मग ते मासीमपूर... मासीमपुराच्या मातीचा रक्तानं चिखल झाला होता. तिथल्या जमिनीला माणसांची हाडं खायला मिळाली. जागोजाग घुबडाकावळ्यांनी कुरतडून टाकलेले मांसाचे गोळे वाळून दर्प सोडीत होते. आणि ते पाहून पाषाणहृदयालाही पाझर फुटत होता, स्थितप्रज्ञाची मती कुंठित होतं होती, भावनाहीन माणसाच्या काळजात तुटत होतं...

मासीमपुराचा उजाड उध्वस्त भाग संपला. त्या गावात औषधालाही हिंदू राहिला नव्हता. मुसलमान होते तेही काही मोठे उजळ माथ्यानं वावरत होते असं नव्हे. घडून गेलेल्या घटनांची, करून झालेल्या कृत्यांची अपराधी छाया वागवत तिथला माणूस जगत होता.

यात्रा चांदपूरला आली. गांधीजी गावात येऊन पोहोचले तेव्हा चांदपूर नुकतंच कुठं रुग्णशय्येवरून उठलं होतं. हातपाय हलवून फिरू लागलं होतं.

सुधीरबाबूंनी तयार केलेली पोर्टेबल झोपडी इथंही उभारण्यात आली. आणि दुपारच्या वेळी एक अवलिया गांधीजींना भेटायला आला. वर्ण, वेष आणि आवेश यावरून तो मुसलमान वाटत होता. तरी अगदी दंडवत घालून गांधीजींच्या पाया पडाल तो.

"माझं नाव कासम."

"बसा आपण" गांधीजी मृदुतेनं म्हणाले.

"मी आपल्याला आमंत्रण द्यायला आलोय"

"कशाचं? आपल्या घरी काही कार्य वगैरे आहे काय?"

"नाही. कार्य नाही... पण..." अडखळत चाचरत कासम बोलत होता. आणि बाहेर फुटू पाहणारे शब्द ओठांचा अडसर लावून अडवीत होता.

"कासमभाई, तुम्हाला जे स्पष्ट बोलायचं असेल ते बोला."

"मी आपला हरिजन वाचतो, यंग इंडिया वाचत होतो..."

"आनंद आहे."

"आपल्याला प्रत्यक्ष पाहण्याचा योग आजच आला."

"मग? काही चमत्कारिक आढळलं का तुम्हाला माझ्यात?" गांधीजी

हसून म्हणाले.

"आपण एक हिंदू, या आमच्या भागात हिंदूंची बेसुमार कत्तल झाली आहे, त्यावरून कदाचित आपण... आपण ठरवाल की सगळेच मुसलमान... पण नाही. बापूजी... आमच्या गावात हे घडू नये म्हणून मी फार फार प्रयत्न केला. मला यश नाही आलं. ही बोचणी माझ्या मनाला सतत लागून राहिली आहे. काही सुचत नाही."

"कासमभाई तुम्ही मनापासून प्रयत्न केलेत ना, मग झालं. कर्मावर श्रद्धा ठेवा, फलाशा ठेवू नका."

"नाही. बापूजी, मी स्वत: होतो हजर... माझ्या डोळ्यांदेखत... पाठीला पाठ लावून आजन्म राहिलेली माणसं हात धुवून घेत होती... पोरंसोरं सैरावैरा धावत होती. तीच पोरं चार-दोन दिवसांपूर्वी माझ्या मांडीवर खेळली होती. पण... त्या दिवशी मी त्यांना मांडी देऊ शकलो नाही बापूजी... माझी निर्बल सहानुभूती त्या भयंकर हाहा:कारात कुठं जीव धरणार होती... बापूजी... माझ्यातला माणूस जागाच होता. मेलेला नव्हता. पण तो काही करू शकत नव्हता. संहाराला थोपवू शकत नव्हता. माझ्या या निर्बलतेचा कबुलीजबाब द्यायला मी आज आलोय."

"कासमभाई, कबुलीजबाब हा फार कठोर शब्द झाला. असं नका म्हणू. तुम्ही आत्मपरीक्षा केलीत यातच सर्व आलं."

"आता बापूजी, माझी एकच इच्छा आहे"

"सांगा ना. संकोच नका करू."

"आपण चांदपुरात असेतोवर..."

"बोला, बोला, अडखळता का? काय करू मी चांदपुरात?"

"चांदपुरात असेतोवर आपण माझ्या घरी मुक्कामाला यावं."

गांधीजींबरोबर असलेल्या इतरांचे डोळे चमकले. साऱ्यांच्या माना झट्कन वर गेल्या. कासमभाई केवढं मोठं धाडस करायला सांगत होते. नोआखलीत, एका मुसलमानाच्या घरी मुक्काम... खरोखर हे दिव्यच होतं.

गांधीजी काय उत्तर देतात याकडे साऱ्यांचं लक्ष होतं. मनूचा श्वास कोंडून राहिला होता. माणसांची ती छोटीशी सभा रेखाटल्या चित्रासारखी स्तब्ध होती. गांधीजींनी कासमभाईंच्या डोळ्यात रोखून पाहिलं आणि ते म्हणाले,

"भाई, तुम्ही अडखळत बोललात, चाचरत बोललात."

"होय बापूजी, आपल्यासारख्याला अशी विनंती करायला माझी जीभ

धजावत नव्हती.''

''का? का धजावत नव्हती? माझ्यापासून तुम्हाला धोका आहे?''

''छे छे. असली भलतीच शंका मनात नका आणू बापूजी. उलट मी एक मुसलमान, आपण एवढे प्रसिद्ध पुरुष... नोआखलीतल्या मुसलमानांची आधीच एवढी दुष्कीर्ती झालेली...''

''कासमभाई!'' गांधीजी उच्च स्वरात बोलले, ''नोआखलीतले यच्चयावत् मुसलमान तसे आहेत?''

''नाहीत ना. मला तेच सांगायचंय.'' कासमभाई कळवळून म्हणाले.

''मग तुमच्या मनात अशी कुशंका का आली?''

''आली खरी. यायला नको होती.''

''म्हणजे तुमचा स्वत:वरच विश्वास नाही.''

''नाही नाही, बापूजी असं नका म्हणू. माझ्याबद्दल शंका नका घेऊ.''

''मी तुमच्याबद्दल साफ दिलानं बोलतोय भाई. तुम्ही मला चाचरत अडखळत विचारलं ते योग्य नव्हे. भाई, तुमच्या प्रश्नाचे उत्तर प्रश्न विचारलात तेव्हाच मी तयार ठेवलं होतं.''

''म्हणजे... आपण...''

''भाई, मी तुमच्याकडं राहायला येणार आहे.''

'आहे' या शब्दाच्या उच्चारांनी पुन्हा एकदा वातावरण खळबळले. मनूनं आत डोळे मिटून घेतले. कासभाईंच्या चेहेऱ्यावर आनंद मावेनासा झाला,

''बापूजी, खरंच? माझा तर विश्वास बसत नाही.''

''एवढ्यासाठीच मी म्हणालो मघाशी कासमभाई...''

''काय?''

''तुमचा तुमच्यावरच विश्वास नाही म्हणून तुम्हाला असं वाटतंय.''

''नाही बापूजी. आता माझा माझ्यावर वाजवीपेक्षा जास्त विश्वास बसलाय. मी पुढं जाऊन सारी तयारी करतो. आपण मागून या.''

''कासम, तुम्ही तयारी कसली करणार? फकीर येणार आहे तुमच्या घरी. त्याला तयारी नको.''

कासम आनंदाने उत्फुल्लून निघून गेले आणि संध्याकाळी गांधीजींनी कासमभाईच्या घरीच मुक्काम केला. रात्री त्या मोहोल्ल्यातली शे-पन्नास माणसं गांधीजींच्या भेटीला आली होती. सुधीरबाबू, मनू या साऱ्यांच्या काळजात भीतीनं घरे केली होती. पण गांधीजींना नको कुणी म्हणायचं? आणि कुणी

नको म्हणण्याचं धाडस केलंच असतं तर गांधीजींनी त्याला मानलं नसतं.

दुसऱ्या दिवशी सकाळी प्रस्थान ठेवलं तेव्हा बरोबरची माणसं निर्धास्त झाली. कासमभाईला धन्यता वाटली होती. सारा गाव चकित झाला होता.

'Mahatma stays with a Muslim'

'महात्माजी मुसलमानाच्या घरी राहिले'

असे मथळे देऊन वर्तमानपत्रांनी ती बातमी भडकपणे छापली. सकाळी देवीपुराकडं कूच करताना कुणीतरी गांधीजींना ती वृत्तपत्रं दाखवली. ते हसले. म्हणाले, "वेडे आहेत हे लोक."

"का बरं," सुधीरबाबूंनी विचारलं.

"मी मुसलमानाच्या घरी राहिलो ही बातमी होऊ शकते हेच या देशाचं दुर्दैव आहे."

"ते कसं बापूजी?"

"जो आवश्यक आचार असावा ते आश्चर्य ठरले आहे. या देशात हिंदू मुसलमानाच्या घरी राहिला पाहिजे, मुसलमान हिंदूकडं गेला पाहिजे. तसा तो गेला, राहिला, तर मोठा मथळा देऊन बातमी छापण्याइतकं त्यात आश्चर्य कसलं?"

देवीपूर आलं. गावच्या वेशीवर झांवळ्याच्या कमानी केल्या होत्या. यात्रा वेशीतून आत शिरली आणि दोन स्त्रिया पंचारती घेऊन पुढं आल्या. एकीनं गांधीजींच्या कपाळी कुंकुमतिलक लावला. मग दोघींनी ओवाळलं. निरांजनाचा तांबूस प्रकाश गांधीजींच्या चेहेऱ्यावर पडत होता आणि सुधीरबाबू, मनू, त्यांच्याकडे टक लावून पहात होते.

देवीपुरातल्या रस्त्यांवरही सुशोभा करण्यात आली होती. ठिकठिकाणी फुले, रेशीम, जरतार, तांबडेपिवळे कागद यांनी सजावट केलेली होती. कुठेकुठे पहाटेच लावलेले तेलातुपाचे दिवे अजून जळत होते.

सुधीरबाबूंनी झोपडी उभी केली. तिथं अंगणात खाटेवर बसताच गांधीजी मनूला म्हणाले, "या गावची वस्ती, हिंदू किती, मुसलमान किती ते शोधून काढ."

"मी आधीच माहिती काढून ठेवली आहे. तीनशे हिंदू आणि दीडशे मुसलमान आहेत."

"ही सजावट कोणी केली?"

"हिंदूंनी."

"मग ते दादाजी असतील प्रमुख त्यांचे. त्यांना बोलावून घे."

दुपारी दादाजी आले. गांधीजी थोडेसे चिडलेलेच होते. त्यांनी विचारलं, "दादाजी, ही सारी सजावट करण्यासाठी तुम्ही पैसे कुठून आणले?"

"वर्गणी काढली, तीनशे रुपये जमवले."

"छान. दादाजी, हा सारा झगमगाट पाहून मला आनंद नाही झाला. ही सगळी फुलं क्षणभरानं कोमेजून जाणार आहेत. हा झगमगाट करून तुम्ही मुसलमानांवर मात करण्याचा आव आणलात आणि जातीयवादाच्या आधीच पेटलेल्या आगीत या सजावटीचं तेल ओतलंत, असं जर मी म्हटलं तर..."

"आम्हाला वाईट वाटेल." दादाजी कठोर स्वरात म्हणाले.

"पण मी तसं म्हणणार आहे."

"म्हणा. पण आमचाही विचार करा. शुद्ध भावनेनं केलेल्या या सजावटीत आपल्याला अशुद्ध हेतुचा वास येईल असं आम्हाला स्वप्नातही वाटलं नव्हतं. नाही तरी... आपलं नेहमी झुकतं माप त्या बाजूलाच असतं... आणि ते अपेक्षितच होतं."

"दादाजी!" मनू एकदम ओरडली.

"त्यांना बोलू दे मनू. त्यांनी असं बोलणं स्वाभाविक आहे, अपेक्षित आहे. शब्द थांबवलेस तरी भावना बदलेल का? ती बदलली पाहिजे. माझा हट्ट त्यासाठी आहे."

दादाजी खिन्न मनानं निघून गेले आणि अर्ध्या तासाच्या आत चांदपुरातली शोभा-सजावट उतरली गेली. दागिन्यांनी मढवलेल्या पुरंध्रीसारखं दिसणारं चांदपूर! त्याचा चेहेरामोहराच पार बदलून गेला. ते आता संन्यासिनीसारखं दिसू लागलं.

"बापूजी, कलकत्त्याहून तार आली आहे." सुधीरबाबू म्हणाले.

"कशाबद्दल? कुणाची?"

"वल्लभभाईंची आहे तार. तुम्ही कलकत्त्याला जावं, सुचवलंय."

"अजून नोआखली कुठं शान्त झाली आहे?"

"बिहार, बंगाल, सगळीकडे तुम्हीच हवे आहात बापूजी."

"मी एकटा हवा असून उपयोग काय? लोकांनी माझ्या मार्गावरून चालत यायला हवं ना?"

आतल्या बाजूला कपड्याला टाके घालीत मनू गुणगुणत होती- "एकला चलो रे... एकला चलो!"

❖

# एकोणीस

बिहारनं नोआखलीचा कित्ता गिरवला आणि मग कलकत्ता, दिल्ली, मद्रास, मुंबई ही शहरंही स्वस्थ बसली नाहीत. मुंबईत भर रस्त्यात खून पडू लागले. दिल्लीचा तर चेहेरामोहराच बदलून गेला होता. नौआखलीतलं अपुरं कार्य सोडून जाताना गांधीजींना दु:ख होत होतं पण बिहारच्या किंकाळ्या अस्वस्थ करीत होत्या. कलकत्त्याच्या 'मारो-काटो'च्या आरोळ्या चिंता निर्माण करीत होत्या. सुनसान दिल्लीची वृत्तपत्रातील छायाचित्रं पाहून मनावर मळभ येत होतं.

म्हणून मोठ्या अनिच्छेनंच गांधीजींनी नोआखली सोडली. प्यारेलाल, सुशीला नायर, मनू, निर्मलबाबू हे साथी होतेच. कलकत्त्याच्या वाटेवर गाडी असताना राजेंद्रबाबू आले.

"काय बाबू, वार्ता काय आहे?"

"दोन लाख लोकांच्या सह्यांचं पत्र माझ्याकडे आलंय. तुम्हाला देण्यासाठी." राजेंद्रबाबू म्हणाले.

"कशाबद्दल?"

"गोवधबंदीसाठी."

"गोवधबंदीचा कायदा करावा म्हणून?"

"हो. आणि ताराही आल्या आहेत पुष्कळ. या लोकांना उत्तर काय द्यायचं बापूजी?"

गांधीजींच्या कपाळावर एक आठी उमटून गेली. ते म्हणाले,

"तुम्ही काहीच उत्तर नका देऊ. मी प्रार्थनासभेत उत्तर देईन. ते वृत्तपत्रांतून येईलच."

"पण बापूजी, मला वाटतं या लोकांच्या भावनांचा विचार करायला हवा आपण."

"राजेंद्रबाबू, तुम्हाला असं वाटतं... मी गोधवबंदीच्या विरुद्ध आहे? खरंच असं वाटतं?"

"वाटत नाही. पण हा कायदा करावा असं तुम्हाला नाही वाटत?"

"नाही. तुम्ही जाणताच... मी तर गोभक्त आहे. पण माझं मत मी दुसऱ्या कोणावर लादू इच्छित नाही. त्यांच्या मनात परिवर्तन झालं पाहिजे."

"त्यांच्या म्हणजे मुसलमानांच्या..."

"जातीचा उल्लेख नको."

"का नको?"

"द्वेष वाढतो."

"तो आता वाढायचा राहिला आहे?"

"नसेल. पण त्यात तुमच्या माझ्यासारख्या जाणत्या माणसांची भर नको. आगीवर पाणी टाकलं पाहिजे, तेल नको."

"पण... मला असं वाटतं... की हिंदूंच्या भावनांचाही आपण विचार करायला हवा."

"तो केलाच आहे. त्यांनी गोवध करू नये."

"पण दुसऱ्यांनी केला तर त्यांच्या धर्मभावना दुखावतात. त्याचं काय?"

"गोवध करणाऱ्यांच्या मतात बदल घडवावा. कायद्याचा प्रतिबंध असण्यापेक्षा मनाचा प्रतिबंध असावा."

"हे या देशात घडेल असं तुम्हाला वाटतं?"

"पण घडणार नाही म्हणून आपलं तत्त्व सोडावं असं म्हणाल तुम्ही?"

"तसं म्हणणार नाही. पण तत्त्वच कोणतं ते नीट ठरवावं."

"राजेंद्रबाबू, तुम्ही हे बोलता? तुमचा पिंड धार्मिक आहे हे मी जाणतो. मीही धार्मिक आहे. 'स्वधर्मे निधनं श्रेय:' हे मीच माझ्याविषयी सांगतो. पण.. स्वत:च्या धर्मावर प्रेम असताना दुसऱ्याच्या धर्माचा तिरस्कार का करावा? म्हणून मी सांगतो, त्यांची मतं बदलली पाहिजेत. त्यांची मनं घडवली पाहिजेत." गांधीजी शान्तपणे म्हणाले.

"बापूजी, म्हणूनच तुमच्याबद्दल दोन्ही जमातींच्या लोकांत वाद आहेत. हिंदूंना वाटतं तुम्ही मुसलमानांचे पक्षपाती आहात आणि मुसलमानांना वाटतं ज्या अर्थी तुम्ही हिंदू आहात त्या अर्थी तुम्ही हिंदूंचेच पक्षपाती आहात.

वास्तविक तुम्ही कोणत्या पक्षाचे आहात.''

''ते माझं मला चांगलं ठाऊक आहे.''

''मग या सह्यांनी भरलेल्या पत्राला उत्तर काय देऊ?''

''मी सांगितलं ना, मी कोणत्या तरी प्रार्थनासभेत उत्तर देईन.''

''स्वकीयांचा फार मोठा रोष ओढवून घ्याल बरं!''

''त्याचीही मला सवय आहे, राजेंद्रबाबू.''

''आता तुम्ही कुठं जाणार?''

''आधी कलकत्ता आणि मग तुमच्याच गावी, बिहारमध्ये.''

''या. आम्ही तुमची वाट पाहातो.''

''मला एक सांगा, बिहारमध्ये हिंदूंनी कत्तली केल्या हे खरं?''

''हो.''

''याला जबाबदार कोण?''

''लीग.''

''ती कशी काय?''

''त्यांनी नोआखलीत हत्याकांड केलं. त्याचा सूड घेतला गेला.''

''हेही बरं झालं नाही. दुश्चिन्हंच आहेत ही.''

''निश्चितच. दुश्चिन्हच आहेत. पण म्हणूनच याला आवर घालण्यासाठी आपल्यासारख्यांनी काही निश्चित पावलं टाकायला हवीत. हृदयपरिवर्तनाचा प्रयोग उत्तमच. पण ते होईपर्यंत जे रामायण घडले त्याची परिणाम फार काळपर्यंत आपल्याला भोगावे लागतील. बापूजी, नोआखलीत उघड अत्याचारामुळे हत्या झाली पाच हजार जीवांची. आता बिहार! तिथं चार हजार जीव कामास आले. हे सारं पाहिलं की मन सुन्न होतं. या देशात आता रक्तपाताचंच राज्य येणार की काय असं वाटू लागण्यासारखी स्थिती आहे.''

''राजेंद्रबाबू, आत्ता सर्वत्र अंधार आहे. खरं आहे. पण प्रकाशाला वावच नाही, असं नाही.''

''बापूजी, तुम्हालाच काय तो प्रकाश दिसावा आणि आम्हाला दिसू नये असं थोडंच आहे? मला सध्या तर काळाकुट्ट अंधार दिसत आहे. सरहद्द प्रांताची गत काय झाली? डॉ. खानसाहेब बिचारे हकनाक मारले गेले आणि तिथले खुदाई-खिदमतगार..''

''मी त्यांची समजूत काढणार आहे.''

''बापूजी, लोक काय म्हणतात ठाऊक आहे?''

"काय म्हणतात?"

"गाईलाच धर्म शिकवता. वाघावर संस्कार करायला जात नाही तुम्ही." त्या बिचाऱ्या पख्तूनी लोकांनी केवढ्या आशा बाळगल्या होत्या."

"हो. माणसानं, समाजानं, राष्ट्रानं, आशेवरच जगायचं असतं. पण निराशा पदरी आली की मातीत लोळण नसते घ्यायची, किंवा दुसऱ्याच्या अंगावर धावून नसतं जायचं."

पुढल्या स्टेशनवर राजेंद्रबाबू निघून गेले.

"बापूजी, थोडासा लिंबूरस घेता ना?" मनूने पेला पुढं करीत विचारलं.

"नको मनू, आज लिंबूरस घ्यावासा वाटतच नाही."

"बापूजी, अलिकडं मी बघते आहे, तुमचं वरून सारं काही व्यवस्थित सुरू आहे. पण आत काही तरी बिघडलंय..."

गांधीजी शुष्कसे हसले. गाडी पुढं जातच होती. हेलकावे बसत होते.

"मनू, तुला काय म्हणायचंय?"

"बापू, मी तुमचं दु:ख ओळखलं."

"काय ओळखलंस तू बेटी?"

"हिंदू-मुसलमानांच्या या दंग्यांनी तुमच्या मनावर जबरदस्त आघात केला आहे. त्यांनीच तुम्ही अस्वस्थ झालेले दिसता."

"यापेक्षा फार मोठे आघात आता सहन करायचेत बेटी. मला, तुला आणि या देशालाही."

"कसले आघात बापूजी?"

"फाळणी. या देशाचे तुकडे. या भूमीचे छेद..."

"बापूजी..."

"होय बेटी. हे सत्य आहे. कितीही कटू असलं तरी तेच सत्य आहे. भीषण आहे, पण सत्य आहे."

"तुम्ही फाळणीला संमती देणार?"

"देणार नव्हतो. दिली नव्हती. मीच ना म्हणालो होतो... आधी माझ्या शरीराचे तुकडे तुकडे करा आणि मग देशाची फाळणी करा... पण छे... नोआखली, बिहार, कलकत्ता, दिल्ली, मुंबई... ही रक्तानं माखलेली ठिकाणं डोळ्यांसमोर आली की अंग थरथरतं. उतार वयात आधीच अंग थरारतं. आता फाळणीला संमती देण्यावाचून दुसरा मार्ग नाही मनू."

गांधीजी खिडकीला पाठ लावून बसले होते. त्यांची मान डाव्या खांद्यावर

कलली होती. दोन्ही हातांची जुडी गुडघ्याभोवती टाकली होती. एखाद्या विचारमग्न शिल्पाकृतीसारखे ते दिसत होते, त्यांच्याकडे पाहून मनू खुदकन हसली.

"काय झालं हसायला मनुडी?" गांधीजींनी मान वळवून विचारलं.

"बापू, आत्ता तुम्ही अगदी एखाद्या पुतळ्यासारखे दिसता आहात."

"हं. स्वाभाविक आहे. आता हेच व्हायचंय" गांधीजींच्या स्वरात किंचित खिन्नता होती, किंचित कडवटपणा होता.

"काय स्वाभाविक आहे? काय व्हायचंय बापू?" काही न कळल्यामुळे मनूनं विचारलं.

"बेटी, आता माझे पुतळेच व्हायचेत जिकडं तिकडं."

"मग? व्हायला नकोत? मोठ्या माणसांचे पुतळे उभारण्यात काय वाईट आहे?"

"वाईटच आहे. पुतळा उभारणाऱ्या लोकांना असं वाटतं की पुतळा उभारला की काम संपलं. मग लोक सणासुदीला, जन्मतिथीला आणि पुण्यतिथीला त्या पुतळ्याचीच पूजा करतात. ज्याचा पुतळा आहे त्याचं तत्त्व ते साफ विसरतात."

"मग तुम्ही एक जाहीरपत्रक काढा... माझे पुतळे कोणीही उभारू नयेत."

"काही उपयोग नाही त्याचा."

"का बरं? तुमच्याविरुद्ध, तुमच्या इच्छेविरुद्ध, लोक वागणार नाहीत."

"बेटी, तशी आशा पण जरू करावी. पण इतिहास फार वेगळा आहे. त्यातले दाखले मन सुन्न करणारे आहेत. मनू, बुद्धाचं काय झालं? त्याला तर मूर्तिपूजा नामंजूर! आणि दुर्दैव असं की त्याचेच पुतळे मोठ-मोठे, अवाढव्य... लेण्यातून, मंदिरातून इमारतींतून उभारले गेले. बुद्धाचा मृत्यू आणि बुद्धाच्या तत्त्वाचा मृत्यू एकाच दिवशी घडला बेटी."

"खरं आहे बापू" डावी करंगळी आपल्या हनुवटीवर रोवत मनू म्हणाली.

"बेटी, मी निराशावादी कधीच नव्हतो, आणि नाही. पण हिंदुस्थानात चाललेले हे सारे प्रकार पाहिले म्हणजे स्वातंत्र्यानंतर या देशाचं फार भलं होणार आहे अशी वेडी आशा निदान मी तरी करणार नाही. मला करता येत नाही."

"बापू, नका बोलू तुम्ही फार. हा बघा, तुमच्या कपाळावर घाम आलाय जमून. मी टिपते हं." असं म्हणून गांधीजींच्या कपाळावरचा घाम हलक्या

हातानं पुसला.

"मनुडी, पुढच्या स्टेशनवर प्यारेलालला बोलाव. एक महत्त्वाचं पत्र तयार करायचंय."

"कसलं पत्र बापूजी?"

"पत्र म्हण, पत्रक म्हण. आहे काही तरी. स्वातंत्र्यानंतर काँग्रेसचं विसर्जन करावं, असा ठराव मांडणार आहे मी. त्याचा मसुदा तयार करून ठेवतो आत्ता वेळ आहे तोवर."

"बापूजी!" मनू आश्चर्यानं ओरडली.

"आश्चर्य वाटलं तुला मनू?"

"नाहीतर? काँग्रेससारखी देशव्यापी संघटना, स्वातंत्र्यासाठी देश जागविलेली संघटना बरखास्त करायची?"

"अलबत, काँग्रेसचा उद्देश स्वातंत्र्यप्राप्ती हा होता, आहे. स्वातंत्र्य आता येऊ घातलंय. उद्देश संपला की साधनाचा नाश करावा. नाहीतर तेच डोक्यावर बसतं."

"म्हणजे?"

"मनुडी, काँग्रेस देशासाठी होती. आता मात्र देश काँग्रेससाठी असं होण्याची शक्यता आहे. नव्हे तेच होणार आहे. तू पाहतेसना, सत्तेसाठी याच काँग्रेसमध्ये काय लाथाळी चालली आहे..."

"पण म्हणून संघटनाच संपवायची?"

"का नाही? स्वराज्यासाठी काँग्रेस होती. आता सुराज्यासाठी तिनं दूर व्हावं, नाहीतर निराळी संघटना उभारावी."

"जाऊ दे. बापूजी, मला तुमचं हे काही समजत नाही, उमजत नाही. माझ्यापाशी राजकारणाची चर्चा नको. मला त्यात काही रस नाही."

"रस नाही म्हणतेस, आणि खुबीदार प्रश्न मात्र विचारतेस." मनू अर्थपूर्ण हसली. गांधीजी बाकावर आडवे झाले. बराच वेळ छताकडे बघता बघता वेळ गेला. आणि गांधीजींचा डोळा लागला. मनूनं त्यांच्या अंगावर चादर पांघरली. पुढच्या स्टेशनवर प्यारेलाल डब्यात आले. आणि डोकावून तसेच परत गेले.

आणि अखेर तो सुदिन उगवला... नव्हे ती रात्र उगवली. त्या पूर्वीच्या अनेक रात्री भीषण आणि भयंकर होत्या. ज्या रात्रीपूर्वीच्या अनेक रात्रींनी आपल्या काळोखात अनेक श्वास गुदमरताना ऐकले होते, त्या रात्रींनी देशभक्तांची

ज्वलज्जहाल क्रांतीसूक्ते ऐकली होती, देशबुडव्यांची फसवी राजकारणी चर्चा ऐकली होती. त्या रात्रींनी रक्तपात पाहिला होता, गोळीबार ऐकला होता. पूर्णचंद्र असूनही आपण अंधारात आहोत असं त्या खुद्द रात्रींना वाटलं होतं.

अशा रात्री आता संपल्या होत्या. स्वातंत्र्याचे सुस्वर गीत उद्याच्या पहाटे कानांवर येणार म्हणून ही रात्र आनंदली होती. ही रात्र उद्या उगवणार होती पुन्हा, तेव्हा ती स्वतंत्र भारताची रात्र उगवणार होती. पारतंत्र्यातली ती रात्र! तेव्हाच ते अलौकिक सत्तांतर होणार होतं. वर्षानुवर्षे उराशी बाळगलेले स्वप्न आज सत्य होणार होते.

मग कोण्या कवींना कविता स्फुरल्या-

"शतकानंतर आज उगवली पहिली रम्य पहाट" कुणाच्या शब्दांना अलौकिक सुगंध येऊ लागला. कुण्या प्रतिभावंताची प्रतिभा थयथया नाचू लागली, आनंदानं बेभान होऊन! कुण्या शाहिराचा डफ गर्जू लागला; कुण्या कोकिळकंठी गानसम्राज्ञीचे सुस्वर स्वातंत्र्यगीत आळवू लागले.

त्या रात्री भारताचा दुसराही एक भूभाग-त्याच दिवशी निर्माण झालेला-स्वतंत्र झाला होता. पण धडापासून हात तोडून टाकल्यावर त्या हातात जीव कसा तो राहणार!

कदाचित स्वातंत्र्यदिन साजरा होत होता. पण तो निस्तेज होता. भारतात आनंदाची उधळण सुरू होती.

आणि गांधीजी कुठं होते?"

कलकत्त्यात!

होय! उत्सव साजरा होत होता. पण उत्सवमूर्ती उत्सवात नव्हती. तिला उत्सवाहून अधिक निकडीचं दुसरं कोणतं कार्य होतं. आणि लोक बिचारे वेडे! स्वातंत्र्यकल्पनेने बेभान होऊन नाचणारे! उत्सवमूर्तीशिवाय उत्सव साजरा करीत होते. नाचत होते. गात होते, बोलत होते, घोषणा देत होते...

गगनभेदी घोषणांनी दिल्लीवरलं आकाश दुमदुमून गेलं.

"भारतीय स्वातंत्र्याचा विजय असो"

"भारतमाता की जय."

आणखी एक घोषणा... लाख मुखातून दुमदुमणारी...

"महात्मा गांधी की जय."

पण हा जयकार ऐकायला गांधीजी दिल्लीत नव्हते. गांधीजींचा जयकार करायला कुणाला गांधींची आवश्यकताही भासली नाही. कुणी पुसटशी आठवण

काढली. पण कल्लोळात ती आठवणही बुडून गेली.

या देशात असंच झालंय! होतंय...

तर गांधीजी होते कलकत्त्यात.

पुन्हा त्यांनी आपल्या आवडत्या कार्यात स्वत:ला जणू झोकून दिलं होतं.

मुस्लिम लीगचे महमद उस्मान, गव्हर्नर बरोज आणि शहीद सुरावर्दी यांनी गांधीजींना कलकत्त्यात ठेवून घेतलं होतं. सुरावर्दी गांधीजींना भेटायला आले होते.

"गांधीजी, तुम्ही कलकत्ता सोडू नका. तुम्ही असलात की आम्ही निश्चिंत असतो."

"असं? ठीक आहे. मी राहतो. पण एक अट आहे."

"सांगा. कोणतीही अट असू द्या."

"तुम्ही माझ्याबरोबर राहणार असाल तर मी राहीन."

"मी?" सुरावर्दी चमकून म्हणाले.

"का? जिथं मी राहू शकतो तिथं तुम्ही नाही राहू शकणार?"

"हो... पण... ठीक आहे. राहीन मी." मनाचा निश्चय करून सुरावर्दी म्हणाले.

"सुरावर्दी, प्रसंग बाका आहे. मुलं, वडील, घरचे लोक, साऱ्यांची संमती घेऊन या आणि मग मला होकार द्या."

आणि मग गांधीजींनी हैदर मॅन्शनमध्ये आपला मुक्काम हलवला. या इमारतीचं नावच मोठं. इमारतीची पडझड झालेली होती. चहूबाजूंनी यायला जायला रिकाम्या वाटा आ पसरून होत्या. खिडक्यांच्या काचा फुटलेल्या होत्या. त्या 'मॅन्शन'मध्ये राहणाऱ्यांसाठी एकच शौचकूप होता. आसपासची वस्तीही गलिच्छ! अशा या हैदरी मॅन्शनमधल्या दोन-तीन खोल्यांना स्वच्छ व्हावं लागलं होतं. गांधीजी राहणार म्हणून.

एका अरुंद बोळातून गांधीजी आले. धीमे धीमे पावलं टाकीत, काठी टेकून ते पुढं जात होते. त्यांच्यामागं मनू.

शेकडो संतप्त तरुणांनी हैदरी मॅन्शनला वेढा दिला होता.

"गांधीजी, परत जा."

"गांधी, परत जा."

ते तरुण बेभान होऊन घोषणा देत होते.

"आम्ही मरत होतो तेव्हा नाही तुम्ही आलात. आता का आलात?"

मुसलमानांसाठी! मुसलमान तुम्हाला प्रिय आहेत.''

ते तरुण कंठरवाने ओरडत होते.

सुरावर्दीची गाडी आली. संप्तत तरुण अधिकच बिथरले होते.

''तुमचे प्रतिनिधी पाठवा.'' गांधीजींनी तरुणांना सांगितलं.

''त्यांनी प्रतिनिधी पाठवले, आणि सुरावर्दी मग कोकरू होऊन त्या हैदरी मॅन्शमध्ये सुरक्षितपणे जाऊन बसले.

ते आलेले पाच प्रतिनिधी म्हणजे जणू पाच अग्निगोलक होते. त्यांच्या शब्दाशब्दांतून ठिणग्या पडत होत्या. संतापज्वाला उसळत होत्या. गांधीजी हसतमुखानं त्या ज्वालांचा स्वीकार करीत होते.

''गांधीजी, गेल्या वर्षीची ती कत्तल आठवा. सोळा ऑगस्टला या मुसलमानांनी जिहाद पुकारला, प्रत्यक्ष कृती केली... तेव्हा आमच्या मुलीबाळी बलात्कारामुळं टाचा घासून प्राण देत असताना तुम्ही नाही धावून आलात. आणि आता... आता आलात मुसलमानांसाठी'' एका प्रतिनिधीचे संतप्त शब्द! या शब्दांची आग त्या खोलीला भाजत असतानाच बाहेरून दगडांचा वर्षाव होऊ लागला आणि खिडक्यांच्या उतरल्यासुरल्या काचाही फुटल्या. एक दगड सरळ गांधीजींच्या पायाच्या करंगळीला येऊन भिडला.

मनू दारात मागं उभी होती. ती धावली. तिनं एक पट्टी गांधीजींच्या रक्ताळलेल्या करंगळीला गुंडाळली.

''असू दे मनू. तो दगडही आपलाच, मारणाराही आपलाच आणि ज्याला मारला दगड तोही त्यांचाच. येऊ दे थोडंसं रक्त.'' गांधीजी शान्तपणे म्हणाले. नंतर ते वळून त्या मंडळींना म्हणाले,

''मित्रांनो, नोआखलीतल्या मुसलमानांना मी निर्वाणीचा इशारा दिलाय. माझ्या आयुष्याचा प्रवास मी संपवीत आलोय. पण पुन्हा तुम्ही जातीयवेडानं बेभान झालात तर त्याचा साक्षीदार म्हणून मी जिवंत असणार नाही. तुम्ही शान्त रहा.''

''आम्हाला तुमची अहिंसेवरची प्रवचनं नाही ऐकायची. तुम्हीच इथून चालते व्हा, आम्ही मुसलमान आता औषधालाही शिल्लक ठेवणार नाही.''

''तुम्ही मला बळजबरीनं घालवणार आहात?'' गांधीजींनी कठोरपणे विचारलं, ''पण लक्षात ठेवा, कोणत्याही बळजबरीला मी शरण जाणार नाही. मला ठार मारा, वेडंवाकडं बोला.मी पोलीस बोलावणार नाही. पण मला हे सांगा, मी तुम्हाला हिंदूंचा शत्रू कसा वाटतो?''

कुणीच काही बोलला नाही.

"मी जन्मानं हिंदू, धर्मानं हिंदू आणि आचरणानं कट्टर हिंदू, मी हिंदूंचा वैरी आहे असं तुम्हाला म्हणवतं तरी कसं?" गांधीजींनी कळवळून त्या लोकांना विचारलं.

आणि त्यांच्या विरोधाची आच हळूहळू कमी होऊ लागली. जमाव विरत चालला. तरी धुसफूस मात्र सुरूत होती. नोआखलीत आणि इतरत्र मुसलमानांनी केलेल्या अत्याचारांना लोक विसरले नव्हते. जखमेवर खपली धरत असली तरी वेदना मात्र कायम होती. तीव्रता जाणवणारी होती.

संध्याकाळच्या प्रार्थनेसाठी हैदरी मॅन्शनच्या आवारात लोक जमले. दहा हजारांचा समुदाय!

"सुरावर्दी कुठं आहेत?" पाचपंचवीस खवळलेले आवाज एकदम ओरडले. त्या आवाजात दरडावणी होती, धमकी होती.

"सुरावर्दी आत आहेत." गांधीजींनी सांगितले.

हैदरी मॅन्शन दगडाच्या माऱ्याखाली दडपू लागले. दाराखिडक्यांवर थडाथड दगड आपटू लागले. एखादा-दुसरा दगड आत जाऊन जमीन थरथरू लागली. दगडांच्या माऱ्यांनी आधीच खिळखिळ्या झालेल्या खिडक्या कोलमडू लागल्या होत्या.

होरेस अलेक्झांडर आत होते.

सुरावर्दी जमिनीवर आडवे पडले होते. बाहेरील तरुणांविषयी बोलू नये असं ते बोलत होते. गांधीजी आत आले. गांधीजींनी मनूला सांगितलं.

"मनू, खिडकी उघड."

"बापूजी, बाहेरून दगडमारा सुरू आहे."

"खिडकी उघड" गांधीजी तीव्रपणे म्हणाले.

खिडकी उघडली गेली. गांधीजींनी सुरावर्दींना जवळ येण्याची खूण केली. एक हात सुरावर्दींच्या खांद्यावर आणि दुसरा हात मनूच्या खांद्यावर ठेवून गांधीजी उभे राहिले. खिडकीतून दिसणाऱ्या त्या अलौकिक अनपेक्षित दृश्याने संतापलेले लोक क्षणभर स्थिरावले.

आणि मग सुरावर्दी भाषण करू लागले. लोक ऐकू लागले. त्या रात्री कलकत्त्यात पाच हजार हिंदू-मुसलमानांचा जमाव मिरवणुकीने एकत्र आला. गांधीजींचं कार्य त्या रात्रीपुरतं तरी सफल झालं.

रात्रीचा एक प्रहर टळला होता. सुरावर्दींनी सुरक्षित असल्याबद्दल,

संकटातून पार पडल्याबद्दल नि:श्वास सोडला. त्यांच्या जिवावर उठलेले लोक त्यांचा जीव न घेता, त्यांच्या अंगाला हातही न लावता परतले होते. हे सर्व का? हा चमत्कार कसा झाला?

गांधीजींचा हात सुरावर्दीच्या खांद्यावर होता म्हणून!

होय. म्हणूनच हा चमत्कार झाला. होत्याचं नव्हतं आणि नव्हत्याचं होतं झालं. तरवार उपसणाऱ्याने तरवार म्यान केली होती; नरडीचा घोट घ्यायला येणारा आपलेच हात बांधून परत गेला होता. शिव्या शापांची लाखोली वाहणारा मूक होऊन परत गेला होता. रात्री सुरावर्दी म्हणाले, "बापूजी, येता फिरायला?"

"हो. जाऊ. पण पायी जायचं."

"चालेल. बापूजी, प्रत्येक वेळी तुमची काहीतरी अट असते."

"त्याशिवाय अटीतटीचे सामने जिंकता येत नाहीत."

"फिरायला जायचं कुठं?"

"लेककडं जाऊ."

"चालेल. चला निघू याच."

आतून मनू डोकावत होती. तिच्या डोकावण्याचा अर्थ समजून गांधीजी म्हणाले, "मनू, तू नाही आलीस तरी चालेल या सुरावर्दीसारखा खंबीर माणूस माझ्या दिमतीला आहे."

ज्या सुरावर्दींना काही तासापूर्वी जिवाच्या भीतीनं गांधीजींच्या मागं लपावं लागलं होतं तेच सुरावर्दी गांधीजींच्या बरोबर आता निर्भय होऊन नि:संकोचपणे कलकत्त्याच्या रस्त्यावर हिंडत होते.

आणि तिकडे दिल्लीत आनंदोत्सव सुरू होता. लक्ष लक्ष दीपांनी दिल्ली उजळली होती. रस्ते रात्र असूनही फुलून गेले होते. माणसांची हृदयं छातीत मावेनाशी झाली होती. बिगुल वाजत होते. चौघडे झडत होते. सनई मंजुरवाने गीत आळवीत होती. घोषणांनी आभाळ फाटत होते... मध्यरात्रीला लालकिल्ल्यावर भारताचा ध्वज फडकू लागला... आणि त्याच क्षणी स्वातंत्र्यदेवी भारत भूमीवर प्रकट झाली.

❖

# वीस

येणार येणार म्हणता स्वातंत्र्यदेवी आली. मिळणार मिळणार म्हणता स्वातंत्र्य मिळालं, दीडशे वर्षांचं जोखड दूर झालं. तरी स्वातंत्र्याची फळं या देशातल्या गरीब जनतेला सहज मिळतील असे दिवस दूर होते. उलट नित्य नव्या अत्याचाराच्या वार्ता पाकिस्तानातून येत होत्या. निर्वासितांच्या लोंढ्यांनी सरहद्दीवरली गावं फुगून गेली होती. पाकिस्तानच्या लावसट मागण्या वाढत होत्या. आणि देशाची चिंता वाढत होती.

गांधीजींचा मुक्काम दिल्लीत होता. भंगीवस्तीत मुक्काम करून ते राहिले होते. गांधींची अस्वस्थता दिवसेंदिवस वाढत होती. मानसिक शारीरिकही.

"बापूजी, तुम्हाला आता औषध घ्यायलाच हवं." मनू म्हणाली.

"मनुडी, जी गोष्ट मी करणार नाही हे तुला ठामपणे माहीत आहे तीबद्दल तू आग्रह का धरावास?"

"बापू, प्रेम म्हणून आणि प्रेमाचा अधिकार म्हणून." आजकाल तुम्हाला थोडा थोडा तापही येतो.

"येऊ दे. कितीही ताप आला, कोणतीही व्याधी उद्‌भवली तरी त्यांचा शेवट काय? मृत्यू. त्याकडे तर मी कधीच तोंड फिरवले नाही."

"पण शरीराची आबाळ करूनही चालणार नाही."

"ती मी कधीच केली नाही. पण शरीराचे आणि विशेषतः जिभेचे चोचलेही पुरवू नयेत."

स्वयंसेवकानं चिठ्ठी आणली, पांढऱ्याशुभ्र चौकोनी कागदावर वळणदार अक्षरात लिहिलं होतं,

"आपली भेट हवी, फक्त पंधरा मिनिटे."

- आनंदप्रकाश

"पाठवून द्या त्यांना आत." गांधीजींनी सांगितलं.

मनूनं गांधीजींच्या खाटेसमोर एक चटई अंथरली आणि त्याच वेळी एक उमदा तरुण आत आला. केशरी फिकट रंगाची लुंगी आणि मुंढेछाट पांढरी स्वच्छ पैरण असा त्याचा वेष होता. डोक्याचा भाग जरा मोठाच असला तरी तो शोभून दिसत होता. त्याचं नाक धारदार आणि डोळे तेजस्वी होते. कमावलेल्या शरीराप्रमाणेच त्याची बुद्धीही तल्लख असावी असं पाहताक्षणीच कुणीही जाणलं असतं.

"माझं नाव आनंदप्रकाश." असं म्हणून त्यानं गांधीजींच्या पायाला हात लावून विनम्रपणे अभिवादन केलं."

"बसा बसा" गांधीजी म्हणाले.

आनंदप्रकाश चटईवर मांडी दुमडऊन बसला. तरी तो वीरासन घालून बसल्यासारखा दिसत होता.

"आज मैं आपसे कुछ बाते करने आया हूँ।" आनंदप्रकाश बोलले तेव्हा तंबोऱ्याची तार खर्ज छेडून गेल्यासारखं वाटलं मनूला.

"आपण आनंदानं बोला."

"सध्या आपण भंगी कॉलनीतल्या देवळात प्रार्थनासभा घेता."

"हो घेतो ना."

"आणि देवळात कुराणपठण करता." आनंदप्रकाशचा आवाज किंचित चढलेला होता. त्यांच्या गोऱ्यापान चेहेऱ्यावर लाली आली होती.

"मग? कुराण काय अपवित्र आहे?"

"छे! मी तसं नाही म्हणत. कुराण शिरोधार्य असेल. पण ते हिंदूच्या देवळात कशाला वाचता?"

"पवित्र ग्रंथाचं वाचन पवित्र ठिकाणी करायला काय हरकत आहे?" गांधीजींनी शान्तपणे विचारलं.

"काहीच हरकत नाही. पण महात्माजी, कुराणाचे पठण देवळात करता तसंच गीतेचं पठण मशिदीत का करत नाही?" तीव्र स्वरात आनंदप्रकाशनी विचारलं. मनू चमकली आणि ती दारातून दोन पावलं पुढं आली. गांधीजी काहीच बोलले नाहीत. तेव्हा आनंदप्रकाश उसळले-

"का गीता आपल्याला पवित्र वाटत नाही?"

"प्रकाशजी..." मनू ओरडली.

"बोलू दे त्यांना." संथ स्वरात गांधीजी म्हणाले. "प्रकाशजी, तुम्ही म्हणता ती गोष्ट खरी आहे? तुम्ही विचार करा. गीता मला प्राणाहून प्रिय! गीतेहून पवित्र काय आहे? पण तिचं वाचन मुद्दाम मशिदीत करावं, अभिनिवेशान व्हावं असं मला वाटत नाही."

"गीता मशिदीत वाचावी असं वाटत नसेल पण मग कुराण देवळात वाचावं असं का वाटतं? आपण... स्पष्ट बोलतो माफ करा, आपण मुसलमानांना भिता... त्यांच्या कडव्या वृत्तीपुढं आपली शरणागती असते... म्हणून आपण आपल्याच लोकांवर आपली तत्त्वे लादता. आपण घरच्या म्हातारीचे काळ आहात असं मी म्हटलं तर..."

"चालेल. आपण तसंही म्हणा. आपण काहीही म्हणू शकता." गांधीजी शान्तपणे म्हणाले.

"पण आपण माझ्या प्रश्नांची उत्तरं नाही दिलीत." गांधीजींच्या शान्तपणामुळे उसळून जाऊन आनंदप्रकाश म्हणाले.

"आपण प्रश्न नाही विचारले. आपण केवळ विधाने केलीत. त्यावर मला काहीही बोलायचं नाही."

आनंदप्रकाशचा आता नाईलाज झाला. त्यांना पुढं बोलायला वाट राहिली नाही. बराच वेळ कुणी कुणाशी बोललं नाही. ती शान्तता बोचणारी होती.

"मनू, पाहुण्यांचं आदरातिथ्य कर." गांधीजी दाराकडे वळून म्हणाले.

"माफ करा, मी चहा, कॉफी, दूध काही घेत नाही." तुटकपणे आनंदप्रकाश म्हणाले.

"पण आम्ही तुम्हाला त्यातलं काहीच देणार नाही." हसून गांधीजी म्हणाले. मनू बाहेर आली तिच्या हातात चिनी मातीची एक बशी होती. बशीत भिजलेले शेंगदाणे आणि ताडगुळाचा खडा होता.

"घ्या. हे आमचं देशी आदरातिथ्य."

"नको मला. मी जातो."

"अहो आमच्यावर राग असू द्या. या बिचाऱ्या शेंगदाण्यांवर आणि त्या गुळाच्या खड्यावर राग का?"

"नाही तसं नाही. घेतो..."

आनंदप्रकाश निघून गेले. आणि गांधीजींना थकवा आल्यासारखं वाटू लागलं. खोकल्याची ढासही लागली. मनूनं गरम पाण्यानं छाती शेकली तरी ढास थांबेना. अंग थोडं गरम होऊ लागलं.

"सुशीलाबेन येईलच आता तोवर बापू तुम्ही विश्रांती घ्या." मनू म्हणाली,

"आता घ्यायलाच हवी विश्रांती. शरीर चालतंय कुठं?" काहीशा दबल्या आवाजात गांधीत म्हणाले.

"आणि बापू, आता तुम्ही माझं एक ऐका."

"काय?"

"मनाला ताप होईल असले वादविवाद करायचे नाहीत. अशा लोकांची भेट घ्यायची नाही."

"असं कसं म्हणतेस बेटी! सारे आपलेच आहेत आणि मी कुणाला भेटही दिली नाही तर लोकांना काय वाटेल?"

"असा सारखा लोकांचा विचार केलात म्हणून तर असं झालंय. पडा आता जरा. आता मी तुम्हाला हलू द्यायची नाही." असं म्हणून एखाद्या लहान मुलासारखं हातानं थोपटून मनूनं गांधीजींच्या अंगावर चादर घातली.

रात्री दिल्लीतले हिंदु-मुसलमान पुढारी गांधीजी भेटायला आले. कारण... कारण गांधीजींनी उपवास जाहीर केला होता. गांधीजींचा उपवास म्हणजे साऱ्या देशावरचं संकट.

मंडळी चर्चा करून बाहेर आली. तेव्हा दिल्लीच्या आभाळात शुक्र उगवला होता. कुणाच्या चेहेऱ्यावर समाधान नव्हतं. असंतोष, चिंता यांनी व्यग्र झालेली ती माणसं पायात मणामणाच्या बेड्या अडकवल्या सारखी चालत होती.

मुसलमान मंडळी निघून गेली. आणि मग राहिलेल्यापैकीच कुणीतरी चालता चालता त्या मूक वातावरणाला वाचा फोडली.

"अगोदरच पाकिस्तानच्या हातावर पंचावन्न कोटीचं उदक सोडलंय."

"त्यात आणखी या अटी? म्हणे पाडलेल्या मशिदी परत बांधून द्या."

आणखी नाही का काही? मेलेले मुसलमान जिवंत करून द्या असं नाही म्हणाले हे नशीब!

आमची पाडलेली देवळे ते बांधून देतील का?

आमच्या बायकांवर झालेल्या बलात्कारांबद्दल प्रायश्चित्त घेतील का?

अशा विविध उद्‌गारांनी वातावरणाला छेद जाऊ लागले. चालता चालता आपण बोलत कोणत्या रस्त्याला आलो हेही त्या बापड्यांना कळलं नाही. गांधीजींसमोर ते काही बोलू शकले नाहीत, बोलले नाहीत; म्हणून मग दबलेली तोंडाची वाफ अशा रीतीने ते मोकळी करत होते. आणि मग भंगी

कॉलनीतल्या त्या अरुंद रस्त्यांवरून ती वार्ता. दिल्लीभर पसरली, दिल्लीनं ती देशभर नेली आणि जगानंही ऐकली.

गांधीजींनी उपवास सुरू केला.

एक, दोन... तीन... चार... पाच...

गांधीजींना बिर्लाभवनात हलवण्यात आलं. पत्रकावर पत्रके निघू लागली. दिल्ली थोडी शान्त झाली होती. खद्खद्णारा असंतोषाचा ज्वालारस आता तडागातील जलाशयासारखा स्तब्ध झाला होता.

रात्री राजेंद्रबाबू भेटायला आले. आणि गांधीजींच्या अगदी पायांशी नम्रपणे बसले.

"बापूजी, आपण उपवास सोडावा."

"का सोडावा?" क्षीण आवाजात गांधीजींनी विचारलं.

"आम्हा सर्वांसाठी. बापूजी, आम्हाला बघवत नाही आपल्याकडे."

"बाबू, नाहीतरी आता काही फार दिवस मी जगत नाही," जगण्याची इच्छाही नाही. राम राम राम..." पुटपुटत गांधीजी म्हणाले.

"बापूजी, तुम्ही फार बोलत आहात" जवळच असलेल्या प्यारेलालनी दटावलं.

"बोलू दे रे. तुम्ही सारे माझ्यावर असा पहारा नका करू. निदान आता शेवटी शेवटी तरी मला माझं मन मोकळं करू द्या. राजेंद्रबाबू, फाळणीमुळं या देशाची हानीच होणार. स्वातंत्र्य आलं. राजकीय गुलामगिरी गेली. पण लालकिल्ल्यावरचा एक ध्वज जाऊन आपला म्हटलेला दुसरा एक ध्वज आला. यापलीकडं काय झालं? बाबू, याच गोष्टींच्या फार फार वेदना हातात मला."

"ही बात अगदीच अलग आहे बापूजी. आपल्या लोकांना सुधारू शकतो."

"नोआखलीपासून ती आशा मी सोडली आहे. दुसऱ्या लोकांचं जाऊ द्या, काँग्रेसमधेच आपल्या काय चाललंय! अनृत, असत्य, अनाचार, अवैध असं सारं काही चाललंय. बाबू, स्वातंत्र्यप्राप्तीचा उद्देश आता संपलाय. तेव्हा काँग्रेस बरखास्त करावी हे चांगलं."

"बापूजी, विषयातून विषय वाढत चाललाय." मनूनं थोडी दटावणी दिली. "राजेंद्रबाबू, तुम्हीच आलात की बापूजींना फार फार बोलावंसं वाटतं. का कुणास ठाऊक."

"ठीक आहे बेटी. मी यातली सूचना समजलो. मी आता जातो." राजेंद्रबाबू हसत हसत म्हणाले.

जवाहरलाल, वल्लभभाई, सरोजिनी नायडू, विनोबा, काकासाहेब, कृपलानी, सारी मंडळी भेटून गेली. गांधीजींची क्षीणता दिवसेंदिवस नव्हे तासागणिक वाढत होती. लोक चिंतातुर होते.

आणि मग लोकांना दुसरा मार्गच राहिला नाही. पुन्हा एकदा तोच देखावा झाला. देखाव्याचं चित्र तेच असलं तरी यावेळी रंग मात्र वेगळे होते. हिंदू-मुसलमानांनी हातात हात घालून गांधीजींना वचने दिली.

ती पाळण्यासाठी होती का नव्हती कुणास ठाऊक!

पण वचने दिली.

हिंदूंनी मुकाटपणे माना खाली घालून मशिदी बांधून देण्याचं कबूल केलं. आपल्या बांधवांच्या या उदार दृष्टिकोनामुळे नेहमीप्रमाणे मुसलमान संतुष्ट झाले.

हिंदूंनी मुसलमानांना निर्भयपणे वावरू देण्याचं आश्वासन दिलं.

मुसलमानांच्या सर्व हक्कांचं आम्ही संरक्षण करू असंही आपल्या तोंडानं सांगितलं. हातावर हात मारून अभिवचन दिलं.

मुसलमानांनी सर्व हिंदूना काय दिलं?

काही नाही.

कारण यावेळी त्यांनी काही द्यायचं नव्हतंच. पाकिस्तानने पंचावन्न कोटी रुपये घ्यायचे होते. मुसलमानांनी मशिदी बांधून घ्यायच्या होत्या. निर्भयपणे जगविण्याचं अभिवचन घ्यायचं होतं.

मुसलमानांनी एक मात्र गोष्ट दिली.

या सर्व अटी राबवून घेण्याचं अभिवचन दिलं.

आणि पुन्हा एकदा त्यांच्या हातावर उदक सुटलं.

आणि मगच गांधीजींचं उपोषण सुटलं. आझादांनी मुसंब्याच्या रसाचा पेला पुढं केला. गांधीजींनी तो तोंडाला लावला. गांधीजी अनासक्त होते. आहार काय, निराहार काय. त्यांची कुडी, त्यांचं मन बदलत नव्हतं. इतरांना मात्र आपलंच उपोषण सुटून आपल्या पोटात उठलेला भुकेचा कल्लोळ शमला असं वाटलं आणि संतुष्ट मनानं मंडळी घरोघर गेली.

पावसानं दिल्लीला झोडपायला सुरुवात केली होती. त्यात कडाक्याच्या थंडीनं भर घातली होती. मशिदींच्या आसऱ्याला आलेल्या निर्वासितांना मशिदीबाहेर

पडावे लागले होते. थंडीच्या लाटेत आपली कुडकुडती शरीरं आणि उदासवाणी मनं घेऊन माणसं आसरा शोधत होती. यांना आसरा द्यायचा कुठं या कल्पनेनं दिल्लीतली राजकारणी भलीभली माणसं कपाळाला हात लावून बसली होती.

पाठीवर गाठोडी घेऊन, मुलाबाळांना पोटांशी कवटाळून, थंडीपावसाशी सामना देत देत माणसांच्या, स्त्रियांच्या व्याकुळ नजरा शोधीत होत्या आसरा! छत आणि निवारा. अन्नाची चिंता मागून. तीही होतीच. पण आधी ही निपचित होणारी शरीरं कुठं तरी टेकवली पाहिजेत ना. अर्थातच त्या वेदना, ते नि:श्वास, ती धडपड, ती आर्तता यांचा मागमूसही बिर्लाहाऊसपर्यंत येऊन पोचत नव्हता. नाहीतर...

नाहीतर गांधीजी आणखी अस्वस्थ झाले असते. आणि त्यांनी आणखी उपवास केला असता.

आभाळ कुंद झालं होतं. चित्रविचित्र ढगांनी आभाळात गर्दी केली होती. बिर्ला हाऊसची एरवी शोभून दिसणारी हिरवळ आज मलूल पडली होती. तरी या वातावरणातही प्रार्थनासभेसाठी माणसांची तुडुंब गर्दी झाली होती. हिरवळीपलीकडे लगतच्या एका चौथऱ्यावर प्रार्थनेची जागा होती. बिर्ला हाऊसमधील गांधीजींच्या खोलीकडे साऱ्यांचे डोळे लागले होते.

स्वर्गाच्या दारातून देवदूत बाहेर पडावा तसे गांधीजी दारातून आले. शुभ्र स्वच्छ स्मित; प्रसन्न मुद्रा... मनू आणि आभा दोघी आधाराला होत्या. लोकांनी वाट करून दिली. कुणी प्रणाम केले, कुणी दंडवत घातले, कुणी नमस्कार केला. सातासमुद्रापलीकडून आलेल्या कुण्या गौरांगाने हस्तांदोलनासाठी हात पुढं केला आणि त्याला मऊशार हाताचा स्पर्श झाला.

गांधीजी स्थानापन्न झाले. आणि "आज भजन कोण म्हणणार" अशा अर्थानं त्यांनी मनूकडे पाहिलं.

एवढ्यात संतप्त आवाजातल्या काही घोषणा आल्या. पाच-पंचवीस काळे झेंडे वर सरसावले. दूरवरून गांधीजींनी ते पाहिले.

"बापूजी, तुमच्याविरुद्ध निदर्शनं आहेत."

"का म्हणून?"

"तुम्ही मुस्लिमधार्जिणे म्हणून."

"मग? त्यासाठी ही निदर्शनं कशाला?"

"तरी आम्ही त्यांना तिथंच थांबवून ठेवलंय."

"का बंदी केलीत त्यांना! असं नको होतं व्हायला."

"तुमच्या सुरक्षिततेसाठी."

एवढ्यात एका पंजाबी युवतीनं वैष्णवजन तो तेने कहिये... हे भजन म्हणायला सुरुवात केली म्हणून हा संवाद थांबला. निदर्शकही निघून गेले होते.

भजन संपलं आणि गांधीजी बोलू लागले.

"मित्रहो. आताच माझ्यापुढं ही निदर्शनं झाली. काळे झेंडे दाखवले. मी मुसलमान धार्जिणा म्हणून मला त्या निदर्शकांविषयीही आदरच आहे. कारण तेही आपलेच आहेत."

आणि डाव्या बाजूच्या भिंतीकडून कानठळ्या बसविणारा आवाजा आला. एखादा तेजोगोल अंगावर चाल करून यावा तसं काही तरी गांधीजींच्या दिशेनं आलं. पण ते फेकणाऱ्याचा हेतू नाही सिद्धीस गेला. दिशा चुकली... नेम गेला.

भिंतीला भलं मोठं भगदाड पडलं होतं... दोनचार माणसं सहज जातील एवढं. त्या कर्णभेदी आवाजाने प्रार्थनासभा थरारून गेली होती. पोरंबाळं आपल्या आयांना बिलगली. म्हाताऱ्याकोताऱ्यांनी कानात बोटं घातली. तरुणांनी चिकित्सेनं, कुतूहलानं इकडे तिकडे धाव घेतली. बिर्ला हाऊस सारं कसं शहारून गेलं.

गांधीजींनी पुन्हा भाषणाला सुरुवात केली. जणू काही घडलंच नाही अशा रीतीनं ते बोलले. प्रार्थनासभा संपली. धडधडत्या अंत:करणानं लोक घरोघर गेले. गांधीजी मनू आणि आभा यांना घेऊन आपल्या निवासात गेले. जाणाऱ्या प्रत्येकाच्या कानात तो आवाज होता आणि डोळ्यांसमोर भिंतीला पडलेलं ते भलं मोठं भगदाड होतं. सुदैव एवढंच की आणखी काही बघण्याचा प्रसंग टळला होता.

पहाटेचे साडेतीन वाजले होते. शुक्राला नुकताच आभाळात प्रवेश करता आला होता. स्वच्छ आभाळाकडे पहात गांधीजी उठले आणि प्रात:स्मरण झाल्यावर विश्रांतीसाठी लवडले. पण विश्रांती मिळेना. शरीराला मिळाली तरी मन स्वस्थ बसेना. म्हणून उठून बराच वेळ लिहीत बसले.

सूर्य बराच वर आला तेव्हा प्यारेलाल आले. प्यारेलालनी पाहिलं, गांधीजींचा चेहेरा प्रगूढ, गंभीर दिसत होता.

"बापूजी, काय चाललंय?"

“काल रात्रीच तुला सांगितलं होतं. काँग्रेसची घटना तयार करतोय.” वर पहात गांधीजी म्हणाले.

“आज तुम्ही मला बरे दिसताय.”

“आज तुमचे डोळे चांगले आहेत म्हणून मी तुम्हाला चांगला दिसतोय.” हसून गांधीजी म्हणाले.

आणि मनू आली.

“आमचा पहारेकरी पाहिलात प्यारेलाल?” गांधीजींनी मनूकडे पाहात विचारलं.

“बापूजी, तुम्हाला आता खरोखरीच पहारेकरी हवाय. बॉम्बहल्ल्यापासून मला तर बाई तुमची फार काळजी वाटू लागली आहे.

“मनू मी तुला दोन-तीन दिवसांपूर्वी एकदा बोललो होतो.”

“प्यारेलालजींना तरी सांगा.”

“तुम्ही लोक मला महात्मा समजता.”

“मग?”

“माझ्यावर त्यामुळं फार मोठी जबाबदारी येऊन पडते.”

“कसली?”

“बेटी, महात्म्याचं मरणसुद्धा महान, लोकविलक्षण असावं लागतं.”

“म्हणजे? मी नाही समजले.”

“मी जर चारचौघांसारखा अंथरुणावर पडून, शान्तपणे किंवा हाय खाऊन मरण पावलो तर मी कसा महात्मा?”

“मग?”

“माझी अशी इच्छा आहे की- कुणीतरी पिस्तुल सरसावून पुढं यावं. मी माझी छाती ताठ मानेनं पुढं करावी, त्याच्या गोळ्या मी माझ्या छातीवर झेलाव्या... आणि रामनाम घेत घेत माझा देह मातीत मिसळावा... बेटी असं काही घडलं तरच मी महात्मा.”

“बापू” गांधीजींच्या तोंडावर हात ठेवीत मनू ओरडली. “काहीतरी अभद्र बोलून आम्हाला भिववू नका.”

“मृत्यू काय अभद्र असतो?”

“नाही; लाख भद्र असतो. सुंदर असतो. पण तुम्ही नका बोलू.”

“वेडी रे वेडी.” असं म्हणत गांधीजींनी मनूच्या डोक्यावर एक चापट मारली आणि प्यारेलालजींकडे वळून ते म्हणाले,

"बोला प्यारेलालजी, आजचा कार्यक्रम काय आहे? काही काम नसेल तर... आज मी..."

"काय करणार आहात बापू? मी सर्व भेटी रद्द करतो हव्या तर."

"प्यारेलाल" गांधीजींचा स्वर जड झाला होता. "का कुणास ठाऊक, आज मला महादेवची आणि बाची आठवण येते. मन त्यांच्या आठवणीभोवती रुंजी घातलंय. काही काम विशेष नसलं, तर आज मी स्वस्थ चिंतन करणार आहे."

"बापूजी, आज तर दहावीस मुलाखती आहेत. दुपारी सरदार यायचेत ना. चर्चा करायला. मौलाना येणार आहेत."

"ठीक आहे. महादेवला मी मनाच्या गाभाऱ्यात बसवून ठेवतो. तो बिचारा शालीन आहे. सांगेल तसं वागतो."

प्यारेलाल निघून गेले. खोकल्याची ढास वाढत होती. आतल्या बाजूला काहीतरी कुटल्याचा आवाज येत होता. गांधीजींनी डोकावून पाहिलं. मनू लवंगा कुटत होती.

"बेटी, आत्ता कशाला हे करतेस?" गांधीजींनी विचारलं.

"बापू, रात्रीच्या वेळी लवंगांची भुकटी लागली तर कुठं बघू?"

"कुणास ठाऊक, रात्र होण्यापूर्वीच काय घडणार आहे! कशाला रात्रीची काळजी! तू आपलं काम आवर आणि लिहायला ये."

"बापू, आज सकाळपासून तुम्ही असं का बोलताहात?" मनू त्रासिकपणे म्हणाली. पण गांधीजींनी तिला उत्तर दिलं नाही. ते फक्त मृदुमधुर हसले. मृत्यू या शब्दाच्या उच्चारानं किंवा केवळ कल्पनेनं त्या पोरीचा थरकाप होत होता याची गंमत पहात होते.

दुपारी सरदार आले. चर्चा गंभीर होती. रंगली होती. चर्चा लवकर संपण्याचं चिन्ह दिसेना. आभाची गडबड उडाली. तिनं हळूच घड्याळ काढलं आणि गांधीजींना दाखवलं. त्याचा अर्थ काय समजायचा तो दोघेही समजले.

बिर्ला हाऊसच्या पटांगणावर नेहमीप्रमाणे तुडुंब गर्दी झाली होती. प्रार्थनास्थळापर्यंत जाणाऱ्या अरुंद रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी छोटी झुडपं शोभा देत होती. लोकांनी हिरवळीला झाकून टाकलं होतं. लोकांचे आतुर डोळे गांधीजींची वाट पहात होते.

अखेर थोडे उशीराच गांधीजी आलो. नेहमीसारखं मंद- मधुर स्मित... दोन्ही बाजूला मनू आणि आभा या हातकाठ्या. धीमी धीमी पावलं टाकीत

हास्यविनोद करीत ते पुढं येत होते. कुण्या लहानग्या मुलानं एक टपोरं गुलाबाचं फूल पुढं केलं. तेव्हा त्याचाच गालगुच्चा घेऊन त्याला ते फूल परत केलं गांधीजींनी... लोकांनी केलेल्या साखळीतून गांधीजी प्रार्थनास्थळी पोचले आणि तिथं जमलेल्या जनसमुदायाला नमस्कार करण्यासाठी त्यांनी हात जोडले.

उजव्या बाजूला थोडी रेटारेटी झाली, कोणी एक त्या तुंबळ गर्दीतून मार्ग करीत मुसंडी मारीत पुढं आला. त्याला गांधीजींच्या पायाला स्पर्श करायचा होता.

"आता पुढं नका येऊ. प्रार्थनेला आधीच उशीर झालाय." मनूनं त्याला दटावलं.

त्याबरोबर त्यानं मनूचा हात हिसकला आणि तिला खेचून दूर केलं. मनूच्या हातातल्या सर्व वस्तू तुटलेल्या माळेतील मण्याप्रमाणे विखुरल्या.

"आज आपल्याला प्रार्थनेला उशीर झाला." तो म्हणाला.

"होय झाला खरा."

... आणि... आणि मग घडले ते विपरीतच...

थाड् थाड् थाड्...

त्याच्या पिस्तुलातून तीन गोळ्या सुटल्या होत्या. त्या आज्ञाधारक गोळ्यांनी आपले काम चोख केले होते.


रक्ताच्या थारोळ्यात गांधीजींचा देह पहुडला होता. जमावात विलक्षण कोलाहल झाला. मनू किंचाळली, आभा ओरडली. लोकांना समजले तेव्हा त्यांच्या हंबरड्यांनी आभाळ फाटले... पण ऐकायला गांधीजी होते कुठं...

मुंगीला रीघ नव्हती. माणसाला माणूस दिसत नव्हतं. पुढारी पुढारी राहिला नव्हता. साऱ्यांची भावना एकच. साऱ्यांचं दु:ख एकच. साऱ्यांना नदीच्या तीरावर दिसत होत्या त्या फक्त ज्वाला! चितेच्या ज्वाला. गांधीजींचा देह खाऊन टाकणाऱ्या त्या भक्षक ज्वाला. तूप आणि चंदन खाऊन त्यांच्या जिभा लकलकत होत्या. पण तरीही...

त्या ज्वाळांना कंठ असता, त्या ज्वाळांना स्वर असता तर आभाळापर्यंत पोचून म्हणाल्या असत्या-

वैष्णवजन तो तेने कहिये... जो पीड पराई जाने रे...

❖



डॉ. न. म. जोशी

चंगळवाद, दहशतवाद, वैचारिक गोंधळाचे वादविवाद यांनी भारताचेच नव्हे तर जगाचेही सांस्कृतिक पर्यावरण प्रचंड प्रमाणावर प्रदूषित झाले आहे. अशा काळात सत्यअहिंसेचे तत्त्वज्ञान मांडणारे व जगणारे महात्मा गांधी हे भारताला पडलेलं एक धूसर स्वप्न होतं असं वाटण्याची शक्यता आहे.

आजच्या काळवंडलेल्या काळातील अनेक समस्यांना गांधीजींच्या तत्त्वज्ञानात स्पष्ट, स्वच्छ आणि परिणामप्रभावी उत्तरे सापडतील. सुप्रसिद्ध साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ, ख्यातनाम वक्ते डॉ. न. म. जोशी यांनी 'मोहनदास करमचंद' या चरित्रात्मक कादंबरीत महात्मा गांधी यांचा सुरेख जीवनपट प्रत्ययकारी शब्दांत उलगडून दाखवला आहे.

एका युगकर्त्याची ही शैलीदार व प्रभावशाली जीवनकथा!

उत्कृष्ट साहित्यकृती म्हणून वाचक, वक्ते , समाजचिंतक, शिक्षक 'मोहनदास करमचंद' चे भरभरून स्वागत करतील असा विश्वास आहे.

अनुबंध प्रकाशन

Manisha